# अभ्यासक्रम

# आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र : सिध्दांत आणि धोरण

# (अर्थशास्त्र पेपर नं.८)

विभाग १ (तासिका)

## १. आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दांत (१२ लेक्चरर्स)

आंतरारष्ट्रीय अर्थशास्त्राचे महत्त्व :- परकीय व्यापार व परकीय गुंतवणूकीचे फायदे. तुलनात्मक खर्च लाभ सिध्दांत : टॉसीगचे पूर्नप्रतिपादन, तुलनात्मक लाभसंदर्भातील काही गैरसमज, गरिब – श्रमिक युक्तीवाद, आंतरराष्ट्रीय व्यापाराचा घटक विपुलता सिध्दांत, हेक्चर – ओहाभिन प्रतिमान, हेक्चर – ओहलिन सिध्दांतावरील सैंधातिल पुरावा, लिऑन्टिक विरोधाभास.

## २. आंतरराष्ट्रीय घटक हालचाली गतिशिलता (१२ तासिका)

श्रम व भांडवलाची गतिशिलता निर्धारित करणारे घटक, श्रमगतिशिलता आणि श्रमाचे स्थलांतर : आंतरराष्ट्रीय प्रवृत्ती, वेतन एककेंद्रभिमूखता. परकिय गुंतवणूकीतील प्रवृत्ती : अनुदान, स्वायत्त गुंतवणूक, प्रत्यक्ष थेट गुंतवणूक : बहुउद्द्येशीय कंपण्याशी अनुभव.

## ३. व्यापारी धोरणे (१२ लेक्चरर्स)

मुक्त व्यापार आणि कार्यक्षमता, संरक्षणवाद, व्यापार आणि वृध्दीचे डावपेच युक्तीवाद : आयात पर्यायी औद्योगिकरण आणि निर्यात प्राधान्य औद्योगिकरण.

जागतिक व्यापार संघटनेतंर्गत () व्यापार उदारिकरण, व्यापारी धोरणातील मतभेद – श्रमदर्जा, पर्यावरण, बौध्दिक संपदा () आणि व्यापार आणि जकातविषयीचा सामान्य करार () इ. संदर्भात, जागतिक व्यापार संघटनेची तंटा मिटवणारी यंत्रणा.

## ४. व्यापारी धोरणाची साधने (१४ लेक्चरर्स - तासिका)

जकात : अर्थ, अंमलबजावणी परिणाम आणि उदाहरणे (वर्गात व्यष्टी अध्ययना विषयी चर्चा करणे.), पर्याप्त जकातीचा सिध्दांत.

जकातसंघ सिध्दांत : व्यापार निर्मिती आण व्यापार विविघता बिगर – जकातबंधने : निर्यात अनुदान, आयात कोटा, स्वेच्छा निर्यात बंधने, अधिमान्य व्यापार करार, विक्रेयवस्तू करार : अर्थ, परिणाम आणि व्यष्टी अध्ययन (वर्गात चर्चा करणे).

## विभाग २

### ५. व्यवहारतोल (१२ तासिका)

व्यवहारतोलाची रचना, व्यवहारतोलातील जमाखर्चाची तत्वे (द्विनोंद पध्दत), व्यवहारतोलाची मुलभूत ओळख. असंतुलीत व्यवहारतोल – कारणे आणि प्रकार व्यवहारतोलातील तुट कमी करण्याच्या पध्दती, परिणामकारक अवमूल्यन : मार्शल - लर्नर शर्त.

### ६. परकिय विनिमय बाजार (१२ तासिका)

अर्थ आणि कार्ये : स्वरुप आणि (सहभागीदार), घटक दलालांची भूमिका, विनिमय दर सिध्दांत : व्यवहारतोल सिध्दांत आणि खरेदीशक्ती समता दर सिध्दांत. तात्काळ (हजर) आणि वायदा दर, विनिमय दर धोके : कारणे आणि व्यवस्थापन (वायदा दर करार, देवाणघेवाण आणि चलन पर्याय)

### ७. आंतरराष्ट्रीय मौद्रिक पध्दत (१२ तासिका)

सूर्वणपरिणाम पध्दतीचा आढावा, कोसळलेली (नष्ट) ब्रिटनवूडस पध्दत. स्थिर विरोधी लवचिक विनिमय दर पध्दत, बदलत्या विनिमयदर पध्दतीचा उद्य : अर्थ, मध्यवर्ती बँकेची भूमिका मौद्रिक धोरण स्वायत्तता (स्वातंत्र्य) प्रश्न/समस्याः आंतरराष्ट्रीय रोखता आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची भूमिका चलनआरिष्ट्य : अर्थ आणि परिणाम, दक्षीणपूर्व आशिया चलन आरिष्ट्य, १९७३ – १९८० मधील वाढत्या तेलकिंमतीतील विनिमयदराचा अनुभव, विकसनशिल देशांचा चलनआरिष्ट्यांचा धडा/अनुभव.

### ८. आर्थिक एकात्मीकरण व व्यापारगट (१२ तासिका)

आर्थिक एकात्मीकरणाचा अर्थ आणि फायदे, आर्थिक एकात्मीकरणाचे प्रकार (मुक्त व्यापार क्षेत्र, आंशिक एकात्मीकरण, सीमाशुल्क, जकातसंघ, सामाईक बाजारपेठ, आर्थिक संघटना). व्यापारी गटांचे अनुभव आणि मूल्यमापन : उत्तर अमेरिकन मुक्त व्यापारी क्षेत्र, दक्षिण अमेरिकन मुक्त व्यापारक्षेत्र तेल उत्पादित व निर्यातीत देश, युरोपियन संघटना आणि प्रादेशिक सहकार्यासाठी दक्षिणपूर्व आशियाई संघटना.

❖❖❖

# १

# आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र : सिद्धांत आणि धोरण

## ( International Economics : Theory & Policy)

**घटक रचना / पाठ्यक्रम**

१.० उद्दिष्ट्ये
१.१ प्रस्तावना
१.२ आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राची व्याख्या व महत्त्व
१.३ आंतरराष्ट्रीय व्यापाराची ठळक वैश्टिये
१.४ आंतरप्रादेशिक व आंतरराष्ट्रीय व्यापारातील फरक
१.५ प्रश्नमालिका

## १.० उद्दिष्ट्ये :

जागतिक अर्थव्यवस्थेत आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रामुळे देशाचा आर्थिक, सामाजिक व राजकीय विकास घडून येण्यास मदत होते. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र या पाठात आपण आंतरराष्ट्रीय व्यापाराच्यादृष्टीने अभ्यास करणार आहोत. या पाठाची उट्टिष्ट्ये खालीलप्रमाणेः

१) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राची संकल्पना व महत्त्व यांचा अभ्यास करणे.
२) आंतरप्रादेशिक व आंतरराष्ट्रीय व्यापार यातिल फरक अभ्यासणे.
३) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या विविध वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

## १.१ प्रस्तावना:

जागतिक अर्थव्यवस्थेच्या स्वरूपात आणि व्यवहार पद्धतीत अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. जागतिकीकरणाने वेग घेतला आहे. जागितक व्यापार संघटना (WTO) कार्यान्वित होत असल्याने आयात - निर्यात व्यापारावरील विविध नियंत्रणे आणि बंधने कमीत कमी होत आहेत. समाजवादी अर्थव्यवस्थांच्या मर्यादा रशियाच्या विघटनामुळे जगापुढे आल्या आहेत. केंद्रिय पद्धतीच्या नियोजीत अर्थव्यवस्था बाजारव्यवस्थेकडे झुकू लागल्या आहेत. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ झाली आहे. व्यापाराचे स्वरूप आणि रचना यामध्ये अलीकडच्या काळात खूप मोठा बदल होत आहे. उत्पादन घटकांची आतरराष्ट्रीय गतिशीलता वाढत आहे. वाहतूक दळणवळण आणि तंत्रज्ञान इत्यादींमध्ये खूपच सुधारणा होत आहे. त्याचाही आंतरराष्ट्रीय व्यापारास आणि म्हणून आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रास महत्त्व प्राप्त झाले आहे.

सध्या जगातील सर्वच देश आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातून जोडले गेले आहेत. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या गुंतवणूक, रोजगार, उत्पादन, बचत आणि किंमत पातळीवर परिणाम

होत असतो. व्यापाराचा परिणाम कसा आहे? तो कसा असावा ? त्यासाठी धोरणात्मक साधने कशी वापरता येतील याचा अभ्यास आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रात केला जातो.

जकात आणि व्यापारासंबंधीच्या सर्वसाधारण कराराची (GATT) ऊरूग्वे फेरी स्वीकारण्यामुळे जगातील देश व्यापाराच्या बाबतीत अधिकाधिक जवळ येत आहेत. १ जानेवारी १९९५ रोजी जागतिक व्यापार संघटनेची (WTO) स्थापना करण्यात आली असून सध्या संघटनेचे १४० देश सदस्य आहेत. यावरून आंतरराष्ट्रीय व्यापाराचे महत्त्व जगातील बहुतेक सर्वच देशांनी मान्य केल्याचे स्पष्ट होते. आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे काय हे स्पष्ट करण्यासाठी व्यापार म्हणजे काय ते पाहणे संयुक्तिक ठरते. "दोन व्यक्ति किंवा संस्थांमधील वस्तू व सेवांच्या ऐच्छिक, वैधानिक आणि परस्परांमधील देवाण - घेवाणीस व्यापार म्हणतात." अशा प्रकारचा व्यापार पैशाच्या माध्यमातून होत असतो. व्यापारामध्ये वस्तुच्या उत्पादनापासून त्या उत्पादनाची विक्री होईपर्यंत ज्या क्रिया घडून येतात त्या सर्व क्रियांचा समावेश व्यापारामध्ये होत असतो.

**व्याख्या –**

### अ) आंतरप्रादेशिक व्यापार – (Inter regional Trade)

"जेव्हा एकाच देशातील दोन किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्ति किंवा व्यक्तिसमुहामध्ये व्यापार चालतो तेव्हा अशा व्यापारास आंतरप्रादेशिक किंवा देशांतर्गत व्यापार असे म्हणतात."

उदा. महाराष्ट्रातील एखादी व्यक्ती/व्यापारी गुजरातमधील एखाद्या व्यापा-याबरोबर व्यापार करतो तेव्हा तो आंतरप्रादेशिक व्यापार ठरतो.

### ब) आंतरराष्ट्रीय व्यापार -(Inter national Trade)

" दोन किंवा अधिक राष्ट्रांमध्ये चालणा-या व्यापारास आंतरराष्ट्रीय व्यापार असे म्हणतात."

उदा. भारताचा व्यापार अमेरिका, रशिया, चीन, इंग्लंड इत्यादी देशांशी चालत असेल तर आंतरराष्ट्रीय व्यापार ठरतो . आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये विविध देशांतील भिन्न चलनाच्या साहाय्याने व्यापार चालतो.

★ **आपली प्रगती तपासा:-**

१) आंतरप्रादेशिक व्यापार ही संकल्पना स्पष्ट करा.

२) आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे काय?

## १.२ आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व –

आधुनिक अर्थव्यवस्थेत आंतरराष्ट्रीय व्यापारास अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. इंग्लडसारख्या देशाने तर आपला विकास आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातूनच साध्य केला आहे. आधुनिक अर्थिक विकासाचा मूलाधार आंतरराष्ट्रीय व्यापारच असल्याचे स्पष्ट झाले आहे. अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, जपान इत्यादी प्रगत देशांनी जी औद्योगिक प्रगती केली आहे त्याचे महत्त्वाचे कारण त्यांनी स्वीकारलेल्या व्यापार धोरणात सापडते. म्हणूनच सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ आंतरराष्ट्रीय व्यापार हे उत्पादनात वाढ घडवून आणण्याचे केवळ साधन नसून अर्थिक विकासाचे इंजिन मानतात.

आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

१) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळे लोकांचा दृष्टिकोन अधिक व्यापक व विशाल बनतो. संकुचित राष्ट्रवादी विचारातुन लोक बाहेर पडतात. देशाचे विकास करायचा असेल तर आंतरराष्ट्रीय व्यापाराशिवाय पर्याय नाही. आपल्या देशात ज्या साधनांची कमतरता आहे अशा वस्तू व साधनांची परदेशातून आयात करता येते आणि विकासाचा दर वाढविता येतो. तसेच आपल्याकडे ज्या वस्तूंचे अतिरिक्त उत्पादन होते त्यांची विदेशातून निर्यात करून त्या बदल्यात आपणास वस्तू आणि पैसा मिळविता येतो. या गोष्टी आपणास आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळेच समजतात.

२) विदेशी व्यापार आणि विदेशी भांडवल यांच्या साहाय्यनेच अनेक देशांनी आपला विकास साध्य केला आहे. आज ज्या देशांना प्रगत देश मानले जाते त्यांचा विकास अंतर्गत संसाधनाचे परिणाम आणि त्यांची गतिशीलता याच कारणामुळे झाला आहे, असे मानून परकिय व्यापारामुळे त्यांच्या विकासाचा दर वाढला आहे.. जर त्यांना आपल्या देशाच्या विकासाची गती अशीच कायम ठेवायची असेल तर त्यांनी इतर देशांबरोबर व्यापारी संबंध ठेवलेच पाहिजेत. कोणताही देश पूर्णपणे स्वावलंबी असूच शकत नाही.कारण प्रत्येक देशाला कोणत्या ना कोणत्या वस्तूसाठी दुस-या देशावर अवलंबून राहावेच लागते. म्हणजेच त्यास अलिप्त राहून चालत नाही.

३) अर्थिक विकासात परास्परावलंबित्वाची भूमिका काय आहे? आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे अर्थिक वृद्धीसाठी काही मदत होते या गोष्टी आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळे समजण्यास मदत होते.

४) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळे लोकांचा, राज्यकर्त्यांचा आणि अर्थशास्त्रज्ञांचा दृष्टीकोन आंतरराष्ट्रीय बनतो. अशा व्यापक दृष्टीकानामुळे चालू आंतरराष्ट्रीय अर्थिक समस्या सोडविण्यास मदत होते. अनेक देशात दारिद्र्याची, बेकारीची गंभीर समस्या आहे. इतर देशांतून साधनांची निर्यात किंवा स्थानांतर कसे घडवून आणता येईल हे आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासावरून समजते. तसेच कोणताही देश दीर्घकाळ इतर देशांच्या विरूद्ध धोरण अवलंबून आपला विकास किंवा आपले अस्तित्व टिकवून ठेवू शकत नाही.त्याचा प्रत्यय आज सर्वच देशांना आला आहे. आपल्या शेजारील देशाला गरीब बनविण्याचे धोरण कसे चुकीचे आणि अयोग्य आहे हे जगाला अनुभवाने आणि आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळे समजले आहे.

५) जागतिक पातळीवर वेगवेगळ्या देशांमध्ये अनेक समस्या आहेत. त्यांची सोडवणूक तो एकटा देश करू शकत नाही. त्यासाठी आंतरराष्ट्रीय अर्थिक सहकार्याची गरज असते. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्यास व एकमेकांच्या हितासाठी विविध देश सहजपणे तयार होतात. मुक्त व्यापार परस्परांच्या हिताचा कसा आहे हे सांगण्याचे कार्य आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र करते. जागतिक पातळीवर शांतता प्रस्थापित करण्यासाठी निर्हस्तक्षेपाचे धोरणच गरजेचे आहे. आयात -निर्यात निर्बंध कमी करण्याची आवश्यकता आहे. या सर्व गोष्टींचे आकलन आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळेच होते.

★ **आंतरराष्ट्रीय व्यापाराचे महत्त्व –**

अर्थिक विकासाच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय व्यापाराचे महत्त्व पुढील मुद्यांच्या साहाय्याने स्पष्ट करता येईल.

१) श्रमविभागणी आणि विशेषीकरणाचे फायदे -

आंतरराष्ट्रीय व्यापार दोन किंवा अधिक देशात चालत असतो. त्यामुळे व्यापाराची व्याप्ती वाढते. प्रत्येक देश उपलब्ध असणारी साधनसामग्रीचा पर्याप्त वापर करण्यासाठी श्रमविभागणी आणि विशेषीकरणाचा अवलंब करतो. त्यामुळे कमी वेळात अधिक व दर्जेदार उत्पादन होऊन मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे सर्व फायदे मिळतात.

२) बाजाराची कक्षा रूंदावते -

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे बाजारपेठेची व्याप्ती वाढत जाते. व्याप्ती वाढल्यामुळे प्रत्येक देशाला आपल्या उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तिचा अधिकाधिक वापर करता येतो.

३) उत्पादनात वाढ -

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे ज्या वस्तूंचे उत्पादन करणे कमी खर्चाचे व अधिक फायद्याचे असते अशाच वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी प्रत्येक देश श्रमविभागणी आणि विशेषीकरणाचा वापर करतो. विशेषीकरणामुळे अधिक व दर्जेदार उत्पादन होऊन एकूण जागतिक उत्पादनात वाढ होते. उत्पादन वाढल्यामुळे उपभोक्त्यांना जास्तीत जास्त वस्तूंचा उपभोग घेता येतो.

४) उत्पादनपद्धतीत सुधारणा -

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे देशा - देशात उत्पादनवाढीची स्पर्धा निर्माण होते. अशा स्पर्धेत टिकून राहण्यासाठी प्रत्येक देश उत्पादनात नवीनवीन शोध लावून अधिकाधिक उत्पादन करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे उत्पादन पद्धतीत नवसंशोधनास चालना मिळून उत्पादन पद्धतीत सुधारणा धडून येते. आधुनिक पद्धतीने उत्पादन केल्यास उत्पादनाचा सरासरी खर्च कमी येतो म्हणजेच आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे देशातील रोजगार पातळी आणि उत्पन्न पातळी उंचावते.

५) रोजगार आणि उत्पादनात वाढ -

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे उत्पादन घटक एका देशातून दुस-या देशात सहजपणे जावू शकतात. त्यामुळे उतपादनघटकांची गतिशीलता वाढते. गतिशीलता वाढल्यामुळे एकूण रोजगार पातळीत वाढ होऊन लोकांच्या उत्पन्न पातळीत वाढ होते त्याचप्रमाणे देशाची निर्यात वाढल्यास देशाला मोठ्या प्रमाणात परकीय चलन प्राप्त होते. त्यामुळे देखील देशाच्या एकूण उत्पन्नात भर पडते. निर्यात वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली जावून रोजगाराच्या अधिक संधी निर्माण

होतात. थोडक्यात आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे देशातील रोजगार पातळी आणि उत्पादन पातळी उंचावते.

६) उपभोक्त्यांचे समाधान वाढते -

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे विशेषीकरण आणि श्रमविभागणीच्या तत्वाचा अवलंब होऊन कमी खर्चात अधिक उत्पादन होते. तसेच ज्या वस्तूंचे उत्पादन देशात होत नाही अशा वस्तूंची आयात केली जाते. त्यामुळे उपभोक्त्यांना कमी किमतीत जास्तीत जास्त वस्तूंचा उपभोग घेता येतो. त्यामुळे उपभोक्त्यांचे समाधान वाढते.

७) अर्थिक संकटात मदत -

ब-याच वेळा देशात अतिवृष्टी, महापूर, दुषकाळ, भूकंप यांसारखी नैसर्गिक आपत्ती निर्माण झाल्याने उत्पादनात घट होते. अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातून इतर देशातून अत्यावश्यक वस्तूंची आयात करता येते आणि उद्‌भवलेल्या नैसर्गिक परिस्थितीवर प्रभावीपणे मात करता येते.

८) मक्तेदारीचे नियंत्रण -

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे उत्पादकांमध्ये स्पर्धा निर्माण होते. प्रत्येक उत्पादक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी दर्जा उंचविण्यासाठी प्रयत्न करतो. त्यामुळे विशिष्ट वस्तू उत्पादनात एखाद्या उत्पादकाची मक्तेदारी निर्माण होत नाही.

९) उत्पादनात सातत्य –

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे वस्तूच्या आयातीबरोबरच कच्च्या मालाची देखील आयात करता येते. त्यामुळे देशात कच्च्या मालाची टंचाई निर्माण झाल्यास इतर देशातून कच्चा माल आयात करून उत्पादनात सातत्य टिकवून ठेवता येते.

१०) किंमत पातळी स्थिर राहते –

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे एखाद्या देशात विशिष्ट वस्तूची मागणी वाढल्यास इतर देशातून वस्तूची आयात करून मागणी आणि पुरवठा यांच्यात समतोल राखता येतो. त्यामुळे किंमत पातळी स्थिर राहण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापारास महत्त्व प्राप्त होते.

११) तांत्रिक मागणी –

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे प्रगत देशातून आधुनिक यंत्रसामुग्री, भांडवली वस्तू व तंत्रज्ञानाची आयात करता येते. अशा आयातीमुळे तशाच प्रकारचे तंत्रज्ञान देशात विकसित करण्याचा प्रयत्न केला जावून देशाची तांत्रिक प्रगती होते.

१२) आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढते –

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे वस्तू व सेवांच्या आयात -निर्याती बरोबरच इतर देशातील रूढी, परंपरा, संस्कृती आणि विचारांची देवाण – घेवाण ते देशादेशांमधील संबंध वाढत जावून सहकार्य वाढीस लागते. त्यातून आंतरराष्ट्रीय सामंजस्य आणि एकात्मता निर्माण होण्यास मदत होते.

★ **आपली प्रगती तपासा:-**

१) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राचा अभ्यास कसा महत्त्वाचा आहे ?

२) आंतरराष्ट्रीय व्यापाराचे आर्थिक दृष्टीने महत्त्व काय आहे ?

## १.३ आंतरराष्ट्रीय व्यापाराची ठळक वैशिष्ट्ये –

अंतर्गत व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापारात अनेक मुलभूत स्वरूपाचे फरक आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी स्वतंत्र सिद्धांत मांडण्याची आवश्यकता अनेक अर्थशास्त्रज्ञांनी मान्य केली आहे. अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या तुलनात्मक अभ्यासानंतर आपणास आंतरराष्ट्रीय व्यापाराची काही ठळक वैशिष्ट्ये थोडक्यात सांगता येतील.

१) आंतरराष्ट्रीय व्यापारात उत्पादन घटक अगतिशील असतात असे सष्ट मत सनातन अर्थशास्त्रज्ञ मांडत होते. तुलनात्मकदृष्ट्या आंतरराष्ट्रीय व्यापारात उत्पादन घटक कमी गतिशील असतात तर ते अंतर्गत व्यापारात अधिक गतीक्षम असतात.

२) बाजारपेठांची विविधता हे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे वैशिष्ट्य आहे. अंतर्गत व्यापारात बाजारपेठ अधिक अंशी एकजिनसी असते. वजनमापे चालीरीती ,भाषा, लोकांची आवडनिवड याबाबतीत बराच एकजिनसीपणा असतो. परंतु आंतरराष्ट्रीय व्यापारात बाजारपेठांमध्ये वरील बाबतीत भेद असतात. त्यामुळे बाजारपेठांमध्ये एकजिनसीपणा अजिबात राहत नाही.

३) आंतरराष्ट्रीय व्यापारात वेगवेगळ्या चलनांचा वापर होत असतो. अंतर्गत व्यापारात एकमेव चलन वापरले जात असते तर आंतरराष्ट्रीय व्यापारात प्रत्येक देशाचे चलनच वापरले जात असते. त्यामुळे विविध चलनांचा वापर हे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे वेगळे वैशिष्ट्य असते.

४) अंतर्गत व्यापारात एकाच देशातील लोक सहभागी होत असल्याने लोकांचे एकच गट असतो. परंतु आंतरराष्ट्रीय व्यापारात विविध देशातील लोक सहभागी होत असल्याने विविध गट अस्तित्वात येतात.

५) अंतर्गत व्यापार एकाच राजकीय कुलात होत असतो. तर आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी होणारे देश राजकीय दृष्टीने सार्वभौम असतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे विविध स्वतंत्र राजकीय कुलांमधील व्यापार असतो. प्रत्येक देशाची धोरणे स्वतंत्र व वेगवेगळी असतात. त्याचा परिणाम आंतरराष्ट्रीय व्यापारावर निश्चित होत असतो. प्रत्येक देशातील सरकार व्यापारातून आपल्या लोकांचे महत्तम कल्याण कसे होईल या दृष्टीने प्रयत्नशील असते. परंतु

आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी होणारे देश या दृष्टीने प्रयत्नशील असतीलच असे नाही.त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारापासुन सर्वांचा समान फायदा होईलच असे नाही.

६) राष्ट्रीय नियम, कायदे, व्यापारासंबंधी कायदे आणि धोरणे, व्यापार, उद्योग व कराविषयक कायदे याबबतीत अंतर्गत व्यापारात सारखेपणा असतो. परंतु आंतरराष्ट्रीय व्यापारात अशाप्रकारचा सारखेपणा नसतो. सरकारचे जकातिवषयक धोरण, कोटा पद्धती, अनुदाने यांचा आंतरराष्ट्रीय व्यापारावर परिणाम होणे अपरिहार्य असते. अंतर्गत व्यापारावर या बदलांचा फारसा परिणाम होत नाही.

७) व्यापाराम्ध्ये सहभागी होणा-या देशांच्या विकासाचा स्तर वेगवेगळा असतो. विकासाचा स्तर व वेग यामधून व्यापारिवषयक धोरण निश्चित होत असते. हा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा प्रमुख गुणधर्म आहे.

८) आंतरराष्ट्रीय सहकार्य व शांतता यावर व्यापारविषयक संबंध अवलंबून असतात. जर शांतता व सहकार्य असेल तर व्यापारविषयक संबंध अधिकाधिक दृढ होत जातात. दुसऱ्या महायुद्धानंतर व्यापार वाढीसाठी ही परिस्थिती अधिक जबाबदार झाली आहे असा अनुभव घेतला आहे,

९) आंतरराष्ट्रीय व्यापार अधिक भौगोलिक अंतरावर होत असतो. तर आंतरप्रादेशिक व्यापार कमी भौगोलिक अंतरामध्ये होत असतो. कारण दोन देशांमधील अंतर खुप असते.

**आपली प्रगती तपासा:-**

१) आंतरराष्ट्रीय व्यापाराची ठळक वैशिष्ट्ये कोणती आहेत ?

______________________________

______________________________

______________________________

## १.४ आंतरप्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय व्यापार –

'व्यापार म्हणजे वस्तूंचा विनिमय' असा सर्वसाधारण व्यवहारामध्ये व्यापाराचा अर्थ घेतला जातो. व्यापार अंतर्गत त्याचप्रमाणे बाह्य देखील असतो. देशाच्या भौगेलिक सिमांच्या अंतर्गत चालणारा व्यापार म्हणजे अंतर्गत किंवा देशी व्यापार त्यालाच आंतरप्रादेशिक व्यापार असेही म्हटले जाते.

आंतरराष्ट्रीय व्यापार देशाच्या राजकीय सीमा ओलांडून होत असतो. म्हणून आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे वेगवेगळ्या देशांमध्ये होणारा वस्तू व सेवांचा विनिमय होय. या व्यापारालाच 'परकीय व्यापार' असेही म्हटले जाते.

थोडक्यात दोन देशांमध्ये होणारा व्यापार म्हणजे 'आंतरराष्ट्रीय व्यापार' आणि देशाच्या दोन प्रदेशातील व्यापार म्हणजे 'अंतर्गत' किंवा 'आंतरप्रादेशिक व्यापार' होय.

एका देशातील वस्तू व सेवा यांचा इतर देशांबरोबर होणा-या विनिमयाशी संबंधित असणारी अर्थशास्त्राची शाखा म्हणजे आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र होय. अंतर्गत व्यापारासाठी जे आर्थिक कारण जबाबदार असते ते म्हणजे परस्पर गरजांची पूर्तता तेच कारण आंतरराष्ट्रीय व्यापारास जबाबदार असते. आंतरराष्ट्रीय व्यापाराशिवाय अधिक समाधानकारक जीवन व्यतित करणे कोणत्याही समाजाला आज शक्य नाही.जीवनमानात सुधारणा करण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापाराची गरज असते. आधुनिक समाजाने आपल्या जीवनमान पातळीत जी सुधारणा करून घेतली आहे ती केवळ आंतरराष्ट्रीय व्यापारामुळेच शक्य झाली आहे.

ज्या वस्तूंचे उत्पादन एखाद्या देशाला करता येत नाही त्या वस्तूंची इतर देशांमधून आयात केली जाते. तसेच ज्या वस्तूंचे गरजेपेक्षा अधिक उत्पादन होत असते त्या वस्तूंची इतर देशांना निर्यात केली जाते. काही वस्तूंच्या उत्पादनाच्या बाबतीत एखाद्या देशाला इतर देशांपेक्षा विशेष लाभ मिळत असतात. त्यामुळे त्या वस्तू इतर देशांपेक्षा कमी खर्चात उत्पादित करतो.परतु सर्वच वस्तूंच्या बाबतीत अशी शक्यता नसते म्हणून काही वस्तूंचे उत्पादन करणे अधिक खर्चिक होत असते. उत्पाादनाच्या बाबतीत ही परिस्थिती लक्षात घेतल्यास सहजपणे असे सांगता येते की आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्पादनाच्या बाबतीत श्रमविभागणी किंवा विशेषीकरणाची गरज असते. आंतरप्रादेशिक व्यापार जसा श्रमविभागणी किंवा विशेषीकरणाच्या तत्वावर आधारित आहे. उदा. कोळसा, चहा, आणि ताग यांचे उत्पादन पश्चिम बंगाल घेतो तर महाराष्ट्राने कापड उत्पाादनाच्या बाबतीत विशेषीकरण केले आहे. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय व्यापारात प्रत्येक देश ज्या वस्तूच्या उत्पादनाच्या बाबतीत विशेष लाभ मिळतो त्या वस्तूंचे अधिक उत्पादन करून त्या वस्तूंची इतर देशांना निर्यात करतो व त्यांच्या बदल्यात इतर वस्तूंची इतर देशांकडून आयात करतो.

अंतर्गत व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापार यांच्या मुळाशी असलेले तत्त्व जरी सारखे असले तरी त्या दोघांमध्ये अनेक फरक आहेत. फार पूर्वी फ्रेड्रिक लिस्ट (Friedric List) यांनी म्हटल्याप्रमाणे

<u>“देशी व्यापार हा आमच्या लोकांमधील व्यापार असतो तर आंतरराष्ट्रीय व्यापार हा आमच्यात आणि त्यांच्यात होत असतो.”</u>

★ **<u>आंतरप्रादेशिक व आंतरराष्ट्रीय व्यापारातील फरक</u> –**

अंतर्गत व बाह्य व्यापार यातील फरकाचे काही प्रमुख मुद्दे पुढीलप्रममाणे :

**१) <u>उत्पादन घटक गतिशीलता</u> –**

श्रम व भाडवल देशातल्या देशात अधिक गतिशील असातात. तर दोन देशात ते कमी गतिशील असतात. याच कारणाने रिकार्डोने आंतरराष्ट्रीय व्यापारसाठी स्वतंत्र सिद्धांत मांडण्याची आवश्यकता सांगितली आहे.

घटक गतिशीलतेतील तुलनात्मक फरकामुळे वस्तूंच्या उत्पादनखर्चात वेगवेगळ्या देशात तुलनात्मक फरक निर्माण होत असतो आणि हा फरक कायमस्वरपी राहत असतो. अंतर्गत व्यापारात असा फरक राहत नाही. कारण समजा, एखाद्या उद्योगात उत्पादन खर्चापेक्षा किंमत अधिक असेल तर त्या उदयोगात उत्पादन घटक संक्रमित होतील तेथील उत्पादन वाढेल व किमती कमी होतील.त्यांची घटण्याची प्रवृत्ती त्या उत्पादन खर्चाइतकी होईपर्यंत चालू राहील. याउलट दुसऱ्या उद्योगात घटक बाह्य स्थानांतरण सुरू राहील. त्यामुळे उत्पादन कमी होवून किमती वाढतील व त्यांच्यातील वाढ उत्पादन खर्चातील समानतेपर्यंत चालू राहील.

दोन देशांमध्ये घटक गतिशीलता तुलनेने कमी असते त्यामुळे खर्च व किंमतीमध्ये आपोआप समता प्रस्थापित होत नाही. त्यांच्यामध्ये कायमस्वरूपी अंतर राहत असते. उदा. दीर्घकाळात भारतातील चहाची किंमत त्याच्या उत्पादन खर्चाइतकी भारतात राहील. परंतु इंग्लंडमध्ये भारतीय चहाची किंमत त्याच्या भारतातील उत्पादनखर्चापेक्षा निश्चितपणे कायमस्वरूपी अधिक राहील. अशा त-हेने अंतर्गत व्यापारापेक्षा आंतरराष्ट्रीय व्यापार वेगळा ठरतो.

२) नैसर्गिक घटक देणग्या –

वेगवेगळ्या देशांना वेगवेगळ्या नैसर्गिक घटना देणग्या लाभलेल्या असतात. त्यामुळे एखादी विशिष्ट वस्तू एखाद्या विशिष्ट देशामध्येच का निर्माण होते हे लक्षात येते. उदा. दक्षिण अफ्रिकेमध्ये सोन्याचे उत्पादन होते. ब्राझिलमध्ये कॉफीचे उत्पादन होते तर भारतात चहाचे उत्पादन होते या घटक देणग्यांचे लाभ दुस-या देशांना पाठविता येत नाहीत. त्यामुळे आंतर प्रादेशिक व्यापार आंतरराष्ट्रीय व्यापार यांच्यामध्ये फरक निर्माण होतो.

३) व्यापारावरील निर्बंध –

जेव्हा व्यापार एकाच देशातील विविध प्रदेशांमध्ये चालतो तेव्हा त्या व्यापारावर सरकारची फारशी नियंत्रणे नसतात. मात्र जेव्हा व्यापार दोन किंवा अनेक देशात चालतो तेव्हा त्या व्यापारावर सरकारकडून विविध प्रकारची नियंत्रणे व निर्बंध लादले जातात. आंतरराष्ट्रीय व्यापार हा सरकारने घातलेल्या नियमांच्या चौकटीतून चालत असतो. दोन देशांच्या सीमारेषेपलीकडे चालणा-या व्यापारावर आयात जकाती आकारणे, आयातीचा वाटा ठरवून देणे, विशिष्ट वस्तूची आयात करण्यावर पूर्ण बंदी घालणे, अत्यावश्यक वस्तूच्या आयातीवरील जकात कमी करणे, व्यापाराचा परवाना देणे इत्यादींसारखी नियंत्रणे सरकारकडून घातली जातात.

४) वाहतूक खर्चात फरक -

आंतरप्रादेशिक व्यापारात वस्तूची वाहतूक करण्यासाठी रेल्वेची मालवाहतूक, रस्त्यावरील वाहतुकीची साधने वापरली जातात. मालवाहतुकीचे अंतर कमी असते त्यामुळे वाहतुकीचा खर्च कमी असतो. याउलट आंतरराष्ट्रीय व्यापार दोन किंवा अनेक देशांमध्ये चालत असल्याने वाहतुकीचे अंतर प्रचंड असते. अशा वेळी समुद्र मार्गाच्या मालवाहतुकीसाठी जहाज आगबोटी तसेच हवाई वाहतुकीसाठी विमानाचा वापर केला जातो. अशा वाहतुकीमध्ये धोक्याचे प्रमाण अधिक असल्याने वाहतुकीचा खर्चही अधिक असतो.

५) भिन्न राष्ट्रीय धोरणे -

प्रत्येक देशाचे स्वतंत्र अधिक धोरण असते. सरकारच्या आर्थिक धोरणात चलनविषयक धोरण, राजकोषीय धोरणाचा समावेश होतो. त्या धोरणाचा परिणाम देशातंर्गत किंमत पातळी, रोजगार पातळी आणि व्यापारावर होत असतो. तसेच या धोरणाचा परिणाम उत्पादन खर्चावर होत असतो. अशा देशांतर्गत धोरणाचा परिणाम दोन देशात चालणा-या आंतरराष्ट्रीय व्यापारावर होतो. प्रत्येक राष्ट्राचे स्वतंत्र अर्थिक धोरण असल्याने त्याचा परिणाम आंतरराष्ट्रीय व्यापारावर ठळकपणे दिसून येतो. आपल्या देशाची अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण व्हावी, आपल्या देशातील उद्योगांना जागतिक स्पर्धेतून संरक्षण मिळावे यासाठी इतर देशातून होणा-या विशिष्ट वस्तूच्या आयातीवर निर्बंध लादतात. तसेच एखादा देश दुस-या देशाची बाजारपेठ काबीज करण्यासाठी आपल्या देशात उत्पादित झालेली वस्तू देशातील ग्रहकांना अधिक किमतींना विकतात व तीच वस्तू दुस-या देशात कमी किमतीला विकण्याचे धोरण राबवितात. त्यालाच अर्थशास्त्रीय भाषेत 'अवपूंजन' (Dumping) असे म्हणतात.

६) <u>बाजारपेठांमध्ये तफावत</u>-

आंतरप्रादेशिक व्यापारामध्ये देशातील सर्व बाजारपेठांमध्ये एकाच प्रकारची वजने व मापे वापरली जातात, विक्रीची विशिष्ट प्रकारची पद्धती असते. उदा. भारतात मालाचे वजन करण्यासाठी मेट्रिक पद्धतीची किलोग्रॅम, क्विंटल, टन इत्यादी मापे वापरील जातात. तसेच शेतमालाची विक्री करण्यासाठी लिलावपध्दती वापरली जातेय तसेच देशांतर्गत बाजारपेठांच्या रचनेत फारसा फरक असत नाही. मात्र जेव्हा व्यापार दोन किंवा अधिक देशात चालतो तेव्हा वजने व मापे यामध्ये फरक असतो, विक्रीची वेगळी पद्धती वापरली जाते. म्हणूनच आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आंतरप्रादेशिक व्यापारात बाजारपेठांमध्ये फरक दिसुन येतो.

७) <u>मानवी क्षमता</u> –

देशादेशांमधील मानवी क्षमतांमध्ये भिन्नता असते. काही देशांमधील लोक शारीरीक दृष्टीने अधिक दणकट असतात. तर काही देशांमधील लोक अधिक बुद्धिमान असतात. काही लोकांमध्ये अधिक कलाकौशल्य असते, तर काही देशांमधील लोकांकडे व्यवस्थापन व संघटन कौशल्य असते. या विविध भिन्नतेमुळे देशी व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापार यामध्ये भिन्नता निर्माण होते.

८) <u>भांडवलाचा साठा</u> –

इंग्लंड, अमेरिका, जपान यांसारख्या देशांजवळ खूप मोठा साठा आहे. तर इतर देशांमध्ये भांडवलाची टंचाई आहे. त्यामुळे वेगवेगळ्या देशांच्या उत्पादनात फरक निर्माण होतो. अंतर्गत व्यापारात अशी स्थिती निर्माण होत नाही.

९) <u>राजकीय सार्वभौमत्व</u> –

प्रत्येक देश राजकीय दृष्टीने सार्वभौम असल्याने आंतरराष्ट्रीय व्यापारात अनेक समस्या निर्माण होत असतात. वस्तूंचे चलनवलन, वेतन व किमती, राजकोषीय व्यवहार, बँकाविषयक कायदे, परकीय कर्जे इ. बाबतीत प्रत्येक देश स्वतंत्र धोरण राबवित असतो. देशाच्या सीमा ओलांडून होणारी वस्तूंची आयात-निर्यात याबाबतीत प्रत्येक देश वेगवेगळ्या मर्यादा घालत असतो. परंतु या प्रकारच्या मर्यादा आंतरप्रादेशिक व्यापार व अंतर्गत व्यापारांमध्ये नसतात. त्यामुळे आंतरप्रादेशिक व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापारात भेद निर्माण होतो.

१०) <u>चलन पद्धती</u> –

देशादेशांच्या जलन पद्धती भिन्न- भिन्न असतात. त्यामुळे एका देशातून दुस-या देशामध्ये वस्तूंच्या प्रवाहावर प्रतिकुल परिणाम होतो. चलन विनिमयाच्या अनेक समस्या निर्माण होत असतात, त्या समस्या अंतर्गत व्यापारात नसतात.

जी व्यक्ति आंतर-प्रादेशिक व्यापारात भाग घेत असते तिला चलनांच्या तुलनात्मक मुल्यांचा विचार करण्याची आवश्यकता नसते. परंतु जी व्यक्ति आंतरराष्ट्रीय व्यापारात भाग घेत असते तिला चलनांच्या तुलनात्मक मुल्यांचा विचार करावाच लागतो.

११) <u>भांडवली गतिशीलता</u> –

चलनांमध्ये असलेला वरील भेद भांडवलाच्या अंतर्गत व आंतरराष्ट्रीय गतिशीलतेवर भिन्नपणे परिणाम करीत असतो. देशातील चलनांच्या अंतर्गत मूल्यात बदल होत असेल तर देशातील सर्व प्रदेशात कर्जरोख्यांच्या मूल्यावर होणारा परिणाम सारखा असेल.

त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीच्या तुलनेने देशांतर्गत भांडवल अधिक मुक्तपणे गतिशील असते, परंतु एखाद्या देशाच्या विनिमय दरात बदल होत असेल तर त्या देशाच्या चलनामध्ये धारण केलेल्या भांडवलाच्या मूल्यामध्ये निश्चितपणे बदल होईल. त्यामुळे परकीय चलनामध्ये

भांडवल धारण करण्यामध्ये अनेक धोके असतात. म्हणून लोक परकीय चलनामध्ये भांडवल स्वीकारताना तुलनेने अधिक दक्ष असतात. या वैशिष्ट्यांमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर तुलनेने भांडवल कमी गतिशील राहते.

१२) स्वतंत्र बाजारपेठा -

आंतरराष्ट्रीय बाजारपेठांची स्वतंत्र संस्कृती असते. त्यामुळे प्रत्येक देशाची एक स्वतंत्र बाजारपेठ बनत असते. उदा. ब्रिटीश उजव्या बाजूला स्टेअरिंग असलेल्या कार वापरतात. तर फ्रेंच डाव्या बाजूला स्टेअरिंग असलेल्या कार वापरतात. त्यामुळे कारच्या बाजारपेठा परिणामकारकपणे वेगवेगळ्या होत असतात.

त्याचप्रमाणे भाषा, सवयी, पसंती, चालरिती यामुळे बाजारपेठांमध्ये वेगळेपण निर्माण होत असते.

१३) आर्थिक राष्ट्रवाद

प्रत्येक देशाची स्वतंत्र अर्थिक जीवनपद्धती असते. राजकीय स्वातंत्र्याबरोबरच आर्थिक स्वावलंबनाची मागणी केली जात असते. आपल्या देशाचा अर्थिक विकासाचा दर वाढविण्याचा प्रत्येक राष्ट्र प्रयत्न करीत असते. त्यामुळे राष्ट्राराष्ट्रांचा स्वतंत्र अर्थिक राष्ट्रवाद निर्माण होत असतो आणि तो आंतरप्रादेशिक व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापारातील फरक वाढविण्यास मदत करतो.

१४) व्यापार व विनिमय नियंत्रणे

प्रत्येक आधुनिक राष्ट्र कमी अधिक प्रमाणात व्यापार व विनिमयावर नियंत्रणे लादत असते. त्यांचा वस्तू व सेवांच्या आंतरराष्ट्रीय आवक -जावकवर परिणाम होत असतो. त्यामुळे आंतर-प्रादेशिक व्यापार आंतरराष्ट्रीय व्यापार यामध्ये भेद निर्माण होतो.

**आपली प्रगती तपासा:-**

१) आंतरप्रादेशिक व आंतरराष्ट्रीय व्यापार यामध्ये काय फरक आहे ?

______________________________

______________________________

______________________________

## १.५ प्रश्नमालिका

प्र. १ आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र म्हणजे काय ? आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राचे महत्व विषद करा ?

प्र. २ आंतरराष्ट्रीय व्यापाराची ठळक वैशिष्ट्ये कोणती ?

प्र. ३ आंतरराष्ट्रीय व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापार यातिल फरक स्पष्ट करा ?

❖❖❖

# २

# तुलनात्मक खर्च - लाभ सिध्दांत
# (Comparative Cost – Benefit Theory)

**घटनात्मक/पाठ्यक्रम**

२.० उद्दिदष्ट्ये
२.१ प्रस्तावना
२.२ रिकार्डोचा – तुलनात्मक खर्च - लाभ सिध्दांत
२.३ टॉसीग पूर्णप्रतिपादन
२.४ गरिब श्रमिक युक्तीवाद (Pouper labour arguments)
२.५ हे आंतरराष्ट्रीय व्यापाराचा हेक्चर – ओहलिन सिध्दांत
२.६ लिऑन्टिफ विरोधाभास
२.७ प्रश्नमालिका

## २.० उद्दिदष्ट्ये

आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र तसेच आंतरराष्ट्रीय व्यापाराचे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अत्यंत म्त्व आहे. हे जानून घेतल्यानंतर आंतरराष्ट्रीय व्यापार देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी कसा व केव्हा फायदेशीर ठरु शकतो. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे तुलनात्मक लाभ कसा मिळू शकतो ह्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. या पाठात आपण विविध अर्थतज्ञांनी मांडलेले आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधी सिध्दांत अभ्यासणार आहोत.

या पाठाची उद्दिदष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येईल

१) रिकार्डोचा तुलनात्मक खर्च - लाभ सिध्दांताचा अभ्यास करणे.
२) तुलनात्मक खर्च - लाभ सिध्दांताविषयीचे टॉसींग यांचे पूर्णप्रतिपादन अभ्यासणे.
३) गरिब श्रमिक युक्तीवाद ही संकल्पना अभ्यासणे.
४) हेक्चर ओहलिन यांची आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दांताविषयीची घटक विपूलता ही संकल्पना अभ्यासणे.
५) तुलनात्मक खर्च– लाभ सिध्दांताविषयीचा लिऑन्टीफ विरोधाभास म्हणजे काय ? याचा अभ्यास करणे.

## २.१ प्रस्तावना

व्यापारवाढ्यांच्या नियंत्रित व्यापार धोरणावर ॲडमास्मिथने जोरदार टिका केली आहे. देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये नियंत्रित व्यापारामुळे अडथळे निर्माण होतात. व्यापारावर मर्यादा घालण्याच्या जूनाट धोरणाचा त्याग करुन श्रमविभागणीला मदत करणाऱ्या आणि मुवज व्यापार

धोरणाचा पाया प्रथम ॲडम स्मिथयांनी घातला आहे. मुक्त व्यापार धोरण हे देशाला श्रीमंत बनविण्याचे धोरण आहे. कारण त्यामुळे बाजारपेठांच्या कक्षा रुंदावून श्रमविभागणी किंवा विशेषीकरणाचे लाभ देशाला मिळू शकतात. श्रमविभागणीच्या तत्वावर आधारित असलेल्या व्यापार सिध्दांताला तुलनात्मक खर्च लाभाचा सिध्दांत म्हणून ओळखला जाते.

तुलनात्मक खर्च लाभाचे तत्व ॲडम स्मिथ, केव्हिड रिकार्डो या अर्थत्तज्ञांनी विकसित केले. तुलनात्मक खर्च लाभाचे तत्व रिकार्डोपूर्वी अनेक अर्थत्तज्ञांनी केले या तत्वामध्ये सुधारणा करण्याचे कार्य इलिएट, केर्नस, मार्शल, बॅस्टबल, हॅबरलर हेक्चर, ओहलिन इ. अर्थत्तज्ञांनी केले. रिकार्डोपासून या सिध्दांताच्या झालेल्या विकासाची चर्चा आपण पुढील लिखाणातून करणार आहोत.

## २.२ डेव्हिड रिकार्डो - तुलनात्मक खर्च लाभाचा सिद्धांत –

१६ व्या शतकात व्यापारवादी धोरणावर झालेल्या टीकेतून तुलनात्मक खर्च सिद्धांताची निर्मिती झाली आहे. ॲडम स्मिथने "राष्ट्राची संपत्ती" या ग्रंथामध्ये व्यापारवादी धोरणावर जोरदार टीका केली. मुक्त व्यापार धोरण संरक्षित व्यापार धोरणापेक्षा अधिक श्रेष्ठ असते, याचे स्पष्टीकरण तुलनात्मक खर्च सिद्धांताने अधिक स्पष्टपणे मांडले आहे. या तत्वाचा महत्वाचा गुण म्हणजे निरपेक्ष खर्च लाभ असेल तरच आंतरराष्ट्रीय व्यापार होतो. ही ॲडम स्मिथची आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी आवश्यक अट होती. त्याची गरज नसते हे रिकार्डोने आपल्या सिद्धांतामधून दाखवून दिले आहे.

डेव्हिड रिकार्डो यांनी १९१८ मध्ये प्रकाशित प्रकाशित केलेल्या "The Principle of political Economy and Taxation"या ग्रथांत आपला आंतरराष्ट्रीय व्यापाराचा शुद्ध सिद्धांत मांडला. हाच सिद्धांत १६१५ मध्ये रॉबर्ट टॉरेन्स यांनी मांडला होता. रिकार्डोच्या सिद्धांताचा केंद्रिबंदू म्हणजे तुलनात्मक लाभाचे महत्व होय. ज्या वस्तूच्या उत्पादनाच्या बाबतीत देशाला विशेष लाभ मिळतो. त्या वस्तूंच्या उत्पादनात देशाने विशेषीकरण करावे. रिकार्डोचे पुढील विधान आजही लागू पडते.

"It is …. Important to the happiness of mankind that our enjoyment should be increased by the better distribution of Labour by each country is producing those commodities for which by its situation, its climate and its other natural or artificial advantages, it is adopted and by exchanging them for the ccommodities of other counties "

प्रत्येक देशाने आपले हवामान, नैसर्गिक संसाधने किंवा इतर कृत्रिम लाभाच्या दृष्टीने ज्या वस्तूंचे उत्पादन करणे अधिक लाभदायक आहे अशा वस्तूंचे मूल्य उत्पादन करावे आणि इतर देशांना त्यांच्या वस्तूंच्या बदल्यात त्यांचा विनिमय करावा. हे मानवी सुखाच्या वाढीसाठी महत्त्वाचे आहे.

संकल्पना –

श्रममूल्य सिद्धांतामधुन रिकार्डोने तुलनात्मक खर्च तत्वाचा विकास केला आहे. या सिद्धांतानुसार कोणत्याही वस्तूचे तिच्या श्रम खर्चाने निधारित होत असते. रिकार्डोच्या शब्दांत सांगायचे झाल्यास "श्रमांच्या साहाय्याने विविध वस्तूंचे कमी –अधिक प्रमाणात उत्पादन केले जाते. त्यामुळे त्यांचा श्रमातील खर्च कमी अधिक होत राहतो. तोच वस्तूंच्या भूतकाळातील आणि वर्तमान किमती ठरवित असतो."

ज्या नियमाने एकाच देशातील वस्तूंच्या किमती नियंत्रित केल्या जातात. त्याच नियमाने आंतरराष्ट्रीय व्यापारात प्रवेश करणा-या वस्तूंच्या किमती नियंत्रित होत नाहीत. अंतर्गत व्यापारासाठी श्रममूल्य सिद्धांत रास्त ठरतो. परंतु आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी रास्त ठरत नाही. याचे कारण म्हणजे देशातल्या देशात श्रम गतिशील असतात तर आंतरराष्ट्रीय पातळीवर ते अगतिशील असतात. जर श्रमिक दोन देशांमध्ये पूर्ण गतिशील असतील तर वस्तूंचे विनिमय मूल्य त्यांच्यामध्ये असलेल्या श्रममूल्यानुसार ठरतील. त्यांच्या विनिमय मूल्यात थोडा जरी बदल हात असेल तर तो बाजार प्रेरणांनी कमी केला जातो.

<u>उदाहरण</u> –

रिकार्डोने अंकगणितीय उदाहरणाच्या साहाय्याने तुलनात्मक खर्चाचे तत्व स्पष्ट केले आहे.

| | उत्पादनाचा श्रम खर्च | | देशांतर्गत विनिमय दर (देशांतर्गत व्यापार शर्ती) |
|---|---|---|---|
| देश | दारू | कापड | |
| पोर्तुगाल | ८० | ९० | ८०:९० =१ नग दारू =०.८९नग कापड |
| इग्लंड | १२० | १०० | १२०:१००=१नग दारू =१.२नग कापड |
| तुलनात्मक खर्च गुणोत्तर | ८०/१२०=०.६७ | ९०/१००=०.९० | |

उदाहरणात पोर्तुगालला इग्लंडपेक्षा दोन्हीही वस्तूच्या उत्पादनात निरपेक्ष खर्च लाभ अधिक आहे. कारण कापड उत्पादनात १ नग कापडासाठी पोर्तुगालला ९० श्रमिक तर इंग्लंडला १०० लागतात. तर दारू उत्पादनात एका नगासाठी पोर्तुगालला ८० श्रमिक तर इंग्लंडला १२० श्रमिक लागतात. तथापि, दारू उत्पादनात पोर्तुगालला इंग्लंडपेक्षा तुलनात्मक लाभ अधिक आहे. कापड उत्पादनाचे गुणोत्तर ९०/१०० तर दारू उत्पादनाचे गुणोत्तर ८०/१२० असे आहे. त्यांची तुलना केल्यास ८०/१२०< ९०/१०० असे दिसते. दुसरीकडे इंग्लडला दोन्हीही वस्तूंच्या उत्पादनात निरपेक्ष तोटा असल्याचे दिसते. परंतु कापड उत्पादनातील तुलनात्मक तोटा कमी आहे. हे आपणांस १००/९० < १२०/८० या गुणोत्तरावरून लक्षात येते.

तुलनात्मक लाभाचा खर्च स्पष्ट करण्यासाठी कमीत कमी दोन देश व दोन वस्तू असाव्यात असे हॅबटलरने म्हटले आहे आणि आपणास एका वस्तूंच्या दोन्ही देशातील उत्पादन खर्च गुणोत्तराची

८०/१२० दुस-या वस्तूंच्या दोन्ही देशातील उत्पादन खर्च गुणोत्तराशी ९०/१०० तुलना करावी लागते. वरील गुणोत्तरांचे शब्दात वर्णन करावयाचे झाल्यास पोर्तुगालला कापड उत्पादनापेक्षा दारू उत्पादनात इंग्लडवर तुलनात्मक लाभ अधिक आहे. याउलट इंग्लंडचा दारूतील पोर्तुगालवरील तोटा कापडापेक्षा अधिक आहे. दुस-या पद्धतीने सांगायचे झाल्यास इंग्लंडला कापड उत्पादनात निरपेक्ष तोटा आहे. परंतु त्याच वेळेस त्याला कापड उत्पादनात तुलनात्मक लाभ आहे.वरील असमानता, (८०/१२० < ९०/१००) या समीकरणाने तंतोतंत मांडता येते.

श्रमखर्च रचनेच्या तुलनेवरून आंतरराष्ट्रीय व्यापाराचा दोघांनाही किती लाभ मिळतो त्याचे मोजमाप करता येते. इंग्लंडमध्ये दारूचा श्रमखर्च (१२०तास) कापडाच्या श्रम खर्चा (१०० तास) पेक्षा अधिक आहे. त्यामुळे दारूच्या बदल्यात अधिक कापड खरेदी करता येते. म्हणून इंग्लंडमधील अंतर्गत व्यापारशर्ती १ नग = १.२ नग कापड अशा असतील.पोर्तुगालमध्ये दारूचा श्रमखर्च (८० तास) कापडाच्या श्रम खर्चापेक्षा (९० तास) कमी आहे. म्हणून दारूच्या बदल्यात कमी कापड खरेदी केले जाऊ शकते. पोर्तुगाल मधील व्यापारशर्ती १ नग दारू =०.८९ नग कापड अशा असतील.

आकृती




आकृतीमध्ये PA रेषा पोर्तुगालचे दारू व कापड (OP/OA किंवा १ कापड=१.१३ नग दारू ) यांचे अंतर्गत गुणोत्तर दर्शविते. तर EA रेषा इंग्लंडचे दारू व कापड(OE/ OP किंवा १ कापड=०.८३ नग दारू ) यांचे अंतर्गत विविध गुणोत्तर दर्शविते. TA रेषा दोन्ही देशातील आंतरराष्ट्रीय व्यापारशर्ती (१ नग दारू = १नग कापड किंवा OT/ OA) दर्शविते. TA खंडित रेषा ही PA ला समांतर काढली आहे. ती पोर्तुगालचे अंतर्गत विनिमय गुणोत्तर (१ नग दारू =०८९ नग कापड किंवा OT/ OP) दर्शविते.

दोन्ही देशाच्या अंतर्गत व्यापारशर्तीवरून असा निष्कर्ष काढता येतो की, इंग्लंडशी तुलना करता पोर्तुगालला दारू व कापड या दोन्ही वस्तूंत निरपेक्ष लाभ आहे तर इंग्लंडला कापडात किमान तोटा आहे. जर पोर्तुगालने दारूत आणि इंग्लंडने कापडात विशेषीकरण केले आणि त्यांच्यातील व्यापारशर्ती TA रेषेने दर्शविल्याप्रमाणे म्हणजे १ नग दारू = १नग कापड अशा ठरल्या तर दोन्हीही देशांना लाभ मिळेल. इंग्लंड १ कापडाच्या बदल्यात अंतर्गत व्यापारापेक्षा ०.१७ नग ( ET ) अधिक नग दारू मिळवतो.

त्याचप्रमाणे पोर्तुगाल व नग दारूच्या बदल्यात अंतर्गत व्यापारापेक्षा ०.११ नग ( PA ) कापड अधिक मिळवतो. यावरून असे लक्षात येते की दोन देशात दोन वस्तूंच्या उत्पादन खर्चात तुलनात्मक फरक असेल तर त्या दोन देशात आंतरराष्ट्रीय व्यापार होऊन त्या दोघांनाही फायदा होतो.

**गृहीते –**

१) फक्त दोनच देश आहेत आणि ते दोन वस्तूंचा विनिमय करतात. म्हणजेच त्यांनी दोन देश आणि दोन वस्तू असे साधे प्रतिमान गृहीत धरले आहे.
२) श्रम हा महत्त्वाचा उत्पादन घटक आहे. इतर उत्पादन घटक श्रमामध्ये रूपांतरित करून प्रतिमानातील क्लिष्टता कमी करता येते.
३) श्रमाचे सर्व नग एकजिनसी असतात.
४) उत्पादन घटक देशातल्या देशात पूर्ण गतिशील असतात तर इतर देशात ते पूर्ण अगतिशील असतात.
५) वाहतूक खर्चाचा अभाव आहे.
६) वस्तूंच्या किंमती त्यांच्या वास्तव खर्चानुसार ठरतात.
७) दोन्हीही देशात स्थिर उत्पादनफलाच्या नियमानुसार उत्पादन होत आहे.
८) वस्तू बाजार व घटक बाजारात पूर्ण स्पर्धा असते.
९) दोन्हीही देशात पूर्ण रोजगार पातळी असते.
१०) मुक्त व्यापाराचे अस्तित्व.

**टीका–**

बर्टील ओहलीन व फ्रँक ग्रॅहमसह अनेक अर्थशास्त्रज्ञांनी या सिद्धांतावर टीका केली आहे.

१) श्रम खर्च हाच एकमेव खर्च नाही.
या सिद्धांताने असे गृहीत धरले आहे की अंतर्गत विनिमय दर हा केवळ वस्तूच्या श्रमखर्चावरून ठरत असतो. परंतु टीकाकारांचे असे मत आहे की वस्तू उत्पादनासाठी श्रम हाच एकमेव उत्पादन घटक वापरला जात नाही.

२) सनातन सिद्धांताने असे गृहीत धरले आहे की उपभोक्त्यांची पसंती, उत्पादन कलेने आणि घटक देणग्या देखील कायम असतात. त्यांच्यात बदल होत नाही.
परंतु स्थितीशील समतोल विश्लेषणावरून काढलेले निष्कर्ष आजच्या गतिमान जगाला लागू होणार नाहीत.
३) सनातन अर्थशास्त्रज्ञांनी वाहतूक खर्चाकडे दुर्लक्ष केले आहे.
परंतु आंतरराष्ट्रीय व्यापारात तो खर्चाचा एक महत्वाचा घटक आहे.
४) स्थिर खर्चाच्या गृहीतामुळे देखील अडचणी निर्माण होतात.
५) या सिद्धांतात दोन देश, दोन वस्तू आणि एक उत्पादन घटक लक्षात घेतले आहे.
परंतु प्रत्यक्षात व्यापारात एकापेक्षा अधिक देश, अधिक वस्तू सहभागी होत असतात.
६) सनातन सिद्धांताचा महत्त्वाचा दोष म्हणजे या सिद्धांताने गृहीत धरलेले पूर्ण रोजगार पातळी अस्तित्व होय.

७) काही वस्तूंच्या उत्पादनात देशाला नैसर्गिक लाभ मिळत नसताना देखील देश त्या वस्तूंचे उत्पादन आपल्या देशात चालू ठेवतो. हे तुलनात्मक खर्च लाभ तत्वांशी विसंगत आहे.

८) बर्टील ओहलीनने या सिद्धांताला बोजड व अवास्तव संबोधून त्यावर टीका केली आहे. कारण हा सिद्धांत वेगवेगळ्या देशांतील पूर्ण खर्च फरक विचारात घेत नाही.

**निष्कर्ष -**

अशा प्रकारे या सिद्धांतावर काही टीका करण्यात आल्या असल्या तरी आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने हा सिद्धांत महत्त्वाचा ठरतो.

**आपली प्रगती तपासा:-**

१) रिकार्डोचे तुलनात्मक खर्च लाभ तत्व म्हणजे काय ?

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

## २.३ टॉसिंगचे तुलनात्मक खर्च - लाभ सिद्धांतावरील पुर्नप्रतिपादन –

**प्रस्तावना -**

रिकार्डोने आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांतामध्ये श्रममूल्य ही अट विचारात घेऊन तुलनात्मक उत्पादन खर्च हे तत्व विकसित केले. तुलनात्मक खर्चाचे तत्व स्पष्ट करताना रिकार्डोने फक्त श्रममूल्य किंवा श्रम या एकाच उत्पादन घटकाचा विचार केला. परंतु आधुनिक अर्थव्यवस्था ही मौद्रिक अर्थव्यवस्था आहे. प्रत्यक्ष व्यवहारात पैशातील किंमत ही निधार्रित घटक म्हणून महत्वाची आहे. म्हणून आंतरराष्ट्रीय व्यापार हा श्रममूल्यातील तुलनात्मक फरकापेक्षा पैशातील किंमतीतील निरपेक्ष फरकावर निधार्रित होत असतो.

**संकल्पना -**

प्रोफेसर टॉसिंग यांनी दोन वस्तूंमधील वास्तव विनिमय संबंध तसेच अगदी सहजपणे तुलनात्मक खर्च तत्व हे वस्तूच्या श्रममूल्याचा फरक आणि निरपेक्ष फरक दाखवून दिले आहेत.

**सिद्धांताचे स्पष्टीकरण :**

प्रोफेसर टॉसिंग यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारातील तुलनात्मक खर्च तत्व स्पष्ट करण्यासाठी तसेच निरपेक्ष लाभखर्च हा श्रममूल्य खर्च यातील फरक दाखवून देण्यासाठी खालील काल्पनिक उदाहरण घेतले आहे.

समजा , 'A' देशामध्ये

१ दिवसात श्रमिक दारूचे २० घटक उत्पादित करतात आणि
१ दिवसात कपडाचे २० घटक उत्पादित करतात .

'B' देशामध्ये

१ दिवसात श्रमिक दारूचे १० घटक तर
१ दिवसात श्रमिक कापडाचे १५ घटक उत्पादित करतात .

म्हणून वरील उदाहरणावरून असे म्हणता येईल की 'A' देश हा दारू आणि कापड या दोन्ही वस्तूच्या उत्पादनात श्रेष्ठ आहे तर 'B' हा देश कापडाच्या उतपादानासाठी श्रेष्ठ आहे.

प्रा.टॉसिंग यांनी श्रमाचे मूल्य पैशातील मूल्यांमध्ये रूपांतरीत केले आहे. हे पुढील तक्त्याद्वारे स्पष्ट केले आहे. यासाठी दैनंदिनी वेतन विचारात घेतले आहे. 'A' देशात श्रमिकांचे दैनंदिनी वेतन १००रू. तर'B' देशातील श्रमिकांचे दैनंदिनी वेतन ८०रू.आहे असे गहीत धरले आहे.

**वस्तूंचा पैशातील खर्च**

| देश | श्रमिकांचे १ दिवसाचे उत्पादन | दैनंदिन वेतन =पैशातील खर्च (प्रत्येक दिवसाचे श्रम रूपयांत) | पैशातील खर्च =उत्पादनाची प्रत्येक घटकांची पुरवठा किंमत (रूपयांत) |
|---|---|---|---|
| अ | दारू २० घटक | १०० | ५.०० |
| | कापड २० घटक | १०० | ५.०० |
| ब | दारू १० घटक | ८० | ०८.०० |
| | कापड १५ घटक | ८० | ५.३३ |

उदाहरणावरून असे म्हणता येईल की 'अ' देशामध्ये दारूची उत्पादित किंमत (पैशातील किंमत ५ रू.) ही ब देशातील पैशातील किंमतीपेक्षा (८रू.) कमी आहे. रिकार्डोच्या तुलनात्मक खर्च सिद्धातांचा आढावा घेतल्यास आपण पैशातील किंमत किंवा श्रममूल्याची तुलना करू शकतो. त्यामुळे साहजिकच 'अ' देश दारू उत्पादनात विशेष असल्यामुळे तो दारूचे उत्पादन 'ब' देशाला निर्यात करेल. कारण 'ब' देशाचा दारूचा उत्पादित खर्च (पैशातील किंमत ) 'अ' देशापेक्षा जास्त आहे.

तसेच 'ब' देशाला कापड उत्पादनामध्ये पैशातील खर्च लाभ कमी असला तरीही 'ब' देश कापड उत्पादनात विशेष/श्रेष्ठ आहे. म्हणून 'ब' देश कापडाची निर्यात 'अ' देशाला करेल.

समजा 'अ' देशाचा दोन्ही वस्तूंचा (कापड आणि दारू) पैशातील खर्च किंवा श्रममूल्य खर्च हा २०० रूपये म्हणजे 'ब' देशापेक्षा जास्त आहे. (१६०रू.) तसेच 'ब' देशाचा पैशातील खर्च हा दोन्ही वस्तूंच्या (कापड आणि दारू) जास्त असला तरी श्रममूल्य कमी आहे. त्यामुळे 'अ' देशाला दारूची निर्यात ('ब' देशाला) करूनही फायदेशीर ठरणार नाही. याशिवाय 'ब' देशाकडून कापडाची आयात केल्यामुळे 'अ' देशाचा व्यवहारतोल असंतुलित होऊन देशातील संपत्तीचा (सोन्याचा) प्रवाह दुस-या देशात जाईल आणि 'अ' देशाची व्यापाराची दिशा बदलेल.

तसेच 'ब' देशाच्या बाबतीत 'अ' देशाला कापडाची निर्यात केल्यामुळे संपत्तीचा प्रवाह देशामध्ये येऊन व्यवहारातोल सुधारेल. परंतु जर 'अ' देशाने कापडाच्या आयातीशिवाय केवळ दारूची निर्यातच 'ब' देशाला केली तर 'ब' देशातील संपत्तीचा (उत्पन्नाचा) प्रवाह 'अ' देशाला येईल. परिणामी 'अ' देशाचा व्यवहारातोल अनुकूल होईल तर 'ब' देशाचा व्यवहारातोल प्रतिकूल होईल.

थोडक्यात टॉसींग यांनी रिकार्डोच्या तुलनात्मक खर्च लाभ तत्त्वामध्ये श्रमातील खर्चापेक्षा पैशातील खर्च विचारात घेऊन देशांना लाभ मिळवता येतो. तुलनात्मक खर्च लाभ सिद्धांतामध्ये श्रम उत्पादन खर्चापेक्षा पैशातील खर्च ही गोष्ट महत्वाची आहे. हे टॉसींग यांनी स्पष्ट केले.

**निष्कर्ष /सारांश –**

डेव्हिड रिकार्डो यांनी तुलनात्मक खर्च लाभ तत्त्वामध्ये राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये श्रममूल्यातील फरकामुळे तुलनात्मक लाभ मिळतो. श्रमउत्पादनखर्च या एकाच घटकाचा रिकार्डोने आपल्या सिद्धांतात विचार केला. परंतु आधुनिक अर्थव्यवस्थेत सर्व व्ययवहार हे पैशातून होतात. वस्तूचा उत्पादनातील पैशातील खर्चामुळेही (किमतीमुळे) राष्ट्रांना तुलनात्मक लाभ मिळवता येतो. हे टॉसींग यांनी आपल्या सिद्धांताद्वारे दाखवून दिले आहे.

★ **आपली प्रगती तपासा:-**

1) निरपेक्ष लाभ खर्च आणि श्रमखर्च यांतील फरक स्पष्ट करा.

____________________________________________________

____________________________________________________

____________________________________________________

---

## २.४ ★ गरीब - श्रमिक युक्तीवाद खर्च :- तुलनात्मक लाभसंदर्भात काही गैरसमज – (Pauper labour Arugument)

---

प्रस्तावना -

डेव्हिड रिकार्डो यांनी तुलनात्मक खर्च लाभ तत्व विकसित केले. पुढे हेक्श्चर व ओहलिन या अर्थतज्ञांनी या सिद्धांताला आधुनिक रूप दिले. प्रोफेसर टॉसींग यांनी रिकार्डोच्या तुलनात्मक खर्च-लाभ तत्वाचे पूर्नप्रतिपादन केले. याशिवाय इतर अनेक अर्थतज्ञांनी तसेच टिकाकारांनी यावर भाष्य केले. आंतरराष्ट्रीय व्यापारात दोन्ही देशांना तुलनात्मक लाभ मिळतो. तो कसा प्राप्त होतो ? त्याची कारणे कोणती ? या विषयाचे समज गैरसमज (पॉपर लेबर अरग्यूमेंट) श्रमिक हा उत्पादन घटक विचारात घेऊन झालेले आहेत.

**उत्पादनातील महत्त्वाचा घटक –**

श्रमिक याविषयी वादविवाद /मतमतांरे –

उत्पादनाच्या चार घटकामध्ये श्रम किंवा श्रमिक हा म्हत्त्वाचा घटक आहे. श्रम या उत्पादन घटकाच्या साहाय्याने देश आंतरराष्ट्रीय व्यापारापासून तुलनात्मक लाभ मिळवतो. कमी वेतन, पिळवणूक या गोष्टीकडे मात्र देश दूर्लक्ष करतो. रिकार्डोच्या तुलनात्मक खर्च लाभ सिद्धांतामध्ये 'श्रममूल्य' महत्त्वाचे आहे. यावरून अनेक अर्थतज्ञ राजकारणी, व्यावसायिक ह्यांनी परस्परांविरोधी ' तुलनात्मक लाभ आणि श्रममूल्य' याविषयी मतमतांतरे केली आहेत. अर्थशास्त्रीय विश्लेषणात टिकू शकणार नाहीत. परंतू आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रात काही अंशी खरी ठरतील अशी काही मत -मतांतरे मांडण्यात आली आहेत.

तीन गैरसमज ठाम (निश्चित) आहेत की जे तुलनात्मक लाभ तत्त्वाच्या दृष्टीने ते कसे चुकीचे आहेत. हे तीन गैरसमज पुढीलप्रमाणे,

१) उत्पादकता आणि स्पर्धात्मकता ( Productivity & Competitiveness)

२) दारिद्र्यातील श्रमिक युक्तीवाद ( Pauper labour Argument)

३) पिळवणूक ( Exploitation)

**स्पष्टीकरण :-**

१) उत्पादकता आणि स्पर्धात्मकता ( Productivity & Competitiveness)
अ) खोटी /कल्पित गोष्टः-

परकीय स्पर्धेत टिकून राहण्यासाठी तुमचा देश पुरेसा सामर्थ्यशाली असेल तरच मुक्त व्यापाराचे फायदे त्या देशाला मिळू शकतात.

वरिल विधान वरवर पाहता अत्यंत योग्य वाटते पण प्रत्यक्षात ते फसवे आहे. वरील विधानकर्त्याने रिकार्डोचे तुलनात्मक खर्च लाभ प्रतिमानातील आवश्यक मुद्दा ध्यानात घेतला नाही. व्यापारापासून लाभ हा निरपेक्ष लाभापेक्षा तुलनात्मक लाभावर अवलंबून असतो. त्यांच्या मते इतरांपेक्षा जास्त कार्यक्षमतेने उत्पादन उत्पादित करण्यास तुमचा देश कार्यक्षम नसेलही. आपल्या व्यापाराच्या साध्या अंकगणितीय उदाहरणात, स्वदेशात श्रमिकाचे कमी घटक (नगसंख्या) वापरून चीज आणि दारू या दोन्हीही वस्तूच्या क्षेत्रांमध्ये जास्त उत्पादकता होते. यापुढे आपण पाहिले दोन्ही देशांना श्रमिकांची संख्या आणि त्यांची कार्यक्षमता यामुळे व्यापारातून फायदा होतो.

आपल्या एक घटक (श्रम) प्रतिमानात निश्चित स्पर्धात्मक लाभाला उद्योगांतील निरपेक्ष उत्पादकता लाभ हा आवश्यकही नाही आणि पुरेसाही नाही ह एक कारण आहे. उद्योगांचा स्पर्धात्मक लाभ केवळ परकीय उद्योगासंबंधित त्यांच्या उत्पादकतेवर अवलंबून नसून, परकीय वेतन दर, स्वदेशातील वेतन दरावर सुद्धा निगडीत आहे. कोणत्याही कारणाने (अयोग्य) का असेना परंतू स्पर्धात्मक हा कमी वेतन- दरावर आधारित आहे. सारांश रूपाने लोक दुस-या गैरसमजावर विश्वास ठेवण्याचा विचार करतात.

२) उपजिवीकेचे कोणतेही साधन नसणारे गरीब श्रमिक -युक्तीवाद
ब) खोटी /कल्पित गोष्टः-

“ परकीय स्पर्धा ही दुस-या देशाला अयोग्य आणि त्रासदायक वाटते. जेव्हा ती कमी वेतनावर आधारलेली असते.”

काही वेळा रिशिष्ट कामगार संघटना परकीय स्पर्धेपासून सरंक्षण मिळविण्यासाठी गरीब श्रमिकांच्या (Pauper labour) संदर्भात युक्तिवाद /वादविवाद करतात. जे लोक खूप निष्ठेने या युक्तीवादावर (मतावर) विश्वास ठेवतात. की, देशांतील उद्योगांनी परकीय उद्योगांशी सामना करावयास नको कारण ते उद्योग अकार्यक्षम श्रमिक परंतु कमी वेतनावर आधारलेले असतात. राजकीय परिणाम विचारात घेतल्यामुळे हा दृष्टीकोन सर्वत्र पसरला.

उदाहरणार्थ अमेरिका आणि मॅक्सीको यांच्यात होणारा मुक्त व्यापार हा कमी वेतनावर आधारित आहे. त्यामुळे कमी वेतन आणि मालकांची रक्तपिपासू वृत्ती (श्रमिकांची पिळवणूक/ शोषण) यामुळे अमेरिकेतील उद्योगातील श्रमिक दक्षिण अशियाई देशाकडे उद्योगासाठी वळले.

वरील साधे उदाहरणाने हा युक्तीवाद (विधान) फसवा आहे हे उघड झाले. एका देशात परकीय देशापेक्षा दोन्ही वस्तुंची उत्पादकता जास्त आहे कारण त्या देशात श्रममूल्य अत्यंत कमी आहे तर परकीय देशात जास्त वेदतनदर आणि वस्तूंचा (दारू) उत्पादनखर्च कमी आहे. थोडक्यात एका देशात कमी वेतनदरावर (कमी श्रममूल्य) जास्त उत्पादकता घेऊन व्यापारापासून फायदा घेतला जातो. तर दुस-या देशात जास्त वेतनदर (श्रममूल्य) आणि कमी उत्पादनखर्चात उत्पादकता घेऊन व्यापारापासून फायदा मिळवला जातो. थोडक्यात ज्या देशात कमी वेदनदर देऊन श्रमिकांचे शोषण करून उत्पादकता मिळवली जाते. त्याचप्रमाणे निर्यात वाढवून परकीय स्पर्धेत टिकून राहता येते परंतू ही व्यापाराची कल्पना काहीतरी चुकीची वाटते. कारण कमी वेतनदर ठरवून निर्यात आकर्षणाची स्थिती कितपत योग्य वाटते ? शेवटी चांगल्या व्यापारासाठी योग्य /जास्त वेतनदर व जास्त उत्पादकता योग्य आहे म्हणून वरील विधान वरवर पाहता खरे वाटत असले तरी ते फसवे आहे.

३)पिळवणूक /शोषण ( Exploitation)

क) खोटी /कल्पित गोष्टः-

“व्यापारामुळे देशाची पिळवणूक होते अणि इतर देशातील कामगारांपेक्षा कमी वेतन मिळकत अधिक वाईट किंवा त्रासदायक बनविते.”

वरील मत भावनिक संकल्पनेतून व्यक्त केले आहे. येथे कमी वेतनदर किंवा कामगारांची पिळवणूक यासंबंधी एक उदाहरण दिले आहे. अमरिरकेतील एका कापडाच्या कंपनीतील अधिकारी आणि दुस-या व्यापारी माल उत्पादित करमा-या कंपनीतील कामगार यांच्या वेतनातील फरक व कामगारांचे शोषण.

देश श्रमिकांना कमी वेतनावर जास्त उत्पादन घेऊन मिर्यात वाढवतो आणि व्यापारापासून लाभ मिळवतात. कामगारांना जास्त वेतन देऊन उत्पादन का वाढवले जात नाही ? कमी कार्यक्षमता, कमी वेतनामुळे उत्पादनाचा दर्जा घसरतो. त्यामुळे देशातील व्यापारही कमी होतो. (मंदावतो) यावरू प्रश्न असा उद्‌भवतो की यावर मग पर्याय काय आहे ?

थोडक्यात कमी वेतनदर पिळवणूकीचे प्रतिनिधीत्व करते जोपर्यंत त्या देशाला वरील पर्याय काय आहे हे माहित आहे. सत्रलेखकाने वरील उदाहरणातील अधिका-याच्या आणि कामगाराच्या उत्पन्नातील (विरोधाभास) तफावत किंवा फरक निर्देशनास आणून दिले. वेतनातील तफावतीमुळे तीव्र दारिद्रय देशात निर्यात होते. जरी देशात तीव्र दारिद्रय असले तरी कमी वेतनपद्धतीवर निर्यातसंधी आणि व्यापारी सामर्थ्य वाढवण्यास देश नापसंती दर्शवितो. म्हणून व्यापारामुळे देशात दारिद्रय निर्माण होते. व दारिद्रयामुळे कमी वेतन व कामगारांची पिळवणूक होते. पर्यायाने देशाची पिळवणूक होते.

थोडक्यात कमी वेतनदर पद्धती आणि कामगारांचे शोषण यावरील वरील विधान खरे वाटत असले तरी काही अंशी ते फसवे आहे.

**सारांश :-**

तुलनात्मक लाभ – खर्च तत्त्वावरील वरील तीन मतमतांतरे विविध व्यक्तींनी मांडलेली आहेत. तुलनात्मक खर्च - लाभ तत्त्वाशी निगडीत समज –गैरसमज यामुळे सिद्धांताचे महत्त्व आणखीनच वाढते.

★ **प्रगती तपासा:-**

१. गरीब श्रमिक युक्तीवाद म्हणजे काय ?

______________________________

______________________________

______________________________

## २.५ आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधीचा आधुनिक सिद्धांत – (आंतरराष्ट्रीय व्यापाराचा हेक्श्चर –ओहलीन सिद्धांत)

**प्रस्तावना -**

या सिद्धांतालाच आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आधुनिक सिद्धांत म्हणून ओळखले जाते. हेक्श्चर ओहीलीनचा सिद्धांत, तुलनात्मक खर्च सिद्धांताला खोटे ठरवित नाही तर त्याला आधार देतो. उत्पादन खर्चामध्ये तुलनात्मक फरक का निर्माण होतो ? याचे उत्तर सनातन सिद्धांताला देता आले नाही. हे उत्तर देण्याचे काम 'एली हेक्श्चर ' व 'बर्टिल ओहलीन ' यांनी तुलनात्क खर्चाचा श्रममूल्य सिद्धआंताजागी आधुनिक मूल्य सिद्धांत मांडून केले आहे.

**संकल्पना –**

काही देशांकडे भांडवल खूप मोठ्या प्रमाणात असते तर काही देशांकडे श्रम असतात. हा सिद्धांत असे सांगतो की, "भांडवल श्रीमंत देश भांडवलप्रधान वस्तूंची निर्यात करतो तर श्रमाच्या बाबतीत श्रीमंत असलेला देश श्रमप्रधान वस्तूंची निर्यात करतो.."

ओहलीनच्या मते आंतरराष्ट्रीय व्यापाराचे महत्त्वाचे कारण म्हणजे काही वस्तू इतर प्रदेशातून अगदी स्वस्त किमतीला खरेदी करता येतात. परंतु त्याच वस्तूंचे आपल्या प्रदेशात उत्पादन करणे खूप खर्चिक असते. म्हणून प्रदेशा - प्रदेशातील व्यापाराचे कारण म्हणजे वस्तूंच्या किमतीमध्ये असलेला फरक होय.

**गृहीते -**

१) हा सिद्धांत $2 \times 2 \times 2$ प्रतिमान आहे. म्हणजेच सिद्धांतात दोन देश दोन वस्तू आणि दोन उत्पादन घटक (श्रम व भांडवल गृहीत धरले आहे.)
२) वस्तू बाजार व घटक बाजारात पूर्ण स्पर्धचे अस्त्वित्व असते.
३) ससाधनांमध्ये पूर्ण रोजगार पातळी असते.
४) वेगवेगळ्या प्रदेशात उत्पादन घटकाच्या उपलब्धतेत संख्यात्मक स्वरूपाचे भेद असतात. गुणात्मकदृष्टया ते एकजिनसी असतात.
५) दोन वेगवेगळ्या वस्तूंच्या उत्पादन फलनांमध्ये घटक तीव्रता वेगवेगळी असते. काही श्रमप्रधान तर काही भांडवलप्रधान असतात.

६) वाहतूक खर्चाचा अभाव असतो.
७) दोन देशात मुक्त व अनिर्बंध व्यापार असतो.
८) प्रत्येक वस्तूच्या बाबतीत प्रत्येक देशात स्थिर उत्पादन फलनाची स्थिती असते.
९) दोन्ही देशांमध्ये ग्राहकांची पसंती आणि मागणीची रचना विशिष्ट असते.
१०) तांत्रिकज्ञानामध्ये कोणताही बदल होत नाही.

वरील गृहीत परिस्थिती लक्षात गेता, हेक्श्चर व ओहलीन यांचे असे मत आहे की, वस्तूंच्या किमतीमध्ये तुलनात्मक फरकामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार निर्माण होत असतो.

★ **घटक किंमतीच्या स्वरूपातील घटक मुबलकता –**

हेक्श्चर ओहीलीन यांनी घटक देणग्यांची मुबलकता, घटक किमतीच्या स्वरूपातून स्पष्ट केली आहे. जर ’A’ देशांमध्ये भांडवल तुलनेने स्वस्त असेल तर देशात भांडवल मुबलक आहे आणि ’B’ देशात श्रम स्वस्त असेल तर त्या देशात ’B’ श्रम विपुल आहे. हेच आपणांस पुढीलप्रमाणे लिहिता येते. (PC/PL)A< (PC/PL)B येथे PC व PL म्हणजे अनुक्रमे भांडवल व श्रमाची किंमत आणि A व B ही देशांची नावे आहेत.

दुस-या शब्दात सांगायचे झाल्यास जर A देशात भांडवल तुलनेने स्वस्त असेल तर A देशात भांडवल विपुल आहे आणि जर B देशात श्रम स्वस्त असतील तर B देश श्रम विपुल आहे. म्हणून A देश भांडवलप्रधान वस्तू निर्यात करेल आणि B देश श्रमप्रधान वस्तू निर्यात करेल.




आकृतीमध्ये ’X’ ही श्रमप्रधान वस्तू आहे आणि आडव्या अक्षावर मोजली आहे. तर ’Y’ ही भांडवलप्रधान वस्तू आहे ती उभ्या अक्षावर मोजली आहे. ’X X’ हा ’X’ वस्तू समउत्पादन वक्र आहे. ’Y Y’ हा ’Y’वस्तूचा समउत्पादन वक्र आहे. ते A आणि B देशांच्या बाबतीत सारखेच आहे. ’A’ देशातील तुलनात्मक घटक किंमती A Aघटक किंमत रेषेने दर्शविल्या आहेत.

आपण असे गृहीत धरू की प्रत्येक सम उत्पादन वक्र त्या त्या वस्तूचे प्रत्येकी १ नग उत्पादन दर्शवितो. म्हणून Y वस्तूचे एका नगाचे उत्पादन करण्यासाठी भांडवलाचे OC नग

तर श्रमाचे ODनग लागतील. कारण E बिंदूजवळ Y Y समउत्पादन वक्र समखर्चरेषा AA ला स्पर्श करून जातो.

त्याचप्रमाणे या पद्धतीनेच आपण A देशात X वस्तूचे एका नगाचे उत्पादन करण्यासाठीचा खर्च शोधून काढू शकतो. तो खर्च म्हणजे भांडवलाचे OM नग तर श्रमाचे ON नग इतका असेल. ' A ' देशात भांडवल मुबलक व स्वस्त असल्याने त्यामुळे Y या भांडवलप्रधान वस्तूच्या उत्पादनात विशेषीकरण करेल. हे आकृतीवरून स्पष्ट होते. Y वस्तूचे एक नग उत्पादन करण्यासाठी भांडवलाचे अधिक नग (OC) व श्रमाचे कमी नग (OD) वापरेल. त्याचप्रमाणे X X समउत्पादन वक्रावरील ' L' बिंदूवर भांडवलाचे कमी नग आणि श्रमाचे अधिक नग वापरून X वस्तूचे उत्पादन करेल. परंतु उत्पादन Y च्या तुलनेने महाग पडले. त्यामुळे A देश भांडवलप्रधान व स्वस्त अशी Y वस्तू उत्पादित करेल आणि त्याची B देशाला निर्यात करेल.

' B' देशातील X आणि Y वस्तूच्या प्रत्येकी एका नगाचा उत्पादनखर्च शोधून काढण्यासाठी YY समउत्पादन वक्राच्या G बिंदूजवळ स्पर्श करणारी BB ही पसरट घटक किंमत रेषा काढली आहे.अशीच घटक किंमत रेषा $B_1B_2$ ही BB ला समांतर काढली आहे. ती X X च्या समउत्पादन वक्राला 'S' जवळ स्पर्श करते. म्हणून आपणास असा निष्कर्ष काढता येतो की Y वस्तूचे B देशात एका नगाचे उत्पादन करण्यासाठी भांडवलाचे OK नग तर श्रमाचे OH नग लागतील आणि X वस्तूचे एक नग उत्पादित करण्यासाठी याच देशात भांडवलाचे OT नग तर श्रमाचे OR नग लागतील.

यावरून आपणांस हेक्श्चर ओहलीनचा सिद्धांत मांडता येतो. भांडवल विपुल देश, तुलनात्मक दृष्टीने स्वस्त असलेल्या भांडवलप्रधान वस्तू निर्यात करेल आणि श्रम विपुल देश तुलनेने स्वस्त असलेल्या श्रमप्रधान वस्तू निर्यात करेल.

समजा A आणि B देश आहेत. A देशात भूमिची विपुलता आहे आणि श्रम व भांडवलाची कमतरता आहे. त्यामुळे तिथे भूमी स्वस्त आहे. याउलट B देशात श्रमाची विपुलता आहे आणि इतर साधनांची कमतरता आहे. या गृहीतांच्या आधारावर उत्पादन साधनांच्या किमतीची स्थिती पुढीलप्रमाणे □

| साधन | A देश B देश | साधनाचे परिणाम |
|---|---|---|
| भूमी<br>श्रम<br>भांडवल | १ रू. २० रू.<br>६०० रू. १०० रू. ८० रू.<br>१५० रू. | एक एकर – एक वर्ष<br>एक एकर – एक वर्ष<br>१००० रू. |

समजा X व Y या दोन वस्तू आहेत. X वस्तूच्या उत्पादनासाठी भूमिचा अधिक वापर करावा लागतो आणि श्रम व भांडवलाचा वापर कमी करावा लागतो. याउलट Y वस्तूच्या उत्पादनसाठी तुलनेने भूमी कमी व श्रम अधिक लागतात. समजा X व Y वस्तूंच्या उत्पादनासाठी उत्पादन साधनाचा वापर पुढीलप्रमाणे करावा लागतो.

X आणि Y वस्तुंसाठी साधनांची गरज

| साधन | X वस्तू (१ मे. टन) | Y वस्तू (१ मे. टन) |
|---|---|---|
| भूमी | १००० | २ |
| श्रम | १ | १ |
| भांडवल | १ | १/२ |

वरील दोन्ही साधनांच्या आधारे आपणास A आणि B देशात X आणि Y वस्तूची उत्पादनखर्चाची स्थिती काय असेल ते स्पष्ट करता येते. वरील तक्ते आणि विश्लेषणांद्वारे असे म्हणता येईल की, हेक्श्चर आणि ओहलीन यांनी रिकार्डोचा सिद्धांत खोटा न ठरवता त्याच्यातील उणिवा दूर करून दोन देशामध्ये व्यापार का होतो? या कारणाचे सविस्तर स्पष्टीकरण केले आहे.

**हेक्श्चर ओहलीन सिद्धांताचे श्रेष्ठत्व –**

१) हेक्श्चर ओहलीन सिद्धांताने सर्वसाधारण मूल्य सिद्धांतामार्फत आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांत मांडला आहे. त्यामुळे श्रममूल्य सिद्धांताच्या तावडीतून सनातन सिद्धांताची सुटका केली आहे.

२) सनातन सिद्धांत आंतरराष्ट्रीय व्यापार हा आंतरप्रादेशिक व्यापारापासून पूर्णपणे भिन्न आहे असे मानतो. परंतु, हेक्श्चर-ओहलीन यांच्या मते, आंतरप्रादेशिक व्यापाराचा किंवा स्थानिक व्यापाराचा एक विशेष प्रकार म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापार होय असे मानतात.

३) सनातन सिद्धांतामध्ये श्रम या एकाच उत्पादन घटकाचा विचार तर हेक्श्चर-ओहलीन सिद्धांतात श्रम आणि भांडवल अशा दोन उत्पादन घटकांचा विचार केला आहे.

४) उत्पादन घटकांच्या पुरवठ्यात वेगवेगळ्या देशात असलेला फरक हा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा मुख्य आधार आहे असे हेक्श्चर-ओहलीनचा सिद्धांत मानतो, परंतु त्याचा सनातन सिद्धांतामध्ये अजिबात विचार झालेला नाही.

५) उत्पादन घटकांच्या तुलनात्मक किमतीमध्ये असलेल्या फरकामुळे वस्तू किमतीमध्ये तुलनात्मक फरक निर्माण होतो व त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार घडून येतो असे हेक्श्चर-ओहलीन सिद्धांतात म्हटले आाहे. परंतु सनातन सिद्धांतात केवळ वस्तूच्या तुलनात्मक फरकाचा विचार करतो.

६) सनातन सिद्धांत केवळ श्रमाची उत्पादकता विचारात घेतो तर हेक्श्चर-ओहलीन सिद्धांत श्रम व भांडवलाच्या उत्पादकतेतील तुलनात्मक फरकाचा विचार करतो.

७) सनातन सिद्धांत केवळ श्रम या एकाच घटकाचा दर्जा विचारात घेतो. तर हेक्श्चर-ओहलीन सिद्धांतात देशातील उत्पादन घटकांचा परिणामात्मक पुरवठा व त्यांचा दर्जा या दोन्हीही गोष्टी विचारात घेतो.

८) वस्तू उत्पादनात तुलनात्मक लाभात फरक का निर्माण होतो याचे विश्लेषण रिकार्डोचा सिद्धांत देऊ शकला नाही. परंतु त्याचे स्पष्टीकरण हेक्श्चर-ओहलीन सिद्धांताने दिले आहे.

९) दोन देशांमधील व्यापारामुळे काय लाभ मिळतात त्याचे स्पष्टीकरण सनातन सिद्धांत करतो. म्हणून तो कल्याणकारी सिद्धांताशी निगडीत आहे. तर हेक्श्चर-ओहलीन सिद्धांत शास्त्रीय सिद्धांत आहे तो व्यापार का निर्माण होतो यावर अधिक भर देतो.

१०) हेक्श्चर-ओहलीन सिद्धांताने सर्वप्रथम घटक बाजाराचा, आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांताशी संबंध जोडला आहे.

**टीका –**

१) ओहलीन $2 \times 2 \times 2$ प्रतिमान अत्यंत साध्या गृहीतावर आधारित आहे म्हणून त्यावर टीका केली जाते.

२) सनातन सिद्धांताप्रमाणेच हा सिद्धांत स्थितीशील सिद्धांत आहे. तो फक्त एका विशिष्ट वेळेला अर्थव्यवस्थेची असलेली वैशिष्ट्ये सांगतो. परंतु उत्पादन स्थितीमध्ये होणा-या बलदानुसार अर्थव्यवस्था कशी विकसित होईल याचे कोणतेही निर्देश हा सिद्धांत देत नाही.

३) हेक्श्चर-ओहलीन सिद्धांत घटक देणग्यांची गुणोत्तरे मोजण्यासाठी उत्पादन घटक एकजिनसी असतात असे गृहीत धरतो. परंतु वास्तवतेत कोणत्याही वेगवेगळ्या देशातील उत्पादन घटक एकजिनसी नसतात,एकच घटक विविध प्रकारचा असतो.

४) हेक्श्चर-ओहलीन सिद्धांत असेही गृहीत धरतो की, दोन देशांमध्ये एकाच वस्तूसाठी वापरण्यात येणारी उत्पादन तंत्रे एकजिनसी असतात असे गृहीत धरतो. परंतु प्रत्यक्षात एकाच वस्तूसाठी दोन देशांमध्ये वापरण्यात येणारी उत्पादन तंत्रे वोगवोगळी असतात.

५) ओहलीनच्या मते उत्पादन घटकांच्या तुलनात्मक किमती त्यांच्या तुलनात्मक पुरवठ्यानुसार ठरतात. त्याचा अर्थ घटक किमती ठरण्यामध्ये घटकांचा पुरवठा हाच मागणीपेक्षा महत्त्वाचा घटक आहे. परंतु घटक किमती निश्चितीमध्ये घटक मागणी महत्त्वाची असते आणि त्यामुळे प्रत्यक्ष परिस्थिती सिद्धांताच्या विरूद्ध दिसुन येऊ शकते.

६) विजन होलस यांच्या मते घटक किमती वस्तूंच्या किमती ठरवित नाहीत तर वस्तूंच्या किमती घटकांच्या किमती ठरवितात. हे मत आहलीन सिद्धआंताच्या विरूद्ध आहे. वस्तूंच्या किमती त्यांच्या उपयोगितीवरून ठरत असतात. जास्त उपयोगितांच्या वस्तूंना अधिक किमती मिळतात. त्यामुळे त्या वस्तूंचे उत्पादन करणा-या उत्पादन घटकांना आपोआप अधिक किमती मिळतील.

७) ओहलीन सर्वसमावेशक अशी सामान्य समतोलाची संकल्पना विकसित करू शकला नाही. म्हणून हॅबर्लरने त्याच्यावर टीका केली आहे.

८) ओहलीनचा सिद्धांत एक संदिग्ध व काही अटींवर आधारलेला सिद्धांत म्हणूनही त्याच्यावर टीका केली जाते.

**निष्कर्ष -**

हेक्श्चर-ओहलीन सिद्धांतात अशा अनेक टीका करण्यात येत असल्या तरी सनातन सिद्धांतापेक्षा तो एक सुधारित सिद्धांत आहे. सामान्य समतोलाशी संबंध जोडून आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या पायाचे विश्लेषण मांडण्याचा प्रयत्न या सिद्धांतात करण्यात आला आहे.

★ **आपली प्रगती तपासा:-**

१) हेक्श्चर-ओहलीन यांची घटक विपुलता संकल्पना म्हणजे काय ?

______________________________

______________________________

______________________________

## २.६ लिऑंटिफचा विरोधाभास – (The Leontief's Paradox)

**प्रस्तावना**

मुबलक उत्पादन घटकांच्या साहाय्याने उत्पादित केलेल्या वस्तूंची देश निर्यात करतो आणि दुर्मिळ उत्पादन घटकांच्या साहाय्याने उत्पादित होणा-या वस्तूंची देश आयात करतो. असा निष्कर्ष हेक्श्चर-ओहलीन सिद्धांतावरून निघतो. लिऑंटिफ यांनी १९४७ या वर्षातील अमेरिकेच्या आयात – निर्यातीच्या रचनेचा अभ्यास केला. त्यावेळेस सर्वानुमते अमेरिका भांडवल विपुल देश होता. त्यामुळे कोणीही असा निष्कर्ष काढेल की अमेरिका भांडवलप्रधान वस्तूंची निर्यात करेल आणि श्रमप्रधान वस्तूंची आयात करेल.

**संकल्पना –**

अमेरिकेत निर्यात १ दशलक्ष डॉलरने कमी करण्यासाठी आणि आयात पर्यायी वस्तू १ दशलक्ष डॉलरने वाढविण्यासाठी लागणा-या उत्पादन घटकांच्या वापरावर होणा-या परिणामाचे लिऑंटिफने मोजमाप केले. त्यांनी भांडवल व श्रम असे दोनच घटक व्यक्तपणे विचारात घेतले. जेव्हा निर्यात कमी केली जाते तेव्हा श्रम व भांडवल असे दोन्हीही घटक मुक्त होतात. तसेच आयात –स्पर्धात्मक वस्तूंचे उत्पादन वाढविले जाते तेव्हा श्रम व भांडवल असे दोन्हीही घटक लागतात. लिऑंटिफच्या गृहीतानुसार निर्यात उद्योगातून तुलनेने अधिक भांडवल मुक्त होईल आणि आयात स्पर्धात्मक उद्योगात तुलनेने अधिक श्रम लागतील.

पुढील तक्ता लिऑंटिफने केलेले गणितीय विश्लेषण दर्शवितो. हेक्श्चर-ओहलीन प्रमेयानुसार आपण जी अपेक्षा करतो त्याच्याबरोबर विरूद्ध त्याची अनुमाने आहेत. अमेरिकेच्या निर्यात उद्योगात आयात उद्योगाच्या तुलनेने अधिक श्रमिक वापरले जातात. त्याचा अर्थ अमेरिका श्रमप्रधान वस्तू निर्यात करते तर भाडवलप्रधान वस्तूंची आयात करते.

१९४७ मध्ये अमेरिकेत निर्यात १ दशलक्ष डॉलरने कमी करण्यासाठी व आयात पर्यायी वस्तू १ दशलक्ष डॉलरने वाढविण्यासाठी लागणारे भांडवल व श्रम.

| उत्पादनघटक | निर्यात वस्तू | आयात पर्यायी वस्तू |
|---|---|---|
| भांडवल(१९४७ च्या किमतीनुसार<br>(०००डॉलर)<br>श्रम(श्रमवर्ष)<br>भांडवल- श्रम गुणोत्तर | २५५१<br>१८२<br>१३.९९ | ३०९१<br>१७०<br>१८.१८ |

तक्त्यावरून असे लक्षात येते की, निर्यात उद्योगात उत्पादन १ दशलक्ष डॉलरने कमी केल्यास २५५१ हजार डॉलर भांडवल व १८२ श्रम वर्ष श्रम मुक्त होतात. तर आयात पर्यायी उद्योगात उत्पादन १ दशलक्ष डॉलरने वाढविण्यासाठी ३०९१ हजार डॉलर अधिक भांडवल व १७० श्रम वर्ष अधिक श्रम लागतात. म्हणजे अमेरिकेसारख्या भांडवल श्रीमंत देशातून श्रमप्रधान वस्तूंची निर्यात व भांडवलप्रधान वस्तूंची आयात होते. निर्यात उद्योगात भांडवल श्रम गुणोत्तर १३.९९ तर आयात पर्यायी वस्तू उद्योगात ते १८.१८ इतके आहे. आयात उद्योगात निर्यात उद्योगापेक्षा भांडवलाचा अधिक वापर होतो.

**टीका** –

लिऑंटिफच्या निष्कर्षाच्या प्रकाशानंतर अनेक अर्थशास्त्रज्ञांनी त्याच्या सांख्यीकीय माहितीच्या बिनचुकतेबद्दल आणि योग्यतेबद्दल तसेच त्याच्या पाहणी पद्धतीच्या स्वरूपाबद्दल प्रश्न उपस्थित केले होते. 'बुचनन' यांनी लिऑंटिफच्या भांडवलाच्या मापनावर आक्षेप घेतला आहे. त्यांच्या मते लिऑंटिफ भांडवलाचा टिकाऊपणा विचारात घेत नाही. 'लोब' यांच्या मते निर्यात क्षेत्रातील आणि आयात स्पर्धात्मक क्षेत्रातील भांडवल सधनतेमधील भेद सांख्यकिय दृष्टीकोनातून अर्थपूर्ण नाही. स्वरलिंग यांच्या मते १९४७ हे वर्ष असाधारण वर्ष होते.

आर. जोन्स असा युक्तीवाद करतात की अमेरिकेत निर्यात आणि आयात स्पर्धात्मक वस्तू इतर देशांच्या तुलनेत अधिक भांडवलप्रधान तंत्राने उत्पादित केल्या जातात. त्यामुळे ओहलीनचे प्रमेय चूक ठरत नाहीत. लिऑंटिफने अमेरिकेतील आणि इतर देशातील घटक देणग्यांचे तुलनात्मक मापन करण्याचा अजिबात प्रयत्न केला नाही. त्याने अमेरिकेचा फक्त एकांगी विचार केला आहे. त्याचप्रमाणे असे म्हटले जाते की, अमेरिकेत भांडवलप्रधान वस्तूंची मागणी खूप मोठी आहे. त्या तुलनेने भांडवलप्रधान वस्तूंचा पुरवठा कमी होत असेल. म्हणून अमेरिकेला भांडवलप्रधान वस्तूंची बाहेरून आयात करणे भाग पडत असेल.

**निष्कर्ष** -

लिऑंटिफ यांनी तुलनात्मक खर्च लाभ तत्त्व गणितीय पद्धतीने विश्लेषण करून अमेरिका भांडवलप्रधान देश असूनही तुलनात्मक खर्च लाभ मिळवण्यासाठी श्रमप्रधान वस्तूची निर्यात करतो व भांडवलप्रधान वस्तूंची आयात करतो हे विश्लेषणाच्या आधारे आंतरराष्ट्रीय व्यापारातील विरोधाभास स्पष्ट केले आहे.

★ **आपली प्रगती तपासा:-**

१) लिऑंटिफ विरोधाभास म्हणजे काय ?

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## २.७ प्रश्नमालिका :

१) रिकार्डोचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सनात्तन सिध्दांत स्पष्ट करा.

२) तुलनात्मक खर्च - लाभ सिध्दांतावरील टॉसीगचे पूर्नप्रतिपाद स्पष्ट करा.

३) तुलनात्मक खर्च -लाभ तत्वाविषयीचे गरिब – श्रमिक युक्तिवाद स्पष्ट करा.

४) घटक विपुलता ही सकंल्पना काय आहे ? हेक्चर ओहलिन प्रतिमाना संदर्भात लिऑन्टिफ विरोधाभास स्पष्ट करा.

❖❖❖

# ३

# आंतरराष्ट्रीय घटक हालचाली/गतिशिलता
# (International Factor movements)

३.० उद्दिष्ट्ये
३.१ प्रस्तावना
३.२ श्रमिक व भांडवलाच्या हालचाली निर्धारित करणारे घटक
३.३ आंतरराष्ट्रीय प्रवृत्ती : श्रमगतिशिलता व स्थलांतर
३.४ वेतन एककेंद्रभिमूखता
३.५ परकीय गुंतवणूकीतील प्रवृत्ती
३.६ परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक
३.७ बहुराष्ट्रीय कंपन्या
३.८ प्रश्नमालिका

## ३.० उद्दिष्ट्ये :-

नैसर्गिक आणि मानवनिर्मित घटकांचे विभाजन वेगवेगळ्या देशात भिन्नभिन्न झाले आहे. काही देशांमध्ये नैसर्गिक साधनसंपत्ती मुबलक आहे. तर काही देशात मानवनिर्मित साधनसंपत्ती, तंत्रज्ञान इ. ची रेलचेल आहे. त्यानुसार काही देशांनी आपला विकास साधला आहे तर काही देश विकासाच्या वाटेवर आहेत. अशा विविध घटकांसाठी एका देशातून दुसऱ्या देशात हालचाली/वहन होत असतात.

या पाठाची उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे :

१) कामगार व भांडवलाच्या हालचाली ठरविणारे घटक अभ्यासणे.
२) कामगाराच्या हालचालीच्या प्रवृत्ती अभ्यासणे.
३) वेतन एककेंद्रभिमूखता ही संकल्पना अभ्यासणे.
४) परकीय गुंतवणूकीतील प्रवृत्तींचा अभ्यास करणे.

## ३.१ प्रस्तावना

जगातील काही देशांनी नैसर्गिक साधनसंपत्ती मानवी साधनसंपत्ती, विज्ञान आणि तंत्रज्ञान, संशोधन, आंतरराष्ट्रीय व्यापार इ. च्या माध्यमातून देशांतर्गत उत्पादन, रोजगार आणि राष्ट्रीय उत्पादनात वाढ घडवून आपल्या देशाच्या विकासाचा वेग वाढविला आहे. तर काही देश वरील घटकांच्या अभावामुळे/कमतरतेमुळे विकासाच्या बाबतीत मागे पडले आहेत. तसेच काही देशांचा विकास मंद होत आहे. विविध देशातील विकासातील तफावतीतूनच जगाचे विकसित, विकसनशील आणि अविकसित देश असे विभाजन झाले आहे. यामुळेच उत्पादन घटकांचे

मुबलक प्रदेशांकडून कमतरता असलेल्या प्रदेशाकडे वहन होते यालाच उत्पादन घटकांच्या आंतरराष्ट्रीय हालचाली असे म्हणतात.

## ३.२ श्रमिक आणि भांडवलाच्या हालचाली (गतिशिलता) निर्धारित करणारे घटक

आंतरराष्ट्रीय व्यापारातून भौतिक वस्तू, सेवा, भांडवल हे तीन घटक एका देशातून दुसऱ्या देशात जातात यालाच उत्पादन घटकांच्या आंतरराष्ट्रीय हालचाली म्हणतात.

भांडवल एका देशातून दुसऱ्या देशात आगमन किंवा निर्गमन होणे म्हणजेच भांडवलाच्या आंतरराष्ट्रीय हालचाली होणे.

विकसित देशातून आर्थिक व मानवतेच्या हेतूने भांडवली हालचाली केल्या जातात तर विकसनशील व अविकसित देशात व्यवहारतोलातील तूट भरुन काढण्यासाठी परकीय भांडवलाचे आगमन स्वीकारले जाते.

### अ) भांडवलाच्या आंतरराष्ट्रीय हालचालीवर पुढील घटकांचा परिणाम घडून येतो.

**१) व्याजदारातील भिन्नता –**

व्याजदर हा भांडवली हालचालीवर परिणाम करणारा एक घटक आहे. सर्व साधारणपणे विकसित देशात भांडवलाची विपुलता असते. त्यामुळे व्याजाचे दर कमी असतात. याउलट अविकसित देशात बचतीच्या कमतरतेमुळे भांडवल निर्मितीचा वेग कमी असतो. भांडवलाच्या मागणीच्या मानाने पुरवठा कमी पडत असल्याने व्याजाचे दर जास्त असतात. विकसनशील देश विदेशी भांडवल आकर्षित करण्यासाठी व्याजाचे दर जास्त देऊ करतात. व्याज दरातील भिन्नतेमुळे भांडवली हालचाली होतात.

**२) सट्टेबाजीचा हेतू –**

सहेबाजीच्या हेतूने भांडवलाच्या हालचाली घडून येतात. दुसऱ्या देशात भविष्यात व्याजाचे दर वाढणार असतील, वस्तूंची मागणी वाढून कंपनीच्या नफ्यात वाढ होऊन अधिक लाभांश मिळण्याची शक्यता असेल. भांडवल बाजारात तेजीचे वातावरण निर्माण होऊन शेअर्सच्या किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होणार असेल तर गुंतवणूकदार अल्पकालीन प्रपत्रे आणि दुय्यम भांडवल बाजारातून शेअर्स, कर्जरोख्यांची खरेदी करुन व्याज, लाभांश व भांडवली नफा मिळविण्यासाठी भांडवली हालचाली करतात.

**३) विनिमय दरातील चढ - उतार –**

विनिमय दरातील चढ - उतारामुळे भांडवली प्रवाहात बदल होतो. समजा, एखाद्या देशाच्या विनिमय दरात घट होऊन चलनाचे अवमूल्यन केले तर त्या देशातील ज्या नागरिकांकडे विदेशी चलन आहे. ते त्या दिवशी चलनाचे विदेशी मालमत्तेत म्हणजेच विदेशी कंपन्याचे शेअर्स, डिंबेचर्स - कर्ज रोख्यात रुपांतरण करतात. त्याचप्रमाणे देशाच्या अनिवासी नागरिकांच्या ठेवी देशात ज्या अल्पकालीन गुंतवणूकीत असतात. त्या ते काढून ज्या देशात राहतात त्या देशात परत नेतात. कारण अवमूल्यनाने मालमत्तेचे मूल्य कमी झालेले असते.

**४) कर विषयक धोरण –**

सरकारचे कर विषयक धोरण विभेदात्मक स्वरुपाचे असेल तर त्या भांडवली प्रवाहावर सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

**५) देशांतर्गत परिस्थिती –**

देशांतर्गत परिस्थिती गुंतवणूकीला अनूकूल असेल तर व्याज, नफा, लाभांशाच्या अपेक्षेने विदेशी गुंतवणूक प्रवाहित होते. तसेच देशांतर्गत अनुकूल परिस्थिती असल्याने देशातील गुंतवणूकदार आपल्या गुंतवणूकी विदेशात न करता देशातच करतात. याउलट परिस्थितीत गुंतवणूकी परदेशात होतात.

**६) बँक दरातील बदल –**

देशाची मध्यवर्ती बँक व्याजदरात बदल करुन अल्पकालीन भांडवली प्रवाहात बदल करु शकते. बँक दरात वाढ केल्यास व्याजदरात वाढ होते. वाढत्या व्याजदरातचा फायदा घेण्यासाठी विदेशातील भांडवल देशात प्रवाहीत होते. याउलट बँक दरात घट केल्यास देशातील विदेशी भांडवलाबरोबरच स्वदेशी भांडवलाचेही निगमन होते.

**७) भांडवलाची सीमीत कार्यक्षमता –**

भांडवलाची दीर्घकालीन गुंतवणूक करणारे व्याजाचा दर आणि भांडवलाची सिमात कार्यक्षमता यांची तुलना करतात. दुसऱ्या देशात व्याज दरापेक्षा भांडवलाची सिमांत कार्यक्षमता जास्त असेल तर त्या देशात लाभ मिळविण्याऱ्या हेतूने भांडवलाच्या दीर्घकालीन हालचाली होतात.

**८) जोखमीचे विविधीकरण –**

भांडवलदार जोखमीचे विविधीकरण करण्यासाठी एकाच देशात भांडवल गुंतवणूक करतात. एखाद्या देशात भांडवली नुकसान झाले तर ते दुसऱ्या देशातून भरुन काढण्यासाठी विविधीकरण केले जाते. विविधी करणातूनही भांडवली हालचाली होतात.

**९) सरकारचे धोरण –**

विदेशी भांडवल गोठविणे, जप्त करणे, खाजगी कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करणे, सार्वजनिक क्षेत्राच्या विस्तार करणे. इ. सरकारचे धोरण असेल. तर विदेशी भांडवलाचा प्रवाह भारतात येत नाही. याउलट विदेशी भांडवल आमंत्रित करण्यासाठी सरकारने विदेशी गुंतवणूकीवरील नियंत्रणे हटविली, करात सवलती दिल्या, पायाभूत सुविधा पुरविल्या, नफा व लाभांश मायदेशी नेण्याची परवानगी दिली तर देशात विदेशी भांडवल प्रवाहीत होते.

**१०) राजकीय परिस्थिती –**

देशात राजकीय स्थैर्य असेल, विदेशी भांडवल आगमनाला राजकीय परिस्थिती अनुकूल असेल, देशात अंतर्गत शांतता, आणि सुन्यवस्था असेल, देशात आर्थिक आणि सामाजिक विकास होत असेल तर दीर्घकालावधीसाठी थेट भांडवली गुंतवणूकीत वाढ होऊ शकते. यातून विदेशी भांडवलाचे आगमन होते.

### ११) विनिमय नियंत्रण –

सरकारने चलन विनिमयावर कडक निर्बंध घातले तर आपोआप भांडवल आगमन – निगमनावर नियंत्रण येतात.

अशा प्रकारे वरील घटक भांडवलाच्या हालचालीवर परिणाम घडवून आणतात.

**आपली प्रगती तपासा :-**

१) भांडवलाच्या आंतरराष्ट्रीय भांडवलीचे निर्धारक लिहा.

__________________________________________________

__________________________________________________

__________________________________________________

## ३.२ ब) श्रमाची गतिशिलता निर्धारित करणारे घटक

**(Factors Determinants of Labour Mobility)**

**प्रस्तावना :-**

आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध कारणामुळे एका देशातून दुसऱ्या देशात श्रमिकांचे आगमन व निर्गमन होते यालाच श्रमिकांच्या हालचाली असे म्हणतात. श्रमिकांना हालचाली प्रामुख्याने सामाजिक, आर्थिक, नैसर्गिक व राजकीय कारणामुळे निर्माण होणाऱ्या बंधने व मर्यादा यामुळे होतात. विशेषतः अल्पविकसित व विकसमशील देशात त्या अधिक प्रभावी असतात त्यामुळे अशा देशात श्रमिकांची संख्या वाढते. एका अंदाजानुसार अशा मर्यादामुळे विकसनशील देशाची प्रत्येक वर्षी २५० बिलीयन डॉलर्सची लुबाडणूक होते. अशा मर्यादामुळे श्रमिकांचे आंतरराष्ट्रीय पातळीवर स्थलांतर कायेदशीर किंवा बेकायदेशीर ऐच्छिक सक्तीचा स्वरुपात होते.

**श्रमिकांच्या आंतरराष्ट्रीय हालचालीवर परिणाम करणारे घटक**

१) वेतनदरातील भिन्नता व रोजगार संधीतील विविधता.
२) विकासाच्या / प्रगतीची संधी.
३) राहणीमानाचा दर्जा
४) मूलभूत सोयी सुविधा
५) आधुनिक पध्दतीची जीवनशैली.
६) वेतनत्तर फायदे. शिक्षक व प्राशीक्षणच्या सुवीधा. श्रमिकांना आर्थिक व आर्थिकेतर घटकांमुळे एका देशातून दुसऱ्या देशात जावे लागते.

**आंतरराष्ट्रीय श्रमिकांच्या हालचालीच्या प्रवृत्ती**

वेतनदर, रोजगारसंधी, उच्च राहणीमान, विकासाच्या संधी, मुलभूत सुविधा इ. कारणामुळे श्रमिकांच्या आ्तरराष्ट्रीय पातळीवर हालचाली होतात. ज्या देशात वरील सर्व प्रकारच्या सुविधा असतात, व ज्या देशात या संबंधीच्या मर्यादा आहेत ज्या देशाकडून सुविधा असणाऱ्या देशाकडे स्थलांतर करण्याची प्रवृत्ती अधिक दिसून येते. भारतासारख्या विकसनशील देशात लोकसंख्या, तत्रज्ञान, रोजगार संधीचा अभाव, दारिद्रय व बेकारी या व असा प्रकारच्या घटकामुळे श्रमिक अमेरिका, कँनडा, युरोपिय राष्ट्रे जपान, ऑस्ट्रेलिया इ. देशात जातात. श्रमिकांच्या हालचालीची प्रवृत्ती प्रामुख्याने अविकसित व विकसनशील देशाकडून विकसित देशाकडे अधिक आहे.

**आंतरराष्ट्रीय श्रम स्थलांतर (International Labour Migration)**

श्रमिकांचे एका देशातून दुसऱ्या देशात स्थलांतर होत असेल तर, त्याला आंतरराष्ट्रीय श्रम स्थलांतर असे म्हणतात. श्रमिकांचे स्थलांतर ऐच्छीक स्वरुपाचे असते तेव्हा त्याला मुख्य प्रेरणा आर्थिक असते. स्थलांतर मुख्यतः चांगल्या आर्थिक संधीच्या शोधामुळे असते. स्थलांतरावर प्रभाव पाडणारे घटक पुढील प्रमाणे दोन विभागात वर्गीकरण केले जाते.

**१) ढकलणारे घटक (Push Factors)**

अ) गरीब आर्थिक परिस्थिती

ब) संधीचा कमतरता.

वरील कारणामुळे श्रमिक चांगल्या जीवनासाठी संधी शोधत प्रदेशाबाहेर ढकलत जातो. त्यामुळे त्यांना ढलकणारे घटक म्हणतात.

**२) ताणणारे घटक (Pull Factors)**

आर्थिक संधी, सुविधा, उच्चवेतन, आधुनिक जीवनशैली, इ. मुळे श्रमिकाहना विकसीत देश आकर्षित करत असतात. मात्र या प्रकारचे आकर्षक अकुशल श्रमिकाच्या बाबतीत दिसन येतनाही कुशल श्रमिकांचे या प्रकाराच स्थलांतर होते. श्रमिकांचे स्थलांतर विकसीत देशात मोठ्या प्रमाणात होते. भांडवलापेक्षा श्रमिकांची आंतरराष्ट्रीय गतिक्षमता कमी आहे असे मानले जाते. सध्या मात्र श्रमिकांचे स्थलांतर महत्वाचा घटक म्हणून जागितक स्तरावर पाहीले जाते. स्थलांतराची प्रक्रिया अतिशय गुतांगुती आहे. स्थलांतराचा परिणाम केवळ उत्पनाचा नसून कल्याणाचा परिणाम आहे.

**३) आर्थिक घटक :**

आर्थिक घटक श्रमस्थलांतरणासाठी कारणीभूत असतात. कमी उत्पन्न असणारे श्रमिक जास्त उत्पन्न मिळवण्याच्या उद्देशाने जिथे चांगल्या उत्तम रोजगाराच्या संधी उपलब्ध असतात अशा ठिकाणी स्थलांतरीत होतात.

**४) भौगोलिक घटक :**

जागतिक अर्थव्यवस्थेत देशा-देशातील फक्त १०० लाख लोक / श्रमिक एका देशातून दुसऱ्या देशात स्थलांतरीत होतात. कायम वास्तव्य व स्थलांतरणास लोकसंख्येची सामान्य प्रवृत्ती कारणीभूत असते.

**५) श्रमिकांचे वैयक्तीक / व्यक्तीगत वैशिठ्ये:**

श्रमिकांची व्यक्तीगत वैशिष्ठये स्थलांतरणास कारणीभूत असतात. यामध्ये साधारणपणे

अ) वय (२० ते २४ वर्षे)

ब) शिक्षण (उच्च किंवा व्यावसायिक शिक्षण)

क) कौशल्य (कुशल व प्रशिक्षित श्रमिक)

ड) अविवाहीत वक्ती.

इ. व्यक्तीगत घटक स्थलांतरणास कारणीभूत ठरतात. वरिल घटकांशिवाय पूढील काही घटक स्थलांतरणास जबाबदार ठरतात.

६) अंतर किंवा ठिकाणाची भूमिका
७) गतिशिलता परतावा.
८) राजकीय घटक.
९) सरकारी धोरणे
१०) सामाजिक घटक

थोडक्यात श्रमिकांच्या ताणणारे घटक, ढकलणारे घटक, आर्थिक, सामाजिक व राजकीय घटकांमूळे स्थलांतरणावर परिणाम होत असतो.

**आपली प्रगती तपासा**

१. श्रमाची गतिशिलता म्हणजे काय ?

______________________________

______________________________

______________________________

२. ताणणारे घटक व ढकलणारे घटक म्हणजे काय ?

______________________________

______________________________

______________________________

## ३.३ आंतरराष्ट्रीय प्रवृत्ती : श्रमगतिशिलता आणि स्थलांतर

एका देशातून दुसऱ्या देशाकडे श्रमिकांच्या हालचाली किंवा श्रमाचे स्थलांतर ही एक महत्त्वाची गोष्ट आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र आणि राजस्व धोरणाची आहे. कोणत्या प्रेरणेने श्रम कायम वास्तव्य ते स्थलांतर करतात ? प्रथम ही गोष्ट विचारात घोतली पाहिजे व त्यानंतर आपण जागतिक अर्थव्यवस्था आणि अमेरिका पासून काही माहिती चे परिक्षण करणार आहोत. कायम वास्तव्य करणारे लोक जे कायमस्वरुपी बदल म्हणून त्यांच्या वास्तव्य देशाशी करतात. (दुरिस्ट)(पर्यटक) व्यावसायिक प्रवासी, धार्मिक व्यक्ती वैद्यकीय उपचार घेणारे लाखो दरवर्षी परकीय देशांना भेट देतात त्यांचा समावेश कायमस्वरुपी वास्तव्य या व्याख्येत/संकल्पनेत होत नाही.

### १) श्रम गतिशिलतेतील आंतरराष्ट्रीय प्रवृत्ती :-

१९६५ च्या प्रारंभी फक्त ७५ लाख लोक जगामध्ये एका देशातून दुसऱ्या देशात स्थलांतरीत होत होते. तर २००० मध्ये त्यांची संख्या १५० लाखावर गेली. १९६५ पासून १९७५ पर्यंत कायम वास्तव्य असणाऱ्या लोकांचा वार्षीक दर १.२% वाढला.सध्या हाद र २.६ ते ३% एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात आहे. एकूण लोकसंख्येच्या जवळजवळ १०% कायम वास्तव्य दर हा पाश्चिमात्य युरोप उत्तर अमेरिका या देशातील आहे. अंदाज २१ लाख कायमस्वरुपी स्थलांतरीत फ्रान्स, कॅनडा, ऑस्ट्रेलीया आणि यु.के. या देशात आहेत. तर २५ लाखापेक्षा जास्त कायमस्वरुपी स्थलांतरीत अमेरिका (U.S) या देशात आहेत. काही देशांच्या कायम स्थलांतरीत धोरणामध्ये मतभेद आहेत. याचे कारण कायमस्वरुपी स्थलांतरीत म्हणजे काही लोक स्वच्छेने

एका देशातून दुसऱ्या देशात स्थलांतरण करतात. इथे प्रेरणा आणि परिणाम विचारात घेतले पाहिजे. सामान्यपणे हे ऐच्छिक स्थलांतरण आर्थिक कारणासाठी होते. आणि देशामधील ही श्रमगनिशिलना भांडवखली गतिशिलतेसारखी जास्त आहे.

स्वदेशामध्ये राहणीमानाचा दर्जा खालावलेला असतो त्यामुळे श्रमिक स्वदेश सोडून परदेशात स्थलांतरीत होतात. काही देश फक्त कुशल आणि प्रशिक्षित अर्थव्यवस्थेसाठी उत्पादित तयार करतात. त्यामुळे अशा घटनेमध्ये विकसनशिल देशात बेकारिचा दर वाढतो परिणामी श्रम विकसित देशाकडे स्थलांतर करतात.

ढकलणारे घटक किंवा कृतीस (Push factors) प्रवृत्त करणाऱ्या घटकात दारिद्र्य, बेकारी, गरिब आर्थिक परिस्थिती, संधी शोधात श्रमिक देशाबाहेर ढकलला जातो किंवा प्रवृत्त होतो.साहाजीकच त्यामुळे जगातिक अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचे वाटप सारखे होते. तथापी, अंदाजे ८०% जागतिक उत्पादन आणि उत्पन्न फक्त २६ देशाकडून होते त्याच बरोबर हे प्रमाण जागतिक लोकसंख्येच्या २०% पेक्षाही कमी आहे.

ताणणारे घटक (Pull fctors) विकसित प्रदेशात रोजगारासाठी स्थलांतर करावयास लावले जाते. गरजापूर्तीच्या इतर आर्थिक संधी, सुविधा, उच्च वेतन, आधुनिक पध्दतीचे जीवनमान इ. बाबींमुळे श्रमिकांना विकसित क्षेत्र आकर्षित करते. व्यवसायिक आणि उच्च कौशल्याचे लोक आंतरराष्ट्रीय स्थलांतर मोठ्या प्रमाणात करतात. जागतिक बँकेच्या अहवालानुसार मागिल १९७० च्या दशकात बांगला उत्पन्न मिळवण्यासाठी अकुशल श्रमिकांचे स्थलांतर दहा पटीपेक्षा जास्त अरबगल्फ देशात झाले असा तो एकमेव देश आहे.

सारांश, आधुनिक जगात ढकलणारे घटक (Push fctors) आणि ताणणारे घटक (Pull fctors) यामुळे आंतरराष्ट्रीय स्थलांतराचे प्रमाण वाढले आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) आंतरराष्ट्रीय स्थलांतर म्हणजे काय ?

______________________________

______________________________

______________________________

## ३.४ वेतन एककेंद्रभिमूखता (Wage Convergence)

आधुनिक जगात जरी देशातील लोकांच्या सातत्याने गतिशिल हालचाली होत असल्या तरी वास्तविकपणे श्रमगतिशिलता विशिष्ट वयापर्यंत शक्य असते. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या पूर्वार्धात स्थलांतर न होण्याचे प्रमाण देशातून घटले होते. जागतिक अर्थव्यवस्थेत लोहमार्ग, जहाजबांधणी, टेलीग्राफ केबल अशी नवीन क्षेत्रे नव्याने निर्माण झाल्यामुळे व स्थलांतरावरील कायदेशीर बंधने कमी झाल्यामूळे लाखो लोक चांगल्या जीवनाच्या शोधात दूर ठिकाणी वळलेले आहेत. युनायटेड स्टेटस कॅनडा, अर्जेटीना ऑस्ट्रेलिया जपान ब्राझील, आफ्रिका देशात इ. देशांतील लोक उच्च वेतनामूळे मोठ्या प्रमाणात स्थलांतरीत होत आहेत.

विविध देशातींल वास्तव्य वेतनातील प्रवृत्ती (१८७० ते १९१३) ही चार प्रमूख मुक्कामी देश व चार प्रमूख मूळ देशांची पूढील कोष्टकाद्वारे दाखवण्यात आली आहे.

| देश | वास्तव्य वेतन १८७० U.S = 100 | वास्तव्य वेतनातील वाढ (%) टक्केवारीत १८७० - १९५३ |
|---|---|---|
| अ) मुक्कामी देश | | |
| अर्जेंटीना | ५३ | ५१ |
| ऑस्ट्रेलिया | ११० | १ |
| कॅनडा | ८६ | १२१ |
| युनायटेड स्टेटस | १०० | ४७ |
| ब) मूळ देश | | |
| इरलँड | ४३ | ८४ |
| इटली | २३ | ११२ |
| नॉर्वे | २४ | १९३ |
| स्वीडन | २४ | २५० |

वरील तक्त्यामध्ये सुरुवातीला मुक्कामी देशांतील लोकांचे मूळ देशातील लोकांच्या वास्तव्य वेतनापेक्षा जास्त होते. पूढच्या चार दशकानंतर सर्वच देशातील वास्तव्य वेतन वाढले (कॅनडा सोडून) परंतु मूळ देशांचे वास्तव्य वेतन मुक्कामी देशांपेक्षा जास्त वाढले त्यामुळे वेतनसमानता निर्माण झाली.

आकृतीद्वारे स्पष्टीकरण

समजा कामगार स्वदेशातून परदेशात जाण्यासाठी पात्र आहेत. कामगारांच्या या हालचालीमूळे स्वदेशातील कामगारसंख्या कमी होईल व वास्तव्य वेतन वाढेल तर परदेशात कामगारसंख्या वाढेल व वास्तव वेतन घडेल जर कामगतिशिलतेत काही अडथळा आला नाही तर ही प्रक्रिया सुरळीत राहून दोन्ही देशातील श्रमिकांचे सिमांत उत्पादन समान राहिल.

खालील आकृती आंतरराष्ट्रीय श्रमगतिशिलता व वेतन एककेंद्रभिमूखता याची कारणे आणि परिणाम उदाहरणाच्या सहाय्याने दर्शविते.




वरील आकृतीत समांतरअक्ष जगातील एकूण श्रमशक्ती दर्शवितो. स्वदेशातील कामगार समांतर अक्षाच्या (उभा अक्ष) डावीकडे तर परदेशातील कामगार समांतर अक्षाच्या उजवीकडे (उभारेषेवर) दर्शविले आहेत. डावीकडील उभ्या अक्षावर स्वदेशातील श्रमिकांचे सिमांत उत्पादन तर उजवीकडील उभ्या अक्षावर परदेशातील श्रमिकांचे सिमांत उत्पादन दर्शविले आहे. समजा सुरुवातील स्वदेशातील $OL^1$ कामगार आणि विदेशातील $L^1O^*$ कामगार आहेत. दिलेल्या या साधनांवरुन असे म्हणता येईल की स्वदेशातील वेतनदर कमी होईल (C बिंदू) विदेशातील वेतन दरापेक्षा (B बिंदू) कोणत्याही देशातील उच्च वास्तव वेतनाची संधी मिळाल्यास कामगार मुक्तपणे स्थलांतर करु शकतात. श्रमिक स्वदेशातून विदेशात जातील जरी वास्तव वेतन दर समान असेल. जागतिक अर्थव्यवस्थेतील एकूण श्रमशक्तीचे विभाजन एक स्वदेशातील $OL^2$ श्रमिकांशी तर $L^2O^*$ विदेशातील श्रमिक (बिंदू A)

जगातील एकूण श्रमशक्तीचे विभाजन पूढील तीन गोष्टीवर अवलंबून असते हे लक्षात घ्यावे लागले.

१) वास्तव वेतन एककेंद्रभिमूखता – वास्तव वेतन स्वदेशात घटते व विदेशात वाढते.
२) जगाचे उत्पादन वाढते (स्वदेशातील श्रमिकांचे सिमांत उत्पादन घटते त्यामूळे स्वदेशाला तोटा होतो तर विदेशात फायदा होतो).
३) काही लोकांना मूळातच उच्च वास्तव वेतन मिळते मात्र काही मूळातच विदेशात कमी वास्तव वेतनवर काम करतात.

थोडक्यात आंतरराष्ट्रीय व्यापारा पासून फायदा, आंतरराष्ट्रीय श्रमगतिशिलतेमूळे मिळू शकतो.

**आपली प्रगती तपासा**

प्र. वेतन एककेंद्रभिमूखता ह्या संकल्पनेचा अर्थ सांगा.

---

## ३.५ परकीय भांडवलीची/गुंतवणूकीची प्रवृत्ती
## (Trends of foreign Investment)

प्रस्तावना : विकासासाठी आवश्यक असलेल्या गुंतवणूकीसाठी भारतासारख्या विकसनशील देशाला परकीय भांडवलावर अवलंबून रहावे लागते, कारण अशा देशांमध्ये भांडवलाची कमतरता असते. शिवाय भांडवल बाजार अविकसीत असतो. अननुभवीपणामुळे काही उत्पादन क्षेत्रात, अशी उत्पादन क्षेत्रे विकासासाठी अत्यावश्यक असली तरीही राष्ट्रीय भांडवल प्रवाहीत होत नाही. संभाव्य बचत वेगाने पुढे सरकत नाही. म्हणून परकीय भांडवलाचे अशा देशांतील स्थान अनन्य साधारण आहे.

**परकीय भांडवलाचे स्वरुप/स्त्रोत/प्रकार**

**अ) खाजगी परकीय गुंतवणूक :-**

१) परदेशी मदत (foreign aid) : परकीय भांडवलाचा सवलतीने मिळणारा अंश म्हणजे परकीय सहाय्य होय. हे कर्ज अथवा अनुदान या स्वरुपात मिळते. अनुदाने ही देणगीच्या स्वरुपात असतात. कर्जे सवलतीच्या दरात असतात व दीर्घ मुदतीची असतात. हे सहाय प्रामुख्याने विकसीत राष्ट्रींची सरकारे व आंतरराष्ट्रीय संस्थांकडून मिळते.

२) बाह्य व्यापारी कर्ज : आंतरराष्ट्रीय भांडवल बाजारातून बाजारनिर्धारीत व्याज दराने ही कर्जे घेतली जातात. ही कर्जे अल्पकालीन व महाग असल्यामुळे त्यासाठी सरकारची मान्यता आवश्यक असते.

३) प्रत्यक्ष खाजगी परदेशी गुंतवणूक (FDI) : ही दोन प्रकारची असते – पोर्टफोलीओ गुंतवणूक व प्रत्यक्ष परदेशी गुंतवणूक, परदेशी कंपन्या व वित्तीय संस्था आपल्या देशातील कंपन्यांचे भाग भांडवल व कर्जरोखे यात गुंरवणूक करतात, ती पोर्टफोलीओ गुंतवणूक होय. यावर व्याज द्यावे लागत नाही, तर नफ्यातील वाटा द्यावा लागतो.

प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक परदेशी कंपनीची -शाखा अथवा उत्पादनात देशी व परकीय भांडवलाचा एकत्रीत सहभाग म्हणजेच परदेशी एकत्रीकरण (Foreign Collaboration) या स्वरुपात असते. समभाग भांडवल (Equity Capital), उत्पन्नाची पुनर्गुंतवणूक (Reinvesed Earnings) व इतर भांडवल या स्वरुपात खाजगी परकीय गुंतवणूक असते. इतर भांडवलात बहुराष्ट्रीय कंपनीने संलग्न कंपनीला दिलेल्या अल्पकालीन व दीर्घकालीन निधीचा समावेश होतो.

४) अनिवासी गुंतवणूक व ठेवी :- परदेशी राहत असलेल्या स्वकीय नागरीकांकडून मिळणारा निधी या स्वरुपात असतो. परकीय भांडवलाचा हा महत्त्वाचा स्त्रोत गणला जातो.

प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक पुढील स्वरुपाची असते :

१) बाजार पेठेचा शोध घेत विस्तारीत बाजारपेठ मिळण्यासाठी, ही गुंतवणूक असते देशाचे उत्पन्न व वृध्दी दर यावर ती अवलंबून असते.

२) पायाभूत सुविधा व श्रमिकांवरील खर्च यावर आधारीत उत्पादन खर्च कमी असल्याने ही गुंतवणूक आकर्षित होते.

३) देशाची तांत्रीक स्थीती, ब्रँड नेम, आर्थिक धोरण, अर्थव्यवस्थेचा खुलेपणा या सारख्या लाभांवर देखील परदेशी खाजगी गुंतवणूक अवलंबून असते.

**ब) परकीय अप्रत्यक्ष गुंतवणूक किंवा रोखारुपी गुंतवणूक (Foreign investment or portfolio investment)**

जेव्हा विदेशी गुंतवणूकदार व गुंतवणूक संस्था देशाच्या दुय्यम भांडवल बाजारात शेअर्स, डिबेंचर्स, कर्जरोखे इ. रोख्याची व्याज लांभाश आणि सट्टेबाजीतील नफा मिळण्याच्या हेतूने दूय्यम खरेदी करतात तेव्हा रोखरुपी गुंतवणूक असे म्हणतात.

रोखरुपी गुंतवणूकीतून रोख्यांच्या मालकी हक्कांचे व दाव्यांचे हस्तांतरण होते. ही गुंतवणूक सट्टेबाजीच्या हेतूने प्रेरित होऊन केली जाते. हिचा हेतू कंपणीच्या व्यवस्थापणात सहभागी होणे, व्यवस्थापण ताब्यात घेणे, कंपनीची मालकी मिळवणे हा नसतो. ह्या गुंतवणूकीतून देशाच्या मालमत्तेत वाढ होत नाही. कारण यातून आहे त्याच रोख्यांची खरेदी केली जाते. ही गुंतवणूक अल्पकालीन असते. ती देशातून केव्हाही बाहेर जावू शकते.

रोखारुपी गुंतवणूकदरांचा सट्टेबाजीच्या हेतूबरोबरच स्वदेशी व विदेशी भांडवल बाजारातील जोखीम कमी करणे म्हणजेच जोखीमचे विविधीकरण करणे हा हेतू असतो. या गुंतवणूकीसाठी कमीत कमी व्यवहारखर्च करावा लागतो. आणि गुंतवणूकीसाठी मोठ्या रकमेची आवश्यकता नसते. हे गुंतवणूकदारांच्या दृष्ट्रीने फायद्याचे होय.

रोखारुपी गुंतवणूक एका देशात व्यक्ती किंवा आर्थिक संस्था इतर देशांचे समभाग आणि रोखे असतात. अशा रोख्यांना किंवा समभागांना त्या देशाच्या सरकारची हमी असते. अलिकडच्या काळात अप्रत्यक्ष गुंतवणूकीची नवी पध्दत निर्माण झाली आहे.

जागतिक बँक विकसनशील देशांना विशिष्ठ प्रकल्पात पैसे उपलब्ध करुन देण्यासाठी रोखे विक्रीस काढतात. परकीय खाजगी गुंतवणूकदार हे रोखे विकत घेऊ शकतात.

**आपली प्रगती तपासा**

प्र.१) प्रत्यक्ष गुंतवणूक म्हणजे काय ?

_________________________________________________

_________________________________________________

_________________________________________________

प्र.२) अप्रत्यक्ष परकीय गुंतवणूक म्हणजे काय ?

_________________________________________________

_________________________________________________

_________________________________________________

## ३.६ थेट परकीय गुंतवणूक (Foreign Direct Investment)

१९८० साली भारत सरकारने अप्रवासी भारतीय नागरिक, तेल विकास व नियीत देश व परकीय गुंतवणूकदार यांना भारतात थेट गुंतवणूकीसाठी याकृष्ट करण्यासाठी पुढील उपाययोजना केल्या.

१) नवीन कंपन्यांच्या तसेच आस्तित्वात असलेल्या कंपन्यांच्या भागभांडवलात परकीय कंपन्यांना ४०% पर्यंत गुंतवणूक करण्याची परवानगी देण्यात आली.

२) किमान ३ वर्षे गुंतवमूक न काढण्याच्या अटीवर राहण्याची घरे, मालमत्ता यांच्यामध्ये परकीयांना १००% गुंतवणूक कमाल १६% नफा मिळण्यापर्यंत परवानगी देण्यात आली होती.

३) भारतातील जे उद्योग आजारी आहेत त्या उद्योगांचे पुर्नवसन करण्यासाठी पाच वर्षाची गुंतवणूक न काढण्याच्या अटीवर परदेशी कंपन्यांना १००% गुंतवणूक करण्याची परवानगी देण्यात आली.

४) हवाई क्षेत्रात अप्रवासी भारतीयांना १००% भागभांडवल सहकार्याची परवानगी देण्यात आली.

५) खाजगी बँकिंग क्षेत्रात परकीय गुंतवणूकीची मर्यादा ४०% पर्यंत भागभांडवल स्वरुपात गुंतवणूक करण्याकरिता परकीयांना परवानगी देण्यात आली.

६) जे उद्योग किंवा व्यापारी क्षेत्र किंवा व्यापार क्षेत्रात गुंतवलेले आहेत. अशा व्यवसायाबद्दल १००% भाग भांडवल गुंतवून भागीदारी स्वरुपात गुंतवणूक करण्याची परवानगी देण्यात आली.

क्षेत्रानुसार परकीय थेट गुंतवणूक

खालील तक्त्यात १ ऑक्टोंबर १९११ ते ३१/५/१९९९ या कालाधीत झालेल्या गुंतवणूकीची टक्केवारी दिली आहे.

| क्षेत्र | थेट परकीय गुंतवणूक रु |
|---|---|
| इंधन | ३१.३७% |
| टेलिफोन सेवा | १८.३३% |
| सेवा क्षेत्र (वित्तीय, अवित्तीय बँक) | |
| दवाखाने | ६.१२% |
| वाहतूक | ७.१३% |
| रसायने व खते | ५.८३% |
| धातू उद्योग | ५.७५% |
| अन्न प्रक्रिया व इतर उद्योग | ३१.१३% |

वरील आकडेवारी अशी दर्शविते की भारतात वीजनिर्मिती, तेल शुध्दीकरण, टेलिफोन सेवा, अन्नधान्य प्रक्रिया व इतर उद्योग यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक झालेली आहे.

**थेट परकीय गुंतवणूक मिळण्याचे मार्ग :**

१९९० ते २००१ या कालावधीत भारतात थेट गुंतवणूक करण्याच्या मार्गामध्ये फारसे बदल झालेले नाहीत. मॉरिशस, अमेरिका, जपान, जर्मनी या देशांमधून भारतात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक झालेली आहे. या गुंतवणूकीत संगणकाचे भाग, इंजिनिअरिंग, औद्योगिक क्षेत्र, सेवाक्षेत्र, इलेक्टॉनिक, इलेक्ट्रिकल व त्यासंबंधीत उपकरणे व तसेच रसायने, अन्न, सेवा क्षेत्र इत्यादी क्षेत्रामध्ये परकीय गुंतवणूक झालेली आहे.

**१) पोर्ट फोलिओ गुंतवणूक –**

यानुसार परकीय गुंतवणूकदारांकडून भारतीय शेअर्स बाजारात व काही प्रकल्पांमध्ये भाग भांडवल स्वरुपात अल्पकालासाठी परदेशी गुंतवणूक केली जाते. १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणानुसार भारतात परकीय गुंतवणूक केली जाते. १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणामुळे भारतात परकीय गुंतवणूक वाढली. १९९६ – ९७ नंतर त्यात अनेक चढ - उतार झाले. पूर्व आशियातील संकटामुळे यात घट झाली. २००१ साली परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून १३.५ बिलीयन एवढी रक्कम काढून घेतली.

**२) अप्रवासी भारतीयांच्या ठेवी –**

अप्रवासी भारतीयांकडून आलेल्या ठेवींमधून भारतातील आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या व्यवहारशेषातील असमतोल दूर करण्यासाठी महत्त्वपूर्ण मदत झालेली. १९८९ – ९० मध्ये अप्रवासी भारतीयांच्या ठेवी १.३ दशलक्ष एवढ्याच होत्या. त्या १९९० – ९१ मध्ये २५० दशलक्ष इतक्या वाढल्या. वरील बदल आंतरराष्ट्रीय बाजारात भारतीय अर्थव्यवस्थेच्या चांगल्या कामगिरीमुळे निर्माण झालेल्या विश्वासाची खात्री देतो.

**संस्थात्मक परकीय गुंतवणूक –**

१९९२ – ९३ नंतर भारतातील शेअर्स बाजारात परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून मोठ्या प्रमाणात गुंतवणूकीस सुरूवात झाली. भारताने परकीय चलन नियंत्रण कायदा १९९१

मध्ये रद्द केला (FERA) व १४ नोव्हेंबर १९९५ मध्ये परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांपासून भारतात केल्या जाणाऱ्या गुंतवणूकीवरील निर्बंध उठवले. गुंतवणूक पध्दती, नोंदणीकरण, पात्रता, सामान्य जबाबदाऱ्या व कर्तव्य याविषयी मोठ्या प्रमाणात अनुकुल बदल केले. ते बदल पुढीलप्रमाणे

**परकीय गुंतवणूकदारांना :**

१) भारतीय कंपन्यांच्या तसेच सरकारच्या प्राथमिक व दुय्यम बाजारात गुंतवणूक करुन भागभांडवल, कर्जरोखे, नोंदणीकृत शेअर्स बाजारातून खरेदी करण्याची परवानगी देण्यात आली.

२) देशातील म्युच्युअल फंड, युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया (UTI) ने विक्रीस काढलेले युनिट खरेदी करण्याची परवानगी देण्यात आली.

३) संयुक्त प्रकल्प
भारतातील बँका, उद्योगसंस्था, विमा कंपन्या तसेच परकीय संस्थात्मक गुंतवणूक संस्था यांना संयुक्तपणे व्यवसाय करून भारतात गुंतवणूक करण्याची परवानगी देण्यात आली.

४) युरो इश्यू
भारतीय कंपन्यांद्वारे तसेच चलन परिवर्तनीय बॉंड्स यादवारे परदेशातून अमेरिकन डॉलरमध्ये भांडवल उभारण्याची परवानगी देण्यात आली. तसेच भारतीय कंपन्यांचे शेअर्स, डिबेंचर्स, जी. डी. आर यांची न्यूयॉर्क व इतर आंतरराष्ट्रीय शेअर बाजारात नोंद करण्यात आली.

पुढील तक्त्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारे परकीय गुंतवणूकदारांनी १९९२ ते १९९७ – ९८ या कालावधीत कशी व किती गुंतवणूक केली हे दर्शविले आहे.

| गुंतवणूकीचा प्रकार | १९९१ – ९२ | १९९२ – ९३ | १९९७ – ९८ |
|---|---|---|---|
| १) थेट गुंतवणूक | १५० | ३४१ | ३१९७ |
| २) पोर्ट फोलिओ गुंतवणूक | ०९ | ९२ | १६०१ |
| अ) परकीय संस्था | - | ०१ | ७५२ |
| ब) युरो भाग भांडवल | - | ८६ | ६४५ |
| क) परकीय निधी व इतर | ८ | ५ | २०४ |

**भारतातील थेट गुंतवणूक –**

भारतातील औद्योगिक रचना, औद्योगिक धोरण व विकासाची धोरणे तसेच भारतात राजकीय बदलांबरोबर बदलणारी औद्योगिक व व्यापारी धोरणे यामुळे भारतात गुंतवणूक करताना परकीय गुंतवणूकदार खूप काळजीपूर्वक करतात.

भारतात पुढील कारणांमुळे परकीय गुंतवणूकीवर विपरित परिणाम झाला.

**१) सार्वजनिक क्षेत्राची मक्तेदारी –**

भारतात महत्त्वाच्या सार्वजनिक क्षेत्राची मक्तेदारी असल्याने या क्षेत्रात परकीय गुंतवणुकीला फारसा वाव नाही.

**२) परकीय तंत्रज्ञान –**

जेव्हा भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना परकीय तंत्रज्ञान व भांडवलाची आवश्यकता असते तेव्हा बहुतेक वेळा भारत व परकीय सरकारकडून थेट गुंतवणूकीचे करार केले गेले.

**३) निवडक भांडवल धोरण –**

भारताने परकीय गुंतवणूकीसाठी निवडक धोरण स्वीकारले. त्यामुळे फक्त अपेक्षित क्षेत्रांपैकी काही क्षेत्रातच भारतात परकीय गुंतवणूक आली.

**४) मर्यादित गुंतवणूक –**

परकीय कंपन्यांना भारतात गुंतवणूक करण्यासाठी ४०% त्यानंतर ५१% व नवीन धोरणात फक्त काही क्षेत्रात ७४% गुंतवणूक करण्याची सीमा ठरवण्यात आली. त्यामुळे परकीय गुंतवणूक मर्यादित राहिली होती. ती आता वाढत आहे.

**५) फेरा कायदा (Foreign Exchange Regulation Act) –**

१९७३ पर्यंत फेरा कायद्याने भागभांडवलावरील नफा, सहभागाचे भांडवल भारतात येणारी परकीय रक्कम या सर्वांवर फेरा कायद्याचे नियंत्रण होते. हा कायदा पुढे १९९१ मध्ये रद्द करण्यात आला.

**६) करांचे आर्थिक दर व गुंतागुंत –**

भारतात कंपन्यावरील करांचे दर अधिक आहेत व भारतातील कंपनी कायद्यामध्ये गुंतागुंत आहे. त्यामुळे परकीय कंपन्या भारतात गुंतवणूकीसाठी फार उत्साही नसतात.

**७) राजकीय धोरणातील अस्थिरता –**

भारतात प्रमुख राजकीय पक्ष उदा. भारतीय जनता पक्ष, इंदिरा कॉंग्रेस पक्ष, डावे पक्ष यांच्या परकीय गुंतवणूकविषयीच्या धेरणांमध्ये विरोधाभास आहे. त्यामुळे परकीयांमध्ये गुंतवणूकीसाठी विश्वास निर्माण होत नाही. त्यामुळे भारतात गुंतवणूक कमी होते.

## ३.७ बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका –

**प्रास्ताविक –**

आधुनिक अर्थव्यवस्थांमध्ये बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या विस्तारामुळे जागतिक व्यापार आणि अर्थव्यवस्थांचा विकास होण्यास मोठा हातभार लागला आहे. प्रसिध्द अर्थतज्ञ पिटर कर यांच्या मते, “बहुराष्ट्रीय कंपन्या आणि जागतिक व्यापारांचा विस्तार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.” Multinational and expanding world trade are two sides of the same coins – Peher Drucker.

सध्या विकसनशील देशांनी बहुराष्ट्रीय कंपन्यांना आपले प्रवेशद्वार खुले केले आहे. विदेशी सहभागाबरोबरच विदेशी भांडवल गुंतवणूक महत्त्वाची मानली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी प्रत्यक्ष भांडवल गुंतवणूक करुन विविध देशात आपल्या संस्था स्थापन केल्या आहेत. बहुराष्ट्रीय

कंपन्यांनी युध्दोत्तर काळात उल्लेखनीय प्रगती केली आहे. औद्योगिक क्रांती, तंत्रज्ञान क्षेत्रातील सुधारणा, वाहतूक व दळणवळण क्षेत्रात युध्दोत्तर काळात झालेली वाढ यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

**व्याख्या व अर्थ -**

१) "बहुराष्ट्रीय कंपनी ही अशी व्यवसाय संस्था असते की जी एकापेक्षा अधिक देशांमध्ये कार्यरत असते."

२) बहुराष्ट्रीय कंपनीच्या व्यवस्थापनाचे मुख्यालय एका देशात (स्वदेशात) असते. परंतु अशी कंपनी इतर देशात कार्यरत असते.

**आंतरराष्ट्रीय श्रम संघटना –**

भारतातील १९७३ मध्ये विदेशी विनिमय नियंत्रण कायदा (FERA) करण्यात आला असून या कायद्यात बहुराष्ट्रीय कंपनीची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

"बहुराष्ट्रीय कंपनी म्हणजे अशी कंपनी की जिच्या दोन किंवा अधिक देशात दुय्यम शाखा किंवा व्यापाराचे केंद्र असते आणि ती दोनपेक्षा अधिक देशात कार्यरत असते."

**बहुराष्ट्रीय कंपनीची वैशिष्ट्ये –**

१) बहुराष्ट्रीय कंपनीचे मुख्यालय स्वदेशात असते मात्र या कंपनीचे व्यवहार अनेक देशात सुरु असतात.

२) बहुराष्ट्रीय कंपनीच्या भांडवली संपत्तीत स्वदेशी नागरिकांचा वाटा मोठा असतो.

३) बहुराष्ट्रीय कंपनाच्या व्यवस्थापन मंडळातील बहुसंख्य सदस्य स्वदेशातील नागरिक असतात.

४) नवीन गुंतवणूकीसंबंधीचे निर्णय आणि उद्दिष्टे स्थानिक पालक कंपनीकडून ठरविली जातात.

५) बहुराष्ट्रीय कपन्यांचे आकारमान मोठे असल्याने त्यांचाच आर्थिक व्यवहारांवर अधिक प्रभाव असतो.

६) अशा कंपन्या विकसित व विकसनशील देशातील प्रत्यक्ष गुंतवणूकीद्वारे उत्पादनावर नियंत्रण ठेवू शकतात.

७) बहुराष्ट्रीय कंपन्यांचे स्वरुप अल्पविक्रेताधिकाराचे असते. त्यामुळे उत्पादनात आधुनिक तंत्राचा वापर, व्यवस्थापनात कौशल्य, वस्तुभेद आणि जाहिरातीचा वापर ही बहुराष्ट्रीय कंपनीची वैशिष्ट्ये असतात.

८) बहुराष्ट्रीय कंपन्या विदेशी भांडवल गुंतवणूकिशिवाय निर्यात व्यापारात भाग घेऊ शकत नाहीत.

**बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्गीकरण –**

बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्गीकरण करण्यासाठी त्या कंपन्यांकडून केली जाणारी कार्ये, कंपनीची गुंतवणूक, उलाढाल, नियंत्रण आणि उत्पादन इत्यादी गोष्टी विचारात घेतल्या जातात. बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून केली जाणारी कार्ये विचारात घेऊन कंपन्यांचे वर्गीकरण ३ गटांत केले जाते.

**१) बहुराष्ट्रीय सेवा कंपन्या –**

ज्या कंपन्यांच्या एकूण महसुलापैकी ५०% पेक्षा अधिक महसुल पुरविलेल्या सेवांपासून प्राप्त होतो. त्या कंपन्या बहुराष्ट्रीय सेवा कंपन्या म्हणून ओळखल्या जातात.

अशा कंपन्यांकडून बँकिंग सेवा, वित्त, विमा, वाहतूक, पर्यटन इ. सेवा दुसऱ्या देशात पुरविल्या जातात.

२) **बहुराष्ट्रीय उत्पादक कंपन्या –**

ज्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या एकूण महसुलापैकी ५०% पेक्षा अधिक महसुल उत्पदक कार्यापासून प्राप्त होतो. अशा कंपन्या उत्पादक कंपन्या म्हणून ओळखल्या जातात. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये उत्पादक कंपन्यांचे प्रमाण अधिक असते. उदा. कॅडबरी, चॉकलेट, कोलगेट, पामोलिव्ह, सोप, पाँड्स, डनलॉप, विविध प्रकारच्या पावडरी इत्यादींचा उत्पादक कंपन्यांमध्ये नावलौकिक आहे.

३) **बहुराष्ट्रीय व्यापारी कंपन्या –**

बहुराष्ट्रीय व्यापार कंपन्या म्हणजे अशा कंपन्या की ज्यांच्या एकूण महसूलापैकी ५०% अधिक महसूल व्यापारापासून प्राप्त होतो. हा बहुराष्ट्रीय कंपन्यांचा जुना प्रकार आहे. जागतिक निर्यातीपैकी ६०% पेक्षा अधिक वाटा बहुराष्ट्रीय कंपन्यांचा आहे. उदा. टाट, लिप्टन, हिंदूजा, ब्रक बाँड.

**विकसनशील देशात बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका –**

जागतिक अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकाससामर्थ्य बहुराष्ट्रीय कंपन्यांनी महत्वाची भूमिका पार पाडली आहे.

१) बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे विकसनशील देशातील भांडवल गुंतवणूक, उत्पन्न आणि रोजगार पातळी वढण्यास मदत झाली आहे.
२) बहुराष्ट्रीय कंपन्या विकसनशील देशात व्यावसायिक व्यवस्थापनाला उत्तेजन देतात.
३) विकसनशील देशाच्या निर्यात वाढीला चालना देण्यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्या मदत करतात.
४) बहुराष्ट्रीय कंपन्यांनी काही वस्तूंचे उत्पादन हाती घेतल्याने विकसनशील देशाचे आयातीसाठी दुसऱ्या देशावरील अवलंब कमी होते.
५) बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या व्यापक कार्यक्षेत्रामुळे जागतिक उत्पादन खर्चातील तफावत कमी होण्यास मदत झाली आहे.
६) बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे आर्थिक विकासाला चालना मिळून देशाचे औद्योगिकरणाची गती वाढण्यास मदत झाली आहे.
७) बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या प्रवेशामुळे विकसनशील देशात व्यवसाय पर्यावरणावर अनुकूल परिणाम होत आहे.
८) बहुराष्ट्रीय कंपन्या विकसनशील देशात आधुनिकीकरण व जलद आर्थिक विकास यांचे माध्यम ठरल्या आहेत..
९) बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे नवीन दृष्टिकोन आणि सांस्कृतिक देवाण – घेवाण वाढण्यास मदत झाली आहे.
१०) बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे विकसनशील देशांच्या व्यवहारतोलास प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

थोडक्यात बहुराष्ट्रीय कंपन्या महत्तम नफा मिळवण्यासाठी जागतिक अर्थव्यवस्थेतील सर्व प्रकारच्या साधनसंपत्तीचा वापर करण्याचा प्रयत्न करतात. जागतिकीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यावर त्यांचा अधिक भर असतो.

**बहुराष्ट्रीय कंपन्या आणि भारत –**

भारत हा एक विकसनशील देश असल्याने सरकारने विदेशी भांडवल गुंतवणूकीसाठी जे धोरण स्वीकारले आहे. तसेच धोरण बहुराष्ट्रीय कंपन्यांबाबत देखील स्वीकारले आहे. जर्मनी, जपान आणि अमेरिकेच्या आर्थिक विकासात बहुराष्ट्रीय कंपन्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. सध्या या कंपन्या भारत आणि चीनची बाजारपेठ काबीज करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. भारतासारख्या विकसनशील देशाने आर्थिक विकासाचे उद्‌दिष्ट गाठण्यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्यांना आपले द्‌वार खुले केले आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या प्रारंभीच्या काळात बहुराष्ट्रीय कंपन्यांनी केवळ लोखंड - पोलाद प्रकल्पात गुंतवणूक केली होती. परंतु अलीकडच्या काळात त्यांनी पेट्रोलिअमचे शुध्दीकरण, रसायने, औषध निर्मिती, अवजड यंत्रसामग्रीची निर्मिती, पोलाद, काचा आणि इतर उद्‌योगात आपला सहभाग वाढविला आहे. सध्या बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेत आपले स्थान अधिकच बळकट केले आहे. मागील दोन दशकात या कंपन्यांनी औद्‌योगिक क्षेत्रापैकी ५३.७% क्षेत्र नियंत्रणाखाली आणले आहे.

या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असे की या व्यवसायासाठी लागणारे भांडवल भारतातूनच जमा करतात.

१९८० नंतर भारत सरकारने उदारिकरणाचे धोरण स्वीकारल्यामुळे विदेशी भांडवल गुंतवणूकीला महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतीय कंपन्यांशी करार करुन विदेशी गुंतवणूकीत वाढ केली आहे. नवीन आर्थिक धोरणामुळे विदेशी सहभाग वाढला आहे. १९४८ ते १९८८ या ४० वर्षांच्या काळात विदेशी सहभागासंबंधी चे १२,७६० करार झाले. त्यापैकी ६,१६५ करार १९८० ते १९८८ या ८ वर्षांच्या कालावधीत झालेले आहेत.

अलीकडच्या काळात बहुराष्ट्रीय कंपन्यांनी विकसनशील देशात वाढत्या दराने गुंतवणूक केल्याचे दिसून येते. या कंपन्यांना एकूण विदेशी व्यापारातील वाटा वाढत आहे. या कंपन्या आपल्या उत्पादनाची विक्री वाढावी म्हणून आकर्षक स्वरुपाची जाहिरात करतात तसेच त्यांचा जागतिक बाजारपेठेतील नावलौकिक वाढल्याने एकूण व्यवहारात त्यांचे प्रभुत्व वाढत गेले आहे. भारतीय कंपन्यांपेक्षा बहुराष्ट्रीय कंपन्यांची आर्थिक स्थिती मजबूत आहे. आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त झालेला असल्याने बहुराष्ट्रीय कंपन्यांना आंतरराष्ट्रीय वित्त संस्थांकडून सहजपणे निधी जमा करता येतो.

तसेच या कंपन्या उत्पादनात अत्याधुनिक उत्पादन तंत्राचा वापर असल्याने उत्पादनाचा दर्जा उच्च प्रतिचा असतो व उत्पादन खर्च कमी असल्याने उत्पादनाची विक्री सहजपणे करता येते. या कंपन्या सतत उत्पादनविषयक संशोधन करीत असल्याने उत्पादनाचा दर्जा उंचावण्यास मदत होते. या सर्व कारणांमुळे भारतात बहुराष्ट्रीय कंपन्यांचा विस्तार होण्यास मदत झाली आहे. १९९१ नंतर भारत सरकारने विदेशी भांडवल गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी विशेष प्रयत्न केल्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांचा अर्थव्यवस्थेतील प्रवेश सुलभ झाला आहे.

त्याची कारणे पुढीलप्रमाणे :

१) औद्‌योगिक परवाना पध्दती रद्‌द करण्यात आली आहे.

२) मक्तेदारी नियंत्रण कायद्‌याचे गुंतवणूकीसंबंधीचे निर्बंध उठविण्यात आले.

३) तंत्रज्ञान, भांडवली वस्तू आयातीच्या संदर्भातल धोरण आणि पध्दतीमध्ये शिथिलता आणण्यात आली आहे.

४) अस्तित्वातील कंपन्यांना विदेशी भांडवल गुंतवणूक ५१% पर्यंत वाढविण्यास संमती देण्यात आली आहे.

५) विदेशी विनिमय नियंत्रण कायदयातील तरतूदी रद्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळे एखाद्या कंपनीतील विदेशी गुंतवणूकीचे प्रमाण जरी ४०% पेक्षा अधिक असले तरी ती कंपनी भारतीय कपंनीप्रमाणे कार्यरत राहू शकते.

६) विदेशी कंपन्यांना त्यांच्या देशाचा ट्रेडमार्क (व्यापारी बोध चिन्ह) स्वदेशी बाजारपेठेत संमती देण्यात आली आहे.

१९९० च्या दशकात भारतातील विदेशी भांडवल गुंतवणूक वाढत गेल्याचे दिसून येते. भारत सरकारने १९९० मध्ये ६६६ विदेशी सहभागांना संमती दिली आहे. त्यात १९९२ मध्ये दुपटीने वाढ झाली होती. सध्या भारतातील गुंतवणूकीमध्ये अमेरिकेचा वाटा असून स्वीर्त्झलँड, जपान आणि इंग्लंडकडून देखील गुंतवणूक मोठ्या प्रमाणात होत आहे. विदेशी गुंतवणूकीपैकी अधिकाधिक गुंतवणूक तेलशुध्दीकरण केंद्र, वीज निर्मिती, रसायने आणि विद्युत उपकरणांची निर्मिती करणाऱ्या उद्योग क्षेत्रात झालेली आहे.

**बहुराष्ट्रीय कंपन्यांचे दोष –**

बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये पुढील प्रकारचे दोष असल्याची टीका केली आहे.

**१) अधिकतम नफा मिळवण्यावर भर –**

विकसनशील देशातील साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त वापर करुन महत्तम नफा मिळविणे हे बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रमुख उद्दिष्टे असते. त्यामुळे त्यांचे आर्थिक विकास व उत्पन्न वितरणात समानता आणण्यास दुय्यम स्थान आहे.

**२) दुर्मिळ विदेशी चलनाच्या साठ्यावर ताण –**

विकसीत देशातील बहुराष्ट्रीय कंपन्या स्वदेशाच्या लाभासाठी विकसनशील देशात मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवणूक करतात. त्यामुळे विदेशी कंपनी रॉयल्टी नफा, शुल्क, लाभांशाच्या स्वरुपात विदेशी चलन आपल्या देशात पाठवितात. त्यांनी केलेल्या प्रारंभिक भांडवल गुंतवणूकीपेक्षा किती तरी अधिक प्रमाणात ते आपल्या देशातील संपत्ती स्वदेशात पाठवितात.

**३) रोजगार निर्मितीची कमी क्षमता –**

बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून विशेषतः भांडवलीप्रधान उत्पादन क्षेत्रात गुंतवणूक केली जाते. या तंत्रामध्ये श्रमाचा कमीत – कमी वापर होत असल्याने रोजगार निर्मितीची क्षमता कमी असते. तसेच बहुराष्ट्रीय कंपन्या आपल्या उद्योगांत उच्च दर्जाचे तंत्रज्ञान आणि व्यवस्थापनामध्ये स्थानिक लोकांना फारशी संधी देत नाहीत.

**४) देशाच्या सार्वभौमत्वात हस्तक्षेप –**

बहुराष्ट्रीय कंपन्या सरकारचे आर्थिक धोरण ठरविण्यात आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक – राजकीय संबंधात हस्तक्षेप करतात. तसेच अशा कंपन्या राजकीय डावपेच आखून आपल्याला फायदेशीर ठरेल अशा विचाराच्या पक्षाला सत्तेवर आणण्याचा प्रयत्न करतात. बहुराष्ट्रीय कंपन्या देशात राजकीय हस्तक्षेप करुन सार्वभौमत्वास बाधा पोहोचवतात.

**५) सास्कृतिक हस्तक्षेप –**

बहुराष्ट्रीय कंपन्या जाहिरात मार्गाचा अवलंब करुन देशाच्या सांस्कृतिक विचारधारेत हस्तक्षेप करतात. त्यामुळे विकसनशील देशांची एक संस्कृती नष्ट होते. अशा कंपन्या जाहिरातीवर प्रचंड पैसा खर्च करुन ग्राहकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात. अशा जाहिरातीमुळे वस्तूंच्या किंमती वाढतात. मागणीत बदल होतो. साधनसंपत्तीचा जाहिरातीसाठी उपयोग केला जातो.

**६) महत्तम नफा मिळवण्याची प्रवृत्ती –**

बहुराष्ट्रीय कंपन्या उत्पादन खर्च कमीत – कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात उत्पादन करतात. देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील अपूर्णतेचा फायदा घेऊन जास्तीत – जास्त नफा मिळविण्याचा प्रयत्न करतात. अशा कंपन्या ग्राहकांकडून अधिक किंमत वसूल करुन व पिळवणूक करुन महत्तम नफा मुळवतात.

**७) व्यवहारतोलावर प्रतिकूल परिणाम –**

बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे देशाच्या व्यवहारतोलावर प्रतिकूल परिणाम होतो. कारण अशा कंपन्या मिळालेला नफा स्वदेशी पाठवित असल्याने विदेशी चलनाच्या साठ्यावर ताण पडतो आणि देशाचा व्यवहारतोल प्रतिकूल बनतो.

**८) मक्तेदारीत वाढ -**

बहुराष्ट्रीय कंपन्या विकसनशील देशातील स्थानिक कंपन्यांशी अनिष्ट स्वरुपाची स्पर्धा करुन त्यांचे अस्तित्व संपुष्टात आणतात आणि त्या विशिष्ट वस्तूंच्या उत्पादनामध्ये स्वतःची मक्तेदारी निर्माण करतात. एकदा मक्तेदारी निर्माण झाली की जास्तीत – जास्त नफा मिळविण्यासाठी ग्राहकांची पिळवणूक केली जाते.

**९) कर चुकविण्याची प्रवृत्ती –**

बहुराष्ट्रीय कंपन्या विविध प्रकारचे कर चुकविण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब करतात.

**१०) आर्थिक धोक्याची भीती –**

बहुराष्ट्रीय कंपन्या विकसनशील देशावर आपले वर्चस्व निर्माण करुन व आर्थिक नाकेबंदी करुन विकसनशील देशांकडून व्यापारशर्ती आपल्यासाठी सतत अनुकूल कशी राहतील यासाठी दबाव आणतात. तसेच सरकारने अशा कंपन्यांना त्रास देण्याचे ठरविल्यास देशातून भांडवल काढून घेण्याची धमकी देतात.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. बहुराष्ट्रीय कंपन्या यांचे गुणदोष सांगा ?

______________________________

______________________________

______________________________

## ३.८ प्रश्नमालिका :-

प्र. १) श्रम व भांडवलाची गतिशीलता निर्धारित करणारे घटक स्पष्ट करा.

२) श्रमगतिशिलता व श्रमाचे स्थलांतर यातिल आंतरराष्ट्रीय प्रवृत्ती स्पष्ट करा.

३) वेतन एककेंद्रभिमूखता म्हणजे काय ?

४) परकीय गुंतवणूकीची प्रवृत्ती : टीप लिहा.

५) परकीय गुंतवणूकीचे विविध प्रकार कोणते ?

६) बहुराष्ट्रीय कंपन्याच्यासंदर्भात परकिय थेट गुंतवणूकीचा अमुभव किंवा कामगिरी स्पष्ट करा.

७) भारताच्या आर्थिक विकासात बहुराष्ट्रीय कंपन्याचे महत्त्व विशद करा.

८) बहुराष्ट्रीय कंपन्याचे फायदे – तोटे स्पष्ट कार.

❖❖❖

# ४

# व्यापारी धोरणे
# मुक्त व्यापार आणि कार्यक्षमता

**घटकरचना / पाठ्यक्रम**

४.० उद्दिष्ट्ये
४.१ प्रस्तावना
४.२ मुक्त व्यापार आणि कार्यक्षमता
४.३ संरक्षणवाद
४.४ व्यापाराची व्युहरचना आणि वाढ
४.५ आयात - प्रतिस्थापन औद्योगिकरण
४.६ निर्यात - प्रधान औद्योगिकरण
४.७ प्रश्नमालिका

## ४.० उद्दिष्ट्ये :-

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासात व्यापारी धोरणाचे महत्त्व अनन्यसाधारण असते. या पाठात आपण व्यापार धोरण व त्यासंबंधीत बाबींचा अभ्यास करणार आहोत. या पाठाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१) मुक्त व्यापर व संरक्षित व्यापार यांचा अभ्यास करणे.
२) आयात पर्यायीकरण व निर्यात - प्रधान औद्योगिकरण यांचा अभ्यास करणे.
३) व्यापाराची व्युहरचना आणि वाढ यांचा अभ्यास करणे

## ४.१ प्रस्तावना :-

व्यापार धोरण हे कोणत्याही देशासाठी अत्यंत महत्त्वाचे असते कारण या व्यापार धोरणावरच आंतरराष्ट्रीय व्यापार अवलंबून असतो. आंतरराष्ट्रीय व्यापारापासून प्रत्येक देश लाभ प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो. आर्थिक वृध्दीदर उंचवण्यासाठी व्यापारात सहभागी होणे ही काळाची गरज आहे. व्यापार - विषयक धोरण हा आर्थिक धोरणाचाच एक भाग आहे. अपेक्षित परिणाम साध्य करण्यासाठी या धोरणाची आखणी केली जाते. या धोरणाचा संबंध देशाच्या आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांशी असतो. व्यापारधोरणाच्या माध्यमातून देशाचे बाह्य आर्थिक व्यवहार आणि त्या अनुषंगाने वेगवेगळ्या देशांशी निर्माण झालेले आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय संबंधाचे नियमन आणि नियंत्रण केले जाते. व्यापारासंदर्भात निर्माण झालेल्या समस्यांची सोडवणूक केली जाते. व्यापारविषयक धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी करण्याचे कार्य शासनाला करावे लागते. देशाच्या अंतर्गत परिस्थितीचा विचार करुन आर्थिक धोरणाशी सुसंगत अशा व्यापार धोरणाची आखणी केली जाते. आर्थिक विकासासाठी व्यापार ह्या साधनांचा वापर करावयाचा असेल तर त्यासाठी कोण्त्या तंत्राचा वापर करावयाचा, कोणते तंत्र

देशाला हितकारक आणि कोणते अहितकारक याचा विचार करावा लागतो. यासाठी मुक्त व्यापार धोरण योग्य की संरक्षित व्यापार धोरण योग्य की, दोहोंचा समन्वय योग्य याचा निर्णय शासनाला घ्यावा लागतो.

## ४.२ मुक्त व्यापार आणि कार्यक्षमता

मुक्त व्यापार धोरणाचा पुरस्कार सनातनपंथीय अर्थतज्ज्ञांनी केला. मुक्त व्यापार धोरणाला खुले व्यापार धोरण असेही म्हटले जाते. मुक्त ह्या शब्दाचा अर्श नियंत्रण नसलेला. परंतु अर्थशास्त्रामध्ये मुक्त व्यापार याचा अर्थ वेगळा आहे. मुक्त व्यापार ही संकल्पना समजून घेण्यासाठी आपण अर्थतज्ज्ञांनी दिलेल्या व्याख्या पाहणे आवश्यक आहे.

मुक्त व्यापाराच्या व्याख्या

१) मुक्त व्यापार धोरण अशा प्रणालीला म्हटले जाते की, ज्या वस्तूंमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जात नाही. आणि विदेशी वस्तूंवर कोणतेही अनावश्यक नियंत्रण, कर लावले जात नाही. आणि देशी वस्तू आणि उद्योगांना कोणतेही विशेष सुविधा प्रदान केली जात नाही.

- ॲडम स्मिथ

२) प्रा. जगदिश भगवते यांच्या मते, मुक्त व्यापार म्हणजे अशी स्थिती होय की, ज्यात कोणतीही सीमा कर नसतात. कोटा निश्चित केलेला नसतो. विनिमय नियंत्रणाचा अभाव असतो. उत्पादनासाठी आर्थिक मदतीची पध्दत नसते उत्पादन साधनांचा वापर व वापरावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नसते.

वरील वेगवेगळ्या मतावरुन मुक्त व्यापाराची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) मुक्त व्यापारात देशी वस्तू विदेशी वस्तू असा भेद केला जात नाही.

२) आयात - निर्यातवर कोणतेही नियंत्रणे किंवा बंधने नसतात.

काही विचारवंताच्या मते, मुक्त व्यापार धोरण देशाला लाभकारक असते. थर काहींच्या मते हानीकारक असते.

मुक्त व्यापाराच्या समर्थनार्थ खालील मुद्दे मांडले जातात,

१) उत्पादक साधनांचा महत्तम वापर
२) अकार्यक्षम उद्योगांचा ऱ्हास
३) राष्ट्रीय उत्पन्नात वृध्दी
४) उपभोक्त्यांना लाभ
५) मक्तेदारीला पायबंद
६) उत्पादन पध्दतीत सुधारणा
७) राष्ट्रीय भ्रष्टाचारावर नियंत्रण
८) देण्या - घेण्यात सुधारणा
९) राजकीय सार्वभौमत्त्व
१०)राष्ट्रवादाला महत्त्व

मुक्त व्यापाराच्या विरोधी खालील मुद्दे मांडले जातात.

१) अवास्तव ग्रहिते
२) गळेकापू स्पर्धा
३) औद्योगिक विकासाला मारक
४) आरोग्य विघातक वस्तूंची आयात
५) एकांगी विकास
६) विकसित आणि अविकसित देशांतील अंतर वाढते
७) राष्ट्रवादाला महत्त्व
८) राजकीय सार्वभौमत्त्व

अशा प्रकारे आपणास मुक्त व्यापाराचे गुण - दोष सांगता येतील.

## ४.३ संरक्षणवाद संरक्षित व्यापार :-

मुक्त व्यापार धोरणाचा अनुभव जगातिल बहुतांश देशांनी घेतलेला आहे. विकसित देश वगतळता अविकसित देशांना मुक्त व्यापार धोरणांने हानीच जास्त पोहचली आहे.

व्याख्या -

संरक्षण विषयक धोरण म्हणजे सरकारचे असे व्यापारी धोरण होय की, ज्या अंतर्गत देशांतर्गत वस्तू आणि उद्योगांचे विदेशी स्पर्धेपासून संरक्षण करण्यासाठी सीमा शुल्क आकारणे, आयात तोटा ठरविणे, देशीउद्योगांनी आर्थिक साहाय्यता आणि इतर सुविधा प्रदान करणे विदेशी चलन विनिमय व्यवहारावर नियंत्रण आणणे या मार्गाचा अवलंब करुन विदेशी व्यापार नियंत्रित करणे होय.

ज्या व्यापारामध्ये देशी उद्योगांना परकीय उद्योगांपासून संरक्षण दिले जाते त्याला संरक्षणनिती संरक्षणवाद असे म्हणतात.

देशी उद्योगांना संरक्षण देण्यासाठी आयातीवर विविध मार्गांनी नियंत्रण बसवले जाते. तर निर्यात वाढीस प्रोत्साहन दिले जाते.

**संरक्षित व्यापाराचे गुण समर्भन पुढीलप्रमाणे सांगता येतील**

**आर्थिक**

१) बाल्यावस्थेतील उद्योगांना संरक्षण
२) व्यापारशर्ती सुधारणा
३) सौदाशक्तीत वाढ करणे
४) राशीपतन विरोधी मुक्तिवाद
५) समतोल आर्थिक विकास
६) रोजगार वाढ
७) व्यापारतोल अनुकूल करणे
८) स्वस्त श्रम मुक्तिवाद
९) मूलभूत उद्योगांची उभारणी
१०) अंतर्गत बाजारपेठेची वाढ
११) उत्पादन खर्चात समानता आणणे

**आर्थिक तार**

१) संरक्षण - साहित्याचे उद्योग
२) आर्थिक स्वंयपूर्णतः
३) देशाच्या वैशिष्ट्यांचे संवर्धन
४) देशातील पैसा देशात ठेवणे
५) चैनीच्या वस्तूच्या आयातीत कपात करणे.

वरील सर्व गुण संरक्षित व्यापाराचे समर्थनार्थ युक्तिवाद म्हणून मांडले जातात. या बरोबरच सभ्रम निर्यात करणारे काही युक्तिवाद मांडले आहेत.

**संरक्षित व्यापाराचे दोष व तोटे**

१) संरक्षण धोरणामुळे अकार्यक्षम कामगार, व्यवस्थापक आणि उद्योजकांना प्रोत्साहन मिळते.
२) संरक्षित धोरणाने आंतरराष्ट्रीय व्यापारात घट होते.
३) आयातीवर संरक्षण सीमा शुल्क आकारले तर अनावश्यक आयात वस्तूला देशातच पर्याय निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे साधन सामग्रीला अयोग्य / वेगळे वळण लागते.
४) ज्या उद्योगांना संरक्षण प्राप्त होते त्यांना राष्ट्रीय उत्पन्नाचा जास्तीत जास्त हिस्सा प्राप्त होतो. त्यामुळे उत्पन्नाचे असमान विभाजन होते.
५) संरक्षणामुळे विदेशी स्पर्धा नाहीशी होते. देशात वस्तूला पर्याय उपलब्ध नसल्याने काही उद्योगांची देशांत मक्तेदारी निर्माण होते.
६) संरक्षण धोरणाचा भाग म्हणून आयातीवर कडक निर्बंध लादले तर आयात पूर्वतः बंद होईल. असे झाले तर सीमा शुल्कापासून सरकारला उत्पन्न प्राप्त होणार नाही.

**आपली प्रगती तपासा :**

१) संरक्षण वाद म्हणजे काय ?

________________________________________

________________________________________

________________________________________

२) संरक्षण व्यापार म्हणजे काय ?

________________________________________

________________________________________

________________________________________

## ४.४ व्यापाराची व्युहरचना आणि वाढ
### (Strategies of trade & Growth)

परकीय व्यापार आपल्या देशाला अनुकूल ठरण्यासाठी आयात कमी व निर्यात वाढविणे आवश्यक असते, त्यासाठी व्यापाराची व्युहरचना अशा पध्दतीने करणे आवश्यक असते. आयात जास्त व निर्यात कमी अशी परिस्थिती उद्‌भवल्यास व्यवहारतोल प्रतिकूल होतो; आयात निर्यातीमधील दरी भरुन काढण्यासाठी विकसनशील देश निर्यातीस उत्तेजन व आयात पर्यायीकरण - यावर भर देतात. निर्यात उत्तेजनास बाह्य बचती अथवा डावपेच / व्युहरचना असे म्हणतात. आयात पर्यायी करणास अंतर्गत बचती अथवा डावपेच / व्युहरचना म्हणतात. आयात पर्यायीकरण व निर्यात प्रोत्साहन या दोन्ही मार्गाने विकसनशील देशांत आपल्या परकीय व्यापारात वृध्दी / वाढ घडवून आणतात.

## ४.५ आयात पर्यायीकरण
### (Import Substitution Strategy)

"ज्या वस्तूंची आपण विदेशातून आयात करतो, त्या आयात वस्तूंनाच स्वदेशात पर्यायी वस्तू तयार करणे म्हणजे आयात पर्यायी करण होय."

आयात पर्यायी करण याकरिता देशाच्या उत्पादनक्षमता कृषी व औद्योगिक क्षेत्र वाढायला हवी. जर देशातील एकूण पुरवठ्यात आयातीचे प्रमाण पूर्वीपेक्षा वाढत असेल तर आयात पर्यायीकरण धोरण यशस्वी झाले आहे असे म्हणता योईल.

आयात पर्यायीकरणाचे दोन प्रमुख उद्देश

१) देशाच्या अर्थव्यवस्थेला आत्मनिर्भर करण्यासाठी देशाच्या औद्योगिककीकरणाला प्रोत्साहन देणे.

२) विदेशी चलनाची बचत करणे.

आयात पर्यायीकरणात उपभोगनियंनम, देशांतर्गत उत्पादनावर भर, स्वदेशी तंत्रज्ञानाचा विकास व वापर यावर भर देण्यात येतो. आयात पर्यायीकरणाचा पुरस्कार व विरोध विविध तज्ञांनी केला आहे. परकीय व्यापाराची व्युहरचना म्हणून या मार्गांचा अवलंब देश करतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) आयात पर्यायीकरण औद्योगिकरण संकल्पना स्पष्ट करा.

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

## ४.६ निर्यात उत्तेजन
### (Export – oriented industrialization)

विकसित देशात वस्तूच्या बाजारपेठेची पाहणी करुन अपेक्षित बाजाराचे स्वरुप समजावून घेतले जाते. आपारंपारिक वस्तूंच्या निर्यातीला उत्तेजन दिले जाते. प्राथमिक वस्तूंची प्रक्रिया आणि दर्जा सुधारुन पारंपारिक निर्यात वाढविली जाते. यासाठी पुढील मार्गांचा आवलंब केला जातो.

१) शेती, खाणकाम व औद्योगिक सेवा इ. क्षेत्रांची निश्‍चिती केली जाते.

२) उपभोगातील वाढ मर्यादित केली जाते.

३) अंतर्गत किंमतपातळी स्थिर ठेवते.

४) निर्यातक्षम उद्योगेंचे आधुनिकीकरण करणे.

५) निर्यातक्षम उद्योगांना अनुदान देणे.

६) निर्यातील बंधने काढून टाकणे.

७) निर्यातक्षम उद्योगांना आयात औद्योगिक कच्चा माल वापरण्यास सवलत देणे.

८) निर्यातक्षम वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवणे.

९) व्यापारी कंपन्या परदेशात स्थापन करणे.

१०) औदयोगिक व व्यापारी प्रदर्शने परदेशात भरवणे.
११) निर्यात प्रोत्साहन मंडळे स्थापन करणे.

## ४.७ प्रश्नमालिका

१) मुक्त व्यापार म्हणजे काय मुक्त व्यापाराचे गुणदोष स्पष्ट करा
२) संरक्षणवादाच्या समर्थनार्थ मूद्दे विशद करा.
३) टीपा लिहा
   १) आयात पर्यायी औद्योगिकरण
   २) निर्यात प्राधान्य औद्योगिकरण
   ३) संरक्षणवाद

❖❖❖

# ५

# जागतिक व्यापार संघटना

**पाठ्यक्रम**

५.० उद्दिष्ट्ये
५.१ प्रस्तावना
५.२ जागतिक व्यापारी संघटना - कार्ये आणि व्यापारी उदारीकरण
५.३ व्यापारी धोरणातील मतभेद
५.४ ट्रिप्स आणि गॅट्स अंतर्गत बाबी
५.५ जागतिक व्यापार संघटनेची तक्रार निवारण समिती
५.६ प्रश्नमालिका

## ५.० उद्दिष्ट्ये

पहिल्या महायुध्दानंतर आणि प्रामुख्याने आर्थिक मंदिनंतर (१९२९ - ३३) मुक्त व्यापाराचे महत्त्व कमी होऊन संरक्षित व्यापार धोरणाचे महत्त्व वाढत गेले होते. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये भाग घेणाऱ्या देशामध्ये आर्थिक सामंजस्य वाढीस लागण्यासाठी व व्यापारावरील कृत्रीम स्वरुपाची नियंत्रणे कमी करण्यासाठी जे प्रयत्न झाले त्यातूनच गॅटची (GATT) स्थापना झाली. या पाठात आपण गॅट आणि जागतिक व्यापार संघटना इ. विषयीचा अभ्यास करणार आहोत. या पाठाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) जागतिक व्यापार संघटनेतंर्गत व्यापाराचे उदारीकरण अभ्यासणे.
२) तक्रार निवारण समितीचा अभ्यास करणे.
३) बौध्दीक संपदा अधिकार ही संकल्पना अभ्यासणे.

## ५.१ प्रस्तावना

जागतिक व्यापार संघटना हे गॅटचे विस्तारित स्वरुप मानले जाते. भारत गॅटचा संस्थापक सदस्य असल्याने तो जागतिक व्यापार संघटनेचा देखील सदस्य आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेमुळे जागतिक अर्थव्यवस्था जास्त मजबूत होऊन संपूर्ण जागतिक रोजगार, उत्पादन आणि व्यापारामध्ये वाढ होण्यास मदत होईल. WTO मध्ये व्यापारात वस्तूबरोबरच सेवांचादेखील समावेश करण्यात आला आहे.

## ५.२ जागतिक व्यापार संघटना (World Trade Organisation)

आंतरराष्ट्रीय व्यापाराला गती देणे, व्यापारातील मालात्तक नियंत्रणे सैल करणे / रद्द करणे. आंतरराष्ट्रीय व्यापाराशी संबंधीत विविध समस्या सोडविणे ह्या करीता ज्या GATT गॅटची स्थापना ३० ऑक्टोबर १९४७ मध्ये करण्यात आली होती. त्या गॅटचे अस्तित्व १२ डिसेंबर १९९५ मध्ये संपुष्टात आले व त्या जागी आंतरराष्ट्रीय व्यापाराशी संबंधीत जागतिक

व्यापार संघटनेची स्थापना करण्यात आली. १ जानेवारी १९९५ ला जागतिक व्यापार संघटनेची स्थापना झाली.

**जागतिक व्यापार संघटनेची उद्दिष्ट्ये**

१) वस्तू व सेवा यांच्या उत्पादनात व व्यापारात वाढ करणे.
२) प्रभावी मागणी व रोजगार ह्यात व्यापक व प्रभावी वृध्दी करणे.
३) जागतिक संसाधनांचा योग्य उपयोग करणे.
४) सतत विकासाची संकल्पना उचलून धरणे.
५) राहणीमानाच्या पातळीत वाढ करणे.
६) पर्यावरणाचे संरक्षण करणे.

**जागतिक व्यापार संघटनेची कार्ये**

१) व्यापार व प्रशुल्काशी संबंधीत कोणत्याही मुद्दावर सदस्य देशांमध्ये विचार विनिमय करण्याकरिता एका मंचाच्या स्वरुपात कार्य करते.
२) जागतिक व्यापार करार व बहुपक्षीय करार ह्याचे पालन, प्रशासन व परिचालन व्हावे ह्याकरिता सोयी सवलती निर्माण करणे.
३) व्यापार – धोरण समीक्षम प्रक्रियेशी संबंधित नियम लागू करणे.
४) विविध्य मुद्द्यांवर चर्चा करुन त्यांची सोडवणूक करणे.
५) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक यांच्याशी सहकार्य करते.
६) जागतिक संसाधनांचा महत्तम वापर करणे.

**जागतिक व्यापार संघटनेची व्याप्ती**

१) निर्यातीच्या निर्बंधाचा निर्यात कोटा
२) ग्राहकांना संरक्षण देणे (वस्तूंच्या संदर्भातील)
३) आरोग्य व पर्यावरण संरक्षणासाठी व्यापारावर नियंत्रण
४) विकसनशील देशात बालमजूरांचा कामगार म्हणून – उपयोग केल्यास आयात थांबवणे.
५) भेदरहित व्यापार समतोलासाठी तरतूद करणे.

**जागतिक व्यापार संघटनेचे महत्त्वाचे करार**

जागतिक व्यापार संघटनेच्या सभासदांची मंत्री पातळीवरील बैठक दोन वर्षातून एकदा भरते. WTO मध्ये पुढील महत्त्वाचे करार झाले आहेत.

१) वस्तू व्यापारासंबंधीचा बहुपक्षी करार (MAT)
२) वस्तू व्यापाराचा सर्व साधारण करार (MAT)
३) बौध्दिक संपदा संबंधीचा करार (TRIPS)
४) सेवांचा करार (GATS)
५) शेतीविषयक सहमती करार (Agreement of Agreiculture)

जागतिक व्यापार संघटनेच्या वरील महत्त्वाच्या करारानुसार व्यापाराचे मोठ्या प्रमाणात उदारीकरण झाल्याचे दिसून येते. सदर सर्व कराराच्या साहाय्याने मुक्त, उदार, स्पर्धात्मक

व्यवस्था बळकट करण्याचे कार्य जागतिक व्यापार संघटनेमार्फत केले जाईल. पण याचा फायदा प्रत्येक अर्थव्यवस्थेला तिच्या स्पर्धात्मक क्षमतेवर अवलंबून आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) जागतिक व्यापार संघटनेची उद्दिष्ट्ये स्पष्ट करा.

---

---

---

## ५.३ व्यापार धोरणातील मतभेद – कामगारांचा दर्जा - पर्यावरण संरक्षण

अमेरिकेसहीत विकसित देशांद्वारे ज्यांना पूर्ण समर्थन प्राप्त झाले आहे, अशी पुढील दोन कलमे आहेत की, जी भारत व इतर विकसनशील देशांच्या व्यापाराला बाधक ठरत आहेत.

### आंतरराष्ट्रीय श्रम – मानदंड

विकसनशील देश जो माल निर्यात करतात तो माल तयार करताना मजूरांचे शोषण होते, अशी विकसित देशांची ओरड आहे. या मजूरांना पुरेशी मजुरी देण्यात येत नाही. यांच्या बाबतीत असणारे श्रम – कल्याण कार्यक्रम अत्यल्प आहेत. तसेच या श्रमिकांच्या राहणीमानाचा दर्जा अत्यंत कमी आहे. तसेच निर्यात मालाच्या कारखान्यात बाल कामगारांचा वापर होतो. मानव अधिकाराचे उल्लंघन होते. हे विकसनशील देश आंतरराष्ट्रीय मानदंडाचे पालन करित नाहीत. अशा प्रकारचा सांगावा करित हे विकसित देश विकसनशील देशातून येणाऱ्या आयातीवर प्रतिबंध लावतात.

अशा प्रकारचे खोटे आरोप करुन हे विकसित देश भारतातून निर्यात होणाऱ्या गालिचे, हिरे, जड - जवाहर, तयार कपडे, चहा इ. वस्तूंची विटंबना करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे भारतातून निर्यात होणाऱ्या अशा वस्तूंच्या विक्रीवर अत्यंत विपरित परिणाम होतो.

जागतिक व्यापार संघटनेच्या एका आणखी सामाजिक कलमामुळे विकसनशील देशातून करण्यात येणारा आयात मालावर प्रतिशुक्ल लावण्याची तरतूद आहे. प्रतिशुल्क लावल्यामुळे विकसनशील विद्यमान कमी असलेल्या श्रम खर्चाचा प्रभाव नष्ट करता येतो.

पर्यावरण संरक्षण –

पर्यावरण कलम हे आणखी एक कलम आहे की, ज्या आधारे विकसित देश विकसनशील देशांच्या निर्यात – व्यापारात अडथळे आणू शकतात. विकसित देश व पर्यावरणवादी यांच्या मते विकसनशील देश आर्थिक विकासाकरिता जे प्रयत्न करतात त्यामुळे मोठ्या प्रमाणात पर्यावरणाची हानी होत आहे. तरीपण हे देश पर्यावरण संरक्षण करण्याकरिता कोणताही प्रयत्न करतात. पर्यावरण प्रदूषणाकरिता जबाबदार असलेल्या ह्या विकसनशील देशांची / देशांना दंड व शिक्षा व्हावी.

वास्तविक पाहता पर्यावरणाची जी मोठी हानी झाली त्याला विकसित देशच जबाबदार आहेत. औद्योगिक क्रांतीला पाश्चात्य देशातच सुरुवात झाली. पर्यावरणाला ७५% हानी पोचवण्यास तेच जबाबदार आहेत.

**विकसित देशांचा दुटप्पी मानदंड**

विकसित देश बऱ्याच सवलती व शुल्क यांच्यात कपात करण्याकरिता विकसनशील देशावर दबाव आणतात. तसेच विविध प्रकारची नियंत्रणे लावून त्यांच्या निर्यात व्यापारात अडथळे आणतात.

## ५.४ बौध्दिक संपदा अधिकार व गॅटस् अंतर्गत बाबी

जागतिक व्यापार संघटनेत ट्रीप्स आणि गॅटस या दोन महत्त्वाच्या बाबी आहेत.

**ट्रीप्स (TRIPS)**

Trade Related Intelleactual Property Rights
व्यापाराशी संबंधीत बौध्दीक संपत्ती अधिकार

ट्रीप्स कराराच्या अंतर्गत ७ प्रकारची बौध्दीक संपत्ती येते –

१) कॉपी राईट व तत्संबंधी अधिकार
२) ट्रेडमार्क
३) भौगोलिक संकेत
४) औद्योगिक डिझाइन
५) पेटंट - यात सूक्ष्म जिवाणू व रोपट्याचे विविध प्रकार येतात
६) संघटित सर्किट
७) व्यापारिक रहस्य

ट्रीप्सचे उद्दिष्ट हे बौध्दीक अधिकारांचा दुरुपयोग होऊ नये हे आहे. या अधिकारांना दुरुपयोगापासून रोखणे हे उद्दिष्ट आहे. या करिता विविध देशातील सरकारांमध्ये विचार विनिमयांना प्रोत्साहन द्यावयाचे आहे.

हा करार ट्रीप्सची कार्यवाही व्हावी म्हणून उचित कायदे तयार करणे व इतर उपाय योजने याकरिता विकसित देशांनी १ वर्षाचा संक्रमण काल म्हणून देत आहे. विकसनशील देश, पूर्व युरोपीय देश व रशिया यांना ५ वर्षाचा तर न्यूनत्तम विकसित देशांकरिता ११ वर्षाचा संक्रमण काल देण्यात आला. ज्या विकसनशील देशामध्ये वस्तू पेटंट संरक्षण नाही त्यांना १० वर्षाची मुदत देण्यात आली.

करारमध्ये हेही स्पष्ट केले आहे की, बौध्दीक संपत्ती अधिकारांच्या व्यापाराबाबातच्या पहलूच्या मंडळाची स्थापना करण्यात येईल. व हे मंडळ या कराराची अमलबजावणी व सदस्य देशांच्या सरकारामार्फत त्याचे कितपत पालन होत आहे याबाबत निगराणी ठेवेल.

**सेवेतील व्यापाराबाबतचा सामान्य नियम**

यापूर्वी GATT मध्ये केवळ वस्तूंच्याच व्यापाराचा समावेश होता. परंतु १९८६ मध्ये प्रथमच GATT मध्ये GATS च्या रुपाने सेवांचा समावेश करण्यात आला.

सेवांच्या विदेशी व्यापारावर लादण्यात येणाऱ्या प्रतिबंध करण्याशी संबंधित हा करार आहे. ज्यामध्ये उच्च प्रकारच्या तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे. अशा बँकींग, विमा, वाहतूक दळणवळण इ. सेवांचाच यात समावेश आहे. यांचे उत्तरोत्तर उदारीकरण व्हावी अशी अपेक्षा आहे.

या करारामध्ये खास क्षेत्रांच्या बाबतीत विशेष अटीपण देण्यात आलेल्या आहेत. वित्तीय सेवांच्या बाबतीत GATS तर्फे देशांच्या सरकारांना गुंतवणूकदार, जमाकर्ते व पॉलिसी धारकांबाबत योग्य उपाय योजण्याचा अधिकार देण्यात आला आहे. तसेच आर्थिक व्यवस्थेची अखंडता व स्थैर्य निर्धारित करण्याचाही अधिकार मिळाला आहे. या सर्व अटी WTO प्रभावी झाल्यावर ६ महिन्यानंतर लागू करण्यात येतील.

व्यावसायिक सेवांच्या क्षेत्रात देशांमधील सरकारे संचालन दलांच्या नियुक्तीकरिता तयार झाली आहेत. गॅटसमध्ये मंत्रालय मतभेद दूर करणे व एका सेवांच्या समितीची स्थापना करण्याची तरतूद आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) व्यापारधोरणातील मतभेद विशेषतः श्रममानदंड व पर्यावरण रक्षण या संदर्भात टिपण लिहा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ५.५ आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेची तक्रार निवारण समिती – (Dispute settlement body of WTO)

**प्रस्तावना –**

आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेच्या सदस्य देशांच्या अधिकार व कर्तव्य त्याच्याशी संबंधीत विषयावर विचार विमर्श व मतभेद मिटविण्याकरिता एक विवाद मिटविणारी संस्था (Disput settlement body)स्थापन करण्यात आली आहे. या संस्थेला आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेच्या सदस्य देशांचे अधिकार व कर्तव्य यासंबंधी निर्माण होणाऱ्या तक्रारी सोडविण्याचे /निवारण्याचे कार्य करावे लागते म्हणून या संस्थेला तक्रार निवारण समिती असेही म्हणतात.

सर्वप्रथम सदस्य देशाच्या विवाद / तक्रार या संदर्भात सदस्य देशामध्ये वाटाघाटी करण्याची व्यवस्था आहे. या सदस्य देशाच्या वाटाघाटी फिस्कटल्यातर जागतिक व्यापार संघटनेचे संचालन मध्यस्थी करतात. तक्रार करणारा देश विवाद मिटविणाऱ्या संस्थेकडे (Dispute settlement Body - DSB) ३० दिवसांच्या आत तीन तज्ञांची नेमणूक करण्याची विनंती करु शकतो. DSB तर्फे सात सदस्यांची आपील नेमण्यात येते. ही समिती चौकशी करुन DSB ला ६० ते ९० दिवसांच्या आत आपला अहवाल सादर करते. ला ह्या अहवाला बाबत निर्णय घ्यावा लागतो, व दोन्ही देशांना तो मान्य करावा लागतो.

आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेच्या सदस्य देशातील अधिकार व कर्तव्ये यासंबंधीची विवाद मिटविणारी प्रणाली वरीलप्रमाणे कार्यरत आहे.

**जागतिक व्यापार संघटनेची विवाद निवारण / तक्रार निवारण मंडळ / यंत्रणा**
(**Dispute settlement body of WTO**)

जागतिक व्यापार संघटनेचे विवादनिवारण मंडळ हा एक अत्यंत महत्तवाचा घटक आहे. व्यापारविषयक निर्माण होणारे संघर्ष टाळून अथवा मिटवून आंतरराष्ट्रीय व्यापार वृध्दिंगत करण्याचे महत्त्वाचे कार्य या विवाद निवारण मंडळा मार्फत केले जाते. यातील टप्पे पुढील प्रमाणे असतात.

१) सल्लामसलत (Counsultation)
सर संचालकामार्फत विवाद असणाऱ्या देशांमध्ये चर्चा सल्लामसलत करुन ६० दिवसांत प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. त्यासाठी इतर देशांच्या चांगल्या संबंधाचा वापर केला जातो.

२) तज्ज्ञगट नियुक्ती (DSB Establishes Panel)
वरील पध्दतीने विवाद मिटला नाही तर विवाद निवारण मंडळामार्फत तज्ज्ञ गटांची नियुक्ती केली जाते.

३) तज्ज्ञ समितीचा आवाका निर्धारीत करणे
तज्ज्ञ समितीने कोणत्या बाबींचा अभ्यास करुन शिफारशी करावयाच्या आहेत याचा आवाका (Terms of Regerence) ठरवून दिला जातो. हे कार्य सल्लामसलत केले जाते किंवा सरसंचालक ठरतात.

४) तज्ज्ञांचा अभ्यास
विवाद विषयांचा ३ ते ६ महिन्यांच्या आत अभ्यास पूर्ण करण्यात येतो. यासाठी दोन्ही पक्षांचे मत विचारात घेतले जाते. अति महत्त्वाच्या विषयाबाबत तीन महिन्याच्या आत हे काम पूर्ण केले जाते.

५) अहवाल सादरीकरण
तज्ज्ञ समिती आपला अहवाल संबंधित देशांना देते. अहवाल विवाद निवारण मंडळात सर्वांना दिला जातो. त्यांचे अंतिम परिणाम केले जाते व अहवाल स्वीकारला जातो. अन्यथा तक्रार करणाऱ्या देशाचे पुन्हा एकदा आपील विचारात घेतले जाते व आपीलावर अहवाल घेतला जातो.

६) अंमलबजावणी
स्वीकृत झालेल्या अहवालाची अंमलबजावणी निर्धारीत वेळेत केली जाते. (६० दिवसांत)

७) दंडात्मक कारवाई
झर अहवालाची अंमलबजावणी करण्यास सदस्य देशाने कुचराई केल्यास त्यावर दंडात्मक कारवाई केली जाते.

**आपली प्रगीत तपासा :**

१) जागतिक व्यापार संघटनेची विवाद निवारण – समितीची माहिती थोडक्यात स्पष्ट करा.

## ५.६ प्रश्नमालिका

प्र.१ जागतिक व्यापार संघटनातंर्गत व्यापारी उदारीकरण ही संकल्पना स्पष्ट करा.

प्र.२ व्यापारी धोरणातील विविध मतभेद स्पष्ट करा.

प्र.३ बौध्दिक संपदा (TRIPS) आणि व्यापार आणि जकात विषयक सामान्य करार यावर टिप लिहा.

प्र.४ जागतिक व्यापार संघटनेचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम अभ्यासा.

प्र.५ जागतिक व्यापार संघटनेची तेरा मिटवणारी यंत्रणा याविषयी चर्चा करा.

❖❖❖

# ६

# व्यापार धोरणांची साधने

# (Instrument of Trade Policy)

**घटकरचना / पाठ्यक्रम**

६.० उद्‌दिष्ट्ये

६.१ प्रस्तावना

६.२ जकाती – अर्थ आणि स्वरुप

६.३ जकातीचे परिणाम

६.४ पर्याप्त जकातीचा सिध्दांत

६.५ जकातसंघ सिध्दांत

६.६ प्रश्नमालिका

## ६.० उद्‌दिष्ट्ये :-

आयातीवर लादण्यात येणाऱ्या करारास जकात असे म्हणतात. आयात शुल्कालाही समानअर्थी शब्द म्हणून जकातीचा वापर करण्यात येतो. जकाती लादण्याने आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या रचनेत भौतिक स्वरुपाचा बदल घडून येतो. या पाठात आपण जकाती व जकातविषयी सिध्दांताचा अभ्यास करणार आहोत. या पाठाची उद्‌दिष्ट्ये पुढीलप्रमाणे

१) जकातीचा अर्थ व जकातीच्या प्रमुख परिणामांविषयी सविस्तर अभ्यास करणे.

२) जकातीच्या पर्याप्त जकात सिध्दांताचा अभ्यास करणे.

३) जकातसंघ सिध्दांत याविषयी अभ्यासणे.

## ६.१ प्रस्तावना :-

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या रचनेत जकातीमूळे भौतिक स्वरुपाचे बदल घडून येतात. साधारणतः ऋण जकाती व धन जकाती असे जकातीचे प्रमुख दोन प्रकार पडतात. जकाती किंवा सीमाशुल्क याचे प्रमुख तीन गटात वर्गीकरण केले जाते. प्रा. किंडलबर्गर यांनी जकातीचे किंमत परिणाम, उपभोग परिणाम, पूर्नवाटप परिणाम, व्यापारशर्ती परिणाम, इत्यादींचे स्पष्टीकरण दिलेले आहे. तसेच पर्याप्त जकात व जकातसंघ असे जकातीचे सिध्दांतही काही अर्थ - तज्ञांनी मांडले आहेत.

## ६.२ जकाती

### १) जकातीचा अर्थ आणि स्वरुप

व्याख्या -

आयातावर लादण्यात येणाऱ्या कराला जकात असे म्हणतात.

आयात शुल्कालाच समानअर्थी शब्द म्हणून जकातीचा वापर करण्यात येतो. सरकारला उत्पन्न मिळविण्यासाठी किंवा देशी उद्योगांना संरक्षण देण्यासाठी जकातीचा उपयोग करण्यात येतो. आयातीवर जकाती लादल्याने देशाला वस्तू आणि उत्पादन घटकांच्या तुलनात्मक किंमतीमध्ये बदल घडवून आणता येतो. त्यामुळे देशाच्या व्यापार रचनेतही बदल होत असतो. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर जकाती लादल्याने आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या रचनेत भौतिक स्वरुपाचा बदल घडून येतो. जकातीचे उच्चदर आंतरराष्ट्रीय व्यापाराचे आकारमान कमी करतात तर जकातीचे कमीदर आंतरराष्ट्रीय व्यापाराचे आकारमान वाढवितात. ऋण स्वरुपाच्या जकाती किंवा अनुदाने (Subsidy) मुक्त व्यापारापेक्षा आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या आकारमानात विस्तार घडून आणतात.

जेव्हा वस्तू देशाच्या राजकीय सीमा ओलांडतात तेव्हा व्यापारी धोरणाचे एक साधन म्हणून जे शुल्क लादले जाते त्या शुल्काचा एक प्रकार म्हणजे जकाती होय. जकाती आयात आणि निर्यात अशा दोन्ही वस्तूंवर लादल्या जातात. तथापि सर्वसाधारणपणे देशाचे सरकार त्यांच्या आयातीवरच जकाती लादत असते. त्यामुळे जकाती आणि आयात शुल्क यांचा एकमेकांऐवजी वापर करण्यात येतो. "परदेशात उत्पादित होणाऱ्या वस्तू की ज्या शुल्क लादणाऱ्या देशामध्ये येणार आहेत त्या शुल्कालाच 'आयात शुल्क' असे म्हणतात."

देशात उत्पादित होणाऱ्या वस्तू की ज्यांची विदेशात निर्यात केली जाणार आहे त्यावर लादण्यात येणाऱ्या शुल्काला निर्यात शुल्क म्हणतात.

आयात आणि निर्यात शुल्काशिवाय दुसरा एक शुल्काचा प्रकार म्हणजे संक्रमण शुल्क होय. हे शुल्क जेव्हा दुसऱ्या देशाच्या वस्तू आपल्या देशामधून तिसऱ्याच देशात जाणाऱ्या असतात. अशा वस्तूवर संक्रमण शुल्क लादण्यात येते. उदा. नेपाळने इंग्लंडमधून केलेल्या आयात आणि निर्यात वस्तू जेव्हा भारताच्या सीमेतून जातात तेव्हा भारत या वस्तूंच्या प्रवेशाच्या व निर्गमन स्थळावर शुल्क आकारतो.

जकातीचे वर्गीकरण -

जकातीचे विविध प्रकार आहेत. त्यांचे सामान्यपणे तीन गटात वर्गीकरण केले जाते.

१) गट क्रमांक एक -
  अ) विशिष्ट शुल्क
  ब) मुल्यानुसारी शुल्क
  क) संयुक्त शुल्क

२) गट क्रमांक दोन -
  अ) महसुली जकात
  ब) संरक्षण जकात

३) गट क्रमांक तीन -
  अ) एक रकाना जकाती
  ब) बहुरकाना जकाती

वरीलप्रमाणे जकातीचे वर्गीकरण केल्यानंतर आपण आता प्रत्येक गटातील जकातीचे विश्लेषण पाहू.

**१) विशिष्ट शुल्क -**

"वस्तूंचे वजन किंवा इतर माप लक्षात घेऊन जेव्हा सरकार विशिष्ट रक्कम जकात म्हणून लादते त्या जकातीला 'विशिष्ट शुल्क' असे म्हणतात." उदा. सर्वप्रकारच्या दूरदर्शन संचावर त्याच्या किंमती लक्षात न घेता नगानुसार लादलेले शुल्क. विशिष्ट शुल्काची अंमलबजावणी करणे अधिक सोपे असते. कारण त्यामध्ये आयात आणि निर्यात वस्तूंचे मूल्य सहजपणे ठरविणे सोपे नसते कारण ते त्यांच्या मागणी व पुरवठ्याने ठरवणाऱ्या किंमती व्यातिरिक्त करार किंमत, बाजार किंमत इ. किंमती असतात. या अनेक किंमती पैकी जकात आकारताना यापैकी कोणती किंमत विचारात घ्यावी ही अवघड समस्या आहे. त्यामुळे विशिष्ट जकातीचा उपयोग करुन ही समस्या सोडविता येते. कलाकुसरीच्या वस्तूंवर विशिष्ट जकाती आकारता येत नाहीत.

**२) मुल्यानुसारी शुल्क -**

"जेव्हा वस्तूच्या किंमतीच्या विशिष्ट दराने जकात म्हणून आकारली जाते तिला 'मुल्यानुसारी शुल्क' असे म्हणतात." हे शुल्क वस्तूंचे वजन किंवा इतर मोजमापे लक्षात घेत नाही. वस्तूच्या भौतिक प्रमाणापेक्षा वस्तूचे मुल्य हाच मुल्यानुसारी शुल्काचा आधार आहे. मुल्यानुसारी शुल्क समानता तत्त्वाला धरुन आहे कारण अधिक मौल्यवान वस्तूंवर अधिक शुल्क आकारले जाते कारण या वस्तूंची आयात आणि उपभोग देशातील श्रीमंत लोकांकडून घेतला जातो. याउलट कमी किमतीच्या वस्तूवर जकातीचे ओझे कमी पडते. या वस्तूचा उपभोग देशातील गरीब लोक घेत असतात. वेगवेगळ्या देशांनी आकारलेल्या मुल्यानुसारी शुल्कांची एकमेकांबरोबर सहजपणे तुलना करता येते.

**३) संयुक्त शुल्क -**

"जेव्हा देशाचे सरकार आयात वस्तूंवर वस्तूंचे भौतिक आकारमान आणि त्यांचे मूल्य यांचा संयुक्त विचार करुन शुल्क लादते तेव्हा त्या शुल्कांना 'संयुक्त शुल्क' असे म्हणतात." संरक्षणाचे धोरण अधिक प्रबळ करावयाचे असते तेव्हा सरकार शुल्काचा कमाल दर निश्चित करते, त्यामुळे देशी उद्योगांना संरक्षण देणाऱ्या दृष्टिकोनातून ही पध्दत आदर्श ठरते.

**४) सरकते प्रमाण शुल्क -**

"वस्तूंच्या बदलणाऱ्या किंमतीनुसार जेव्हा आयात शुल्कही बदलते तेव्हा त्याला 'सरकते प्रमाण शुल्क' असे म्हणतात." हे शुल्क विशिष्ट किंवा मुल्यानुसारी शुल्क असू शकते. प्रत्यक्ष व्यवहारात बहुधा ते विशिष्ट शुल्कच असते. अन्नधान्याच्या आयातीवर अशाप्रकारचे शुल्क आकारल्याचे व्यवहारामध्ये दिसून येते.

**५) महसुली जकात –**

"देशाच्या सरकारला महसुल मिळावा या एकाच हेतूने जेव्हा जकाती मिश्चित केल्या जातात त्या जकातींना 'महसुल जकाती' असे म्हणतात." सरकारला आवश्यक असलेले महसुल मिळावे या हेतूने या जकातींची आकारणी होत असते. परंतु जर उपभोक्ता संबंधित आयात वस्तूंची मागणी पूर्णपणे दुसऱ्या वस्तूंकडे संक्रमित करीत

असेल तेव्हा अनपेक्षीत संरक्षण परिणाम घडून येतो. म्हणून महसुल जकातीचा काही प्रमाणात संरक्षण परिणाम नेहमी होत असतो. त्यामुळे शुध्द स्वरुपाच्या महसुली जकाती नसतात. महसुली जकाती सामान्यपणे श्रीमंत लोकांच्या चैनीच्या वस्तींवरच लादल्या जातात. कारण त्या वस्तूंची मागणी अलवचिक असते. महसुलाच्या दृष्टीने जकाती उत्पादक ठराव्या म्हणून जकातींचे दर फारसे उच्च नसावेत.

**६) संरक्षण जकाती -**

"स्वस्त आयातीच्या गळेकापू स्पर्धेपासून देशी उद्योगांचे संरक्षण करण्यासाठी परकीय आयात वस्तूंवर ज्या जकाती लादल्या जातात त्यांना 'संरक्षण जकाती' असे म्हणतात." संरक्षण जकातीचा दर जसजसा वाढत जातो, तसतसा संरक्षण परिणामही अधिक होत जातो. जेव्हा देशी वस्तूंशी स्पर्धा करणाऱ्या परकीय वस्तूची आयात पूर्णपणे थांबते आणि जकातीपासून कुठलेही उत्पन्न मिळत नाही. अशा जकातींना पूर्व संरक्षण जकाती असे म्हणतात. देशी उद्योगांना शंभर टक्के संरक्षण मिळण्यासाठी संरक्षण जकातीचे दर पर्याप्त प्रमाणात असले पाहिजेत. जेव्हा जकातीचे दर पर्याप्त पातळीला पोहोचतात तेव्हा आयात पूर्णपणे बंद होते. आणि आयात जकातीपासून कसलेही उत्पन्न मिळत नाही. सरकारला जकातीपासून आवश्यक असणारे उत्पन्न न मिळणे या परिणामाव्यातिरिक्त देशी उत्पादक कृतीशील आणि देशांतील उद्योगांना संरक्षण देणे असा दुहेरी हेतू जकाती लादण्याचा असतो.

**७) एक रकाना जकाती -**

या पध्दती अंतर्गत आयात वस्तू आणि त्या कोणत्या देशात आयात केल्या जातात याबाबतीत कोणत्याही प्रकारचा भेदाभेद न करता सर्वच देशांमधील सर्वच वस्तूंवर कायद्याने एकाच दराने जकाती आकारल्या जातात. ही पध्दत अत्यंत सोपी आहे. कारण या जकात पध्दतीचा आकृतीबंध तयार करणे आणि त्याची अमंलबजावणी करणे सोपे असते.

**८) बहु– रकाना जकाती -**

बहु - रकाना जकाती पध्दतीमध्ये आयातीचे उगमस्थान म्हणजेच देश आणि वस्तूंचे प्रकार याबाबतीत भेद निर्माण करुन दोन किंवा अधिक वेगवेगळ्या दराने कायद्याने जकाती लादल्या जातात. उदा. भारताने १९३२ मध्ये Comman wealth preference agreement स्वीकृत केल्यानंतर बहु – रकाना जकात धोरण स्वीकारले होते. या अंतर्गक कॉमन वेल्थ देशांमधून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर कमी दर जकाती आकारल्या जात होत्या आणि इतर देशांसाठी जकातीचे दर अधिक होते.

**९) सर्वसाधारण आणि पारंपारिक जकाती –**

या जकाती अंतर्गत जकातीच्या दोन सूची तयार केल्या जातात. एक सूची सर्वसाधारण जकातीची असते तर दुसरी पारंपारिक जकातीची असते. सर्वसाधारण जकातीची सूची कायदे मंडळ तयार करते आणि या सूचीच्या बाबतीत असे जाहीर केलेले असते की व्यापारी करारानुसार जेव्हा - जेव्हा गरज भासेल तेव्हा - तेव्हा त्यात बदल करण्यात येतील. जकात लादणारा देश आणि इतर देश यांच्यामध्ये जे व्यापारी करार होतात त्या करारानुसार पारंपारिक जकात सूची तयार होत असते. पारंपारिक सूचीमध्ये

देशातील बदलत्या परिस्थितीनुसार बदल करता येत नाहीत. पारंपारिक जगात सूचीचा महत्त्वाचा दोष म्हणजे ही पध्दत अलवचीक असते. व्यापारी कराराची मुदत संपते किंवा उभय देशात दीर्घकाळ चर्चा घडून येते तेव्हाच हा बदल शक्य असतो.

**आपली प्रगती तपासा:**

प्र.१. जकाती म्हणजे काय?

________________________________________

________________________________________

________________________________________

प्र.२. जकातीचे वर्गीकरण कसे केले जाते?

________________________________________

________________________________________

________________________________________

## ६.३ जकातीचे परिणाम -

प्रा. किंडलबर्जर यांनी जकातीचे होणारे परिणाम पुढील आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट केले आहेत.

**१) किंमत परिणाम –**




जकात परिणाम

विदेशी वस्तूंची किंमत बदलत नाही असे गृहीत धरुन जकात आकारणाऱ्या देशातील किंमतपातळीत जकात दराच्या पूर्ण रकमेएवढी किंमत वाढते. वरील आकृतीत एवढी किंमत वाढ किंमत व परिणाम ठरते. परंतु हे नेहमीच घडत नाही. काही वेळा जकात शुल्कांच्या रकमेपेक्षा अधिक तर काही वेळा जकात रकमेपेक्षा कमी प्रमाणात किंमत वाढते. जेव्हा जकातीमुळे कसलीही किंमत वाढत नाही तेव्हा जकातीचा संपूर्ण भार निर्यातदरांना सहन करावा लागतो आणि जकात रकमेपेक्षा जेव्हा कमी प्रमाणात किंमतीत

वाढ होते तेव्हा जकातीचा भार आयात व निर्यातदरामध्ये विभागला जातो. जकातीला किंमतीवर होणारा परिणाम हा जकाती आकारमान आणि मागणी पुरवण्याची लवचिकता यावर अवलंबून असतो.

### २) संरक्षक परिणाम -

देशातील उदयोगांना परकीय उदयोगापासून संरक्षण देण्यासाठी आयात जकाती आकारल्या जातात. अशा आयात जकातीमुळे विदेशी वस्तूच्या किंमती वाढतात. किंमती वाढल्यामुळे देशातील उपभोक्ते आयात वस्तूऐवजी देशातील वस्तूंचा उपभोग घेणे पसंत करतात. आकृतीमध्ये एवढी किंमत असताना एवढ्या नगसंख्येची मागणी केली जाते. जर आयात वस्तूवर एवढी जकात आकारली तर आयात ने कमी होते आणि देशांतर्गत वस्तूंचा पुरवठा (उत्पादन) वरून पर्यंत वाढते. त्यामुळे देशांतर्गत उत्पादन परिणाम ठरतो.
थोडक्यात संरक्षण आयात जकाती लादल्यामुळे देशी उत्पादकांना संरक्षण मिळून देशांतर्गत उत्पादन वाढण्यास मदत होते.

### ३) उपभोग परिणाम -

जेव्हा वसतूच्या आयातीवर आयात जकात आकारली जाते तेव्हा त्या वस्तूची किंमत वाढून मागणी कमी होते आणि त्या वस्तूचा उपभोग कमी होतो. आकृतीमध्ये (जकात परिणाम) जकातआकारण्यापूर्वी किंमतीला एवढ्या नगसंख्येचा उपभोग घेत होते, जकात एवढी आकारल्यामुळे आयात वस्तूंची किंमत पर्यंत वाढल्यामुळे आयात एवढी कमी होते.त्यामुळे उपभोग वरुन पर्यंत कमी होतो. म्हणजेच उपभोग एवढा कमी होत असल्याने तो जकातीचा उपभोगावर होणारा परिणाम ठरतो. जकातीमुळे उपभोक्त्याचे समाधान एवढे कमी होते. आणि त्याचा आंतरराष्ट्रीय व्यापारावर प्रतिकूल परिणाम होतो.

### ४) महसूल परिणाम -

सरकारला ज्या विविध मार्गांनी उत्पन्न प्राप्त होते त्यात आयात – निर्यात जकातीपासून मिळणारे उत्पन्न महत्वाचे असते. इतर देशातून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर आकारलेल्या जकातीस आयात जकात असे म्हणतात. तर निर्यात होणाऱ्या वस्तूंवर आकारलेल्या जकातीस निर्यात जकात असे म्हणतात. आकृतीमध्ये (जकात परिणाम) मुक्त व्यापार असताना कसलीही जकात आकारली जात नसल्याने एवढ्या किंमतीत वस्तू आयात केल्या जातात.मात्र आयात – जकात एवढी आकारली गेल्यास सरकारला एवढ्या आयातीवर एवढा महसूल प्राप्त होईल. सरकारच्या महसूलात झालेली वाढ या रेखांकित चौकटीत दर्शवली असून तो भाग जकातीचा महसूल परिणाम ठरतो.

### ५) पुनर्वाटप परिणाम -

आयात जकाती आकारल्यामुळे आयात वस्तूसाठी असणारी मागणी कमी होऊन त्याऐवजी देशात उत्पादित झालेल्या वस्तूची मागणी वाढते. मागणी वाढल्यामुळे किंमती वाढून उत्पादकांना पूर्वीपेक्षा अधिक नफा मिळतो. आकृतीमध्ये (जकात परिणाम) जकातीमुळे उत्पादकांना मिळणारा नफा एवढा असेल. हा लाभ उत्पादन खर्चापेक्षा अधिक उत्पन्नाच्या स्वरुपातील असल्याने त्यास किंटलबर्जर यांनी आर्थिक खंड असे म्हटंले आहे. हा सर्व आर्थिक खंड उत्पादकांना प्राप्त होतो. तसेच जकातीमुळे सरकारच्या महसूलात रेखांकित चौकोन एवढी भर पडते. मात्र उपभोक्त्यांना जकातीमुळे किंमत मोजावी लागत असल्याने

उपभोक्त्यांचे नुकसान होते. आकृतीत तयार झालेल्या या त्रिकोणाच्या उत्पन्नाचा देशातील उत्पादकांना किंवा सरकारला लाभ मिळत नाही. यालाच किंडलबर्जर यांनी जकातीचा खर्च असे म्हटंले आहे. त्यामुळे आकृतीत दर्शवलेला हा भाग पुर्नवाटप असून तो लाभ पूर्णपणे उत्पादकांना प्राप्त होतो.

**६) व्यापारशर्ती परिणाम -**

आयात जकाती योग्य प्रमाणात आकारल्यास त्या जकातीचा व्यापार शर्तीवर अनुकूल परिणाम होतोय या व्यापारशर्ती जकात लादणाऱ्या देशाला अनुकूल ठरतात तर दुसऱ्या देशाला त्या प्रतिकूल ठरतात. जकातीमुळे जकात आकारणाऱ्या देशातील उपभोक्त्यांना वस्तूसाठी अधिक किंमत द्यावी लागते. जर निर्यात करणाऱ्या देशातील वस्तूचा पुरवठा अलवचिक असेल आणि आयात करणाऱ्या देशाची मागणी लवचिक असेल तर अशा परिस्थितीत जकात आकारणीमुळे आयातीवर फारसा परिणाम होणार नाही मात्र निर्यात करणाऱ्या देशाचा वस्तूचा पुरवठा पूर्ण लवचिक असेल तर जकात आकारणीमुळे व्यापारशर्तीवर कसलाही परिणाम होत नाही.

**७) स्पर्धात्मक परिणाम -**

इतर देशातील वस्तूंच्या आयातीवर जकात आकारुन देशातील उत्पादकांना विदेशी स्पर्धेपासून संरक्षण दिले जाते. असे संरक्षण जेव्हा देशात उद्योगधंदे नव्याने स्थापन झालेले असतात, त्यांचा फारसा विकास झालेला नसल्याने ते विदेशी उत्पादनाशी स्पर्धा करू शकत नसतात. अशा परिस्थितीत उद्योगांना संरक्षण देण्यासाठी जकाती आकारल्या जातात. परंतु बाल्यावस्थेत उद्योगांना संरक्षण दिल्यानंतर त्यांना संरक्षणाची क्षमता सतत सवय लागून नंतरच्या काळात त्यांच्यात स्पर्धा करण्याची क्षमता निर्माण होत नाही. त्यामुळे विशिष्ट वस्तू उत्पादनात त्या उद्योगाची मक्तेदारी निर्माण होण्याची व त्यांच्यातील अकार्यक्षमता वाढण्याचीच शक्यता म्हणून किंडलबर्जर यांनी स्पर्धात्मक परिणामास स्पर्धा विरोधी परिणाम म्हटले आहे.

**८) उत्पन्न परिणाम -**

आयात वस्तूंवर जकाती लादल्यामुळे आयात वस्तूच्या किंमती वाढून देशातील नागरिकांकडून आयात वस्तूंऐवजी देशात तयार झालेल्या वस्तूंना अधिक मागणी वाढते. अशा वाढलेल्या मागणीची पूर्तता करण्यासाठी देशात मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवणूक होऊन देशांतर्गत उत्पादनपातळी व रोजगार वाढ होऊन देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. तसेच देशांतर्गत उत्पादन वाढून अशा वस्तूंची दुसऱ्या देशात निर्यात करून निर्यातीच्या स्वरूपात देशाला अधिक उत्पन्न प्राप्त होते. परंतु अशा आयात जकातीमुळे देशाच्या उत्पन्नात जरी वाढ होत असली तरी दुसऱ्या देशातून आयात कमी झाल्यामुळे त्या देशातील उत्पादन आणि रोजगारावर प्रतिकूल परिणाम होतो.

**९) व्यवहारतोल परिणाम -**

आयात जकातीमुळे देशाच्या व्यवहारतोलावर अनुकूल परिणाम होतो. कारण जकातीमुळे आयातीचे मूल्य कमी होते. म्हणजेच जकातीचा व्यवहारतोलावर चांगला परिणाम होतो आणि व्यवहारतोलातील असमतोल कमी होण्यास मदत होते.

अशा रीतीने जकातीचे विविध प्रकारचे परिणाम होताना दिसून येतात. जकात आकारणाऱ्या देशांना आर्थिक विकास साध्य करता येतो. कारण जकातीमुळे देशी उत्पादकांना संरक्षण मिळून त्यांचा विकास होतो.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१ जकातीचा किंमत परिणाम अभ्यास.

________________________________________

________________________________________

________________________________________

प्र.२ जकातीचा उपभोग परिणाम म्हणजे काय ?

________________________________________

________________________________________

________________________________________

## ६.४ पर्याप्त जकातीचा सिध्दांत :-

सामान्यपणे जेव्हा जकाती आकारल्या जातत तेव्हा व्यापारशर्ती अनुकूल होऊन जकाती लादलेल्या देशाला फायदा होतो. परंतु जकातीचा दर हा एक मर्यादेत असायला हवा एका मर्यादेपेक्षा जास्त जकातीचा दर असेल तर जकाती लादलेल्या देशाला फायद्याऐवजी नुकसान सहन करावे लागते. तसेच व्यापाराचे परिणामही खालावते. म्हणून प्रश्न असा निर्माण होतो की जकातीचा आदर्श दर काय असावा यावरून अर्थतज्ञांनी पर्याप्त जकात ही संकल्पना मांडली

पर्याप्त जकात म्हणजे जकातीपासून देशाला फायदा मिळणे किंवा व्यापारापासून देशाचे कल्याण साधने होय.

पुढील आकृतीच्या सहाय्याने पर्याप्त जकात ही संकल्पना स्पष्ट केली आहे.




पर्याप्त जकात

वरिल आकृतीत पूर्व जकात वकृ हा OE आणि OP अनुक्रमे इंग्लंड व पोर्तुगीज या देशाचा आहे. तसेच OT हा वकृ जकातीचा उतार दर्शवितो. $CIC_1$ आणि $CIC_2$ इंग्लंडचे समवृत्तीवक्र आहेत. 'T' बींदूच्या ठिकाणी इंग्लंडचा ($CIC_1$) समवृत्ती वक्र घेवून जातो. 'h' या बिंदूच्या ठिकाणी इंग्लंडचा सर्वात जास्त समवृत्ती वक्र पोर्तुगाच्या प्रस्तावक्राला छेदतो. त्यामुळे नवीन $OE^1$ प्रस्तावक्र निर्माण होतो. OT रेषेवर 'h' बिंदू पर्याप्त जकात दर दर्शवितो.

इथे जकातीमुळे व्यापारशर्ती सुधारुन जकाती लादलेल्या देशाला व्यापारापासून फायदा मिळाला पाहिजे त्यासाठी विरुध्द देशाचा प्रस्ताव वक्र दुसऱ्या प्रस्ताव वक्रापेक्षा कमी लवचिक असला पाहिजे.

अर्थतज्ञ किंडलबर्जर यांनी पर्याप्त जकातीचा साधा नमूना पुढीलप्रमाणे दिला आहे.

$$t = \frac{1}{e-1}$$

t = जकातदार, e = विरुध्द देशाच्या प्रस्तावक्राचा लवचिकता बिंदू म्हणून विरुध्द देशाचा प्रस्ताव वक्र सरळरेषेला छेदत असेल (अनिश्चित लवचिकता) तर पर्याप्त जकात म्हणजे $\frac{1}{a-1}$ याचा अर्थ जकातीशिवाय व्यापारशर्ती सुधारु शकतात, म्हणून कमी लवचिकता (e < a) जास्त वस्तूंचा समवृत्तीवक्र म्हणजे उच्च पातळीवरील कल्यान हे पर्याप्त जकातीमुळे शक्य होते.

किंडलबर्जर यांनी पुढील आकृतीच्या सहाय्याने जकातीमूळे देशाला फायदा होत नाही हे दाखवून दिले आहे.




वरिल आकृतीत इंग्लंड आणि पोर्तुगाल या दोन देशातील कापड व दारू या दोन वस्तूच्या व्यापारात जकातीपासून फायदा मिळत नाही हे प्रस्तावक्राच्या आधारे दर्शविले आहे. अर्थतज्ञ कुडलबर्जर यांच्या मते जकातीपासून (पर्याप्त जकातीशिवाय) देशांना व्यापारापासून फायदा होत नसतो.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. पर्याप्त जकात म्हणजे काय ?

---

---

---

## ६.५ सीमाशुल्क संघाचा सिध्दांत (Theory of customs unions)

**प्रस्तावना –**

सीमाशुल्क संघाच्या सिध्दांताचा अभ्यास प्रशुल्क सिध्दांताची एक शाखा म्हणून केला जातो. द्वितीय उत्तमाचे एक प्रमुख उदाहरण म्हणून या संघाचा निर्देश केला जातो. त्यामुळे बरेचदा त्याविषयीची चर्चा कल्याण कल्पनेच्या संदर्भात होऊ लागतो. अर्थात सीमाशुल्क संघाविषयीची चर्चा मागील दोन दशकांपासून जास्त होऊ लागली आहे. त्यावरील साहित्याला आणि संशोधनपत्र लिखाणाला जणू पेव फुटले आहे. कारणही तसेच घडले आहे. फ्रान्स, जर्मनी, इटली, बेल्जिअम, लक्झेम वर्ग आणि नेदपलॅलस या सहा देशांनी १९५८ साली रोम संधी (Treaty of Rome) करुन युरोपीय आर्थिक समुदायाची (european economic community) निर्मिती करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली. आणि तेव्हापासून आर्थिक एकात्मीकरणाच्या चळवळीचे लोण जगभर पसरले आहे. अनेक अल्पविकसित देशांनी अनुकरण करण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून अशाच संधी केल्या आहेत. युरोपीय आर्थिक समुदायाच्या यशस्वीतेची ग्वाही वाढत्या प्रमाणातील अनुकरणांद्वारे मिळते याबद्दल शंका नाही.

**संकल्पना –**

सीमाशुल्क संघाच्या समस्यांचा अभ्यास सामान्यतः कल्याण पैलू आणि यंत्रणा पैलू या दोन शीर्षकांच्या अंतर्गत केला जातो. पहिल्यात संघाच्या स्थापनेमुळे सहभागी देशाच्या आणि एकंदर जगाच्या कल्याणात होणारी वाढ अथवा घट यांचा अंदाज लावला जातो. दुसऱ्यात सभासद देशांना आपल्या प्रशुल्क संरचनांमध्ये आणि वित्तीय धोरणांमध्ये कराव्या लागणाऱ्या बदलांचा विचार केला जातो. संघ सभासदांच्या कल्याणात भर पडते की घट होते. या प्रश्नाचे उत्तर देण्याचा सुविख्यात प्रयत्न जॅकॉब व्हायनर याने व्यापार निर्मिती (Trade creation) आणि व्यापार अपवाहन (Trade diversion) या संदर्भात केला.

**व्यापार – निर्मिती आणि अपवाहन –**

जॅकॉब व्हायनर यांचे सर्वप्रथम १९५० साली सीमाशुल्क संघाचा प्रश्न () या नावाचा अभ्यास प्रकाशित करून या विषयावरील चर्चेला चालना दिली. खुल्या व्यापारामुळे आंतरराष्ट्रीय क्रमविभागणी आणि विशेषीकरण अधिक योग्य प्रकारे होईल जागतिक कल्याणात भर पडते ही कल्पना सर्वसामान्य होती आणि सीमाशुल्क संघाच्या स्थापनेमुळे संबंधित सभासद राष्ट्रात का असेना पण काही प्रमाणात व्यापारातील अडथळे दूर होण्यास निश्चित मदत होते. आणि म्हणून सर्व देशांनी प्रशुल्क भिंती उभारण्यापेक्षा काही देशांनी आपसातील प्रशुल्क भिंती मोडणे केव्हाही जागतिक कल्याणावर भर टाकणारे असते. असा समज सर्वत्र प्रचलित होता. काही खुल्या व्यापारापेक्षा केव्हाही अधिक शिष्ठ ही कल्पना अर्थशास्त्रज्ञांना देखील मान्य होती.

व्हायसरने या कल्पनेला धक्का दिला. सीमाशुल्क संघामुळे जागतिक कल्याणात वाढ किंवा घट काहीही होऊ शकते, असे त्याने सांगीतले आणि विशिष्ट संघाच्या स्थापनेमुळे कल्याणात वाढ होणार की घट यांची मोजमाप करण्यासाठी कसोट्या अथवा अभिलक्षणे सांगितली. सीमाशुल्क संघाच्या स्थापनेच्या व्यापाराच्या स्वरुपावर काय परिणाम होतो याचे विश्लेषण करण्यासाठी त्याने व्यापार – निर्मिती आणि व्यापार – अपवाहन या दोन संज्ञा सांगितल्या. संघाच्या सभासदांनी परस्परातील प्रशुल्काची आडकाठी दूर केल्यानंतरच्या स्थितीत उत्पादन अधिक परिव्यय असलेल्या सभासद देशांमधून कमी परिव्यय असलेल्या सभासद देशांकडे

हस्तांतरीत झाल्यास व्यापार – निर्मिती झाली आणि कल्याणावर घनात्मक परिणाम झाला असे म्हणता येते. या उलट प्रशुल्क आडकाठी दूर केल्यानंतर उत्पदन कमी परिव्यय असलेल्या संघाबाहेरच्या देशांऐवजी जास्त परिव्यय नसलेल्या संघातील देशात होऊ लागल्यास व्यापार अपवाहन झाले असे म्हणता येते.

या दोन परिव्ययातील अंतर आपल्याला उदाहरण आणि आकृतीच्या साहाय्याने समजून घेता येते.

उदाहरणात केवळ उत्पादनांवर लक्ष केंद्रित केले असून एका विशिष्ट क्ष वस्तूंच्या (कापड) मागणी पूर्णपणे अलवचिक असल्याचे आणि पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या – तिन्ही देशांत स्थिर परिव्ययाचा नियम लागू असल्याचे गृहित धरले आहे. प्रशुल्काचा दर प्रत्येक वेळी १०० प्रतिशत मानला आहे. तिन्ही देशातील परिव्यय पहिल्या देशातील चलनात बदलून सांगितला आहे.




आकृतीमध्ये प, प आणि प हे अनुक्रमे पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या देशाचे पुरवठा वक्र दाखविले आहेत. तिन्ही देशातील परिव्यय अनुक्रमे १० रुपये, ८ रुपये आणि ६ रुपये प्रति मीटर आहे. पहिल्या देशाने आपल्या कापड उद्योगाला संरक्षण देण्यासाठी आयातीवर १०० प्रतिशत शुल्क (प्र) लावल्यास दुसऱ्या देशातील कापडाची प्रति मीटर किंमत ८ रु. पासून १६ रु. पर्यंत आणि तिसऱ्या देशातील ६ रु. पासून १२ रु. पर्यंत वाढते. त्यामुळे अ देशात आयात मुळीच होत नाही आणि स्वदेशात १० रु. दराने संपूर्ण उत्पादन होते. समजा आता पहिला आणि दुसरा देश सीमाशुल्क संघ स्थापन करतात. परिणामतः त्यांच्यामधील आयात प्रशुल्क समाप्त होते. तिसऱ्या देशातील मालावर मात्र आयात प्रशुल्क चालू राहते. दुसऱ्या देशातील कापड (८ रु. प्रति मी) आता पहिल्या देशातील कापडापेक्षा (१० रु प्रति मी) स्वस्त असल्यामुळे पहिल्या देशातील जास्त खर्चिक उत्पादन बंद होऊन ते दुसऱ्या देशात सुरु होते. कमी परिव्यय असलेल्या देशाकडे उत्पादन हस्तांतरीत झाल्यामुळे याला व्यापार – निर्मिती म्हणतात. तिसऱ्या देशातून पूर्वी देखील पहिल्या देशात निर्यात होत नसल्यामुळे सीमाशुल्क संघाच्या स्थापनेचा त्याच्या व्यापारावर परिणाम होत नाही. पहिल्या देशाने स्वदेशात मालाची निर्मिती करण्याऐवजी दुसऱ्या देशातून तो आयात केला म्हणून संपत्तीसाधनाची श्रम २ किंवा रेखांकीत भागाएवढी बचत होते. ही बचत म्हणजेच कल्याणात पडलेली भर.

व्यापार निर्मिती होत असेल तर संघात अवश्य प्रवेश करावा आणि व्यापार – अपवाहन होत असेल तर संघाबाहेर राहावे. अर्थात यासंबंधी कोणतेही सरसकट विधान करणे कठीण आहे. प्रत्येक प्रस्तावित सीमाशुल्क संघाचा विचार स्वतंत्रपणे केला पाहिजे.

आपण फक्त उत्पादानावर होणाऱ्या परिणामांचा विचार केला परंतु संघ स्थापनेचे परिणाम उपभोगावरही होतात. आर्थिक समतोलाच्या प्रतिमानात आपण मागणी पूर्णपणे अलवचिक असते असे गृहित घरून विवेचन केले. वस्तुस्थिती मात्र तशी नसते. प्रशुल्क काढल्यामुळे सभासद देशात त्या वस्तूंच्या किमती घटतात आणि त्यांचे मागणीवर उत्पन्न परिणाम आणि प्रतिस्थापन परिणाम होतात. प्रो. मीड यांनी यांसंबंधी उल्लेखनीय विवेचन केले आहे. त्यांच्या मते केवळ एका वस्तूवर होणाऱ्या परिणामाचा विचार करुन भागत नाही. सर्व वस्तूविषयी त्यांचे आंतरसंबंध लक्षात घेऊन विचार कराव लागतो. त्या वस्तू पर्यायी असू शकतात किंवा संपूरक असू शकतात.

संघ स्थापनेचा व्यापार अटींवर परिणाम होतो. देशाचा गट लहान असल्यास व्यापार अटींवर विशेष परिणाम होत नाही. परंतु युरोपीय आर्थिक समुदायासारखा मोठा गट असल्यास प्रशुल्क काढताक्षणीच व्यापारसंबंधामध्ये महत्त्वाचे बदल घडून येतात आणि त्यांचा व्यापार अटींवरही परिणाम होतो. व्यापार अटीतील बदलांचा परिणाम कल्याणावर होतो.

उत्पादन, उपभोग आणि व्यापर अटी यांवर संघ – स्थापनेचा काय परिणाम होतो याचे विवेचन केले म्हणजे सीमाशुल्क संघाच्या सिध्दाताचा बराचसा भाग पूर्ण झाला असे समजायला हरकत नाही. परंतु उपेक्षा करता येणार नाही असेही काही परिणाम बचतीवर होणाऱ्या परिणामांचा विचार व्हावायास हवा. व बाजारपेठ उपलब्ध झाल्याने मोठ्या व कार्यक्षम उत्पादनाचे सर्व फायदे मिळू लागतात. अर्थात ही सामाईक बाजारपेठ फार लहान असू नये.

दुसरे सामाईक बाजारपेठेचा कार्यक्षमतेवरही परिणाम होतो. आधी संरक्षित असलेल्या अर्थव्यवस्था संघातील देशासाठी खुल्या झाल्यामुळे उत्पादकांना वाढत्या स्पर्धेला तोंड द्यावे लागते. इंग्लंडने युरोपीय आर्थिक समुदायात प्रवेश मिळविला पाहिजे, या प्रतिपादनामागे हीच भूमिका होती. बाजारपेठ लहान व संरक्षित असली तर उत्पादक आपली शक्ति अल्पाधिकार स्थापन करण्यासाठी खर्च करतात. नवीन तंत्राचा वापर करण्याकडे किंवा नवीन वस्तू बाजारात आणण्याकडे त्यांचा विशेष कल नसतो. सामाईक बाजारपेठेत प्रवेश केल्यास आपोआप स्पर्धेला सामोरे जावे लागते. सभासद देशांनाही स्पर्धात्मक स्थिती टिकून राहावी व वृध्दीगत व्हावी या दृष्टीने प्रयत्न करावा लागतो.

तिसरे, सीमाशुल्क संघ किंवा सामाईक बाजारपेठ स्थापन केल्याने सभासद देशांच्या आर्थिक अभिवृध्दीला चालना मिळते. लॅटिन अमेरिकन सामाईक बाजारपेठ याच हेतूने स्थापन करण्यात आली. बाहेरच्या देशातील अस्थिर बाजारांवर अवलंबून राहावे लागत नाही. हा त्याचा सर्वात मोठा फायदा असतो. उत्पादकांना परिमाण बचती मिळविता येतात आणि स्पर्धेमुळे कार्यक्षमता वाढण्यास मदत होते.

सीमाशुल्क संघच्या स्थापनेचा उत्पादन, उपभोग, व्यापार अटी, परिणाम बचती, उत्पादनातील कार्यक्षमता आणि आर्थिक अभिवृध्दीदर यावर काय परिणाम होऊ शकतो यासंबंधी आपण केले हे विवेचन केवळ आर्थिक पैलू दृष्टिसमोर ठेवून करण्यात आले. सीमाशुल्क संघाची स्थापना ही घटना मात्र राजकीय असते व तिचे दूरगामी राजकीय परिणाम होतात.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. शीमाशुल्क /जकातसंघ म्हणजे काय ?

## ६.६ प्रश्नमालिका

प्र.१ जकात म्हणजे काय ? जकातीचे स्वरुप स्पष्ट करा.

प्र.२ जकातीचे विविध परिणाम अभ्यासा.

प्र.३ पर्याप्त जकात सिध्दांत स्पष्ट करा.

प्र.४ जकातसंघ सिध्दांत स्पष्ट करा.

❖❖❖

# ७

# बिगरजकात बंधने

**पाठ्यक्रम**

७.० उद्दिष्ट्ये
७.१ प्रस्तावना
७.२ बिगरबंधने :- भूमिका/महत्व
७.२.१ आयात कोटा
७.२.२ स्वेच्छा निर्यात बंधने
७.२.३ निर्यात अनुदान (अर्थसहाय्य)
७.२.४ विक्रेय वस्तू व्यापार करार
७.२.५ अधिमान्य व्यापार करार
७.३ प्रश्नमालिका

## ७.० उद्दिष्ट्ये

देशाच्या आर्थिक विकासामध्ये बिगर जकात बंधनाचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. अलिकडे विकसित देशांबरोबरच विकसनशील देश बिगरजकात बंधने अशा धोरणांचा अवलंब करताना दिसतात. या पाठात आपण प्रामुख्याने बिगरजकात बंधने याविषयी चर्चा करणार आहोत. या पाठाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) बिगरजकात बंधनांची आर्थिक विकासातील भूमिका/महत्व अभ्यासणे.
२) निर्यात अनुदान आयात कोटा या घटकांचा अभ्यास करणे.
३) विक्रेयवस्तू करार याचा अर्थ व महत्व जानून घेणे.

## ७.१ प्रस्तावना

## ७.२ बिगरजकात बंधने (आर्थिक विकासातील भूमिका/बिगरजकात बंधनाचे फायदे - तोटे)

अलीकडे अमेरिकेसारखे विकसीत देश जकाती –खेरीज इतर मार्गांना इतर देशांकडून आयात रोखण्याचा प्रयत्न करीत आहेत. ज्यांच्या उत्पादनात श्रमाचा वापर जास्त होतो आणि ज्यांच्या बाबतीत अल्पविकसित देशांत खर्चाच्या दृष्टीने निर्यातीस अनुकूल परिस्थिती असते,

अशा वस्तुंच्या बाबतीत विकसीत देश असे मार्ग वापरतात. त्याबरोबर अन्य विकसित देशांवरही या प्रकारचे निर्बंध लादतात. यामुळे जकातीत कपात केल्याचे फायदे नाहिसे होतात.

बिगरजकात अडथळे म्हणजे जकात किंवा आयातीवर कर न वापरता अन्य मार्गांनी आयातीवर निर्बंध घालणे. यात दोन प्रकार सांगता येतील.

पहिला प्रकार विकसनशील देश परकीय चलन सुरक्षित राखण्यासाठी किंवा आर्थिक विकासाचे धोरण म्हणून अवलंबितात, यात आयात परवाने, आयातीवर संख्यात्मक निर्बंध (कोटा), परकीयचलन नियम आणि एकाच संस्थे मार्फत आयात यांचा समावेश होतो.

दुसऱ्या प्रकारात विकसित देश विविध मार्गांनी आयातीवर निर्बंध लादतात. ज्या उद्योगांची स्पर्धाशीलता कमी झाली आहे किंवा जे उद्योग राजकीय दृष्टीने संवेदनशील ठरतात त्यांना संरक्षण देणे हा उद्देश असतो. स्वेच्छेने निर्यातीवर निर्बंध लादणे, आंतरराष्ट्रीय करारातून निर्बंध (उदा. वस्त्रांच्या व्यापारावरील निर्बंध), तांत्रिक स्वरुपाचे निर्बंध, आयात वस्तूंच्या किंमतीचे परिक्षण करुन आयात निर्बंधासाठी त्याचा वापर करणे असे उपाय या प्रकारात मोडतात.

बिगरजकात निर्बंधामुळे निर्यात करणाऱ्या देशांचे नुकसान होतेच पण, आयात करणाऱ्या देशात ग्राहकांना महाग वस्तू घ्याव्या लागतात, सरकारचे जकातीचे उत्पन्न बुडते, साधनसामग्रीची वाटणी अकार्यक्षमतेने केली जाते. आणि स्पर्धा कमी होते.

**बिगरजकात निर्बंधाचे विविध मार्ग पुढीलप्रमाणे सांगता येतील.**

१) दोन किंवा जास्त देशात विशिष्ट वस्तूंची निर्यात कमी करण्याचे करार होतात.वस्त्रांच्या निर्याती बद्दल करार हे एक उदाहरण आहे. जपान व अग्नेय आशियातील देश यांच्याशी करार करुन अमेरिकेने आयात कमी केली आहे. अशा करारांना ऐच्छिक निर्यात असे म्हणतात.

२) प्रशासकीय निर्बंध आंतरराष्ट्रीय करारात काही परिस्थितीत आयातीवर निर्बंध लादता येतात. देशी उद्योगांना आयातीमुळे नुकसान होत असल्यास तात्पुरते निर्बंध लादण्याची सवलत वापरुन आयातीवर बंधने घातली जातात. सुरक्षितता, आरोग्य, पर्यावरण व ग्राहक या साठी मानके तयार करता येतात. यांचा वापर विकसनशील देशा विरुध्द केला जातो. आयात मालाचे मूल्य ठरवून त्यावर जकात आकारणे आणि या पध्दतीत बदल करणे हा अशा प्रकारचा निर्बंध आहे.

   कर्जविषयक धोरणात जास्त व्याज आकारुन किंवा आयात दरांना जास्त पैसा स्वतः खर्च करावयास लावून आयात कमी करता येते. परकी चलन नियंत्रणे हा आणखी एक मार्ग सांगता येईल.

३) आयातीवर संख्यात्मक नियंत्रणे लादली जातात. किती आयात करावयाची त्याचे प्रमाण ठरवून दिले जाते. याचे अनेक प्रकार आहेत. एका मर्यादेपर्यंत आयातीवर कर नसतो किंवा कमी दराने असतो. यापेक्षा जास्त आयात झाल्यास जास्त दराने कर आकारला जातो.

**संख्यात्मक निर्बंधाचे पुढील परिणाम होतात.**

अ) देशाचा व्यवहारतोल सुधारतो ब) देशातील किंमती वाढतात क) ग्राहकांना आपली खरेदी कमी करावी लागते. ड) देशातील उद्योगांना संरक्षण मिळून त्यांचा विस्तार होतो इ) किंमती वाढल्याने उत्पन्न ग्राहकांकडून उत्पादकांकडे वळविले जाते. फ) सरकार परवान्यातून आयातकमी करीत आसल्याने सरकारला आयात परवान्यांच्या फीचे उत्पन्न मिळते.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. आर्थिक विकासामध्ये बिगरजकात बंधनाचे योगदान काय आहे ?

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

### ७.२.१ आयात कोटा / कोटापध्दती

प्रशुल्क किंवा जकातीप्रमाणेच वाटा कोटा हा प्रकार व्यापार नियंत्रण ठेवण्याचा महत्त्वाचा प्रकार आहे. आयात किंवा निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूचे प्रमाण निर्धारित करण्याच्या पध्दतीस कोटा किंवा वाटा असे म्हणतात. कोटापध्दत एक संरक्षक पध्दत म्हणून वापरले जाते. सर्वात प्रथम १९३१ मध्ये फ्रान्सने आर्थिक मंदीवर उपाय म्हणून कोटपध्दत वापरली. फ्रान्सने १९३४ पर्यंत ३००० वस्तूंसाठी आयात कोटा ठरवून देशातील उद्योगांना संरक्षण देण्याचा प्रयत्न केला होता. नंतरच्या काळात मात्र दुर्मिळ असलेल्या परकीय चलनाचा पर्याप्त वापर करुन त्याचा दुरुपयोग टाळण्यासाठी कोटा पध्दती स्वीकारण्यात आली आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर अनेक युरोपियन देशांनी व्यवहारतोलात सुधारणा घडवून आणण्यासाठी 'आयात कोटाचा' वापर केला. आयात कोटा प्रमाणेच निर्यात कोटाचा वापर संरक्षण साधन म्हणून केला जातो. ज्या वस्तूंचे उत्पादन देशात गरजेच्या मानाने कमी होते, अशा वस्तूंची इतर देशात निर्यात हो नये किंवा निर्यात कमी करावी यासाठी निर्यात कोटा ठरवून दिला जातो.

कोटा पध्दतीमध्ये जरी आयात आणि निर्यात कोट्याचा समावेश होत असला तरी संरक्षण साधन म्हणून आयात कोट्यालाच महत्त्वाचे स्थान आहे. एका विशिष्ट कालखंडात एखाद्या विशिष्ट वस्तूचे विशिष्ट परिणाम आयात करणे यास कोटा (Import output) असे म्हणतात.

**कोटा पध्दतीची वैशिष्ट्ये –**

१) देशाच्या व्यवहारतोलातील असमतोल कमी करण्यासाठी आयात नियंत्रित करणे. एखद्या विशिष्ट देशातून वस्तूची आयात होत असल्यामुळे जर देशाचा व्यवहारतोल प्रतिकूल बनला असेल तर त्या देशातून होणारी वस्तूची आयात कमी करण्यासाठी आयात कोटा कमी केला जातो.

२) इतर देशातून होणाऱ्या वस्तूंच्या आयातीवर निर्बंध घालून देशातील उद्योगांना संरक्षण देण्यासाठी आयात कोटा ठरवून दिला जातो.

३) देशांतर्गत वस्तूंची किंमत पातळी स्थिर ठेवण्यासाठी आयात कोट्याचा अवलंब केला जातो. जर इतर देशातून आपल्या देशात मोठ्या प्रमाणात वस्तूंची आयात झाल्यामुळे किंमत पातळी

घसरली असेल तर अशी किंमत पातळी घसरु नये, देशातील वस्तूंच्या किंमती स्थिर राहाव्यात यासाठी आयात कोटा निश्चित केला जातो.

४) आंतरराष्ट्रीय निर्यात कराराची अंमलबजावणी करण्यासाठी निर्यात कोटा पध्दतीचा अवलंब केला जातो. प्रत्येक सभासद देशाला ठरवून दिलेल्या निर्यात कोट्यापेक्षा वस्तूंची अधिक निर्यात करता येत नाही.

५) कोटा पध्दतीमुळे आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये निर्माण होणाऱ्या सट्टेबाजीच्या व्यवहारास पायबंद घालता येतो.

६) निर्यात कोट्यामुळे निर्यातीयोग्य वस्तूंचे समानतेने वाटप करता येते.

७) आणीबाणीच्या काळात कोटा पध्दती एक महत्त्वाची उपाययोजना ठरते. मात्र कोटा पध्दती परिणामकारक ठरण्यासाठी त्याची कार्यवाही कार्यक्षमतेने झाली पाहिजे.

**कोटा / वाट्याचे प्रकार –**

१) जकात कोटा

पूर्वीच्या काळात जकात किंवा प्रशुल्क कोटा पध्दती लोकप्रिय मानली जात होती. परंतु अलीकडच्या काळात या पध्दतीचे महत्त्व कमी झाले आहे. या कोटा पध्दतीत विशिष्ट मर्यादेपेक्षा वस्तूसंख्येची आयात करण्यासाठी विनाजकात किंवा नाममात्र दराने जकात आकारले जाते. या निर्धारित प्रमाणापेक्षा अधिक संख्येने वस्तूंची आयात करावयाची असल्यास अधिक दराने शुल्क आकारले जाते. या ठिकाणी निर्धारित कोटा – पध्दती आणि जकातपध्दती एकत्रितपणे वापरली जाते.

या पध्दतीमुळे व्यापारी जकातीचा दर कमी असताना मोठ्या प्रमाणात वस्तूंची आयात करुन त्याची साठेबाजी करतात त्यामुळे व्यवहारतोलावर प्रतिकूल परिणाम होतो. व्यापारी आयात शुल्क नसताना मोठ्या प्रमाणात वस्तूंची देशात विक्री करून अधिक नफा मिळवू शकतात. त्यामुळे उपभोक्त्यांचे मोठे नुकसान होते.

२) एकपक्षीय आयात कोटा -

या कोटापध्दतीत कोणत्याही एका देशाशी बोलणी किंवा करार न करता विशिष्ट कालावधी (एक वर्षा) साठी किती नगसंख्येची आयात करायची हे निश्चित केले जाते. जेव्हा जगातील कोणत्याही देशातून वस्तूंची आयात करायची परवानगी असेल तर त्यास जागतिक कोटा वाटा म्हणतात. जेव्हा आयात करावयाच्या वाट्याची विभागणी विविध देशांमध्ये अगोदरच केली जाते आणि त्याप्रमाणे ठरवून दिलेल्या प्रमाणातच त्या त्या देशातून वस्तू आयात केल्या जातात, तेव्हा त्यास देशनिहाय विभाजित कोटा असे म्हणतात.

जागतिक कोटा पध्दतीमध्ये आयात व्यापारी आवश्यक असणाऱ्या वस्तू कोणत्याही देशातून आयात करु शकतात. म्हणजेच वैयक्तिक निर्यातक देश किंवा आयातदारांसाठी कोटा ठरविलेला नसतो.

३) आयात परवाना -

आयात परवाना पध्दतीत आयात व्यापाऱ्यांना वस्तूची विशिष्ट मर्यादेपर्यंत आयात करण्याचा अधिकृत परवाना सरकारकडून दिला जातो. अशा आयात परवाना देण्यात आल्याची घोषणा न करता त्या विशिष्ट व्यापाऱ्यास किती नगसंख्येची आयात करता येईल हे सांरितले जाते. त्यामुळे सट्टेबाजीच्या व्यवहारास चालना मिळत नाही. आयात परवाना देताना आयात व्यापाऱ्यांकडून अर्ज मागविले जातात. आलेल्या अर्जाची शासकीय यंत्रणेकडून काळजीपूर्वक तपासणी करुन योग्य व्यक्तींनाच परवाना मिळावा म्हणून भ्रष्ट मार्गाचा आवलंब होण्याची शक्यता असते. त्यातूनच काळाबाजार, अतिरिक्त नफा

मिळविण्याची प्रवृत्ती आपले हितसंबंध जोपासण्याची प्रवृत्ती बाळगत जाऊन काळा पैसा अस्तित्वात येते.

४) द्विपक्षीय कोटा -

आयातक देश निर्यातक देशांशी वस्तूच्या आयात निर्याती संबंधी आपापसात द्विपक्षीय करार करुन वस्तुंच्या आयात व निर्यातीचा कोटा निश्चित करतात. कोणत्या निर्यात व्यापाऱ्याने कोणत्या वस्तूची किती निर्यात करावी हे आपापसात चर्चेद्वारे ठरविले जाते. द्विपक्षीय कोटापध्दतीत आयात आणि निर्यात सुरळीत होत असल्याने देशांतर्गत किंमतीत चढ - उतार होण्याची शक्यता नसते. तसेच निर्यात दराची मक्तेदारी निर्माण होण्याचीही शक्यता नसते. सर्वसाधारणपणे विकसनशील देशांना विदेशी चलनाची सतत कमतरता भासत असते अशा देशांना द्विपक्षीय कोटापध्दती सोयीची ठरते. कारण आयात व निर्यात नियंत्रित ठेवली जाते. म्हणून ज्या देशात व्यवहारतोलात समतोल निर्माण होईल अशा पध्दतीने वस्तूची आयात – निर्यात नियंत्रित ठेवली जाते. म्हणून ज्या देशात विदेशी चलनाची टंचाई असते किंवा विदेशी चलनाचे पुरेसे साठे उपलब्ध नसतात अशा देशांसाठी द्विपक्षीय कोटा पध्दती अधिक उपयोगी ठरते.

४) संमिश्र कोटा –

स्वदेशात उत्पादित होणाऱ्या पक्क्या मालाची निर्मिती करण्यासाठी इतर देशातून आयात केल्या जाणाऱ्या कच्च्या मालाचे प्रमाण किती असावे यावर मर्यादा आणण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कोट्यास संमिश्र कोटा असे म्हणतात. म्हणजेच देशात उत्पादित होणाऱ्या वस्तूच्या निर्मितीसाठी देशांतर्गत कच्चा माल आणि विदेशी कच्चा माल वापरला जात असेल तर त्याचे प्रमाण किती असावे हो सरकार ठरविते या पध्दतीमुळे देशांतर्गत कच्च्या मालाचे उत्पादन करणाऱ्या उत्पादकांना सरकारी संरक्षण मिळते. तसेच त्यामुळे दुर्मिळ असणाऱ्या विदेशी चलनाची बचत होते. देशांतर्गत कच्च्या मालाचा उत्पादनात अधिक वापर झाल्यास विदेशी चलनाची बचत होऊन देश आत्मनिर्भर होण्यास मदत होते.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१ आयात कोटा म्हणजे काय ?

______________________________

______________________________

______________________________

प्र.२ आयात कोट्याचे प्रकार सांगा ?

______________________________

______________________________

______________________________

**७.२.१ आयात कोट्याचे परिणाम –**

प्रा. किडलबर्जर यांनी अयात कोट्याचे पुढील सहा परिणाम सांगितले आहेत.

१) किंमत परिणाम –

इतर दे्शातून होणाऱ्या वस्तूच्या आयातीवर संख्यात्मक मर्यादा घालणे हे आयात कोट्याचे उद्दिष्ट असते. अशा आयात मर्यादा घातल्यामुळे देशातील वस्तूचा पुरवठा नियंत्रित होऊन वस्तूच्या किंमतीत वाढ होते.

देशांतर्गत वस्तूंच्या किंमतीत किती वाढ होईल हे वस्तूच्या पुरवठा आणि देशांतर्गत बाजारपेठेत त्या वस्तूला असणारी मागणी या घटकांवर अवलंबून असते. तसेच आयात कोट्यामुळे देशात आयात केल्या जाणाऱ्या वस्तूचा पुरवठा किती प्रमाणात नियंत्रित होईल यावर किंमत पातळी अवलंबून असते.

आयात कोट्याचा किमतीवर होणारा परिणाम पुढील आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट करता येईल.



शेजारील आकृतीत हा देशांतर्गत मागणीवक्र आहे. मुक्त बाजार व्यवस्थेत किंवा ही समतोल किंमत निश्चित होईल. त्यामुळे व्यापार नगसंख्येएवढा होईल जर आयातक देशांनी आयात कोटा एवढा निश्चित केला तर संबंधित पुरवठा पत्रक असे होईल, आणि आयात पुरवठा मर्यादीत होईल त्यामुळे नवीन किंमत किंवा अशी निश्चित होईल. म्हणजे किंमत पातळीत पर्यंत झालेली वाढ आयात कोट्याचा परिणाम असेल.

## २) उपभोग परिणाम -

जेव्हा आयात कोटा निश्चित होतो तेव्हा त्याचा परिणाम देशांतर्गत वस्तूच्या किंमत वाढीवर होतो. त्यामुळे देशांतर्गत उपभोग कमी होतो. हे पुढील आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट होते.



आकृतीमध्ये आक्षावर नग संख्या आणि आक्षावर किंमत दर्शवली आहे. मुक्त व्यापाराच्या परिस्थितीत एकूण देशांतर्गत वस्तूचा उपभोग एवढा आहे. जेव्हा आयात कोटा एवढा निश्चित केला जातो तेव्हा एकूण देशांतर्गत उपभोग एवढा कमी होईल. उपभोगात झालेली घट हा आयात कोट्याचा उपभोग परिणाम ठरतो.

**३) महसूल परिणाम -**

आयात कोट्याचा महसूलावर होणारा परिणाम ठरविणे अतिशय किचकट आणि कठीण आहे. झर सरकारने आयात परवाना देताना या किंमतीला वस्तूचा आयात कोटा निश्चित केला तर आयात कोट्यामुळे सरकारच्या महसूलावर झालेला परिणाम आयात कोट्याच्या उपभोग परिणाम आकृतीमध्ये म्हणजेच या चौकोनाएवढा राहील. जो आयात जकाती एवढा असेल. परंतु सरकारने लिलाव पध्दतीने आयात परवाने दिले नाहीत तर एकतर आयातक व्यापारी किंवा निर्यातक व्यापरी किंवा दोघांमध्ये महसूली परिणाम विभागला जाईल. जर आयातक व्यापारी संघटित असतील आणि देशातील आयातक संघटित नसतील तर आयात कोट्याच्या महसूलाचा संपूर्ण लाभ निर्यातक देशांना मिळतो आणि आयातक व निर्यातक दोन्ही व्यापारी संघटित असतील तर महसूली लाभाचा परिणाम दोघांमध्ये विभागला जातो.

**४) पुनर्वाटपावरील परिणाम -**

आयात कोटा निर्धारित केल्याचा परिणाम उत्पन्नाच्या फेरवाटपावर होतो. जर आयात कोटा निश्चित केल्यामुळे वस्तूंच्या किंमती वाढल्या तर देशांतर्गत उत्पादकांना किंमतीचा लाभ मिळून त्यांचा नफा वाढतो. मात्र उपभोक्त्यांना अधिक किंमतीत वस्तूंचा उपभोग घ्यावा लागत असल्याने उपभोक्त्यांचे नुकसान होते. आयात कोटा निश्चित केल्यामुळे उत्पादकांना फायदा होतो तर ग्राहक उपभोक्त्यांचे नुससान होते. आयात कोट्याचा पुनर्वाटपावर होणारा परिणाम आयात कोटाच्या उपभोग परिणाम आकृतीमध्ये या चौकटी एवढा घडून येतो.

**५) व्यापार शर्ती परिणाम -**

आयात कोटा निश्चित केल्यामुळे त्याचा परिणाम देशाच्या व्यापारशर्तीवर देखील होतो. नवीन व्यापारशर्ती आयात कोटा निश्चित करणाऱ्या देशास कमी – अधिक प्रमाणात अनुकूल ठरतात. जर आयात देशाची वस्तूच्या आयातीमध्ये मक्तेदारी असेल तर त्या देशास व्यापारशर्ती अनुकूल ठरतात. याउलट निर्यातक देशाची मक्तेदारी असेल तर व्यापारशर्ती निर्यातक देशांना अधिक अनुकूल ठरतात. म्हणजेच आयात कोटा ठरविण्याऱ्या देशांना व्यापारशर्ती प्रतिकूल ठरतात.

**६) व्यवहारतोल परिणाम -**

आयात कोट्याच्या व्यवहारतोलावर होणारा परिणाम आयात कोटा ठरविण्याऱ्या देशासाठी अनुकूल ठरतो. आयात कमी करणे हे आयात कोटानिर्धारित करण्यामागेच एक महत्त्वाचे उद्दिष्ट असते. त्यामुळे आयात कोट्यामुळे व्यवहारतोलात सुधारणा घडून येत. कारण आयात कोट्यामुळे इतर देशातून होणारी आयात कमी करता येते, त्याऐवजी देशात उत्पादन केले जाऊन देशातील उत्पादकांना उत्पादन वाढीस उत्तेजन मिळते. देशाची

निर्यात वाढून आणि आयात कमी होऊन व्यवहारतोलातील तूट कमी होण्यास आयात कोटा मदत करतो.

**७) आयात कोटा विरुध्द जकाती -**

जकातीप्रमाणेच वस्तूच्या आयातीची कमाल मर्यादा घालण्यासाठी आयात कोटा निश्‍चित केल्यास त्या वस्तूची आयात कमी होते, त्या विशिष्ट वस्तूच्या किंमती वाढतात आणि त्यामुळे त्या वस्तूचे देशांतर्गत उत्पादन वाढण्यास मदत होते.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१ आयात कोट्याचे विविध परिणाम अभ्यासा.

---

---

---

**७.२.२ ३) स्वेच्छा निर्यात बंधने –**

वरील जकात अडथळे म्हणजे जकात किंवा आयातीवर कर न वापरता अन्य मार्गाने आयातीवर निर्बंध घालणे. यामध्ये प्रामुख्याने दोन प्रकार पडतात.

१) विकसनशिल देश परकीय चलन सुरक्षित राखण्यासाठी किंवा आर्थिक विकासाचे धोरण म्हणून वापरतात. यात आयात परवाने, आयात कोटा, परकीय चबननियम आणि एकाच संस्थेमार्फत आयात इ. चा समावेश होतो.

२) विकसित देश विविध मार्गांनी आयातीवर निर्बंध लादतात. ज्या धोरणांची स्पर्धात्मकता कमी झाली आहे त्यांना संरक्षण देणे हा उद्देश असतो. स्वेच्छेने निर्यातीवर निर्बंध लादणे आंतरराष्ट्रीय करारातून निर्बंध (उदा. वस्त्र व्यापारातील निर्बंध) तांत्रिक स्वरुपाचे निर्बंध, आयात वस्तूंच्या किंमतीचे परिक्षण करून आयात निर्बंधासाठी त्याचा वापर करणे असे उपाय दूसऱ्या प्रकारात मोडतात.

बिगरजकात निर्बँधकाचे ऐच्छिक निर्यात निर्बंध असे विविध मार्ग आहेत. यापैकी स्वेच्छा निर्यात बंधने हा महत्त्वाचा स्त्रोत मार्ग आहे.

दोन किंवा जास्त देशात विशिष्ट वस्तूंची निर्यात कमी करण्याचे करार होतात. वस्त्रांच्या निर्याती बद्दल करार हे उत्तम उदाहरण होय. जपान व अग्नेय आशियातील देश यांच्याशी करार करुन अमेरिकेने आयात कमी केली आहे. अशा करारांना स्वेच्छा निर्यात बंधने किंवा ऐच्छिक निर्यात निर्बंध असे म्हणतात.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. स्वेच्छा निर्यात बंधने म्हणजे काय ?

---

---

---

### ७.२.३ अर्थसाहाय्य/निर्यात अनुदान

स्वदेशीउत्पादनांना अर्थसाहाय्य देणे हा संरक्षणाचा प्रकार आहे. अर्थात आयाती कमी करणे आणि निर्याती वाढविणे हा त्यामागील अंतीम हेतू असतो. भहुदा करमाफीच्या स्वरुपात सरकार हे अर्थसहाय्य देत असते. काही प्रकरणात कर कमी दराने आकारले जातात. कधीकधी परदेशातील विक्री किंमत स्वदेशातील उत्पादन परिव्ययापेक्षा कमी असल्यास, सरकार परिव्ययाचा काही प्रतिशत भार स्वतः सहन करते. निर्यात वाढीला प्रोत्साहन मिळावे म्हणून सरकार अनेकदा निर्यात - लाभांश () या स्वरुपात अर्थसहाय्य देते, किंवा किंमत एका विशिष्ट शेकडेवारी घटवून त्यात अभिप्रेत असलेला आर्थिक भार स्वतः सहन करते. यामुळे स्वदेशांतर्गत किंमत घटते आणि निर्यात वाढते. अर्थात सरकारच्या निर्यात - मिळकतीत वाढ होईल. अशी खात्री देता येत नाही. कारण किंमत ज्या प्रमामात घटविली जाते, त्यापेक्षा कमी प्रमाणात निर्यात वाढल्यास मिळकतीत घट होणे अपरिहार्य असते. तात्पर्य, स्वदेशी मालाच्या परदेशातील मागणीच्या लवचिकपणावर बरेसचे अवलंबून असते. मागणी अलवचिक असल्यास, अर्थसहाय्य देऊन किंमत पुष्कळ घटवली तरी विशेष फायदा होत नाही, उलट मागणी लवचिक असल्यास किंमत थोडी घटली तरी निर्यात मिळकतीत चांगलीच सुधारणा होते. अर्थसहाय्य किती व कसे द्यावे हे ठरविण्यासाठी परदेशी मागणीच्या लवचिकपणाचा योग्य अंदाज घेणे आवश्यक असते. अन्यथा अर्थसहाय्याचा अपेक्षित परिणाम होत नाही व तेवढे प्रयत्न वाया जातात.




वरील आकृतीमध्ये एका विशिष्ट वस्तूचा जागतिक मागणी वक्र म म दाखविला आहे. स्वदेशी पुरवठा वक्र प प उदग्र आकाराचा दाखविला आहे. त्या वस्तूची स्वदेशी बाजारातील किंमत अ ख असून जागतिक बाजारातिल अ क किंमतीपेक्षा अधिक आहे. सरकार स्वदेशी उद्योगाला प्रति एकक क ख अर्थसाहाय्य देऊ शकते, किंवा कखगघ या चतुर्भुजाएवढे एकूण अर्थसहाय्य देऊ शकते. अर्थसहाय्य किंमत कखगघ या क्षेत्रफळाइतकी द्यावी लागते. त्यामुळेच स्वदेशी किंमत जागतिक पातळीपर्यंत खाली येऊ शकते आणि देशाची स्पर्धात्मक शक्ती वाढू शकते. हा विचार निर्यात - प्रोत्साहनाच्या दृष्टीने केला आहे. उत्पादनाला मदत करण्याच्या दृष्टीने विचार केला तरी अर्थसहाय्याचा हिशेब तोच येतो. या दोन्हीतील फरक मात्र लक्षात घेतला पाहिजे. देशातील उत्पादन वाढावे म्हणून अर्थसाहाय्य केले, त्याबद्दल कोणी हरकत घेत नाही. परंतु निर्याती वाढविण्यासाठी किंवा आयाती घटविण्यासाठी अर्थसहाय्य दिले तर या घटनेकडे साशंकतेने पाहिले जाते. कारण त्याचा प्रत्यक्ष परिणाम आंतरराष्ट्रीय व्यापार व किंमती यावर होतो. गॅट () या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या नियमांनुसार निर्यात अर्थसहाय्य केलेल्या कोणत्याही बदलाची माहिती त्या संस्थेकडे पाठवणे बंधकारक असते. उत्पादन अर्थसहाय्य निर्यात अर्थसहाय्य यातील फरक तांत्रिक असला तरी प्रत्यक्ष व्यवहारात तसा भेद करणे कठीण असते.

अर्थसहाय्य हा संरक्षणप्रकार आता सर्वत्र रुढ झाला आहे. अनेक देशांत वस्तूंच्या निर्यात - वाढीपेक्षा सेवांच्या निर्यातवाढीसाठी या माध्यमाचा अधिक प्रभावी उपयोग केला जातो. काही उद्योगप्रधान देश नौवहन सेवा, विमान सेवा, बँक सेवा यांची मोठ्या प्रमाणावर जगभर निर्यात करतात. अशा सेवांच्या निर्यातीपासून होणारी कमाई वाढावी म्हणून तेथील सरकार निरनिराळ्या प्रकारे आपल्या विमान कंपन्यांना, जहाज कंपन्यांना आणि इतर सेवा कंपन्यांना अर्थसहाय्य करतात. हे अर्थसहाय्य कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्ष असते. शिवाय राष्ट्रीय संरक्षणाच्या दृष्टीने सेवा आवश्यक असल्याचे निमित्त करून अर्थसाहाय्याचे सहज समर्थन करता येते.

**आपली प्रगती तपासा :**

प्र अर्थसहाय्य किंवा निर्यात अनुदान याचा अर्थ सांगा.

---

---

---

## ७.२.४ विक्रेयवस्तू करार

किंमती स्थिर असणे हे प्राथमिक वस्तूच्या उत्पादकांच्या आणि उपभोगकर्त्यांच्या दृष्टीने केव्हाही हिताचे ठरते, परंतु किंमत - स्थैर्य वर्तमान स्पर्धात्मक जगात काहीच लाभत नाही ही त्यांची मुख्य तक्रार आहे. प्राथमिक वस्तूंच्या किंमतीत नेहमी चढउतार होत असल्याणे त्यांना कितेकदा तोटा सहन करावा लागतो. म्हणून प्राथमिक वस्तूंची बाब वेगळी व विशेष मानली जावी, अशी उत्पादक देशांची मागणी असते. घहू, साखर, टिन, चहा, कॉफी, रबर यासारख्या वस्तूंच्या उत्पादनावर आणि व्यापारावर नियंत्रण ठेवण्यासाठी आंतर - सरकार विक्रेयवस्तू करार झाले पाहिजेत. ही सूचना या मागणीतून उत्पन्न झाली. विक्रेयवस्तू करार कारखानदार नियंत्रक संघाच्या करारासारखे असले तरी दोन्हीत पुष्कळ भेद आहे.

विक्रेयवस्तू करारात सामान्यतः संबंधित वस्तूंचे सर्व प्रमुख उत्पादक देश किंवा प्रमुख उपभोक्ता देश सहभागी होतात. कार्टेलविषयक करार खाजगी व्यवसायसंस्थांत होू शकतात. तर हे करार केवळ सरकारमध्ये होतात. हा महत्त्वाचा भेद आहे. विक्रेयवस्तू करारांच्या माध्यमाने त्या वस्तूंचे उत्पादन करणारे सर्व देश आणि उत्पादक एका स्थितीत अनिवार्य पणे गोवले जातात. या करारांची आणखी दोन भेददर्शक वैशिष्ट्ये आहेत. एक म्हणजे या करारान्तर्गत उपभोक्त्यांच्या हितांचे संरक्षण व्हावे ही काळजी घेतली जाते. आणि त्या दृष्टीने किंमतव पुरवठाविषयक धोरण ठरविणाऱ्या समित्यांवर त्यांना प्रतिनिधीत्त्व दिले जाते. कार्टेलमध्ये असे मुळीच घडत नाही. दुसरे या करारान्वये मागणी व पुरवठा यांच्यात समतोल राखण्यासाठी सतत प्रयत्न केला जातो. त्यामुळे उत्पादन घटविणे, मालाची गुणवत्ता निकृष्ट करणे किंवा जबर किंमत आकारणे यासारख्या तीन युक्त्या वाद ठरतता.

मागणी आणि पुरवठा या दोन्हींच्या अलवचिकपणातून या करारांचा जन्म झाला असे म्हणता येते. प्राथमिक वस्तूंच्या किंमतीत सतत हंगामी बदल होत असल्याने त्याचे उत्पादन करणाऱ्या देशांना तोटा होतो आणि प्रतिकूल व्यापारी अटी स्वीकाराव्या लागतात. त्यांना न्याय आणि पर्याप्त

किंमती मिळाल्या पाहिजेत. या जाणिवेतून विक्रेयवस्तू करार करण्याची टम निघाली. परंतु विक्रेयवस्तूंच्या किंमती नेहमीसाठी वाढविण्यात या राष्ट्रांना यश आले नाही.

विक्रेयवस्तू कराराची अमलबजावणी तीन तत्वांच्या आधारे करता येते. पहिल्याला वाटा तत्त्व (Quota Principle) म्हणतात. त्यानुसार वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या सभासद देशांना निर्यातीचा वाटा विभागून दिला जातो. वस अशा प्रकारे किंमत स्थिर ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. दुसऱ्याला शिलकी साठा तत्व म्हणतात. या पध्दतीत वस्तूच्या जागतिक किंमती घसरत असताना तिचे साठे विकत घेण्यासाठी आणि किंमती वाढल्या असताना त्यांची विक्री करण्यासाठी एक अभिकरण किंवा यंत्रणा उभारली जाते. तिसऱ्याला बहुपक्षीय कराराचे तत्व म्हणतात. त्यानुसार किंमती एका नियत किमान पातळीपर्यंत घसरल्यास आयातदर देश ठराविक परिणाम साठा खरेदी करण्याची हमी देतात आणि तसेच एका नियत कमाल पातळीपर्यंत किंमती वाढल्यास उत्पादक देश ठराविक परिमाणात साठ्याची विक्री करण्याची हमी देतात. आंतरराष्ट्रीय गहू कराराची अमलबजावणी या तिसऱ्या तत्वानुसार होते. अर्थात त्यातील सभासद देश बहुतांशी विकसित असल्यामुळे समस्येचे स्वरुप किंचित भिन्न असते. गहू कराराची आणि अन्य काही कराराची माहिती पुढे दिली आहे.

तात्पूर्वी एक स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. १९७० सालानंतरच्या कालखंडात आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय चलनाच्या मूल्यात वारंवार व अनपेक्षित बदल झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय विक्रेयवस्तू करारांच्या अमलबजावणीत अनेक अडचणी उत्पन्न झाल्या आहेत.

**आंतरराश्ट्रीय गहू करार -**

हा करार १९४९ साली अस्तित्वात आला. त्यात सामील झालेले देश आयातदार देशांना पर्याप्त गहू पुरविण्यास आणि निर्यातदार देशांना समन्याधिक आणि स्थिर किंमती मिळवून देण्यास वचनबध्द झाले. अर्जेन्टिना आणि सोव्हिएट रशिया वगळता बाकीचे सर्व निर्यातदार देश आणि जवळपास सर्व आयातदार देश या करारात सामील झाले. कॅनडा, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया हे प्रमुख निर्यातदार देश होते. इंग्लंड हा प्रमुख आयातदार देश होता. प्रत्यक्ष व्यापार खाजगी मार्गांनी करावयाचे ठरले. निर्यातीवर नियंत्रण, उत्पादनावर नियंत्रण, राखीव साठा किंमती, साहाय्यासाठी ठेवावयाचा संचय, व्यापाराचा विस्तार आणि सभासद राष्ट्रांची मतदानाची पध्दती या सर्व बाबींचा तपशील करारात नमूद करण्यात आला. करारांच्या अमलबजावणीसाठी आणि तंटे सोडविण्यासाठी एका परिषदेची स्थापना करण्यात आली. हा करार बहुपक्षाय कराराच्या तत्वावर आधारलेला असल्याने त्यातील तरतूदीनुसार गव्हाची कमाल आणि किमान किंमत वेळोवेळी ठरविणे आवश्यक होते.

उदा. पहिल्या वर्षासाठी कमाल किंमत $१.८० प्रति बुशेल आणि किमान किंमत १.५० प्रति बुशेल ठरविण्यात आली नंतर या कमाल व किमान किंमती थोड्यी कमी झाली. निर्यातदार देशांना ठरवून दिलेल्या किंमतीवर विकण्याची पूर्ण मुभा होती.

करारान्तर्गत ठरलेल्या किंमती आणि खुल्या बाजारातील किंमती यात बरीच तफावत असायची गव्हासारख्या शेतमालाच्या किंमती तीन - चार वर्षापर्यंत नियत दाराच्या आसपास स्थिर राहू शकतील हा अंदाज चुकीचा ठरला. यामुळे आयातदार देशांना सतत फायदा झाला आणि निर्यातदार देशांना तोटा झाला.

**आंतरराष्ट्रीय कॉफी करार -**

हा करार वाटा तत्वावर आधारलेला आहे. ९१५१ साली संदर्भ स्वरुपात आणि १९६२ साली अंतिम स्वरुपात अस्तित्वात आलेल्या या कराराच्या अमलबजावणीत दोन प्रकारच्या आडचणी आहेत. एक म्हणजे विभिन्न देशांत समन्यायिक तत्वावर वाट्याची विभागणी करणे अत्यंत अडचणीचे असते. कारण सहभागी राष्ट्रांत एकमत होत नाही. दुसरे उत्पादन, परिव्ययात होणाऱ्या बदलांना विचारात घेऊन वाट्यात बदल करणे कठीण असते. या करारांच्या अंतर्गत जागतिक व्यापाराचा सुमारे ९८ प्रतिशत भाग समाविष्ट होतो हे याचे वैशिष्ट्य. ब्राझील देशात उत्पादन खूप होत असल्याने त्याच्याकडे सुमारे ४० प्रतिशत उत्पादकांची मते आहेत. तसेच अमेरिका देश मोठा उपभोक्ता असल्याने त्याच्याकडेही सुमारे ४० प्रतिशत उपभोक्त्यांची मते आहेत. करारातील बहुतांश निर्णयांवर या दोन देशांची छाप पडते हे उघड आहे. १९६० नंतरच्या वर्षात कॉफीचे उत्पादन खूप वाढले. परंतु करारामुळे घसरणाऱ्या किंमतींना थोपविण्यात यश मिळाले. अमेरिकेच्या डॉलरचा भाव जागतिक मुद्रा बाजारात घटल्यानंतर लॅटिन अमेरिकन देशांनी भाववाढ मागितली.

**आंतरराशष्ट्रीय साखर करार–**

हा करारदेखील वाटा तत्वावर आधारलेला आहे. १९३७ साली झालेल्या अनेक वर्षे थंडया बसत्यात राहिल्यानंतर १९६८ साली पुन्हा पुनरुजीवित करण्यात आला आणि नंतर १९७३ साली तो संपुष्टात आला. १९५७ साली अस्तित्वात आलेला २७ देशांचा आंतरराष्ट्रीय टीन करार शिलकी साठा तत्त्वानुसार अमलात आणला जातो. १९७० नंतरच्या अस्तिरतेनंतरही हा करार टिकून राहिला आहे, हे त्याचे वैशिष्ट्य. याचे कारण म्हणजे टिनचा पुरवठा सतत अपुरा आणि मागणी किती तरी जास्त राहिली आहे.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. विक्रेय वस्तू करार म्हणजे काय ?

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

**७.२.५ अधिमान्य व्यापारी करार**

खुला व्यापार संपुष्टात आल्यानंतर प्रत्येक राष्ट्राय व्यापाराला आपल्या सोयीनुसार वळण देण्याच्या हेतूने जे निरनिराळे उपाय योजले, त्यात व्यापारी करारांना अत्यंत महत्त्वाचे स्थान द्यावे लागले. सध्या जागतिक बहुतांश व्यापार आंतर सरकार करारानुसार चालतो. बहुतेक करार द्विपक्षीय असतात आणि त्यात दोन्ही देशांनी कोणत्या वस्तूचा व्यापार करावा आणि संबंधित देणी - घेणी कोणत्या पध्दतीने करावी याचा तपशील दिला असतो. काही करार केवळ देणी - घेणी करण्याशी संबंधीत असतात. विनिमय संशोधन करार, अधिदान करार आणि हानिपूर्ती करार हे देण्या - घेण्याशी संबंधित करार होत आणि त्यांची माहिती विनिमय नियंत्रण या प्रकरणात आली आहे.

व्यापारी करार द्रिपक्षीय किंवा बहुपक्षीय असतात. अर्थात सर्वाधिक महत्त्व पहिल्या प्रकारच्या करारांनाच असते. त्यात दोन्ही देश वस्तूंच्या दोन यादयांना संमती देतात. याद्यांत वस्तूंची नावे, त्यांचे परिणाम आणि त्यांचे मूल्ये दिली आसतात. या याद्यांच्या आधारे आयात

परवाने आणि निर्यात परवाने देण्याचे दोन्ही देश मान्य करतात. प्रत्यक्ष होणारा व्यापार अगदी यादीनुसार होतो असे नाही, कारण दोन्ही देशांनी केवळ ठरविलेल्या वाट्याच्या मर्यादेपर्यंत परवाने मान्य केले असते. ती मर्यादा गाठली जातेच असे नाही. अशा करारांच्या सहाय्याने अनेक देशांना द्विपक्षीय अधिदान शेष चालू व्यवहाराच्या बाबतीत समतोल ठेवण्यात यश मिळाले आहे. काही देशांमधील दुतर्फी व्यापार या करारांमुळे खूप वाढला आहे. द्विपक्षीय व्यापरी करारामुळे जागतिक व्यापाराची पातळी घसरते. खुल्या व्यापाराचे आणि आंतरराष्ट्रीय श्रम – विभागणीचे फायदे पुरेशा प्रमाणात मिळत नाहीत. इतके असूनही व्यपाराची द्विपक्षीय पध्दती जगातील सर्व देशांत वापरली जाते.

व्यापारी करार आणि अति अनुगृहीत राष्ट्र खंड व्यापार करणाऱ्या देशांना परस्परांशी होणाऱ्या व्यवहारांचे विनिमय करण्यासाठी संधी मध्ये किंवा करारांमध्ये तीन प्रकारच्या खंडाचा समावेश करता येतो.

**१) तुल्यता खंड -**

या खंडानुसार कोणताही देश स्वतःच्या नागरिकांना आणि वस्तूंना देण्यास वचनबध्द असतो. स्वकीय आणि परकीय यात कोणताही भेद न करणे हे या तुल्याता खंडाचे वैशिष्ट्य म्हणता येते.

**२) अन्योन्यता किंवा परस्परता खंड -**

या खंडानुसार कोणताही देश दुसऱ्या देशातील नागरीकांना व वस्तूंना तीच वागणूक देतो, जी दुसरा देश पहिल्या देशातील नागरिकांना व वस्तूंना देत असतो. याचा अर्थ एका देशाने निर्बंध लावले किंवा कमी केले तर दुसऱ्याही देशाला त्याच प्रमाणात निर्बंध लावावे किंवा कमी करावे लागतात.

**३) अतिअनुग्रहित राष्ट्र खंड**

या खंडानुसार कोणताही देश दुसऱ्या देशातील नागरिकांना व वस्तूंना तीच वागणूक देतो, जी तो अन्य कोणत्याही देशातील नागरिकांना व वस्तूंना देत असतो. याचा अर्थ कोणत्याही अन्य देशाला एखादी सवलत दिली तर ती आपोआप या देशालाही देणे भाग पडते. या तिसऱ्या खंडाला सर्वात अधिक महत्त्वाचे स्थान आहे.

अति अनुगृहीत राष्ट्र याचा अर्थ ज्याला सर्वात जास्त अनुग्रह दाखविला जातो तो देश असा होत नाही. थर अन्य कोणत्याही देशाला जो अनुग्रह दाखविला जातो तो या देशालाही मिळेल असा होतो. व्यापारातील भेदाभेद व पक्षपात नाहीसा करणे हे या खंडाचा समावेश करण्यामागचे प्रमुख उद्दिष्ट असते. अतिअनुगृहित राष्ट्र खंडाचे वर्गीकरण तीन प्रकारे करता येते –

**अ) सशर्त आणि बिनशर्त अतिअनुगृहित राष्ट्र खंड**

(Conditional and Unconditional M.F.N. clause):-

करारात सशर्त अतिअनुगृहीत राष्ट्र खंडाचा समावेश केला असल्यास, कोणताही अ देश दुसऱ्या ब देशाला त्याच सवलती देण्याचे अभिवचन देतो. ज्या त्याने अगोदरच तिसऱ्या एखाद्या क देशाला दिल्या असतील. परंतु अट ही असते. की दुसऱ्या ब देशाने त्या अगोदर कोणत्याही

अन्य ड देशाला दिल्या असतील त्या सर्व सवलती अ देशाला दिल्या पाहिजेत. करारात बिनशर्त अतिअनुगृहीत राष्ट्र खंडाचा समावेश असल्यास, अशा सर्व सवलती आपोआप आणि करार अमलात आल्याबरोबर तात्काळ दोन्ही देशांना मिळू लागतात. वरील उदाहरणात अ देशाने क देशाला दिलेल्या ब देशाला आणि ब ने ड देशाला दिलेल्या सवलती अ देशाला स्वयंम मिळू लागतात.

सशर्त खंडात केवळ मर्यादित संरक्षण मिळते हा याचा अर्थ समजा भारताने श्रीलंका देशाशी सशर्त अतिअनुगृहीत राष्ट्र खंड असलेला द्विपक्षीय करार केला आहे, तर सौदी अरेबियाला भारताने श्रीलंकाला दिलेल्या प्रशुल्क सवलती आपोआप मिळतील असे नाही. भारताकडून सवलती मिळण्यासाठी सौदी अरेबियाला देखील सवलती द्याव्या लागतील. आणि त्या सवलती तुल्य असाव्या लागतील. सवलती तुल्य नसल्यास सौदी अरेबिया आणि श्रीलंका यांच्यात भेदाभेद केल्यासारखे होईल. सर्व राष्ट्रांना तीच वागणूक दिली जाते जी अति अनुगृहीत राष्ट्राला मिळते.

### ब) एकपक्षीय आणि बहुपक्षीय अति अनुगृहीत राष्ट्र खंड

(Unilateral and Multi Lateral M.F.N. clause):-

अति अनुगृहीत राष्ट्र खंडाचे सामान्यतः द्विपक्षीय किंवा बहुपक्षीय असेच असते. परंतु काही अपवादात्मक स्थिरतीत, विशेषतः युध्दकाळात ते एकपक्षीय देखील असू शकते. उदाहरणार्थ, महायुध्दानंतर झालेल्या वॉर्सा करारानुसार जर्मनी या जित राष्ट्राने जय झालेल्या मित्र राष्ट्रांना अति अनुगृहीत राष्ट्र म्हणून वागणूक दिली पाहिजे असे ठरले होते. मित्र राष्ट्रांनी मात्र जर्मनीला अति अनुगृहीत राष्ट्र म्हणून वागणूक देण्याचे कोणतेच बंधन स्वीकारले नव्हते.

### क) निर्बंधित आणि अनिर्बंधित अतिअनुगृहीत राष्ट्र खंड

(Restricted and Unrestricted M.F.N. clause) :-

या खंडाचा उपयोग केवळ काही विषय, काही देश आणि काही वस्तू यांच्यापर्यंत मर्यादित ठेवल्यास त्याला निर्बंधित अति अनुगृहीच राष्ट्र खंड म्हणतात. मात्र सर्व विषय, सर्व देश आणि सर्व वस्तू यांचा समावेश करारांतर्गत होत असल्यास त्याला अनिर्बंधित अतिअनुगृहीत राष्ट्र खंड म्हणतात.

बिनशर्त आणि अनिर्बंधित अशा अतिअनुगृहीत राष्ट्र खंडाचा समावेश असलेले व्यापारी करार जितक्या जास्त प्रमाणात होतात. त्या प्रमाणात भेदाभेद विरहीत व्यापाराला चालना मिळते. आणि एकूण आंतरराष्ट्रीय व्यापार वाढण्यास मदत होते.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. व्यापारी करार म्हणजे काय ?

________________________________________

________________________________________

________________________________________

## ७.३ प्रश्नमालिका

१) जकातेत्तर बंधने म्हणजे काय ?
२) आर्थिक विकासातील बिगरजकात बंधनाचे योगदान (भूमिका) स्पष्ट करा.
३) स्वेच्छा निर्यात बंधने म्हणजे काय ? त्याचे विविध परिणाम अभ्यासा.
४) आयात कोटा बंधने म्हणजे काय ? त्याचे विविध परिणाम स्पष्ट करा.
५) निर्यात अनुदानाचे महत्त्व स्पष्ट करा.

❖❖❖

# ८

# व्यवहारतोल

## (Balance of Payment)

**पाठ्यक्रम**

८.० उद्दिष्टये
८.१ प्रस्तावना
८.२ व्यवहारतोलची रचना
८.३ जमाखर्चाची तत्त्वे द्विनोंदपद्धत
८.४ व्यवहार असमतोलाचे प्रकार
८.५ प्रश्नमालिका

### ८.० उद्दिष्टये :

देशाच्या अर्थव्यवस्थेत व्यवहारतोल या संकल्पनेला अत्यंत महत्त्व आहे. आंतरराष्टीय व्यापारच्या चलनविषयक स्थितीचे वर्णन करण्याचे महत्त्वाचे साधन म्हणजे व्यवहारतोल वस्तूच्या आयात निर्यातीबरोबर इतर काही बाबींमुळे परकीय देशांबरोबर देणे-घेणे निर्माण होत असते. या सर्व गोष्टींचे एकत्रितपणे ताळेबंधपत्रक मांडताना व्यापारतोल व व्यवहारतोल या दोन संकल्पना महत्त्वाच्या ठरतात. व्यवहारतोल या पाठात आपण व्यवहार तोलाशी निगडीत बाबींचा आपण अभ्यास करणार आहोत.

**या पाठाची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे :-**

१. व्यवहारतोलाची संकल्पना व रचना याचा अभ्यास करणे.
२. व्यवहारतोल असमतोलाच्या विविध प्रकारांचे अध्ययन करणे.
३. व्यवहारतोल असमतोलाची विविध कारणे जाणून घेणे.
४. व्यवहारतोल समतोलीत करण्याच्या दृष्टीने ज्या विविध पद्धती आहेत. त्या पद्धतींचा अभ्यास करणे.
५. 'परिणामकारक अवमूल्यन' ही संकल्पना अभ्यासणे.

### ८.२ प्रस्तावना

**व्यवहारतोल**

एका देशाचे दुसऱ्या देशाबरोबरचे पैशातील देणे-घेणे फक्त व्यापारी वस्तूंच्या आयाती-निर्याती मधूनच निर्माण होते असे नाही तर अशा अनेक बाबी आहेत

की, त्याच्यामुळे देश दुसऱ्या देशाला काही देणे लागतो व त्याचवेळेस दुसऱ्या देशातून काही उत्पन्नही येत असते.

'व्यापारी बाबींना किंवा वस्त्राच्या आयात निर्यातीला दृश्य बाबी असे म्हणतात.' या बाबींची नोंद बंदरावरील कस्टमस अधिकाऱ्यांकडे असते. म्हणजे आपल्या देशातून किती वस्तू बाहेरच्या देशात निर्यात झाल्या आणि किती आयात झाल्या याची प्रत्यक्ष नोंद बघण्यास मिळते. म्हणून या बाबींना दृश्य बाबी असे म्हणतात.

'अदृश्य बाबी म्हणजे ज्याची नोंद बंदरावरील कस्टम्स अधिकाऱ्यांकडे होत नाही. परंतु देशाच्या बाबतीत देणे आणि घेणे निर्माण होत असते. उदा. वाहतूक, बँक व विमासेवा, पर्यटन इत्यादी. उदा. समजा, आपल्या देशातील बँकेने परकीयांना सेवा दिली तर परकीय लोक त्याचा काही मोबदला आपल्या बँकेला देतील. त्यामुळे ते आपल्या देशाचे उपत्न असते.'

आंतरराष्ट्रीय व्यवहार देणे आणि येणे अशा दोन गटात वर्गीकरण केले जाते.

B = RF - PF

व्यवहारतोल = परकीय येणे - परकीय खर्च

B = व्यवहारतोल

RF = परकीय येणे

PF = परकीय खर्च

परिस्थिती ऋण फरकाची असेल तुटीचा व्यवहारतोल असे म्हटले जाते.

## ८.३ (१) व्यवहारतोलाची रचना :

व्यवहारतोलात समाविष्ट केल्या जाणाऱ्या बाबी

(Compoments of Balance of Payment)

व्यवहारतोलात दोन विभाग समाविष्ट आहेत.

१. चालू खाते

२. भांडवली खाते

त्याचप्रमाणे आर्थिक व्यवहारांचे (१) वास्तव व्यवहार व (२) वित्तीय व्यवहार असे दोन प्रकार केले जातात. उदा. आयात निर्यात. निर्यात उत्पन्न निर्माण करते. तसेच देशातील लोक परकीयांकडून वस्त्र व सेवा खरेदी करतात. त्याला आपण आयात म्हणतो. ती परकीयांसाठी उत्पन्न निर्माण करते. म्हणून वस्त्र व व्यवहार उत्पन्न निर्माण करणारे असतात.

याउलट पैशाच्या किंवा चलनाच्या स्वरूपात होणारे व्यवहार वित्तीय व्यवहारात मोडतात. वित्तीय व्यवहार बऱ्याचदा भांडवली व्यवहार म्हणून ओळखले जातात. हे व्यवहार देशाच्या उत्पन्नपातळीवर प्रत्यक्षपणे परिणाम करत नाहीत. व व्यवहारांमध्ये फक्त भांडवल व भांडवली संपत्ती तसेच देशाची देयता

यांच्यात बदल होत असतो. म्हणून उत्पन्न निर्माण करणारे व्यवहार किंवा वास्तव व्यवहार व्यवहारतोलाच्या चालू खात्यांमध्ये येतात तर वित्तीय किंवा भांडवली व्यवहार भांडवली खात्यात येतात.

**व्यवहारतोल**

| जमा (+) | खर्च (-) |
|---|---|
| (येणे) | (खर्च) |

**चालू खाते**

| आयात | निर्यात |
|---|---|
| १. वस्तू | १. वस्तू |
| २. सेवा | २. सेवा |
| ३. हस्तांतरणदेयता | ३. हस्तांतरण देयता |

**भांडवली खाते**

| | |
|---|---|
| १. इतर देशांपासून कर्ज | १. इतर देशांना दिलेले कर्ज, व्याज |
| २. परकीय देशामधून प्रत्यक्ष गुंतवणूक | २. परकीय देशात प्रत्यक्ष गुंतवणूक |

**समायोजन खाते**

| | |
|---|---|
| १. परकीय सरकारने धारण केलेली वाढ | १. परकीय चलन आणि सोन्याची सरकारकडे वाढती ठेव |

चूकभूल

य) चालू खाते
चालू खात्यामध्ये दोन मुख्य बाबी असतात.
१. दृश्य बाबी किंवा दृश्य खाते.
२. अदृश्य बाबी किंवा अदृश्य खाते.

हृदय खात्यांमध्ये वस्तूची आयात आणि निर्यात समाविष्ट होते तर अदृश्य खात्यामध्ये सेवांचे मोबदले किंवा देणग्या यांचा समावेश होतो. म्हणजेच बदली देण्यांचा समावेश या खात्यात होतो. सर्वसाधारणपणे बँक, विमा, कर्जावरील व्याज, पर्यटकांचा खर्च, वाहतूक शूल्क आणि देणग्या यांचा समावेश या विभागात होतो. आंतराष्ट्रीय नाणेनिधीने (IMF) पुढील बाबींचा समावेश अदृश्य बाबींमध्ये केला आहे.

१. वस्तूंची आंतरराष्ट्रीय वाहतूक, यामध्ये वाहतूक करताना कराव्या लागणाऱ्या साठवणूक खर्च आणि इतर खर्चाचाही समावेश होतो.
२. व्यवहार, शिक्षण, आरोग्य, आंतरराष्ट्रीय समारंभ इत्यादींसाठीचा प्रवास खर्च

३. विम्याचे हप्ते आणि दावे
४. व्याज, खंड, लाभांश आणि नफा यांसारखे गुंतवणूक उत्पन्न.
५. जाहिरात, दलाली, सिनेमांचे भाडे, निवृत्ती वेतन, पेटंट फी, रॉयल्टीज आणि नियतकालीकाची वर्गणी
६. देणग्या
७. भांडवली गुंतवणुकीवरील घसारा

**ब) भांडवली खाते.**

कर्ज आणि इतर दावे भांडवली खात्यात येतात. आयात-निर्यातीसाठी करण्यात येणारा भांडवल पुरवठा तसेच आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून येणारा भांडवल पुरवठा होणाऱ्या कर्जाऊ व्यवहाराचा समावेश या खात्यात होतात. त्यानुसार खाजगी भांडवली खाते, आंतरराष्ट्रीय संस्था भांडवली खाते आणि सरकारी भांडवली खाते, अशी विविध खाती भांडवली खात्यात येतात.

खाजगी भांडवली खात्यात महामंडळे आणि व्यापारी बँका यांचे आंतरराष्ट्रीय भांडवली व्यवहार येतात. हे व्यवहार अल्पकालीन आणि दीर्घकालीन असू शकतात. आंतरराष्ट्रीय भांडवली खात्यात जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय वित्तपुरवठा महामंडळ, आंतरराष्ट्रीय विकास संस्था, बँक फॉर इंटरनॅशनल सेटलमेंट यासारख्या संस्थांनी अल्पकालीन आणि दीर्घकालीन केलेल्या भांडवली व्यवहारांचा समावेश होतो. सरकारी भांडवली खात्यात अनुदाने, अल्पकालीन आणि दीर्घकालीन कर्जाचे सरकारी पातळीवर होणारे व्यवहार समाविष्ट असतात.

**क) समायोजना खाते**

यालाच सरकारची संरक्षित मालमत्ता असेही म्हटले जाते. इंग्लंड आणि अमेरिकेच्या बाबतीत प्रदेश-देश स्वतंत्र दाखवता येतात. त्याचे व्यवहार स्वतंत्र असल्याने सरकार निव्वळ सरकारी राखीव संपत्ती ठेवते. सरकार तडजोडीने देयता बदलते. देयकाची जबाबदारी सरकारवर असते प्रत्येक वर्षी सरकारी राखीव संपत्तीत बदल होतो. सरकारी राखीव संपत्ती परकीय चलनात बदलता येते आणि तशी तरतूद आंतरराष्ट्रीय नाणे निधी (IMF) मध्ये आहे.

**ड) चूक आणि भूल:**

जमाखर्चाची तिन्ही खाती बरोबर असल्यास, त्यामुळे समतोल होतो ही देशाच्या व्यवहारतोल समतोलाची बाब आहे. देशाच्या व्यवहारतोल द्विनोंदी लेखाकर्म पद्धतीने तयार केला जातो. त्यामुळे प्रत्येक बाब देणे आणि घेणे बाजूला येते. त्यामुळे लेखाकर्माच्या दृष्टीने देशाचे येणे आणि घेणे दोन्ही सारखे दिसतात.

**आपली प्रगती तपासा :**

१. व्यवहार म्हणजे काय?

२. व्यवहारतोलाची द्विनोंद पद्धत म्हणजे काय?

## ८.४ (२) व्यवहारतोलातील जमाखर्चाची तत्त्वे :

द्विनोंद पद्धत (Double Entry Book-Keeping System)

व्यवहारतोल नेहमी संतुलीत असतो. (Balance of Payment is always balance) कोणत्याही देशाच्या व्यापारतोल द्विनोंदणी लेखाक्रम (Double entry Book Keeping System) पद्धतीने तयार केलेला असतो. व्यवहारतोलाची महत्त्वाचे वैशिष्टचे म्हणजे त्याच्या दोन्ही बाजू म्हणजेच जमा आणि खर्च (Receipts & Payments) सारखे असतात. असे होण्याचे कारण म्हणजे प्रत्येक बाब देणे आणि येणे बाजूला येते. त्यामुळे लेखाकर्मच्या दृष्टीने देशाचे देणे आणि घेणे सारखेच दिसतात. द्विनोंद पद्धत हे व्यवहारतोलातील जमाखर्चाचे महत्त्वाचे तत्व आहे.

५.४ व्यवहारतोल असमतोलाचे प्रकार

पुढील सुत्रानुसार व्यवहारशेष समतोल अभ्यासता येईल.

वरील सुत्रानुसार,

BOP = R - P

R = एकूण प्राप्ती

P = एकूण खर्च

वरील सूत्रानुसार,

जर R>P तर BOP = 0 किंवा +ve BOP असमतोल

जर R>P तर BOP = 0 किंवा -ve BOP असमतोल

जर R=P तर BOP = 0 - असमतोल

अशा प्रकारे व्यवहारतोलातील प्राप्ती खर्चाच्या असमतोलातून संतुलन निर्माण होते. त्याचे प्रमुख चार प्रकार पडतात.

**१) संरचनात्मक असमतोल :**

देशात दिशाबाहेर निर्माण होणाऱ्या रचनात्मक बदलातून आयात आणि निर्यात वस्तूंच्या मागणी पुरवठ्यात रचनात्मक स्वरूपाचे बदल होतात. आणि त्यातून व्यवहारतोलात संरचनात्मक असमतोल निर्माण होतो.

समजा, भारताची ज्यूट वस्तूंची विदेशातील मागणी कमी झाली म्हणून भारताला ज्यूट उद्योगांतील साधनांना इतर निर्यात उद्योगात स्थानांतरीत

करावे लागेल. जर ते शक्य झाले नाही तर भारताच्या निर्यातीत घट होईल आणि त्याचवेळेला आयात पूर्वीसारखीच राहील आणि व्यवहारतोलात असमतोल निर्माण होईल. या असमतोलाला संरचनात्मक असमतोल असे म्हणतात.

**१. दीर्घकालीन असमतोल :**

हा समतोल काही मूलभूत कारणांमुळे निर्माण होत असतो आणि तो दीर्घकाळ टिकून राहतो. भांडवलनिर्मिती, लोकसंख्या वाढ, प्रादेशिक विस्तार, तांत्रिक सुधारणा, नवनिर्मिती इत्यादी. यासारख्या कारणांमुळे असा असमतोल निर्माण होतो. नवीन विकसनशील अर्थव्यवस्थेत आर्थिक वृद्धीसाठी अंतर्गत बचतीपेक्षा मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करावी लागते. म्हणून आयात मोठ्या प्रमाणात होऊन व्यवहारतोलात असमतोल निर्माण होतो. असा असमतोल एकाएकी दुरूस्त करता येत नाही. तो दीर्घकाळ टिकून राहतो. म्हणून त्याला दीर्घकालीन असमतोल असे म्हणतात. त्याचप्रमाणे एखाद्या देशामध्ये लोकसंख्या वाढ वेगाने होत असेल तर, या देशाची आयात वाढते. त्याचवेळेला निर्यातीत घट होते आणि अर्थव्यवस्थेत दृढमूल (Chronic) स्वरूपाचा असमतोल निर्माण होतो.

**३. अल्पकालीन असमतोल :**

व्यवहारशेषातील जो असमतोल अस्थायी किंवा तात्पुरत्या स्वरूपाचा असतो त्यास अल्पकालीन असमतोल म्हणतात. जेव्हा एखादा देश नाणे निधीसारख्या संस्थेकडून अल्पकालासाठी पैशाची उचल होतो तेव्हा असा असमतोल उद्‌भवण्याची शक्यता असते. परंतु जेव्हा विशिष्ट कालावधीत ही उचल परत केली जाते तेव्हा असा असमतोल आपोआप दूर होत असतो. परंतु जर हा असमतोल योग्य वेळेत सोडविला नाही तर त्याचे जुनाट स्वरूपाच असमतोलात रूपांतर होते.

**४. चक्रीय असमतोल**

व्यापारचक्रिय बदलांच्या प्रभावामुळे व्यवहारतोलात चक्रिय असमतोल निर्माण होतो. त्याची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**अ.) व्यापारचक्राचे स्वरूप** :

वेगवेगळ्या देशात व्यापारचक्राचे स्वरूप वेगवेगळे असते तसेच व्यापारचक्राचा कालावधी आणि निर्माण होण्याची वेळ वेगवेगळ्या देशात वेगवेगळी असते.

ब.) वेगवेगळ्या देशात समतोलासाठी सारख्याच प्रकारचे कार्यक्रम आणि उपयायोजना केल्या जात नाहीत.

क.) वेगवेगळ्या देशात आयात मागणीची किंमत लवचिकता वेगवेगळी असते.

ड.) वेगवेगळ्या देशातील आयातीच्या मागणीची उत्पन्न लवचिकताही वेगवेगळी असते.

त्याचप्रमाणे लोकांची पसंती, फॅशन, सवयी, उत्पन्न, आर्थिक प्रगती यांसारख्या कारणानेही मागणीत बदल होतो. आयात प्रवृत्तीत बदल होतो. काही आयात वस्तूंची मागणी वाढते. तर काही वस्तूंची मागणी घटते. त्यामुळे देखील व्यवहारतोलात असमतोल निर्माण होतो.

**आपली प्रगती तपासा :**

१. व्यवहारतोल असतोलाचे विविध प्रकार कोणते ?

## ८.५ प्रश्नमालिका

प्र.१ व्यवहारतोल म्हणजे काय सांगून व्यवहारतोलाची रचना स्पष्ट करा.

प्र.२ व्यवहारतोलाच्या जमाखर्चाची द्विनोंदपध्दत म्हणजे काय?

प्र.३ व्यवहारतोल असमतोलाचे विविध प्रकार स्पष्ट करा.

❖❖❖

# १

# व्यवहारतोल :- कारणे आणि उपाय

**पाठ्यक्रम**

१.० उद्दिष्ट्ये
१.१ प्रस्तावना
१.२ व्यवहारतोल असमतोलाची कारणे
१.३ व्यवहारतोलातील असंतूलन दुरूस्त करण्याचे उपाय
१.४ मार्शल कर्नर शर्त
१.५ प्रश्नमालिका

## १.० उद्दिष्ट्ये

वस्तूंच्या आयात निर्यातीबरोबरच इतर काही बाबींमुळे परकीय देशाबरोबर देणे - घेणे निर्माण होत असते. या सर्व गोष्टींचे एकत्रितपणे ताळेबंदपत्रक मांडताना व्यापार तोल व व्यवहारतोल या संकल्पना महत्वाच्या ठरतात. यावरुनच व्यवहार अनुकूल किंवा प्रतिकूल आहे हे समजते. या पाठात आपण व्यवहारतोल समतोल असण्याची कारणे व त्यावरील उपाय यांचा अभ्यास करणार आहोत. या पाठाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे :-

१) व्यवहारतोल असमतोलाची विविध कारणे अभ्यासणे.
२) व्यवहारतोल संतुलीत करण्याच्या दृष्टीने विविध उपायांचा अभ्यास करणे.
३) परिणामकारक अवमूल्यनाच्या मार्शल - लर्गर अटींचा अभ्यास करणे.

## १.१ प्रस्तावना

एक किंवा अनेक गोष्टींतील बदलांचा परिणाम व्यवहारतोल असमतोल होण्यावर होत असतो.एखाद्या घटकामध्ये एकाच बाजूने जास्त प्रमाणात किंवा कायमस्वरुपी बदल होत असतील तर त्यामुळे प्रतिकूल परिणाम व्यवहारतोलावर होत असतो. प्रतिकूल किंवा असंतूलीत व्यवहारतोल दुरुस्त करण्याचे अवमूल्यन हे प्रभावी साधन आहे. परिणामकारक अवमूल्यनामूळे व्यवहारतोलाची स्थिती सुधारणे शक्य असते.

## ९.२ व्यवहारतोल असमतोलाची कारणे

एक किंवा अनेक घटकांतील बदलांमुळे व्यवहारतोलात असमतोल निर्माण होत असतो. हे घटक क्लिष्ट स्वरूपाचे असतात. त्यांचा एकमेकांवरही परिणाम होत असतो. व्यवहारतोलवर दिसणारा प्रत्यक्ष परिणाम पुन्हा वेगळा असतो. व्यवहारतोलातील असमतोलाचे स्वरूप देशागणिक वेगवेगळे असते. व्यवहारतोलाच्या रचनेवर अनेक बाबी परिणाम करत असतात. त्यामध्ये दृश्य-अदृश्य आयात - निर्यात देशांचे एकमेकांबरोबरचे देणे-घेणे यासारखे घटक येतात. एखाद्या घटकांमध्ये एकाच बाजूने कायमस्वरूपी बदलत असेल तर त्यामुळेही व्यवहारतोलात असमतोल निर्माण होतो. व्यवहारतोलात असमतोल निर्माण करणारी काही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.
याची विभागणी दोन गटात केली जाते.

**अ. आर्थिक कारणे**

**ब. आर्थिकेत्तर कारणे**

**अ. आर्थिक कारणे**

**१. विकासकार्यावरील खर्च :**

अनेक विकसनशील राष्ट्रांकडून जलद आर्थिक विकासासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च केला जातो. परिणामी देशातील लोकांच्या क्रयशक्तित वाढ घडून येते. वाढत्या क्रयशक्तिमुळे लोकांच्या आयात क्षमतेत वाढ होते आणि देशाची आयात वाढते. मात्र याचवेळी देश विकासाच्या प्राथमिक अवस्थेत असल्याने अशी देशांची निर्यातक्षमता कमी असते. याचा परिणाम म्हणून व्यापारतूट निर्माण होते आणि कालांतराने त्याचे रूपांतर व्यवहारशेषातील असमतोलात होतो.

**२. व्यापार चक्रे :**

अनेक देशातील आर्थिक घटनांमध्ये सातत्याने चक्रिय स्वरूपाचे बदल घडून येतात. अर्थव्यवस्थेत कधी तेजी तर कधी मंदीची चक्रे सतत येत असतात. त्याचा परिणाम संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेवर होत असतो. ज्या देशात तेजीची अवस्था दीर्घकाळ राहते. त्या देशाची आयात वाढते. परिणामी त्या देशाची व्यापारतूट वाढते आणि व्यवहारशेषात असमतोल निर्माण होतो.

**३. आयात लवचिकतेतील बदल:**

जेव्हा आपल्या देशाची आयात लवचिकता बदलते तेव्हा आपली आयातीची क्षमता बदलते तसेच जेव्हा देशांची आयात लवचिकता बदलते तेव्हा त्या देशाची आयातक्षमता बदलत असते तर आयात लवचिकता बदलल्यामुळे एखाद्या देशाची आयात वाढत असेल तर अन्य देशातील उत्पादन, रोजगार, गुंतणूक आदी गोष्टींना चालना मिळते. आणि त्यांची निर्यातक्षमताही बदलते. परिणामी व्यापार असमतोल व नंतर व्यवहार असमतोल निर्माण होतो.

**४. बाह्य उचल :**

जेव्हा एखाद्या देशाकडून मोठ्या प्रमाणावर विदेशी उचल घेतली जाते तेव्हा भांडवली खात्यावर पैसे जमा होत असले तरीही त्यामुळे भविष्यातील देयता मोठ्या प्रमाणावर वाढते. याचा परिणाम म्हणून व्यवहारशेषात तूट तसेच असमतोल निर्माण होतो.

**५. भाववाढ :**

आर्थिक विकासासाठी केलेल्या खर्चामुळे देशातील लोकांची क्रयशक्ती मोठ्या प्रमाणावर सुधारते. परिणामी जनतेकडून देशी तसेच विदेशी वस्तूंची आयात मोठ्या प्रमाणावर होते. देशी वस्तूंच्या वाढत्या मागणीमुळे वस्तूंची टंचाई निर्माण होते. त्यामुळे त्या देशांची निर्यात घटण्याची शक्यता असते. तसेच वाढत्या मागणीमुळे देशात भाववाढीची स्थिती निर्माण होऊन आयातवृद्धी होण्याची  शक्यता असते. त्यामुळेही व्यवहारशेषात असमतोल निर्माण होतो.

**६. वाढती लोकसंख्या :**

अविकसित देशात लोकसंख्या झपाट्याने व मोठ्या प्रमाणावर वाढत असते. अशा सतत वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे देशाच्या आयातीत वाढ होते तर निर्यातीत घट होते आणि त्यामुळे देशाला व्यवहार समतोल बिघडतो.

**७. प्रदर्शन प्रभाव :**

प्रदर्शन प्रभाव हे विशेषत: अविकसित देशाच्या व्यवहारशेषातील असमतोलाचे कारण होय. जेव्हा अविकसित देश आर्थिक, राजकीय, सामाजिक संबंधामुळे विकसित देशांच्या संपर्कात येतात तेव्हा विकसित देशांच्या राहणीमानाचा प्रभाव पडून अविकसित देशांची विविध वस्तूंकरीता मागणी वाढते त्यामुळे आयात वाढते.

**८. विकसित देशांकडून गुंतवणूकीचा अभाव :**

विकसित देशांनी अविकसित देशात जर मोठ्या प्रमाणावर गुंवणूक केली तर अविकसित देशात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली तर अविकसित देशात उद्योगधंदे वाढून रोजगार निर्मिती व उत्पादनात वाढ होते. परिणामी निर्यात वाढते आणि त्यामुळे व्यवहारशेषातील असमतोल दूर होऊ शकतो. परंतु अलीकडच्या काळात विकसित देश अविकसित देशात गुंतवणूक करण्यास असमर्थ ठरले आहेत त्यामुळे अविकसित देशांच्या व्यवहारशेषात असमतोल आढळून येतो.

**९. नावलौकिक :**

बऱ्याच विकसनशील देशांनी आपल्या मालाविषयी नावलौकिकता कमावलेली आहे. कारण त्या देशांत माल चांगला, टिकाऊ, दर्जेदार व खात्रीलायक असतो अशी जगभर प्रसिद्धी झालेली असते. त्यामुळे जगातील बहुतांशी देशात अशा देशातीलच मालाची मागणी केली जाते. आज Made in

U.S.A., Made in Japan असा शिक्का असणाऱ्या मालाला भरपूर मागणी आहे. त्यामुळे जगातिक अनेक देश अशा देशांकडून मालाची मोठ्या प्रमाणात आयात करतात. परिणामी, आयातीत झालेल्या वाढीमुळे व्यवहारशेषात असमतोल निर्माण होतो.

**१०. आर्थिक विषमता**

अविकसित देशाच्या विकास होत असताना देशात आर्थिक विषमता वाढते. आर्थिक विषमतेमुळे अविकसित देशात श्रीमंतांचा एक वर्ग निर्माण होतो. हा श्रीमंतांचा वर्ग परदेशी प्रवास करणे. परदेशी वस्तू अधिक प्रमाणात वापरणे अशा अनेक गोष्टी करतात. त्यामुळे अविकसित देशातील पैसा परदेशात जातो. देशाची परदेशी मालाची आयात वाढते आणि त्याचा परिणाम म्हणून देशाच्या व्यवहारशेषात असमतोल निर्माण होतो.

**ब. आर्थिकत्तर कारणे :**

१. राजकीय घटक :

देशात जर राजकीय अस्थिरता असेल तर मोठ्या प्रमाणावर परकीय भांडवल देशाबाहेर जाऊ शकते तसेच देशांतर्गत गुंतवणूकीचे प्रमाणही घटत जाते. परिणामी देशातील उत्पादन प्रक्रियेत अडथळे येतात व ती मंदावते. या सर्वांचा परिणाम त्या देशाच्या व्यवहारशेषात तुट किंवा असमतोल निर्माण होतो.

**२. सामाजिक घटक :**

लोकांच्या सवयी, आवडी, सामाजिक चालीरिती, रूढी - परंपरा, सतत बदलणारी फॅशन इत्यादी अनेक घटकांचा प्रभाव देशाची आयात प्रभावित करतात. तसेच लोकसंख्यावाढ, देशी वस्तूं बाबतच पूर्वग्रह इत्यादी अनेक घटकांमुळेही त्या देशाच्या निर्यातक्षमतेवर प्रभाव पडतो. अशा प्रकारे या सामाजिक घटकातील बदलांमुळेही व्यवहारशेष असमतोलात आढळतो.

**आपली प्रगती तपासा :**

१. व्यवहारतोल असमतोलाची विविध कारणे कोणती आहेत?

## ९.३ व्यवहारतोलातील असमतोल दुरूस्त करण्याचे उपाय :

देशाच्या व्यवहारतोलात दीर्घकाळ असंतुलत टिकून राहत असेल तर ते आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी आणि त्या देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी अयोग्य असते. व्यवहारतोलात, जेव्हा तूट असते, तेव्हा त्या देशांच्या वस्तूंची व सेवांची निर्यात आयातीच्या तुलनेने अधिक घटते. व्यवहारतोलात सतत तूट किंवा अधिक्य राहणे, अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने अयोग्य राहते.

व्यवहारतोलातील तूटीचे अधिक्यापेक्षा देशाच्या आर्थिक वृद्धीवर अधिक गंभीर परिणाम होत असतात. म्हणून व्यवहारतोलातील तूट लवकरात लवकर भरून काढण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. प्रतिकूल व्यवहारतोल दुरूस्त करण्यासाठी निर्यातीला प्रोत्साहन आणि आयातीला प्रतिबंध बसू शकेल. अशा प्रकारच्या उपाय योजना कराव्या लागतात.

प्रतिकूल व्यवहारतोल दुरूस्त करण्यासाठी वापरण्यात येणारे उपाय दोन प्रकारात स्पष्ट केले जातात.

अ. चलनी साधने :
यामध्ये
१. चलनसंकोच
२. चलनाच्या बाह्यमूल्यात घट / ऱ्हास
३. अवमूल्यन
४. विनिमय नियंत्रण

या साधनांचा समावेश होतो.

ब. गैरचलनी साधने :
यामध्ये
१. आयात जकाती
२. आयात कोटा
३. निर्यात प्रोत्साहन धोरण आणि कार्यक्रम इत्यादींचा समावेश होतो.

व्यवहारतोल स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी योजण्यात येणाऱ्या चलनी साधनांचा दुहेरी परिणाम होत असतो. चलनी साधने एका बाजूला निर्यात वृद्धीसाठी उपयुक्त होतात तर दुसऱ्या बाजूला आयात कमी करण्यासाठी मदत करतात, चलनी साधनांचा परिणाम अप्रत्यक्षपणे होत असतो. तर दुसऱ्या बाजूला गैरचलनी साधनांचा परिणाम प्रत्यक्षपणे होत असतो. हा परिणाम प्रभावी असला तरी तो एकांगी असतो.
अ. चलनी साधने
प्रतिकूल व्यवहारतोल दुरूस्त करण्यासाठी सामान्यपणे चलनीसाधने निर्माण वाढीला आणि आयात घटीला मदत करत असतात. काही प्रमुख चलनी साधने पुढीलप्रमाणे आहेत.

**१. चलनसंकोच :**
व्यवहारतोलातील असमतोल दुरूस्त करण्यासाठी सनातन अर्थशास्त्रज्ञांनी हा उपाय सुचविला होता. चलनसंकोच म्हणजे महाग पैसा आणि पतधोरण स्वीकारून देशातील पैशाच्या संख्येत घट केली जात असते. त्यामुळे देशी वस्तूंचा खर्च आणि किमतीमध्ये घट होते. त्यामुळे देशाच्या निर्यात वस्तू विदेशी बाजारपेठांमध्ये स्वस्त होतात. म्हणून विदेशी बाजारपेठांमधील त्यांची मागणी वाढून देशाच्या चलनसंकोचामुळे उत्पन्न घट होऊन लोकांचा देशी

वस्तूंची मागणी कमी केली जाते. त्यामुळे जास्तीत - जास्त वस्तू निर्यातीसाठी उपलब्ध होतात व देशाची निर्यात वाढण्यास मदत होते. चलनसंकोचामुळे देशातील लोकांचे उत्पन्न घटते त्यामुळे त्यांची आयात प्रवृत्ती कमी होऊन आयात घटीस चालना मिळते. म्हणून चलन संकोचकारक चलनी धोरणामुळे जेव्हा निर्यात वाढते आणि आयात कमी होते तेव्हा व्यवहारतोलातील तूट आपोआप दुरूस्त होते.

**२. चलनाच्या बाह्य-मूल्यात घट :**

प्रतिकूल व्यवहारतोल दुरूस्त करण्यासाठी वापरण्यात येणारे महत्त्वाचे साधन म्हणून देशी चलनाच्या बाह्य मूल्यात घट करण्याचे धोरण याकडे बघितले जाते. जेव्हा देशात बदलते विनिमयदर धोरण स्वीकारलेले असते तेव्हाच या साधनांचा वापर करता येतो आणि चालनाच्या बाह्य मूल्यात घट करणे शक्य होते. एका देशाच्या चलनाचे दुसऱ्या देशातील चलनातील मूल्य जेव्हा कमी होते तेव्हा त्याचा अर्थ चलनाच्या बाह्य मूल्यात ऱ्हास होत आहे असा होतो.

देशी चलनाच्या बाह्य मूल्यात ऱ्हास झाल्याने देशी वस्तू परकीयांना स्वस्त वाटतात. त्यामुळे निर्यात वाढीस चालना मिळेल. याउलट आयात वस्तू देशी लोकांना महाग होतात. म्हणून त्यांची मागणी कमी होऊन आयातीत घट होते. त्यामुळे व्यवहारतोलात असलेली तूट कमी होऊन व्यवहारातील देशासाठी अनुकूल होण्यास मदत होते. देशाची आयात आणि निर्यात वस्तूंची मागणीची लवचिकता बऱ्यापैकी लवचिक असेल तर चलनाच्या बाह्य-मूल्यातील नाममात्र घट देखील व्यवहारतोलातील तूट सहजपणे दुरूस्त करण्यास मदत करणारी ठरते.

**३. अवमूल्यन :**

प्रतिकूल व्यवहारतोल असलेल्या देशामध्ये वापरले जाणारे महत्त्वाचे साधन म्हणजे चलनाचे अवमूल्यन होय. अवमूल्यन म्हणजे कायदेशीररित्या चलनाचे बाह्यमूल्य कमी करणे होय. हे अवमूल्यन सर्व देशांच्या चलनाच्या बाबतीत किंवा सोन्याच्या संदर्भात केलेले असते. परंतु कधी-कधी काही निवडक देशांच्या चलनाच्या बाबतीतही केलेले असते.

उदा. ६ जून, १९६६ रोजी भारतीय डॉलरच्या संदर्भातील मूल्य ५७.५% कमी केले होते. त्यामुळे अमेरिकन डॉलरचा रूपयातील विनिमय दर = २२ सेंट ऐवजी १ = १३.३% सेंट असा निश्चित करण्यात आला.

चलनाच्या अवमूल्यनामुळे नियमितवृद्धिसाठी मदत होते. कारण परकीयांना आपल्या वस्तू स्वस्त वाटू लागतात. त्यामुळे ते आपल्या वस्तू अधिक प्रमाणात खरेदी करतात. याउलट परकीय वस्तू आपल्या देशातील ग्राहकांना देशी वस्तूंच्या तुलनेत महाग वाटतात. म्हणून आपले लोक त्या वस्तूंना फारशी पसंती देणार नाहीत. या सर्वांचा एकत्रितपणे परिणाम असा होतो की निर्यातीत मोठी वाढ होते आणि आयातील घट होते.

**४. विनियम नियंत्रण :**
व्यवहारतोलातील असमतोल दुरूस्त करण्यासाठी विविध देशांमध्ये वापरण्यात येणारे आणखी एक महत्त्वाचे साधन म्हणजे विनियम नियंत्रण होय. व्यवहारतोलातील असमतोल खात्रीशीरपणे दूर करण्यासाठी या साधनांचा वापर होतो. या पद्धतीअंतर्गत विनिमय नियंत्रण मंडळ किंवा मध्यवर्ती बँक निर्यातदारांना त्यांचे परकीय चलनातील सर्व उत्पन्न मध्यवर्ती बँकेकडे जमा करण्यास सांगते आणि हे परकीय चलन परवानधारक आयातदारांना नियंत्रित दराने वाटते.

म्हणून विनियम नियंत्रणामध्ये फक्त आयात - परवाना धारकांनाच वस्तूची आयात करण्याची परवानगी असते. आयातीचा कोटाही निश्चित केलेला असतो. त्यामुळे देशाची आयात-निर्यात उत्पन्नाच्या मर्यादेमध्येच ठेवली जाते आणि व्यवहारतोल असमतोल निर्माण होऊ दिला जात नाही.

**ब. गैरचलनी साधने :**
गैरचलनी साधनांमध्ये आयात जकाती आणि कोटा यांचा प्रामुख्याने उपयोग केला जात असतो. या साधनांमुळे निर्यातीला प्रोत्साहन मिळत असते. आयातीत घट घडून येते आणि देशी उद्योगांना संरक्षण मिळून आयात पर्यायीकरण आणि त्याचवेळेला काही प्रमाणात निर्यात वाढीला चालना मिळत असते. त्यामुळे देशाच्या प्रतिकूल व्यवहारतोल दुरूस्त होण्यास मदत होते.

**१. आयात जकाती :**
प्रतिबंधात्क उपाय म्हणून आयात शुल्क या साधनांचा वापर केला जातो. निवडक आयात वस्तुंवर आयात शुल्क लादल्यामुळे त्यांच्या आपल्या देशातील किती वाढतात. म्हणून त्या वस्तूंच्या मागणीत घट होते. जर निर्यात परिणाम कायम राहत असेल किंवा वाढत असेल आणि आयातीत घट होत असेल तर देशाच्या प्रतिकूल व्यवहारतोल दुरूस्त होण्यास मदत होते.

**२. आयात कोटा :**
प्रतिकूल व्यवहारतोल दुरूस्त करण्यासाठी आयात कोटा हे एक उपयुक्त साधन म्हणून वापरण्यात येते. या आयात कोटा पद्धतीत सरकार आयात वस्तूंची परिणाम किंवा मूल्य निश्चित करते. आणि तेवढेच त्या विशिष्ट कालावधीमध्येच आयात करता येते. त्यामुळे विदेशातील होणारी आयात मर्यादित राखली जाते आणि व्यवहारातीलतील तूट त्या प्रमाणात कमी केली जाते.

व्यवहारतोलातील असमतोल दुरूस्त करण्याची एक प्रत्यक्ष पद्धती म्हणून आयात कोटा हे एक उपयुक्त साधन मानले जाते. कोटा पद्धतीचा लगेच परिणाम होतो. पाहिजे असल्यास आयात शून्यावर देखील आणता येते.

**३. निर्यात प्रोत्साहन धोरण आणि कार्यक्रम :**
वरील साधनांव्यतिरिक्त व्यवहारतोलात तूट असलेला देश निर्यात प्रोत्साहनाचे धोरण आणि कार्यक्रम राबवितो. निर्यात शूल्क कमी करणे, निर्यात उद्योगांना अनुदाने देणे यासारख्या साधनांचा वापर करून निर्यातीला वेगाने चालना देता येते. आयात पर्यायी वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांना सरकार वेगवेगळ्या प्रकारे आर्थिक मदत आणि सहकार्य करून त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करते.

प्रतिकूल व्यवहारतोल दुरूस्त करण्यासाठी ही गैरचलनी साधने अधिक परिणामकारक असतात. त्यामुळे या साधनांचा उपयोग चलनी साधनांऐवजी केला जातो.

**आपली प्रगती तपासा :**

१. व्यवहारतोल दुरूस्त करण्याच्या मौलीक पद्धती (उपाय) कोणत्या आहेत.

२. अवमूल्यन म्हणजे काय?

## १.३.१ अवमूल्यन (Devaluation) :

प्रतिकूल व्यवहारतोल असलेल्या देशामध्ये वापरले जाणारे महत्त्वाचे साधन म्हणजे चलनाचे अवमूल्यन होय. अवमूल्यन म्हणजे कायदेशीररित्या चलनाचे बाह्यमूल्य कमी करणे होय.

मूल्यऱ्हास आणि अवमूल्यन या दोघांचाही होणारा परिणाम सारखाच असतो म्हणजेच निर्यात वाढते आणि आयात कमी होते त्यामुळे प्रतिकूल व्यवहारतोल देण्यासाठी अनुकूल होतो. आधुनिक काळात देशाच्या व्यवहारतोलात मूलभूत स्वरूपाचा असमतोल निर्माण आलेला असेल तरच अवमूल्यन या साधनाचा वापर केला जातो. चलनाचे सतत उर्ध्वमूल्यन (Over-raluation) होत असेल तर प्रतिकूल व्यवहारतोलाचे ते मूळ कारण असते.

त्यामुळे अवमूल्यन करण्याशिवाय दुसऱ्या मार्ग राहत नाही. सततच्या चलनविस्तारामुळे देशाच्या चलनाचे उर्ध्वमूल्यन होत असते. त्यामुळे चालू विनिमयदराला परकीय चलन स्वस्त होते. त्याचबरोबर परकीय वस्तूही स्वस्त होतात. म्हणून आयातीत मोठी वाढ आणि निर्यातीत मोठी घट होऊन व्यवहारतोल देशासाठी प्रतिकूल होतो. त्यामुळे परकीय विनिमय बाजारात बाजारप्रेरणांमुळे चलनांच्या बाह्य मूल्यात घट घडून येते.

**अवमूल्यनाचे यश :**
अवमूल्यनाचे यश खालील बाबींवर अवलंबून असते.

**१. मागणीची लवचिकता : (Elasticity of Demand) :**
आयात आणि निर्यात वस्तूंची मागणीची लवचिकता बऱ्यापैकी असेल तर अवमूल्यनाला नैसर्गिकपणे यश मिळते आणि अपेक्षित परिणामही दिसून येतो. परंतु समजा, आयात आणि निर्यात वस्तूंची मागणी अलवचिक असेल तर अवमूल्यनामुळे व्यवहारतोलाची स्थिती आणखी वाईट बनते.

**२. आयात आणि निर्यातीची रचना :(**Structure of Import and Export)
जर अवमूल्यन करणाऱ्या देशाच्या निर्यातीमध्ये अपारंपारिक वस्तू अधिक असतील आणि त्यांना जगभरातून मोठी मागणी असेल तर अवमूल्यनामुळे व्यापारशर्ती मध्ये सुधारणा तर होईलच परंतु त्याचबरोबर व्यवहारतोल सुधारणा होईल. परंतु अवमूल्यन करणाऱ्या देशाच्या निर्यातीतील प्राथमिक वस्तूंचा भरणा अधिक असेल तर अशा वेळेस व्यापारशर्ती आणि व्यवहारतोल अवमूल्यनामुळे अधिक प्रतिकूल बनतो.

**१. अंतर्गत किंमत स्थैर्य :(I**nternal Price Stability)
अवमूल्यनाचे अपेक्षित परिणाम दिसून येण्यासाठी अवमूल्यन करणाऱ्या देशाला अंतर्गत किंमत पातळीत किंवा चलनाच्या खरेदी शाब्दित स्थैर्य राखण्याची गरज असते. जर हे स्थैर्य राखले जात नसेल तर अवमूल्यानाचा हेतू साध्य होणार नाही. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाले तर, खर्च - किंमत रचनेत बदल व्हायला नको आणि चलनविस्तारही व्हायला नको.

पुढील परिस्थितीमध्ये देशातील खर्च-किंमत रचना बदलून अवमूल्यनामुळे चलनविस्ताराची स्थिती निर्माण होईल.
अ. काही वस्तूंची आयात कमी केली. परंतु त्यांचे देशातील उत्पादन वाढविले नाही तर त्या वस्तूंची टंचाई निर्माण होऊन त्या वस्तूंच्या किंमतीत वाढ होईल.

ब. अवमूल्यनामुळे निर्यातीत वाढ झाली. परंतु त्याचवेळेला निर्यात-उद्योगांचा फारसा विस्तार झाला नाही तर देशी बाजारांमधील या वस्तूंचा पुरवठा कमी होऊन या वस्तूंच्या किंमती वाढतील.

क. जर अवमूल्यन करणारा देश भांडवल टंचाईग्रस्त असेल तर त्याला आवश्यक भांडवली वस्तू अधिक किंमतीला आयात कराव्या लागतात. त्यामुळे देशांतर्गत उत्पादन खर्च काढून किमतीमध्ये वाढ होईल.

ड. जर अनेक वस्तूंच्या किमती वाढत असतील तर देशांतर्गत राहणीमानाचा खर्च वाढेल. त्यामुळे कामगार संघटना अधिक वेतनाची मागणी करतील आणि त्यातून खर्चदाब निर्मित चलनविस्तार निर्माण होईल.

**४. आंतरराष्ट्रीय सहकार्य :**(International Co-operation)

अवमूल्यनाचा हेतू तेव्हाच साध्य होतो की त्यावेळेस अवमूल्यन करणाऱ्या देशाला इतर देश प्रत्युत्तर देत नाहीत किंवा ते देखील त्यांच्या चलनाचे अवमूल्यन करत नाही. जर अशा तऱ्हेने इतर सर्व देश सहकार्य करत असतील तर अवमूल्यन करणाऱ्या देशाला अवमूल्यनाचे यश मिळते. याउलट इतर देशही आपल्या चलनाचे अवमूल्यन करून उत्तर देत असेल तर अवमूल्यन करणाऱ्या देशाचा अवमूल्यनाचा प्रयत्न शून्य होईल.

**५. इतर साधनांबरोबर समन्वय :** (Co-ordination of other measures)

जर अवमूल्यनाबरोबर आयात जकातीमध्ये वाढ, निर्यात शूल्कात घट, निर्यात परवान्यांचे उदारीकरण, आयात कोटा निश्चित करणे, निर्यात प्रोत्साहन कार्यक्रम राबविणे यासारखे इतर उपाय योजले तर अवमूल्यन खूप परिणामकारक होईल. याउलट इतर साधनांचा उलट वापर केला तर अवमूल्यनाचा परिणाम दिसणार नाही.

**आपली प्रगती तपासा:**

प्र.१ परिणामकारक अवमूल्यन म्हणजे काय?

## ९.४ मार्शल लर्नर शर्त (Marshall - Learner Condition)

**प्रस्तावना**

मूल्यघटीमुळे अधिदानशेषाच्या स्थितीत सुधारणा व्हावयाची असल्यास कोणत्या शर्ती पूर्ण झाल्या पाहिजेत याविषयी बरेच लिखाण झाले. मार्शल - कर्नर शर्त (Marshall-Learner-Condition) ही त्यापैकी एक म्हणता येईल.

अर्थ आयातीच्या मागणीचा लवचिकपणा यांची बेरीज एककापेक्षा अधिक असल्यास मूल्यघटीमुळे त्या देशाच्या अधिदानशेषात सुधारणा होते आणि मूल्यवाढीमुळे बिघाड उत्पन्न होतो. लवचिकपणाची बेरीज एककापेक्षा कमी भरत असल्यास मूल्यघटीमुळे अधिदानशेषांवर प्रतिकूल परिणाम होतो. अर्थात त्या देशातील आणि परदेशातील पुरवठ्याचा लवचिकपणा अनंत किंवा पुष्कळ जास्त आहे आणि मूल्यघट करण्यापूर्वी त्या देशातील आयातीचे मूल्य (M) निर्यातीच्या मूल्याच्या (X) समान आहे, असे गृहीत धरावे लागते.

त्या देशाच्या व्यवहारतोलात झालेली सुधारणा (EDX + EDI - 1) या बैजिक पदाच्या समान असते. K मूल्यघटीचे प्रमाण, (EDX), निर्यातीच्या मागणीचा लवचिकपणा आणि EDI आयातीच्या मागणीचा लवचिकपणा

दर्शवितो. मूल्यघट करण्यापूर्वी (X) आणि (M) संतुलन नसल्यास आणि अधिदानशेष तुटीचा असल्यास मूल्यघटीनंतर आयातीत झालेली प्रतिशत घट ही निर्यातीत झालेल्या प्रतिशत वाढीपेक्षा अधिक महत्त्वाची ठरते. याचाच अर्थ असा की लवचिकपणा आणि व्यापाराचे परिणाम या दोन्हींना महत्त्व असते.

**स्पष्टीकरण :**

मार्शल - कर्नर शर्तीविषयी अधिक विचार करू. समजा निर्यातीच्या मागणीचा लवचिकपणा शून्य आहे. म्हणजेच स्वदेशी चलनात होणारी निर्यात प्राप्ती पूर्ववत राहते. अशा स्थितीत मूल्यघटीमुळे अधिदान शेषावर अनुकूल परिणाम होणारी आयतींच्या मागणीचा लवचिकपणा एककापेक्षा जास्त हवा. कारण त्यामुळे आयातीचे एकंदर मूल्य घटून अधिदानाची स्थिती अनुकूल होऊ शकते. याउलट आयातीच्या मागणीचा लवचिकपणा शून्य असल्यास, आयातीवरील स्वकीय चलनातील खर्च त्याप्रमाणात वाढतो आणि म्हणून अधिदानाची स्थिती अनुकूल होण्यासाठी निर्यातीच्या मागणीचा लवचिकपणा एककापेक्षा जास्त असणे आवश्यक ठरते. तसे असल्यास आयात खर्चात झालेली वाढ निर्यात प्राप्तीत झालेल्या अधिप्रमाण वाढीने भरून निघते.

आयातीच्या आणि निर्यातीच्या मागणीचा लवचिकपणा एककापेक्षा कमी असल्यास मूल्यघटीमुळे अधिदानशेषावर अनुकूल परिणाम होण्यासाठी त्यांची बेरीज  एककापेक्षा जास्त भरली पाहिजे.

मार्शर लर्नर शर्त लागू होण्यासाठी दोन प्रकारची परिस्थिती (गृहीते) अस्तित्वात आणली पाहिजेत.

त्यापैकी पुरवठ्याचा लवचिकपणा अनंत किंवा पुष्कळ अधिक असला पाहिजे. हे गृहीत पूर्ण होईल अशी खात्री देता येत नाही. कृषी किंवा अन्य प्राथमिक उद्योगांत गुंतलेल्या देशांत पुरवठ्याचा लवचिकपणा प्राय: कमी असतो. विशेषकरून किंमत घसरली तरी पुरवठा ठळकपणे कमी झाल्याने आढळत नाही. देशात पूर्ण सेवायोजनाची स्थिती असतानाही पुरवठ्याचा लवचिकपणा कमी भरतो. परिणामत: मार्शर कर्नर शर्त लागू होण्याला मर्यादा पडते.

मार्शरर लर्नर शर्तीत लवचिकपणाची बेरीज एककाहून अधिक असावी एवढेच म्हटले आहे. परंतु अधिदान तूट मोठी असल्यास, ही बेरीज एककाहून पुष्कळ जास्त असायला हवी. तरच चलनमूल्य घटविल्याचे पुरेपुर फायदे मिळू शकतात. लवचिकपणाचे प्रमाण कमी असल्यास मूल्यघटीचे प्रमाण पुष्कळ अधिक ठेवावे लागेल आणि लवचिकपणा जास्त असल्यास मूल्य घटीचे प्रमाण कमी ठेवून भागू शकेल हे उघड आहे.

याठिकाणी ''लवचिकपणाचा नैराश्यवाद'' याचा उल्लेख करणे आवश्यक आहे. पुरवठा वक्रांचा लवचिकपणा अनंत असल्याची उदाहरणे क्वचितच सापडत असल्यामुळे मार्शल-लर्नर अटीची प्रभाविकता अत्यंत दुबळी ठरली.

परिणामतः इ.स. १९४५ नंतर म्हणजेच युद्धोत्तर काळात मूल्यघट करणे शक्यतो टाळावे असे म्हणणाऱ्यांचा एक गट तयार झाला. मूल्यघटीचा अधिदान असमतोल. सुधारण्याच्या दृष्टीने काहीच उपयोग होत नाही. यालाच ''लवचिकपणा व रूपलचा नैराश्यवाद'' म्हणतात.

**काही उदाहरणे व अंदाज :**

अमेरिकेचा अधिदानशेश १९५८ सालापासून सतत तुटीचा असल्याचे सर्व विदित आहे. परंतु याचे कारण युरोपिय देशांनी १९४९ साली केलेल्या अवमूल्यनाचे दीर्घकालीन परिणाम हे आहे. अलीकडचे अल्पकालीन परिणामांचे एक उदाहरण म्हणजे इंग्लंडने नोव्हेंबर १९६७ मध्ये केलेले अवमूल्यन. या अवमूल्यनानंतर इग्लंडच्या चालू खात्यातील जमा १९६८ सालच्या पहिल्या तिमहित सुमारे $ २३९ मिलियनने वाढत्या आणि आयातीत मात्र सुमारे $ ३२५ मिलियनने वाढ झाली. अधिदानशेषातील चालू लेख्याची स्थिती आणखी खालावली. परंतु इंग्लंडच्या आयातीत मूल्य आणि परिमाण दोन्ही दृष्टीने पुष्कळ वाढ झाली; यावरून मागणीचा लवचिकपणा जास्त असल्याचे स्पष्ट झाले.

मागणीच्या लवचिकपणाचा अंदाज लावण्याचा यशस्वी प्रयत्न बऱ्याच संशोधकांनी केला आहे. यापैकी वॉल आणि मारवा लेखकांनी अमेरिकेतील १९४८-५८ या कालखंडातील आयातीच्या मागणीचा अभ्यास केला आणि अंदाज व्यक्त केले. कच्चे पदार्थ ०.२६; अर्धे यंत्रनिर्मित माल - १.३८; तयार यंत्रनिर्मित वस्तूंसाठी - ५.२८ हे कमाल मर्यादा दाखविणारे अंदाज सांगितले. केनन या लेखकाने या अंदाजाची तपासणी करण्याच्या हेतूने आयात लवचिकपणाचा अभ्यास केला आणि असे अंदाज व्यक्त केले.

**आपली प्रगती तपासा:**

१. अवमूल्यनाच्या यशस्वीतेच्या मार्शल-लर्नर अटी अभ्यासा.

## ९.५ प्रश्नमालिका

प्र.१ व्यवहारतोल असंतुलीत असण्याची विविध कारणे स्पष्ट करा.

प्र.२ व्यवहारतोलातील असंतुलन दुरुस्त करण्याचे उपाय स्पष्ट करा.

प्र.३ अवमूल्यनाच्या यशस्वीतेच्या मार्शल - लर्नर अटी अभ्यासा.

प्र.४ परिणामकारक अवमूल्यन म्हणजे काय? व्यवहारतोलातील तूट कमी करण्यासाठी ते महत्त्वाचे साधन कसे ठरते? चर्चा करा.

❖❖❖

# १०

# परकीय विनिमय बाजार

(Foreign Exchange Market)

**पाठ्यक्रम**

१०.० उद्दिष्टये
१०.१ प्रस्तावना
१०.२ परकीय विनिमय बाजाराची अर्थ आणि कार्ये
१०.३ परकीय विनिमय बाजाराचे घटक
१०.४ प्रश्नमालिका

## १०.० उद्दिष्टये

विविध देशातील संबंध आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातून जोडले गेले आहेत. प्रत्येक देशात स्वतंत्र चलन अस्तित्वात असते. त्यामुळे विविध देशात व्यापार चालन असताना चलनाची देखील देवाण-घेवाण करावी लागते. आंतरराष्ट्रीय व्यापारात भिन्न देशांतील चलनांचा वापर केला जातो. दोन देशातील विनिमयाचे व्यवहार मिटवण्याच्या दृष्टीने विदेशी विनिमय दरास महत्त्व प्राप्त झाले आहे. म्हणून या प्रकरणात आपण विदेशी चलन बाजार व विदेशी विनियम दर यासंबंधीत सर्व गोष्टींचा अभ्यास करणार आहोत.

या पाठाची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे :

१. विदेशी विनिमय बाजाराचा अर्थ व त्याची कार्ये यांचा अभ्यास करणे.
२. विदेशी विनिमय बाजाराचे स्वरूप व घटक यांचा अभ्यास करणे.
३. विनिमयदराचे विविध सिद्धांत अभ्यासणे.
४. विनिमय दराच्या विविध प्रकारांच्या अभ्यास करणे.
५. विनिमयदरातील धोके व त्याचे व्यवस्थापन समजावून घेणे.

या पाठातील महत्त्वाच्या संकल्पना
१. परकिय विनिमय बाजार
२. विनिमय दर (हजर दर आणि वायदा दर)

## १०.१ प्रस्तावना

विदेशी देणी देण्यासाठी विविध प्रकारची विशेषीकृत साधने वापरली जातात. विदेशी विनिमयात दोन देशातील चलनांची अदलाबदल केली जाते. विदेशी विनिमय बाजार हे नाणेबाजाराचे एक

वित्तीय केंद्र असते. विदेशी विनिमय बाजारातून विविध प्रकारचे डिलर्स (Dealers) (दलाल) असतात. त्यामध्ये महत्त्वाची भूमिका बँका पार पाडतात. अशा बँकांना विदेशी विनिमय बँका असे म्हणतात. विदेशी विनिमय बाजरात विविध दलालांमध्ये बिल ब्रोकर्सचा समावेश असतो. विदेशी विनिमय बाजार ही अशी एक संख्यात्मक यंत्रणा असते. विनिमय बाजारातील मध्यस्थ व दलाल विदेशी चलनाची खरेदी - विक्री करून लाभ मिळवतात.

## १०.२ परकीय विनिमय बाजार आणि त्याची कार्ये :

अ. अर्थ :

परकीय विनिमय व्यवहारात उत्पन्न आणि संपत्तीच्या हक्काचे एका देशाच्या चलनाचे परिवर्तन दुसऱ्या देशाच्या चलनाच्या शर्तीत करून हक्काचे चलनाच्या साहाय्याने परिवर्तन करता येते. या पद्धतीत काही बाबींचा अभ्यास केला जातो.

१. इतर देशांच्या आणि देशांच्या चलनांचा अभ्यास करणे,
२. विनिमय वाढीची कारणे,
३. विनिमयाच्या ठिकाणी विनिमय आणि समतोल मूल्य यांचा अभ्यास केला जातो.

विविध चलनांचे पतसाधनात रूपांतर करणे, प्रबळ साधनांचे पत रूपांतर वेगवेगळ्या चलनात करणे. जसे चेक, ड्राफ्ट, फॅक्स, हुंड्या, टेलिग्राफ, टान्सफर, प्रवासी चेक, तारेने पैसे पाठविणे, बँकेची पतपत्रे इत्यादींचा समावेश होतो. बँकाच्या खात्यात परकीय चलन आणि साधनांद्वारे चलनाच्या विनिमय बँक ताबडतोब करतात. चलन भौतिक दृष्ट्या बदल करता येत नाही. त्यांचा कायदेशीररीत्या संबंधित देशात विनिमय केला जातो. व त्याची नोंद केली जाते.

व्याख्या :

''ज्या बाजारात परकीय चलनाच्या खरेदी विक्रीचे व्यवहार केले जातात. त्या बाजारास परकीय विनिमय बाजार असे म्हणतात.''

कार्ये :

**१. चलनाचे परिवर्तन करणे :**

विदेशी विनिमय बाजाराचे प्रमुख कार्य म्हणजे विशिष्ट परकीय चलनाचे ग्राहकांच्या मागणीनूसार इतर देशांत चलनात परिवर्तन करणे हे असते.

**२. खरेदी शक्तीचे अंतरण :**

विनिमय बाजाराचे एक महत्त्वाचे कार्य म्हणजे खरेदी शक्तीचे एका देशातून दुसऱ्या देशात हस्तांतर करणे असते. देशातल्या देशातील क्रयशक्तीचे हस्तांतरण मध्यवर्ती बँकेच्या समाशोधन ग्रहामार्फत होत असते. मात्र दोन देशात भिन्न प्रकारचे चलन अस्तित्वात असल्याने क्रय शक्तीचे अंतरण बँक ड्राफ्ट व चेकच्या सहाय्याने करता येत नाही. आंतरराष्ट्रीय पातळीवर समाशोधनाची स्वतंत्र अशी यंत्रणा नसते. त्यामुळे विविध देशांतील चलनाचे देण्याघेण्याचे व्यवहार विदेश विनिमय बाजारामार्फतच पार पाडले जातात.

**३. परकीय चलनात कर्जपुरवठा:**

आंतरराष्ट्रीय व्यापारात भाग घेणाऱ्या व्यापाऱ्यांना विदेशी चलनातील कर्जपुरवठा करणे हे विनिमय बाजाराचे एक महत्त्वाचे कार्य असते. कारण आयात व्यापाऱ्यांना आयातीची किंमत परकीय चलनात द्यावी लागते. त्यासाठी त्याला काही कालावधीची आवश्यकता भासते, तर निर्यात व्यापाऱ्यास त्याने निर्यात केलेल्या मालाची तात्काळ किंमत हवी असते. अशा वेळी आयात व्यापारी विनिमय बाजारातून परकीय चलनाच्या स्वरूपात कर्ज घेऊन आयातीची किंमत तात्काळ देऊ शकतो. आयात आणि निर्यात व्यापारी भिन्न देशाचे नागरिक असल्याने त्यांना एकमेकांच्या पतविषयी (Credit) माहिती नसते. अशा परिस्थितीत आयात व्यापाऱ्यांना विदेशी चलनातील कर्ज देणे हे विनिमय बाजाराचे महत्त्वाचे कार्य असते.

**४. हमी स्वीकारणे :**

आयात-निर्यात व्यापारात भाग घेणारे व्यापारी विविध देशांतील असल्याने त्यांचा एकमेकांवर विश्वास नसतो. अशा वेळी निर्यात व्यापाऱ्यांना त्यांनी निर्यात केलेल्या मालाची तात्काळ किंमत मिळावी अशी अपेक्षा असते. त्याच प्रमाणे आयात व्यापारी माल ताब्यात मिळाल्याशिवाय त्याची किंमत देण्यास तयार नसतात. अशा वेळी आयात व निर्यात व्यापाऱ्यांना त्यांच्या व्यवहाराची हमी विनिमय बाजार घेत असतो. निर्यात व्यापाऱ्यांना त्यांनी निर्यात केलेल्या मालाची किंमत देण्याची हमी घेतली जाते. त्याचप्रमाणे आयात व्यापाऱ्यास त्याने खरेदी केलेला माल खात्रीशीर मिळेल अशी हमी घेतली जाते. अशा हमीमुळे व्यापारात विश्वासाचे वातावरण तयार होऊन व्यापार वाढण्यास मदत होते.

५. विदेश विनिमय बाजारामुळे आंतरराष्ट्रीय देण्या-घेण्याचे व्यवहार मिटविण्यासाठी समाशोधन गृहा (Clearing House) ची सुविधा उपलब्ध होते.

६. आंतरराष्ट्रीय व्यापारातून निर्माण होणाऱ्या हुंड्यांच्या मागणीनुसार पुरवठा करता येतो. विदेशी विनिमय बँकांकडून विदेशी चलनाच्या स्वरूपातील विनिमय पत्रे गोळा करून त्याची विक्री आयात व्यापाऱ्यांमध्ये करणे विनिमय बाजारामुळे शक्य होते.

७. विनिमय दरातील बदलामुळे होणारे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी विनिमय बाजार संरक्षक म्हणून कार्य करतो. विदेशी विनिमय बाजारातील देण्या-घेण्याचे व्यवहार पार पाडण्यासाठी विदेशी चलन, सोन्याची निर्यात आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या हुंड्या, बँक, ड्राफ्ट, टेलिग्राफीक ट्रान्सफर आणि प्रवासी चेकचा वापर केला जातो. विदेश विनिमयाचे व्यवहार करणाऱ्यामध्ये विनिमय बाजारातील मध्यस्थ, विनिमय बँका व मध्यवर्ती बँकेचा प्रामुख्याने समावेश होतो. देण्या-घेण्याचे व्यवहार करण्यासाठी विनिमय दराला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. विदेशी विनिमय दर निश्चित करताना हुंड्या आणि कर्जरोख्याचाही विचार केला जातो.

८. दोन देशांतील चलनांची अदला-बदल करून देणे हे विनिमय बाजाराचे मुख्य कार्य असते.

**आपली प्रगती तपासा**

१. परकीय विनिमयाचा अर्थ सांगा.

२. परकीय विनिमय बाजाराची महत्त्वाची कार्ये स्पष्ट करा.

## १०.३ परकीय विनिमय बाजाराचे घटक :

परकिय विनिमय बाजाराचे विविध घटक आहेत. परकिय विनिमय बाजाराचे प्रमुख तीन महत्त्वाचे घटक आहेत.

**१. लोकांच्यातील आणि बँकातील व्यवहार :-**

लोकांच्यातील व बँकातील व्यवहारात बँक प्राप्तीतून देयता लोकांना किंवा खरेदीपासून आणि लोकांच्या विक्रीतून देत असते.

**२. बँकामधील व्यवहार :**

बँक देवघेवीचे व्यवहार परकीय विनिमयात करते. काही केंद्रात चलनाचे परिवर्तन करून दिले जाते. काही केंद्रामध्ये त्याच देशात (आंतरबँक बाजार) किंवा देशात दलाल तसेच विदेशी चलनासाठी देशांतर्गत बँका सुद्धा सहभागी होतात.

**३. बँका आणि मध्यवर्ती बँकामधील व्यवहार :**

परकीय चलनाच्या खरेदी आणि विक्रीचे व्यवहार केले जातात. मध्यवर्ती बँक परकीय मध्यवर्ती बँकेशी व्यवहार करते किंवा परकीय सरकारशी.

**४. परकीय देणी देण्याची पद्धत :**

देशाच्या चलनाचे शर्तीत कोणाचे देणे आहे. ते परकीय देण्यामध्ये दिले जाते. महत्त्वाच्या देशांत अमेरिकेच्या डॉलरचा उपयोग केला जातो. पतसाधनांचा उपयोग परकीय विनिमयात भरणा करण्याचे बँक व्यवहार करत असते. ते खालीलप्रमाणे :-

१. डिमांडड्राफ्ट
२. टेलिग्राफीक ट्रान्सफर
३. हुंड्या
४. बँकेचे चेक
५. प्रवासी चेक
६. आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्ड जसे मास्टर कार्ड किंवा व्हिसा कार्ड,
७. परकीय चलनाची पाठविलेली थोडी रक्कम - आंतरराष्ट्रीय मनी ऑर्डर.

बँका गरजेनुसार परकीय विकतात त्यासाठी पतसाधनांचा उपयोग चालू विनिमय दरानुसार केला जातो. त्यासाठी काही कमिशन आकारले जाते.

**आपली प्रगती तपासा:**

१. परकिय विनिमय बाजाराचे घटक कोणते ?

## १०.४ प्रश्नमालिका

प्र.१ परकीय विनिमय बाजार म्हणजे काय ? त्याची कार्ये स्पष्ट करा.
प्र.२ परकिय विनिमय बाजाराची मुख्य कार्ये स्पष्ट करा.
प्र.३ परकीय विनिमय बाजाराचे घटक स्पष्ट करा.

❖❖❖

# ११

# विनिमय दर सिध्दांत

(Exchange Rate Theories)

**पाठ्यक्रम**

११.० उद्‌दिष्ट्ये
११.१ प्रस्तावना
११.२ परकिय विनिमय दर
११.३ विनिमय दर सिद्धांत :-
    ११.३.१ व्यवहारतोल सिद्धांत
    ११.३.२ खरेदीशक्ती समता दर सिद्धांत
११.४ विनिमय दर प्रकार
११.५ विनिमय दर धोके :- कारणे आणि व्यवस्थापन
११.६ प्रश्नमालिका

## ११.० उद्‌दिष्ट्ये :

आंतरराष्ट्रीय व्यापारात परकिय चलनबाजार व परकिय विनिमय दर या संकल्पना महत्त्वाच्या आहेत. या पाठात आपण दोन देशात आंतरराष्ट्रीय व्यापार होत असताना दोन चलनांला सिध्दांताचा अभ्यास करणार आहोत.

या पाठाची उद्‌दिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१) विनिमय दराचा अर्थ समजावून घेणे.

२) विनिमय दराच्या विविध सिध्दांताचा अभ्यास करणे.

३) विनिमय दरातील धोके, त्याची कारणे व व्यवस्थापन इ. संबधी चर्चा करणे.

## ११.१ प्रस्तावना :

विदेशी विनिमयाची प्रक्रिया ही समाशोधनाची आणि धनादेश स्विकारुन अंतर्गत देणी मिटविणे आणि एका चलनाच्या बदल्यात दूसरे चलन उपलब्ध करुन देणारी असते. विनिमय दर म्हणजे एका चलनाची दूसऱ्या चलनात व्यक्त केलेली किंमत असते. विदेशी विनिमय दरास आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. विविध अर्थतज्ञांनी विनिमय दराचे व्यवहारतोल सिध्दांत व खरेदीशक्ती समता दर सिध्दांत मांडले आहेत. तसेच विनिमय दरातील धोके व त्याचे व्यवस्थापन कसे केले जाते याविषयी चर्चा करणेही महत्त्वाचे आहे.

## ११.२ परकीय विनिमय दर :

**प्रस्तावना:**

परकीय विनिमयाचा विचार दोन दृष्टीने केला गेला. एका दृष्टीने परकीय विनिमयाचा उपयोग परकीय चलनाची खरेदी आणि विक्री किंवा इतर देशांचा चलननांचे परिवर्तन एका देशाच्या चलनात करणे. तर दुसऱ्या दृष्टीने परकीय विनिमयाचा उपयोग एकूण व्यवहारांसाठी दोन देशांच्या समाशोधनासाठी त्यांच्या ऋणग्रस्ततेसाठी म्हणून परकीय विनिमयात

१. ज्या सर्व संख्या परकीय देणी सुविधा,

२. सर्व पद्धती आणि यंत्रणांचा आंतरराष्ट्रीय देणी उपयोगासाठी;

३. इतर देशांच्या चलनाचे परिवर्तन एक देशाच्या चलनाच्या दराने करणे, म्हणून परकीय विनिमयात त्या पद्धतीचा हत्यारे म्हणून आणि सहाय्याने म्हणून उपयोग आंतरराष्ट्रीय देणी देण्यासाठी तसेच देशाची देणी दूर करण्यासाठी होतो.

विनिमय दरालाच हुंडणावळीचा दर असेही म्हणतात. एका देशाच्या चलनाच्या मोबदल्यात किती परकीय चलन मिळते ते दर्शविणारा दर म्हणजे विनिमयाचा दर असे म्हणता येते. दोन देशातील विनिमयाचे व्यवहार मिटवण्याच्या दृष्टीने परकीय विनिमय दरास महत्त्व प्राप्त होते. परकीय विनिमयाच्या प्रक्रियेत समाशोधनाची आणि धनादेश स्वीकारून देशांतर्गत देणी मिटवून आणि एका चलनाच्या बदल्यात दुसरे चलन उपलब्ध करून देणारे असते.

**परकीय विनिमय दराचा अर्थ:**

परकीय विनिमय दर म्हणजे एका चलनाची दुसऱ्या चलनात व्यक्त केलेली किंमत होय. विनिमय दरामुळे दोन देशांतील चलनांचा परस्परांशी असणारा संबंध स्पष्ट होतो. विनिमय दराची अशी व्याख्या करता येते की, देशांतर्गत चलनाच्या शर्तीत परकीय चलनाचे एका एककाचे किंमत होय. विनिमयाचा दर रूपया आणि डॉलरचा विचार करता किती रूपयामध्ये डॉलरची खरेदी केली जाते. म्हणून विनिमय दर रूपया आणि डॉलर भारताच्या (Point) पासून (expressed) रूपये 88.35=1 अमेरिकन डॉलर अमेरिकेला एक रूपया मिळविण्यासाठी अमेरिकन डॉलर. अमेरिकेला एक रूपया मिळविण्यासाठी १ रूपया = ०.०२६६ डॉलर असे प्रमाण राहील.

**परकीय विनिमय दराचे महत्त्व**

आंतरराष्ट्रीय व्यापारात परकीय विनिमय दर ही संकल्पना अतिशय महत्त्वाची आहे त्याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे :-

१. परकीय विनिमय दराचा एकमेकांच चलनांची वेगवेगळ्या देशांच्या आंतरराष्ट्रीय खर्च आणि किंमती समजण्यासाठी मदत होते. म्हणून आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या प्रत्यक्ष आणि तुलनात्मक आकाराची भूमिका स्पष्ट होते.

२. विनिमय दर हा एक चलनातून दुसऱ्या चलनाच्या संरक्षणासाठी उपयोगी ठरते.

३. कोणत्याही प्रकारे देशांतर्गत किंमती कमी न करता देशाची निर्यात स्वस्तात करता येते. देशातील पैशाचे अवमूल्यन करून पैशाचा विनिमय दर कमी करता येतो. त्यामुळे निर्यात वाढते

आणि परकीय विनिमयाचे उत्पन्न वाढते. अपवाद जेव्हा परकीय मागणीसाठी देशाची निर्यात पूर्णपणे अलवचिक असेल तेव्हा त्या बाबतीतच.

**आपली प्रगती तपासा**

प्र.१ विनिमय दर म्हणजे काय ?

प्र.२ विनिमय दराचे महत्त्व सांगा.

## ११.३ विनिमयदराचे सिद्धांत

११.३.१ व्यवहारतोल सिद्धांत
११.३.२ खरेदी शक्ती समता सिद्धांत
टिप : व्यवहारतोल सिद्धांत पुढील सहा पानावर आहे, कृपया पहा.

### ११.३.२ खरेदी शक्ती किंवा क्रयशक्ती समता सिद्धांत

पहिल्या महायुद्धानंतर गुस्टाव कॅसल (Gustav Cassel) यांनी हा सिद्धांत विकसित केला. पहिल्या महायुद्धाच्या काळात सुवर्ण चलन पद्धत संपुष्टात येवून अपरिवर्तनीय कागदी चलन पद्धती अस्तित्वात आली. कागदी चलन पद्धतीचा स्वीकार जगातील बहुतेक सर्वच देशांनी केल्यामुळे दोन वेगवेगळ्या देशातील वेगवेगळ्या कागदी चलनाची देवाण-घेवाण कोणत्या रीतीने करावी व विनिमय दर कसा निश्चित करावा यासाठी स्वीडिश अर्थशास्त्र गुस्ताव फॅसल यांनी विनिमय दर निश्चितीचा खरेदी शक्ती समता सिद्धांत मांडला. प्रसिद्ध स्वीडिश अर्थ शास्त्रज्ञ गुस्ताव कॅसल यांनी १९१८ मध्ये जो सिद्धांत मांडला तोच विनिमय दर निश्चिती संबंधीचा 'क्रयशक्ती समता सिद्धांत' (Purchasing Power parity theory of Exchange Rate) या नावाने ओळखला जातो. कॅसल यांच्या मते चलनाच्या खरेदी शक्ती क्षमतेच्या आधारे विनिमय दराची निश्चिती करण्यात यावी. ज्या काळात सुवर्ण परिणाम पद्धतीचे अस्तित्व सुंपष्टात आले होते, त्याच कालवधीत, क्रयशक्ती समता सिद्धांत लोकप्रिय ठरत होता.

कॅसल यांच्या मते लोकांकडून विदेशी चलनाची मागणी ही त्या चलनामध्ये वस्तू खरेदी करण्याची क्षमता असल्यामुळे केली जाते. जेव्हा एका चलनाच्या ऐवजी दुसऱ्या चलनाची बदलाबदल केली जाते. तेव्हा त्या चलनामध्ये असणाऱ्या क्रयशक्तीची अदलाबदल होत असते. त्यामुळे विनिमय दर हा दोन देशांच्या चलनामध्ये असणाऱ्या खरेदी शक्तीवरून ठरतो. जेव्हा दोन देशातील चलनाची खरेदी शक्ती समान होते; त्या ठिकाणी समतोल विनिमय दर ठरतो.

म्हणजेच ''दोन अपरिवर्तनीय कागदी चलनाचा विनिमय दर हा साधारणपणे त्या दोन चलनाच्या खरेदी शक्तीच्या गुणोत्तराबरोबर असतो.'' "The rate of exchange between two inconvertible paper currencies tends to approximate the ratio of their purchasing power." ''दोन अपरिवर्तनीय कागदी चलनाचा समतोल विनिमय दर हा त्या चलनाच्या क्रयशक्तीत समानता निर्माण होऊन निश्चत होतो.'' "The equilibrium rate of exchange between two in convertible paper currencies comes to be determined by

equality of their purchasing power.” उदा. जर आपण भारत आणि अमेरिकेचा विचार केला तर असे म्हणता येईल की, भारतीयांकडून अमेरिकन डॉलरची मागणी ही अमेरिकन वस्तू खरेदी करण्यासाठी केली जाते. डॉलरच्या आहाय्याने किती नगसंख्येची खरेदी करता येईल. हे तेथील किंमत पातळींवर अवलंबून राहील. त्याप्रमाणे, अमेरिकन लोक भारतीय रूपयाची मागणी करताना रूपयाच्या साहाय्याने किती भारतीय वस्तू खरेदी करता येतील याचा विचार करतात. भारतीय रूपयाच्या साहाय्याने किती वस्तू खरेदी करता येतील हे भारतातील किंमत पातळीवर अवलंबून राहील आणि म्हणून कॅसल यांनी असे मत व्यक्त केले आहे की, अमेरिकन डॉलर आणि भारतीय रूपया मधील समतोल विनिमय दराची निश्चिती ही त्या दोन चलनाच्या खरेदी शक्तीच्या समानतेवर अवलंबून राहील. कॅसल यांनी आपला क्रयशक्ती समता सिद्धांत दोन दृष्टिकोनातून स्पष्ट केला आहे.

अ. निरपेक्ष दृष्टिकोन : (Absolute Version)

क्रयशक्ती समता सिद्धांताच्या निरपेक्ष दृष्टिकोनामध्ये दोन देशाच्या चलनाचा विनिमय त्या चलनाच्या अंतर्गत खरेदीशक्तीत प्रतिबिंबित होत असतो. या दृष्टिकोनानुसार एखादी वस्तू दोन भिन्न देशात खरेदी करण्यासाठी किती खर्च करावा लागेल. यावरून विनिम दर ठरविता येतो. ज्या ठिकाणी दोन चलनांची खरेदी शक्ती समान होते. त्या ठिकाणी दोन चलनाचा विनिमय दर ठरतो.

उदा. X वस्तूची खरेदी करण्यासाठी भारतात ४५,००० रूपये लागत असतील आणि तिच वस्तू अमेरिकेत १००० अमेरिकन डॉलरला खरेदी करता येत असेल तर भारतातील ४५,००० रूपयाची व अमेरिकेतील १००० डॉलरची खरेदी शक्ती X वस्तूच्या ठिकाणी समान होते. म्हणून दोन चलनांतील विनिमय दर = ४५००० रू./१००० डॉलर म्हणजेच ४५ रूपये = १ डॉलर असा निश्चित होईल.

दोन देशातील विनिमय दर पुढील सूत्राच्या साहाय्याने ठरविता येतो.

वरील सूत्रामध्ये R= pb.Qo / pa.Qo

R = Exchange Rate

pb = Prices in country ‘B’ ‘ब’ देशातील त्या वस्तूची किंमत

pa = Prices in Country ‘A’ ‘अ’ देशातील त्या विशिष्ट वस्तूची किंमत

Qo = Weights विशिष्ट नगसंख्या

P = एखाद्या वस्तूची विशिष्ट नगसंख्येची किंमत

वरील सूत्राच्या साहाय्याने दोन देशांतील विनिमयाचा दर हा त्या दोन देशांतील चलनाच्या अंतर्गत खरेदीशक्तीवर अवलंबून असतो. ‘‘दोन देशांतील चलनाच्या अंतर्गत क्रयशक्तीचे गुणोत्तर म्हणजेच त्या चलनाची क्रयशक्ती समता होय.’’ निरपेक्ष दृष्टीकोनानुसार विविध देशांतील चलनाचा समतोल विनिमय दर त्या दोन चलनाच्या खरेदी शक्तीच्या समानतेवरून ठरविला जातो. क्रयशक्ती समता सिद्धांताचा निरपेक्ष दृष्टिकोन व्यापारामुळे वस्तूच्या किंमती जगातील सर्व देशात समान असतात. या ग्रहीतावर आधारलेला आहे.

**ब. सापेक्ष दृष्टिकोन** : (Relative Version)

कॅसल यांनी क्रयशक्ती समता सिद्धांताचा सापेक्ष दृष्टिकोन पूर्वीच्या मांडलेला निरपेक्ष दृष्टिकोनापेक्षा आधुनिक असल्याने तो अधिक लोकप्रिय ठरला आहे. या दृष्टिकोनामध्ये अंतर्गत क्रयशक्ती आणि विनिमय दरात कसे बदल होतात. हे स्पष्ट करण्यात आले आहे. सापेक्ष दृष्टिकोनानुसार समतोल विनिमय दरातील बदल हे अंतर्गत क्रयशक्तीतील बदलामुळे घडून येतात. या ठिकाणी पूर्वीचे विनिमय दर समतोल विनिमय दर म्हणून गृहीत धरले जातात. आणि ते दर पायाभूत दर म्हणून स्वीकारले जातात आणि क्रयशक्तीतील बदल किंमत पातळीतील बदलाच्या निर्देशंकाच्या साहाय्याने मोजले जातात. व विनिमय दरातील बदलाचे मापन संबंधित किंमत पातळीतील बदलाच्या गुणोत्तराच्या साहाय्याने करता येते. त्यामुळे नवीन विनिमय दर निश्चित होतो.

सापेक्ष दृष्टिकोनानुसार विनिमय दर ठरविण्यासाठी पुढील सूत्राचा वापर केला जातो. ‘A’ आणि ‘B’ देशांमधील विनिमय दर कसा निश्चित केला जातो. हे पुढील सूत्राच्या साहाय्याने स्पष्ट करता येईल.

सूत्र : R3 = Ro pb1/pbo   pa1/pao या सूत्रात

R1 = नवीन विनिमय दर / दुरूस्त विनिमय दर

R1 = मूळ किंवा जुना समतोल विनिमय दर

pb1 = ‘B’ देशातील चालू किंमत निर्देशांक

pb0 = ‘B’ देशातील मूळ किंमत निर्देशांक

pa1 = ‘A’ देशातील चालू किंमत निर्देशांक

pa0 = ‘A’ देशातील मूळ किंमत निर्देशांक

वरील सूत्र दुसऱ्या पद्धतीने पुढीलप्रमाणे मांडता येते.

Foreign Exchange Rate = (Current Period)
= Base Rate x Foreign Price Index (in base period)
Domestic P. Index (in base period)
Domestic P. Index (in current period)

भारत आणि अमेरिका यांच्यातील विनिमय दर कसा निश्चित होतो. हे पाहण्यासाठी असे गृहीत धरूया की भारत-अमेरिका यांच्यातील मूळचा विनिमय दर १ रू. = २० सेंट्स आणि दोन्ही देशांतील मूळचा किंमत निर्देशांक १०० आहेत. समजा नंतरच्या काळात भारताचा किंमत निर्देशांक ३०० पर्यंत आणि अमेरिकेचा किंमत निर्देशांक १५० पर्यंत वाढला असेल तर नवीन विनिमय दर.

१रू. २०सेंट्स x १५०/१०० x २००/३००

= २० x १/२

= १० सेंट्स असेल.

यावरून असे म्हणता येईल की भारताचा किंमत निर्देशांक अमेरिकेच्या तुलनेने दोन पटीने वाढल्यामुळे रूपयाचे डॉलर मधील विनिमय मूल्य निमपटीने घटेल आणि डॉलरचे रूपयातील विनिमय मूल्य दोन पटीने वाढल्याचे दिसून येईल.

अशा रितीने गुस्ताव कॅसल यांनी आपल्या क्रयशक्ती समता सिद्धांताच्या साहाय्याने विनिमय दर कसा निश्चित केला जातो हे स्पष्ट केले आहे. दोन देशांतील चलनाची क्रयशक्ती ज्या बिंदूमध्ये समान होते; त्याठिकाणी समतोल विनिमय दर ठरतो असे स्पष्ट केले आहे. या सिद्धांतानुसार दोन देशातील किंमत पातळीमध्ये जसजसे बदल होत जातील त्या प्रमाणात चलनाच्या क्रयशक्तीत बदल होऊन विनिमय दरात देखील बदल होतात. क्रयशक्ती सिद्धांतात किंमत वाढीचा / तेजीचा परिणाम विनिमय दरावर होतो. क्रयशक्ती समता सिद्धांतानुसार विनिमय दर दोन देशांतील किंमत निर्देशांकातील फरकावर अवलंबून असतो आणि क्रयशक्ती समता ही त्या संबंधित देशातील किंमत वाढीवर अवलंबून असते.

PPP = DIR - FIR
PPP = क्रयशक्ती समता Purchasing Power Parity.
DIR = देशांतर्गत किंमतवाढीचा दर Domestic inflation Rate
FIR = विदेशी किंमत वाढीचा दर

Foreign inflation Rate

जेव्हा देशांतर्गत किंमत वाढ बाह्य किंमत वाढीच्या दरापेक्षा अधिक असते. (DIR > FIR) तर देशाच्या चलनाचे मूल्य घटते आणि देशांतर्गत किंमत वाढ बाह्य किंमत वाढीपेक्षा अधिक असते. (DIR < FIR) तेव्हा देशाच्या चलनाचे मूल्य वाढते. म्हणजेच चलनवाढ / किंमत वाढ आणि विनिमय घट हे एकमेकांवर अवलंबून असतात आणि ते एकत्रितपणे निश्चित होतात.

**क्रयशक्ती समता सिद्धांतावरील टीका :**

क्रयशक्ती क्षमता सिद्धांताच्या सापेक्ष दृष्टिकोनामध्ये देखील अनेक प्रकारचे दोष आहेत. प्रत्यक्षातील विनिमय दर हे खरेदी शक्ती समता सिद्धांतानुसार निर्धारित करण्यात आलेल्या विनिमय दरापेक्षा भिन्न असतात. आणि म्हणून क्रयशक्ती समता सिद्धांतावर पुढील प्रकारची टीका करण्यात येते.

१. क्रयशक्ती समता विनिमय दर यामध्ये प्रत्यक्ष कार्यात्मक संबंध असतो असे स्पष्ट करण्यात आले आहे. प्रत्यक्षात मात्र असा कार्यात्मक संबंध दिसून येत नाही. तसेच विनिमय दरावर क्रयशक्ती बरोबरच जकात, सट्टेबाजीचे व्यवहार, भांडवलाच्या हालचाली इत्यादींचा देखील परिणाम होत असतो. परंतू इतर घटकांकडे सिद्धांतात दुर्लक्ष करण्यात आले आहे.

२. क्रयशक्ती समता सिद्धांतामध्ये नवीन विनिमय दर ठरविण्यासाठी आपणास मूळ विनिमय दर / जुना समतोल दर माहीत असला पाहिजे. परंतु पूर्वी अस्तित्वात असलेला एखादा विशिष्ट विनिमय दर हाच समतोल दर आहे असे ठरविणे कठीण असते.

३. जर आर्थिक स्थितीत बदल होत नाहीत असे गृहीत धरले तरच क्रयशक्ती समता सिद्धांतानुसार दोन देशांतील चलनाचा नवीन विनिमय दर ठरविणे शक्य असते.

४. क्रयशक्ती समता सिद्धांतामध्ये चलनासाठी केली जाणारी मागणी ही प्रामुख्याने वस्तुच्या खरेदीसाठीच केली जाते असे मानण्यात आले आहे. परंतु भारतीय नागरिक अमेरिकन / चलनाची मागणी अमेरिकेत गुंतवणूक करण्यासाठी करतात. त्याचप्रमाणे अमेरिकन नागरिक भारतीय रूपयाची मागणी करतात. गुंतवणूक करण्यासाठी करतात. चलनाला असणारी मागणी ही भांडवलाची एका देशातून दुसऱ्या देशात होणाऱ्या हालचालीमुळे होते याकडे सिद्धांतात पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे. हा सिद्धांत विविध देशांत भांडवलाच्या शून्य हालचाली होतात. या गृहीतावर आधारलेला आहे.

५. देशांतर्गत किंमत पातळीतील बदलामुळे दोन देशांच्या चलनामधील विनिमय दरात बदल होतात. तसेच विनिमय दरातील बदलाचा किंमत पातळीवर कोणताही परिणाम होत नाही असे क्रियशक्ती समता सिद्धांतात स्पष्ट करण्यात आले आहे. प्रत्यक्षात मात्र किंमत पातळीतील बदलाचा विनिमय दरावर परिणाम होण्याऐवजी विनिमय दरातील बदलाचाच किंमत पातळीवर परिणाम होतो असे दिसून येते.

६. क्रयशक्ती समता सिद्धांतानुसार विनिमय दर ठरविताना प्रत्यक्ष व्यवहारामध्ये अनेक अडचणी येतात. सिद्धांतात चलानाची क्रयशक्ती मोजण्यासाठी किंमत निर्देशांकाचा उपयोग करावा असे सूचित करण्यात आले आहे. परंतु कोणत्या किंमत निर्देशांकाचा उपयोग करावा. उदा. घाऊक / ठोक किंमत निर्देशांक राहणीमानाचा निर्देशांक यापैकी कोणत्या निर्देशांकाचा उपयोग चलनाची क्रयशक्ती मोजण्यासाठी करावा हे ठरविणे. अवघड असते. तसेच दोन देशातील किंमत निर्देशांकाची तुलना करता येत नाही. कारण असे निर्देशांक काढताना वेगवेगळी पायाभूत वर्षाची निवड व वस्तूची निवड केलेली असते. त्यामुळे अशा भिन्न देशांतील किंमत निर्देशांक विचारात घेऊन चलनाची खरी क्रयशक्ती समता समजू शकत नाही.

७. क्रयशक्ती समता सिद्धांत सरकारच्या निर्हस्तक्षेप आणि मुक्त व्यापार - धोरणाच्या गृहीतावर आधारलेला आहे. परंतु ही गृहीते सध्य स्थितीत आवास्तव ठरली आहेत. पहिल्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय व्यापारावर सरकार अनेक प्रकारचे निर्बंध लादत आहे. तसेच जकाती, कोटा निश्चिती, निर्यात मदत इत्यादी मार्गाने देशी उद्योगांना संरक्षण दिले जात आहे. या सर्व निर्बंधाचा आंतरराष्ट्रीय व्यापारावर आणि विनिमय दराच्या निश्चितीवर परिणाम होत आहे आणि म्हणून विनिमय दराची निश्चिती क्रयशक्ती समता आणि किंमत पातळीवर केली जाते असे म्हणता येत नाही.

८. क्रशशक्ती समता सिद्धांतामध्ये विनिमय दर निश्चित करताना व्यवहारतोलातील चालू खात्यातील व्यवहारांना जरी महत्त्व दिले असले तरी भांडवली खात्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे.

९. या सिद्धांतामध्ये किंमत पातळीतील बदलानुसार विनिमय दरात बदल घडून येतात असे स्पष्ट करण्यात आले आहे. म्हणजेच विनिमय दरातील बदल देशांतर्गत किमान पातळीवर मुळीच परिणाम करीत नाहीत असे नमूद करण्यात आले आहे. परंतु ते सर्वस्व चुकीचे आहे. मागील अनुभवानुसार असे स्पष्ट होते की विनिमय दराचा किंमत पातळीवर परिणाम होत असतो. किंमत पातळीचा विनिमय दरावर परिणाम होत नसतो हे सिद्ध झाले आहे.

१०. क्रयशक्ती समता सिद्धांत स्थितीशील अर्थव्यवस्थेत खरा ठरणारा आहे. दोन देशांत जे बदल होतात; त्याकडे सिद्धांतात दूर्लक्ष करण्यात आले आहे. या सिद्धांतांत विनिमय दरातील बदलामुळे दोन देशांच्या संबंधावर परिणाम होतो. याचा सिद्धांताला विसर पडला आहे. जेव्हा दोन देशांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये नवीन एखादा तिसरा देश प्रवेश करतो. तेव्हा पूर्वीच्या दोन्ही देशांच्या व्यापारावर आणि त्याच्या अंतिम परिणाम विनिमय दरावर देखील झालेला दिसून येतो.

११. क्रयशक्ती क्षमता सिद्धांतात मागणी आणि पुरवठ्याची स्थिती आणि त्याचा विनिमय दरावर होणारा परिणाम याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. आधुनिक अर्थशास्त्रज्ञ जे. एम. केन्स यांच्या मते क्रयशक्ती समता सिद्धांतात मागणीच्या लवचिकतेचा परिणाम विचारात घेतलेला नाही.

उदा. भारतीय वस्तूंना अमेरिकेतून मागणी वाढली तर पूर्वी ज्या एक रूपयासाठी अमेरिकन नागरिक २० सेंट्स देण्यास तयार होते, त्या एक रूपयासाठी २५ सेंट्स देण्यात तयार होतील किंवा अमेरिमन पूर्वी एक रूपयासाठी २० सेंट्स स्वीकारत असतील तर किंमत वाढीमुळे १५ सेंट्स देखील स्वीकारण्यास तयार होतील आणि त्यामुळे दोन चलनांचा विनिमय दर बदलेल.

१२. प्रा. नर्क्स यांच्या मते क्रयशक्ती समता सिद्धांतात विनिमय दरावर परिणाम करणारा किंमत पातळीतील बदल हा एकमेव घटक मानून इतर घटकांकडे दुर्लक्ष केले आहे. मागणी केवळ किंमतीवर अवलंबून नसते तर ती मिळणारे उत्पन्न आणि खर्च यामधील व्यापारचक्रामुळे होणाऱ्या बदलांवर देखील अवलंबून असते. त्यामुळे किंमत पातळी स्थिर राहून देखील व्यापारातील व्यापारचक्रामुळे होणाऱ्या बदलामुळे देखील विनिमय दरात बदल घडून येतात.

१३. देशाच्या आयात-निर्यात व्यापारावर सरकारकडून अनेक प्रकारचे निर्बंध लादले जातात. उदा. आयात निर्यात जकात, आयात परवाने, आयात कोरा आणि इतर निर्बंधामुळे आयात निर्यात व्यापारावर परिणाम होऊन त्याचा अंतिम परिणाम विनिमय दरावर झालेला दिसून येतो. परंतु इतर घटकांकडे क्रयशक्ती समता सिद्धांतात फारसे लक्ष देण्यात आलेले नाही.

क्रयशक्ती समता सिद्धांतावर जरी वरील प्रकारचे आक्षेप घेतले जात असले तरी या सिद्धांताचे महत्त्व कमी लेखता येत नाही. कारण या सिद्धांतानेच विनिमय दरातील दीर्घकालीन बदलाचे सविस्तर विवेचन केले आहे. या सिद्धांतात व्यवहारतोल कसा निश्चित केला जाते. असे स्पष्ट करताना किंमत पातळीतील होणाऱ्या बदलाचा परिणाम व्यवहारतोल व व्यवहारतोल कसा होतो हे स्पष्ट केले आहे. त्यामुळेच दीर्घकाळात विनिमय दर किंमत पातळीतील बदलावरच अवलंबून असतात. किमतीतील बदलाचा विनिमय दरावर परिणाम होतो हे स्पष्ट झाल्याने या सिद्धांताचे महत्त्व मान्य करावे लागते. जरी या सिद्धांताच्या काही उणिवा असल्यातरी दीर्घकाळात विनिमय दर कसा निश्चित केला जातो आणि त्याचा व्यापारतोल आणि व्यवहारतोल यावर काय परिणाम होतो हे सिद्धांतात स्पष्ट करण्यात आले आहे. म्हणून क्रयशक्ती समता सिद्धांताने आपली उपयुक्तता टिकवून ठेवली आहे.

### आपली प्रगती तपासा

१. खरेदीशक्ती समता सिद्धांतातील सापेक्ष दृष्टीकोन व निरपेक्ष दृष्टीकोन स्पष्ट करा.

**१३.३.१ व्यवहारतोल सिद्धांत :** (Balance of Payment Theory)

मुक्त विनिमय दर पद्धतीमध्ये एका देशाच्या चलनाचे दुसऱ्या देशाच्या चलनातील मूल्य हे व्यवहारतोलाच्या स्थितीवर अवलंबून असते असे विनिमय दरासंबंधीच्या व्यवहारतोल सिद्धांतात स्पष्ट करण्यात आले आहे. अमेरिकन डॉलरसाठी असणारी भारतीयांची मागणी ही अमेरिकन वस्तू, सेवा आणि अमेरिकेतील गुंतवणूकीसाठी केली जाते. भरतीयांची अमेरिकन डॉलरसाठी मागणी ही भारतीयांकडून अमेरिकन वस्तू आणि सेवा आणि अमेरिकेत होणाऱ्या गुंतवणूकीतून व्यक्त होत असते. अमेरिकन डॉलरचा पुरवठा हा भारतीय वस्तू व सेवा आणि अमेरिकन नागरिकांकडून भारतात गुंतवणूक करण्यासाठी केला जातो. त्याचप्रमाणे अमेरिकन लोकांची भारतीय रूपयासाठी मागणी होत असते.

जेव्हा भारताचा व्यवहारतोल समतोल असतो म्हणेच व्यवहारतोलात तूट किंवा शिल्लक नसते तेव्हा विनिमय दर हा समतोल विनिमय दर असतो. मात्र जेव्हा भारताच्या व्यवहारतोलात शिल्लक असते. (म्हणजेच अमेरिकनांची भारतीय रूपयासाठी असणारी मागणी ही भारतीयांकडून होणाऱ्या डॉलरच्या मागणीपेक्षा अधिक असते.) तेव्हा विनिमय दर भारतीय रूपयाच्या दृष्टीने अनुकूल ठरतो. त्यामुळे भारतीय रूपया अमेरिकन डॉलरपक्षा डॉलरपेक्षा अधिक महाग होतो याउलट जर भारताच्या अमेरिकेत होणाऱ्या वस्तू व सेवांच्या निर्यात मूल्यापेक्षा अमेरिकेतून भारतात होणाऱ्या वस्तू व सेवांच्या आयात मूल्यापेक्षा अधिक असेल. तर विनिमय दर भारतीय रूपयाच्या दृष्टीने प्रतिकूल बनतो. त्यामुळे भारतीय रूपया अमेरिकन डॉलरपेक्षा अधिक स्वस्त होतो. त्यामुळे विनिमय दरासंबंधीच्या व्यवहारतोल सिद्धांतानुसार दोन देशातील अपरिवर्तनीय कागदी चलनपद्धती अस्तित्वात असताना विनिमय दर हा विदेशी चलनाला असणारी मागणी आणि विदेशी चलनाचा पुरवठा याच्या समतोलातून निश्चित होतो. अमेरिकेच्या बाजूने विचार केल्यास अमेरिकन डॉलर आणि भारतीय रूपयामधील विनिमय दर हा जेव्हा भारतीयांकडून अमेरिकन डॉलरसाठी केली जाणारी मागणी आणि अमेरिकन डॉलरचा पुरवठा याच्या समतोलातून ठरतो, भारताच्या बाजूने विचार केल्यास भारतीय रूपयाचा पुरवठा आणि अमेरिकेतून रूपयासाठी होणारी मागणी यांच्या समतोलातून विनिमय दर ठरतो.

जेव्हा विनिमय दर संतुलित विनिमय दरापेक्षा कमी होतो. तेव्हा भारतास व्यवहारतोलातील तुटीच्या समस्येला तोंड द्यावे लागते. अशा वेळी भारतातून अमेरिकेत मोठ्या प्रमाणात निर्यात करून आणि अमेरिकेतून भारतात होणारी आयात कमी करून व्यवहारतोलातील तूट कमी करावी लागेल आणि समतोल विनिमय दर प्रस्थापित करता येईल.

याउलट भारताच्या व्यवहारतोलात शिल्लक असेल तर विनिमय दर संतुलित दरापेक्षा वरच्या पातळीला जाईल. त्याचा परिणाम भारताची निर्यात कमी होईल आणि अमेरिकेतून होणारी आयात वाढेल, अमेरिकन डॉलर आणि भारतीय रूपयातील विनिमय दर संतुलित विनिमय दराच्या दिशेने वाढेल.

थोडक्यात असे म्हणता येईल की, अपरिवर्तनीय कागदी चलन असलेल्या दोन देशांतील चलनाचा विनिमय दर हा त्या चलनाला असलेल्या मागणी आणि पुरवठा यांच्या समतोलातून निश्चित होतो. मागणी आणि पुरवठ्यात होणारा कोणताही बदल विनिमय दरात बदल घडवून आणतो आणि दैनंदिन स्वरूपात व्यवहारतोलात समतोल घडवून आणतो. विनिमय दराच्या व्यवहारतोल सिद्धांतामध्ये असेही स्पष्ट करण्यात येते की भारतीय वस्तू आणि सेवांना

अमेरिकेतून होणारी मागणी आणि अमेरिकन वस्तू व सेवांना भारतातून होणारी मागणी ही त्या देशांतील मागणीच्या अन्योन्य लवचिकतेवर आणि एकमेकांच्या (Reciprocal Elasticities) आणि एकमेकांच्या देशांत केल्या जाणाऱ्या गुंतवणूकीवर अवलंबून असते.

विनिमय दरासंबंधीच्या व्यवहारतोल सिद्धांतावरून असे स्पष्ट होते की, विनिमय दर हा त्या देशातील चलनाला असणारी मागणी आणि चलनाचा पुरवठा याच्या समतोलावरून ठरत असतो. हा सिद्धांत सर्वसाधारण मागणी पुरवठा सिद्धांत म्हणून देखील ओळखला जातो. कारण या सिद्धांतात विनिमय दर हे मागणी व पुरवठ्याचे फलन असते. त्यामुळे चलनाच्या क्रयशक्तीचा विनिमय दराच्या निश्चितीवर परिणाम होत नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे. या या सिद्धांतानुसार विदेश विनिमयासाठी केली जाणारी मागणी ही व्यवहारतोलाची देणे (Debit) बाजू असते तर विदेशी चलनाचा पुरवठा ही येणे (Credit) बाजू असते. तसेच व्यवहारतोल विदेशी चलनाची मागणी आणि पुरवठा हे व्यवहारतोलावरून ठरत असतात. या सिद्धांतानुसार मागणी - पुरवठा पत्रक आणि त्यांच्यातील क्रिया - प्रतिक्रियेवरून समतोल विनिमय दर ठरविला जातो. या सिद्धांतात असेही स्पष्ट करण्यात आले आहे की जेव्हा चलनाचे मूल्य कमी असते तेव्हा त्याची अधिक मागणी केली जाते.

त्यामुळेच मागणी वक्र डावीकडून उजवीकडे घसरणारा असतो. तर दुसऱ्या बाजूला पुरवठा वक्र वरच्या बाजूने वाढत गेलेला असतो; कारण चलनाचे मूल्य जसेजसे वाढत जाते तसा पुरवठा वाढत जातो. विदेशी चलनाची मागणी आणि विदेशी चलनाचा पुरवठा याच्या ममतोलातून विनिमय दर कसा निश्चित केला जातो. हे पुढील आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट करता येते.
वरील आकृती मध्ये 'ox' अक्षावर डॉलरमधील चलनाचा पुरवठा आणि 'oy' अक्षावर रूपयाची डॉलरमधील किंमत म्हणजेच विनिमय दर दर्शविण्यात आला आहे. 'ss' हा चलनाला पुरवठावक्र आणि 'DD' हा मागणी वक्र असून हे दोन्ही वक्र एकमेकांना 'E' बिंदूमध्ये छेदतात. त्यामुळे 'OR' किंवा 'EM' हा विनिमय दर निश्चित होतो. कारण या बिंदूत चलनाची मागणी आणि पुरवठा (OM) दोन्ही समान होतात.

जेव्हा चलनाचा पुरवठा मागणीपेक्षा अधिक राहतो तेव्हा विनिमय दर कमी होतो आणि मागणीपेक्षा पुरवठा कमी झाला तर विनिमय दर वाढतो. म्हणजेच विनिमय दरातील बदलानुसार चलनाच्या मागणी आणि पुरवठ्यात बदल होतात. त्याचप्रमाणे मागणी पुरवठ्यातील बदलानुसार विनिमय दरात देखील बदल घडून येतात. थोडक्यात सर्वसाधारण मूल्य सिद्धांताप्रमाणेच विदेशी चलनाची मागणी आणि विदेशी चलनाचा पुरवठा यांच्या समतोलातून विनिमय दर निश्चित होतो.

### सिद्धांताचे महत्त्व (Importance of the theory)

१. या सिद्धांताला महत्त्व प्राप्त होण्याचे महत्त्वाचे कारण असे की सर्वसाधारण मूल्य सिद्धांताप्रमाणेच विनिमय दर देखील दोन देशांतील चलनाला असणारी मागणी आणि चलनाचा पुरवठा यांच्यातील समतोलातून समतोल विनिमय दर ठरतो, असे या सिद्धांतात स्पष्ट करण्यात आले आहे.

२. या सिद्धांतात आयात आणि निर्यात या दोन घटकांबरोबरच व्यवहारतोल समाविष्ट असणाऱ्या इतर घटकांचा परिणाम देखील विनिमय दराच्या निश्चितीवर होतो हे स्पष्ट करण्यात आले आहे.

३. या सिद्धांतावरून असे स्पष्ट होते की व्यवहारतोलातील असमतोल विनिमय दरात अल्पसा बदल करून देखील दूर करता येतो. चलनाचे अवमूल्यन किंवा पुनर्मूल्यांकन करून व्यवहारतोलातील असमतोल कमी करता येतो हे सिद्धांतातून स्पष्ट झाल्याने या सिद्धांताची व्यावहारिक उपयुक्तता वाढली आहे.

**सिद्धांतावरील टीका** (Criticisms) :

१. या सिद्धांताचा महत्त्वाचा दोष असा की सिद्धांतात पूर्ण स्पर्धेचे अस्तित्व, चलनाच्या मुक्त हालचाली यासारख्या गोष्टी गृहीत धरल्या आहेत. प्रत्यक्षात अशी परिस्थिती अस्तित्वात नसल्याने हा सिद्धांत अवास्तव ठरतो.

२. या सिद्धांनुसार विनिमय दर आणि किंमत पातळी यांच्यात कार्यात्मक संबंध नसतो असे स्पष्ट करण्यात आले आहे. परंतु प्रत्यक्षात विनिमय दर आणि किंमत पातळीत संबंध असतो.

कारण किंमत पातळीतील बदलाचा व्यवहारतोलावर आणि विनिमयदरावर देखील परिणाम होत असतो. मात्र सिद्धांतात त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

३. सिद्धांतात असे स्पष्ट करण्यात आले आहे की, विनिमय दर हे व्यवहारतोलाचे फलन असते. परंतु प्रत्यक्ष व्यवहारामध्ये असे दिसून येते की विनिमय दरातील बदलाचा व्यवहारतोलावर परिणाम होताना दिसून येतो. म्हणजेच व्यवहारतोल हे विनिमय दराचे फलन असते.

४. विनिमय दरासंबंधीचा व्यवहारतोल सिद्धांत हाच एक अर्धसत्य आहे. कारण व्यवहारतोल हा नेहमीच संतुलित असतो. त्यामुळे व्यवहारतोलात समतोल करण्यासाठी विनिमय दरात बदल करण्याची आवश्यकता नसते.

५. या सिद्धांतात देशांतर्गत किंमत पातळीचा विनिमय दरावर आणि शेवटी व्यवहारतोलावर देखील परिणाम होतो. मात्र विनिमय दरासंबंधीच्या व्यवहारतोल सिद्धांतात देशांतर्गत किंमत पातळीला फारसे महत्त्व देण्यात आलेले नाही. परंतु किंमत पातळीतील बदलामुळे विनिमय दरात देखील बदल घडून येतो. आणि शेवटी व्यवहारतोलावर देखील परिणाम होत असतो. मात्र सिद्धांतात त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

६. या सिद्धांतात असे स्पष्ट करण्यात आले आहे की जेव्हा देशाचा व्यवहारतोल समतोल असता

े तेव्हा संतुलित विनिमय दर निश्चित होतो. प्रत्यक्षात व्यवहारतोल कधीच समतोल असू शकत नाही.

तो एक तर शिलकीचा किंवा तुटीचा व्यवहारतोल असतो म्हणजेच संतुलित व्यवहारतोल क्वचितच दिसून येतो. प्रत्यक्षात विनिमय दर हा तुटीच्या किंवा शिलकी व्यवहारतोलामुळे अस्तित्वात आलेले दिसून येतात.

**आपली प्रगती तपासा**

१. व्यवहारतोल सिद्धांत म्हणजे काय ?

## ११.४ परकीय विनिमय बाजाराचे प्रकार :

परकीय विनिमयाचा उद्देश हा आहे की, बाजारात व्यवहार करणे. त्याचे वर्गीकरण हजर बाजार आणि वायदा बाजार असे असे केले जाते.

१. हजर बाजार (Spot Market) :
परकीय विनिमयाची देवाण-घेवाणीचे व्यवहार त्या ठिकाणी २४ तासांत केले जातात. अल्पकालावधीत विदेशी चलनाची खरेदी विक्री करण्यासाठी विनिमयाचा जो दर निश्चित केला जातो. त्या विनिमय दरास हजर बाजार दर म्हणतात. हजर दरात विक्रीचा दर आणि खरेदीचा दर दोन्ही वेगवेगळे असतात. हजर दरात केबलदर, अंतरणदर, टपाल अंतरण दर यांचा समावेश होतो. ज्या वेळेस परकीय चलनाचा खरेदीदार परकीय चलनाची किंमत देशांतर्गत चलनामध्ये बँकेत जमा करते. तेव्हा त्यांच्या जमा खात्यावर हजर दराने रक्कम जमा केली जाते.

२. वायदे बाजार :
वर्तमान काळात प्रचलित दराने भविष्यासाठी लागणारी किंवा करावयाची खेरदी-विक्री परदेशी चलनाच्या विशिष्ट बाजारात करतात, तेव्हा त्या बाजारात 'वायदा बाजार' असे म्हणतात. वायदे बाजारात व्याजदर महत्त्वाचा असतो. देश तारणावर अधिक व्याज देतो. तेव्हा चलनाचा वायदा दर कमी असतो. जर खरेदीचा भविष्यकालीन कालावधी अधिक असेल तर कसर दर किंवा विनिमयाची किंमत अधिक राहते. 'वर्तमानकाळात ठरलेल्या ज्या दराने भविष्यकाळात खरेदी - विक्री होणार असेल तर त्यास वायदा दर असे म्हणतात.'

विनिमय बाजाराला नियंत्रण नसल्यास मोठ्या प्रमाणात विनिमय दरात चढउतार होतात. त्यामुळे आयात-निर्यातीत अनिश्चितता निर्माण होते. अशा स्थितीत भविष्यात परकीय चलनाची खरेदी किंवा विक्री करावी लागणार असेल तर आयात-निर्यात व्यापारी ती खरेदी विक्री वर्तमानकाळातच करतात.

परकीय चलनाची असणारी मागणी ही वस्तू व सेवांची आयात करणारे आयात व्यापारी आणि सट्टेबाजीचे व्यवहार करणाऱ्या दलालांकडून केली जाते. हे दलाल परकीय चलनाची खरेदी वर्तमानकाळात करतात व भविष्यात विक्री करतात. तसेच परकीय चलनांचा पुरवठा वस्तू व सेवांची निर्यात करणारे व्यापारी आणि दलांलांकडून केली जाते. त्यावेळेस भविष्यात वायदा दर घसरण्याची शक्यता असते. तेव्हा वर्तमानकाळात मोठ्या प्रमाणात परकीय चलनाची विक्री केली जाते. त्यावेळेस वायदा बाजारातील दलाल व सट्टेबाज किंमतीतील बदलानुसार आपआपल्या जवळीत विदेशी चलनाचे रूपांतर एका देशातून दुसऱ्या देशात करतात.

**आपली प्रगती तपासा**

१. परकीय विनिमय बाजाराचे घटक स्पष्ट करा.

२. परकीय विनिमय बाजाराचे प्रकार होणते ?

## ११.५ विनिमयदर धोके : कारणे व व्यवस्थापन

प्रस्तावना : परकीय चलनाच्या अभ्यासात एका देशाच्या चलनाची देवघेव दूसऱ्या देशाच्या चलनाबरोबर करण्यासंबंधी अभ्यास केला जातो.

परकीय चलन बाजारात परकीय चलनाची खरेदी विक्री होते. किंवा वायद्याचे व्यवहार होतात. ज्यांच्याकडे परकीय चलन आहे ते विक्रेते आणि ज्यांना परकीय चलनाची गरज आहे ते ग्राहक बाजारात एकत्र येतात आणि मागणी व पुरवठ्यावरून चलनाचा विनिमयदर ठरतो. १९९३ पासून भारतात टप्प्याटप्प्याने परकीय चलन बाजार निर्माण झाला आहे.

बदलत्या विनिमयदरामुळे नुकसान होण्याचा धोका टाळण्यासाठी वायदे व्यवहार केले जाते. यातून वायदे बाजार निर्माण होतो. पुढच्या तारखेला खरेदी करण्यासाठी आधीच्या तारखेला निश्चित विनिमय दराने करार केला जातो. उदा. एका आयात दाराला एका महिन्यानंतर परकीय चलन द्यावयाचे आहे. तो विक्रेत्याशी आज ठराविक दराने एका महिन्यानंतर परकीय चलन खरेदीचा करार करतो. विनिमयदर येथेही मागणी व पुरवठा या तत्वाप्रमाणे ठरतो. जर पुढे परकीय चलनाचा तुटवडा निर्माण होईल असे वाटले तर वायदे बाजारात परकिय चलन प्रचलित दरापेक्षा जास्त दराने खरेदी केले जाईल. रोजच्या हजर विनिमयदरापेक्षा वायदे बाजारातील दर जास्त राहील. अशा फरकाला प्रीमीयम असे म्हणतात. उलट परिस्थितीत वायदे बाजारातील दर कमी राहील. या फरकाला कसर / वटाव दर असे म्हणतात. प्रिमीयम व कसर दर हे टक्केवारीत सांगितले जातात. अशा व्यवहारात सट्टे बाजी होऊ नये यासाठी यावर नियंत्रणे असतात. भारतात आयात व निर्यात यांच्या पक्क्या व्यवहारांसाठीच बँका वायदाने परकीय चलन विकतात व विकत घेतात.

नेहमीच्या बाजारात परकीय चलन विकत घेऊन वायदे बाजारात विकणे किंवा याविरूद्ध व्यवहारांना ''स्वॅप व्यवहार'' असे म्हणतात. वायदे बाजारात व्यवहार करताना अशी अदलाबदल करणे आवश्यक असते.

दोन ठिकाणच्या बाजारात विनिमय दरात फरक पडला तर जेथे परकीय चलनाचा दर कमी आहे. तेथून परकीय चलन विकत घेणे व जेथे जास्त दर आहे तेथे विकले जाते अशा व्यवहारांना ''आर्वोट्रेज'' असे नाव दिले जाते. यामुळे सर्व ठिकाणी दर समान होतात.

**आपली प्रगती तपासा**

प्र.१ स्वॅप व चलनदेवाणघेवाण म्हणजे काय ?

## ११.६ प्रश्नमालिका

प्र.१ विनिमयदराचा व्यवहारतोल सिद्धांत स्पष्ट करा.

प्र.२ विनिमयदराचा खरेदीशक्ती समता सिद्धांत स्पष्ट करा.

प्र.३ हजर दर व वायदा दर या विनिमयाच्या संकल्पना स्पष्ट करा.

प्र.४ परकीय विनिमयदर जोखीमेची कारणे व व्यवस्थापक याविषयी चर्चा करा.

❖❖❖

# १२

# आंतरराष्ट्रीय मौद्रिक पद्धत

(INTERNATIONAL MONETARY SYSTEMS)

**पाठ्यक्रम:**


१२.० उद्दिष्ट्ये
१२.१ प्रस्तावना
१२.२ सुवर्णपरिमाण पद्धतीचा आढावा
१२.३ ब्रेटन वुड्स पद्धत
१२.४ विनिमय दर :
    १२.३.१ स्थिर विनिमय दर पध्दत
    १२.३.२ बदलता /लवचिक विनिमय दर पध्दत
१२.५ प्रश्नमालिका


## १२.० उद्दिष्ट्ये Objectives :

या पाठात आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्था कशा प्रकारची आहे. विनिमय दर कसे निश्चित होतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर कोणती वित्तिय आरिष्ट्ये निर्माण होतात. विनिमय दराच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय नाणे निधिची कोणती भूमिका असते, आंतरराष्ट्रीय रोखता इ. संबंधीचा अभ्यास करणार आहोत.

या पाठाची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.
१. सुवर्णमान पद्धत व ब्रेटन वुड्स पद्धतीचा अभ्यास करणे.
२. विनिमय दर व त्यांचे प्रकार अभ्यासणे.
३. वित्तीय आरिष्ट अर्थ, कारणे व उपाय अभ्यासणे.
४. आंतरराष्ट्रीय रोखता या संकल्पनेचा अभ्यास करणे.
५. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची भूमिका - या बाबत माहिती घेणे.

## १२.१ प्रस्तावना Introduction :

कोणतेही राष्ट्र सर्व प्रकारच्या वस्तु व सेवा स्वतः आवश्यक तेवढ्या प्रमाणात व कायम स्वरूपी निर्माण करू शकत नाही. यातूनच आंतरराष्ट्रीय स्तरावर वस्तुंची व सेवांची देवाण-घेवाण करण्याची गरज निर्माण होते. त्यातून आंतरराष्ट्रीय व्यापाराचा जन्म होतो आंतरराष्ट्रीय आर्थिक व व्यापार विषयक संबंध निर्माण होतात. यातही बदलत्या परिस्थितीनुसार व्यापार विषयक धोरणात बदलांची आवश्यकता निर्माण होते. या प्रकारात आपण आंतरराष्ट्रीय मौद्रिक पद्धती व त्या संबंधी विविध संकल्पनांचा अभ्यास करणार आहोत. सुवर्णमान पद्धत, ब्रेटन वूड्स पद्धत,

स्थिर - बदलते व तरता विनिमय दर त्या संदर्भात मध्यवर्ती बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची भूमिका वित्तीय आरिष्ट्ये, त्यापासून विकसनशील देशांनी घ्यावयाचा धडा इ.चा आढावा घेणार आहोत. याबरोबरच पूर्व आशियाई देशातील विनिमय दरावर १९७३ व १९८० साली तेलाच्या किंमती भडकल्यामुळे झालेला परिणाम याचाही अभ्यास करणार आहोत.

## १२.२ सुवर्णमानाच्या अंतर्गत विनिमय दर :

सुवर्णमान पद्धतीत प्रत्येक चलनाचे मूल्य सुवर्णात निश्चित करीत असल्यामुळे प्रत्येक देशाच्या सुवर्णाच्या आयातीस व निर्यातास पूर्णपणे मोकळीक असते. कोणतेही निर्बंध नसल्यामुळे जगातील सर्व देशांची चलने परस्परांशी एका समान दुव्याने जोडलेली असतात. सुवर्णमाान पद्धती मध्ये सुवर्णाचा समच्छेदक दुवा हे महत्त्वाचे लक्षण असते. आज जगात एकाही देशात सुवर्णमान पद्धती अस्तित्वात नाही, तरी वर्तमान विनिमय दर समजावून घेण्यासाठी व चांगल्या पद्धतीने आकलन होण्यासाठी या पद्धतीत विनिमय दर कसा ठरतो हे अभ्यासणे महत्त्वाचे आहे.

जेव्हा देशामध्ये सुवर्णमान पद्धती चालू असते तेव्हा दोन देशातील विनिमय दर हा टांकसाळ दरावर (Mint per rate) अवलंबून असतो व हा दर एका प्रमाणका भोवती घोटाळत असतो. आणि हा प्रमाणक दोन्ही चलनाच्या एका चलनाच्या सुवर्णमात्रांच्या गुणोत्तरावर आधारलेला असतो.

टाकसाळ समता दराचा सिद्धांत :

Mint Parity Theory

सुवर्णमान चलन पद्धतीत जेव्हा जगातील सर्व देशांमध्ये प्रत्यक्ष सोन्याची नाणी चलनात होती तेव्हा विनिमय दर ठरविण्यासाठी जी पद्धती वापरली जात होती तिला 'टांकसाळ समता' असे म्हणतात. जेव्हा दोन देश सुवर्ण धातूचा चलनात उपयोग करीत असतात तेव्हा एका देशातील सोन्याच्या नाण्यातील शुद्ध सोन्याच्या वजनाबरोबर दुसऱ्या देशातील तितक्याच सुवर्णात किती नाणी बसतात, याला टाकसाळ समता दर असे म्हणतात.

उदा. भारतीय रूपयामध्ये ५ ग्रॅम सुवर्ण व डॉलरच्या नाण्यात २५ ग्रॅम सुवर्ण असेल तर १ डॉलर बरोबर भारतीय ५ रूपये असा विनिमय दर ठरेल.

सुत्र : टाकसाळ समता दर = $\frac{\text{एका देशाच्या चलनातील शुद्ध सुवर्ण}}{\text{दुसऱ्या देशाच्या चलनातील शुद्ध सुवर्ण}}$

$= \frac{\text{पौडांमधील शुद्ध सुवर्ण}}{\text{डॉलरमधील शुद्ध सुवर्ण}}$

$\frac{113.00\ .\ 4.86}{23.22} = 4.86$

= 4.86 असा विनिमय दर ठरेल.

सुवर्ण बिंदु - (The Gold Points)

सुवर्णमान पद्धतीत विनिमय दर हा टांकसाळ समता दरावर आधारित असतो. टाकसाळ समता दर हा स्थिर असतो. परन्तु प्रत्यक्ष विनिमय दर हा या भोवती घोटाळत असतो. चलनासाठी असलेली मागणी व पुरवठा सम-समान असेल तर विनिमय दर टांकसाळ समता दर समान

राहील. जर मागणी - पुरवठा सम-समान नसतील तर प्रत्यक्ष विनिमय दरात चढ-उतार ज्या कक्षेत होतात त्यांना सुवर्ण निर्यात बिंदू व सुवर्ण आयात बिंदू असे म्हणतात.

सुवर्ण निर्यात बिंदू : (Gold Export Point)
टांकसाळ समता दरापेक्षा विनिमय दर वर सरकला तरी तो एका विशिष्ट बिंदूच्या पलीकडे जावू शकत नाही. कारण ही कमाल मर्यादा ओलांडल्यास आयातदार सुवर्णाची निर्यात सुरू करतील. विनिमय दरात होणाऱ्या परिवर्तनाची उच्चतम सीमा म्हणजेच सुवर्ण निर्यात बिंदू होय.

सुवर्ण आयात बिंदू (Gold Import Point) :
विनिमय दरातील बदलाची न्यूनतम सीमा म्हणजे आयात बिंदू होय. टांकसाळ समता दरापेक्षा विनिमय दर खाली घसरला, तर तो किती खाली जाईल याला जी मर्यादा असते त्याला सुवर्ण

**आपली प्रगती तपासा :**

१. सुवर्णमान पद्धतीचा आढावा घ्या.

## १२.३ ब्रेटन - वुड्स पद्धतीचा ऱ्हास (Collapse of Bretton woods system)

प्रादेशिकता वाद उफाळून येण्यास काही प्रमाणात आंतरराष्ट्रीय मौद्रिक व्यवस्थाही कारणीभूत ठरली. पहिल्या महायुद्धाच्या काळात सुवर्ण परिमाणाचा त्याग जगातील बऱ्याच देशांनी केला. तर अमेरिका सारख्या काही देशांनी पहिल्या जागतिक महायुद्धानंतर पुन्हा सुवर्ण परिमानाचा स्वीकार केला. तसेच पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात अनेक देशांनी बदलत्या विनिमय दराचे धोरणही स्वीकारले.

बदलत्या विनिमय दरामुळे निर्माण झालेल्या परकीय चलन बाजारातील अस्थिर परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी ब्रेटन-वुड्स येथे जुलै १९४४ साली ४४ देशांची परिषद घेण्यात आली. ब्रेटन-वुड्स परिषदेनुसार चलन व्यवस्थेसाठी सुवर्ण धातु ऐवजी अमेरिकन डॉलरची निवडे करण्यात आली.

तसेच व्यापार आणि वित्त याच्या बाबतीत देशांना नियमांची संहिता घालून दिली. व्यापारतोल समस्येवर मात करण्यासाठी उपाय योजना सुचवण्यात आल्या. ब्रेटन वुड्स पद्धतीनुसार सर्वच चलने अमेरिकन डॉलरला स्थिर विनिमय दराला पद्धतीनुसार सर्वच चलने अमेरिकन डॉलरला स्थिर विनिमय दराला खिळवून ठेवलेली होती. मात्र कालांतराने ब्रेटन-वुड्स पद्धती कोसळली. मात्र ब्रेटन - वुड्स पद्धतीने आंतरराष्ट्रीय स्तरावर एक महत्त्वाची मौट्रिक संस्था उदयास आली आणि त्याच बरोबर आंतरराष्ट्रीय नाणे निधि (IMF) सुरू झाली. IMF ची कार्यवाही १ मार्च १९४७ साली झाली. विनिमय दरातील स्पर्धात्मक घसरण थांबवणे, परकीय चलनावरील बंधने कमी करणे हे IMP चे महत्त्वाचे कार्य.

जागतिक पातळीवर त्यानंतर अनेक मौद्रिक सुधारणा करण्यात आल्याचे दिसून येते. १९७१-७२ नंतर विनिमय किलनपासून बरेचसे देश त्या विनिमय दराकडे वळले. अर्थात हा तरलता

विनिमय दर म्हणजे नियंत्रित दर होय. IMF च्या स्थापनेनंतर सुरूवातील आंतरराष्ट्रीय रोखतेच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले.

IMF च्या सदस्य स्थापनेसाठी SDR पद्धती १९७० च्या दशकात सुरू करण्यात आली. अशा प्रकारे सुवर्ण राखीव पद्धतीचे उच्चाटन करण्यात आले. S.D.R. च्या स्वरूपात सदस्य देशांना त्यांच्या चलनाचे मूल्य आणि कोटा राखून ठेवण्यास परवानगी दिलेली आहे.

१९८१ साला पासून एक महत्त्वाचा बदल S.D.R. च्या बाबतीत करण्यात आला. तो म्हणजे S.D.R. धारण करण्याची मर्यादा पूर्णपणे काढून टाकण्यात आली.

(७.६) २. स्थिर विनिमय दर विरूद्ध बदलते विनिमय दर :
परकीय विनिमय दर स्थिर किंवा बदलते असतात. दोन्हींचेही फायदे आणि तोटे असतात. त्यांची चर्चा खालीलप्रमाणे :-

**१२.४.१ स्थिर विनिमय दर :**

स्थिर विनिमय दरात सर्व परकीय विनिमय व्यवहार देशाच्या वित्तीय अधिकारात विनिमय दराच्या ठिकाणी ठरवून घेतले जातात. विनिमय दर स्थिर ठेवण्यासाठी कायद्याने परकीय चलन बाजारात मध्यस्थ म्हणून वित्तीय अधिकारात मागणी आणि पुरवठ्याची पोकळी भरून काढण्यासाठी मध्यवर्ती बँकेत चलन राखीव ठेवले जाते. 'जेव्हा परकीय चलनाची देवाण-घेवाण सरकारने कायद्यानुसार ठरविलेल्या विनिमय दरानुसार केली जाते. तेव्हा त्या दरास स्थिर विनिमय दर म्हणतात.'
१. स्थिर विनिमय दराबाबतीत : स्थिर किंवा स्थिर विनिमय दराच्या बाजूचे युक्तिवाद :

**१. कॉमन चलनाचा आधारः**

`वेगवेगळ्या देशातील स्थिर विनिमय दराचा आधार कॉमन चलनाचा असतो. कारण कॉमन चलनाचे मूल्य निश्चित असते. त्यामुळे व्यापारात वाढ आणि उत्पादन आणि आर्थिक वाढीचा जलद दर साध्य होतो. परिणामी परकीय व्यापार आकर्षित होऊन वस्तूच्या किंमती व्यापाराबरोबर सांगितल्या किंवा भाकीत केल्या जातात. जॉन्सन यांच्या मते विनिमय दरामुळे आंतरराष्ट्रीय एकात्मता साध्य करण्यास मदत होते.

**२. शिस्तीला उत्तेजन :**

स्थिर विनिमय दरामुळे वित्तीय बाबतीत शिस्त लावण्यास मदत होते. प्रवाह योग्य दिशेने वळविण्यासाठी वित्तीय आणि राजकोषीय धोरण काळजीपूर्वक राबविले जाते. विशेषतः अर्थव्यवस्थेतील चलनवाढीच्या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी उपयोगी ठरते.

**३. चलनात चढ-उतार होत नाही.**

स्थिर विनिमय दराच्या पद्धतीनुसार चलनाच्या घटीची किंवा वाढीची शक्यता नसते. त्यामुळे देशांतर्गत चलनाची मजबूत वाढ होते आणि देशात आर्थिक स्थैर्य निर्माण होते.

**४. भांडवल आणि अंत:प्रवाह आकर्षण:**

स्थिर विनिमय दरामुळे दीर्घकाळ भांडवलाचा प्रवाह चालू राहतो. तो अर्थ व्यवस्थेला सहाय्यक ठरतो. स्थिर विनिमय दरात जबाबदारी आणि अनिश्चितता नसते.

**५. सट्टेबाजी उपक्रमावर नियंत्रण :**

स्थिर विनिमय दर असेल तर सट्टेबाजीला प्रेरणा मिळत नाही. देशाची वित्तीय प्रणाली सट्टेबाजीला अयशस्वी ठरविते. त्यामुळे सट्टेबाजीला कोणताही वाव राहात नाही.

**६. लहान देशांना उपयुक्त :**

जॉन्सन यांच्या मते, स्थिर विनिमय धोरण लहान देशांना अतिशय उपयुक्त ठरते. कारण देशांच्या बाबतीत बदलत्या विनिमय दरामुळे चलनवाढ आणि मूल्यऱ्हास होऊन विनिमय दर पडतात.

**७. दायित्व किंवा भार :**

स्थिर विनिमय दरामुळे वस्तूच्या आयात आणि निर्यातीत परकीय दायित्व निर्माण होते. खर्चामुळे उत्पन्न निर्माण होते.

**८. नाणे आणि भांडवल बाजाराचा विकास :**

स्थिर विनिमय दरामुळे नाणे आणि भांडवल बाजाराचा विकास होतो. देशामध्ये भांडवलाचा प्रवाह.

**९. बहुविध व्यापाराची उभारणी :**

स्थिर विनिमय दरामुळे अनिश्चितेचे वातावरण नसते. त्यामुळे देशाच्या बहुविध विकास होतो.

**१०. आंतरराष्ट्रीय वित्तीय सहकार्य :**

स्थिर विनिमय दर पद्धतीमुळे आंतरराष्ट्रीय वित्तिय सहकार्याची उभारणी होते. कामात सुरळीतपणा निर्माण होतो. परिणामी जसे, IMF, IBRD, युरोपबाजार इत्यादींचा परिणामकारक विकास होतो.

**११. विकसनशील देशाला स्थैर्य :**

विकसनशिल देश स्थिर विनिमय दराला प्राधान्य देतात. स्थिर विनिमयासाठी आर्थिक विकायाचे नियोजन केले जाते. परकीय भांडवलाचा देशांतर्गत प्रवाह सुरळीतपणे राहण्यासाठी स्थिर विनिमय दर महत्त्वाचा ठरतो.

**१२. देशांतर्गत संबंध वाढीचे महत्त्व** :

स्थिर विनिमय दरामुळे देशात संधी आणि प्रेरणा निर्माण होते. त्यामुळे देशांतर्गत संबंध आपोआप सुधारतात.

थोडक्यात स्थिर विनिमय दरामुळे दोन देशामधील आंतरराष्ट्रीय व्यापारास स्थैर्य प्राप्त होते व त्यामुळे देशांतर्गत आर्थिक स्थैर्य राखण्यासाठी मदत होते. स्थिर विनिमय दरामुळे निश्चिततेचे आणि विश्वासाचे वातावरण निर्माण होऊन आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ होते. विशेषतः इंग्लंड, जपान यासारखे देश परराष्ट्रीय व्यापारावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असतात. त्यांच्या दृष्टीने

असे वातावरण असणे आवश्यक आहे. विनिमय दर अस्थिर असल्यास अशा देशांच्या परराष्ट्रीय व्यापारावर प्रतिकूल परिणाम होऊन आर्थिक प्रगतीच्या मार्गात अडथळे येण्याची शक्तता असते. अमेरिका, प. जर्मनी, जपान, फ्रान्स, इंग्लंड या देशांनी आपापसातील व्यापारात चलनाचे विनिमय दर स्थिर ठेवण्यासाठी 'लूव्र करार' या दृष्टिकोनातूनच केला आहे. स्थिर विनिमय दरामुळे व्यापाऱ्याना आयतीकरिता किती किंमत द्यावी लागेल व निर्यातीपासून किती उत्पन्न मिळेल या ची निश्चित कल्पना येऊ शकते. दीर्घकालीन गुंतवणुकीच्या दृष्टीनेही स्थिर विनिमय दर आंतरराष्ट्रीय क्षेत्रात पोषक वातावरण निर्माण करतो. आंतरराष्ट्रीय व्यापराची त्यामुळे निरोगी वाढ होते. स्थिर विनिमय दरामुळे सट्टेबाजीच्या व्यवहारांना आळा बसतो. त्यामुळे भांडवलाच्या भयप्रद उड्डाणाला पायबंद घातल जातो. स्टर्लिंगक्षेत्र, डॉलरक्षेत्र, युरो क्षेत्र यासारख्या चलन क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टिने स्थिर विनिमय दर योग्य ठरतात. विकसनशील देश आर्थिक विकासासाठी आंतरराष्ट्रीय व्यापारावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असतात. त्यांना स्वतःच निर्यात व्यापार वाढविण्याची गरज असते. अशावेळी स्थिर विनिमय दरामुळे निर्माण होणारे स्थैर्याचे व निश्चिततेचे वातावरण त्यांच्या दृष्टीने पोषक ठरते.

**ब. स्थिर विनिमय धोरणाच्या विरोधातील युक्तिवाद :**

विनिमय धोरणाच्या विरोधात पुढील युक्तिवाद मांडले जातात.

**१. उद्दिष्टांचा त्याग :**

स्थिर विनिमय दराच्या परिणामी अर्थव्यवस्थेत साधारण किंमत पातळीचे स्थैर्य आणि पूर्ण रोजगाराच्या महत्त्वाच्या उद्दिष्टांचा त्याग केला जातो. उदा. व्यवहार तोलाचे अधिवय राहण्यासाठी देशांतर्गत किंमत वाढीचे धोरण अवलंबिले जाते. त्यामुळे देशात सामाजिक खर्च मोठ्या प्रमाणात वाढतो. आणि वित्तीय स्वातंत्र्यावर गदा येते.

**२. अनपेक्षित व्यत्यय :**

स्थिर विनिमय दराच्या पद्धतीमुळे देशांतर्गत अर्थव्यवस्थेत अनपेक्षित व्यत्याच्या परिणामी व्यवहारतोल समतोल बदलला जातो.

**३. परकीय चलनाचे राखीव ठेवीत मोठे ओझे :**

स्थिर विनिमय दर पद्धतीमुळे देशाचे परकीय विनिमय मोठ्या प्रमाणात राखीव ठेवले जाते. त्यामुळे परकीय विनिमयाच्या अपूर्णतेमुळे आपोआपच देशाला त्या समस्येला तोंड द्यावे लागते. त्यामुळे परकीय विनिमयाच्या राखीव ठेवीचे मोठे ओझे सहन करावे लागते.

**४. वास्तव किंमत परिणाम संबंधाला अपयश :**

स्थिर विनिमय दर पद्धतीमुळे वेगवेगळ्या देशांचे चलनामध्ये खर्च किंमतीचे वास्तव चित्र दिसत नाही. दोन्ही देशांचा प्रवाह वेगवेगळ्या आर्थिक धोरणा नुसार चालतो.

**५. अस्थैर्य आणि अनिश्चितता :**

स्थिर विनिमय दरामुळे अनिश्चितता आणि अस्थैर्याचे कारण यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आकार कमी होतो. आणि गुंतवणूक कमीतकमी पातळीवर होते.

**६. गुंतागुंतीची पद्धत :**

स्थिर विनिमय दरामुळे अधिक गुंतागुंत होते. कारण उच्च कौशल्याच्या व्यक्तीच्या गुणांचा उपयोग करून घेतला जातो. त्या वेळी त्याचा उपयोग होता. परंतु त्यामुळे त्या परिणामी अनिश्चितता निर्माण होते. या पद्धतीची ही एक चूक आहे आणि ती अमलात आणली जाते.

**७. नेहमीच शक्य नसणे:**

दीर्घकाळात स्थिर विनिमय दर टिकविणे शक्य नाही. कारण दीर्घकाळात व्यवहारतोलाच्या समस्या आणि आंतरराष्ट्रीय वस्तूंच्या किंमती बदलतात. त्यामुळे देशाला आंतरराष्ट्रीय विनिमय दरात बदल करावा लागतो.

**८. व्यवहारतोलातील असमतोल :**

स्थिर विनिमय दर पद्धत व्यवहार तोलातील असमतोलाची समस्या सोडविण्याला मदत करीत नाही. हा तात्पुरता उपाय आहे. कायमस्वरूपी उपाय नाही.

**९. आंतरराष्ट्रीय समस्यांवर वाढते अवलंबित्व :**

स्थिर विनिमय दर पद्धतीमुळे देश मोठ्या प्रमाणावर आंतरराष्ट्रीय संस्थांवर मदतीसाठी आणि कर्जासाठी जास्त अवलंबून राहतो.

**१०. आंतरराष्ट्रीय देयतेची समस्या :**

स्थिर विनिमय दराचा हेतू व्यवहारतोलातील समतोल ठेवण्यासाठी परकीय विनिमयाचा राखीव साठा मोठ्या प्रमाणात ठेवावा लागतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय चलनाचे देयता मागणीमुळे वाढते. अधिक मागणीमुळे देणे वाढते ह्या समस्या निर्माण होतात. म्हणून असा युक्तिवाद केला जातो की, देशाने लवचिक विनिमय दर ठेवावा.

**१२.४.२ बदलते किंवा लवचिक विनिमय दर :**

बदलते, लवचिक किंवा तरते विनिमय दर हे बाजारातील परदेशी चलनाची मागणी आणि पुरवठा यांच्या समतोलातून निश्चित केले जातात. सरकारचा विनिमय दर निश्चितीत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हस्तक्षेप नसतो. जर विनिमय दर बाजारातील मागणी आणि पुरवठ्यावरून ठरत असतील तर देशाच्या व्यवहारतोलात आपोआप समतोल प्रस्थापित होतो. बदलत्या विनिमय दरामुळे आंतरराष्ट्रीय व्यवहारतोलात सरकारच्या कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय समतोल प्राप्त होतो. त्यामुळे असे म्हणता येते की, जेव्हा परदेशी चलनाचा विनिमय दर सरकारी हस्तक्षेपापासून न ठरता बाजारातील परदेशी चलनाची मागणी आणि परदेशी चलनाचा पुरवठा यांच्या समतोलातून ठरतो, तेव्हा त्यास बदलते विनिमय दर म्हणतात.

**अ. बदलत्या विनिमय दराचे फायदे :**

बदलत्या विनिमय दराचे फायदे किंवा बाजूचे युक्तिवाद पुढीलप्रमाणे :

**१. साधी कृती :**

बदलत्या विनिमय पद्धतीत कृती करण्याची यंत्रणा अतिशय साधी आहे. विनिमय दर मुक्तपणे आणि आपोआप परकीय विनिमय बाजारात मागणी आणि पुरवठ्यामुळे होतो. त्यामुळे देशाची दुर्मिळता किंवा अधिक्य कमी होते.

**२. सुरळीत तडजोड :**

व्यवहार तोलात सुरळीपणे आणि परिणामकारकरित्या जुळवून घेतले जाते. व्यवहार तोलावर ताण येत नाही. तसेच व्यवहारतोलाच्या कठीण स्थितीला ताण स्वीकारला जातो.

**३. आपोआप असमतोल दुरूस्त :**

बदलत्या विनिमय दर पद्धतीमुळे व्यवहारतोलातील असमतो आपोआप आणि परिणामकारकरीत्या दुरूस्त होतो. त्यामुळे सोन्याच्या प्रवाहाची गरज भासत नाही. किंवा देशाचे भांडवल आत किंवा बाहेर जाते.

**४. परकीय विनिमयाच्या राखीवतेची गरज नाही :**

बदलता विनिमय दर आपोआप समतोल पातळीवर येतो. त्यासाठी परकीय विनिमय सेवेची गरज नाही. देशाच्या व्यवहारतोलातील तूट भरून काढण्यासाठी परकीय चलन संबंधात चलनाचा मूल्य ऱ्हास होतो. त्यामुळे चलनाचे अधिक्य स्वीकारले जाते. आणि व्यवहारतोलाचा समतोल आपोआप समतोल पातळीवर येतो.

**५. देशांतर्गत आर्थिक धोरणे स्वयंपूर्ण :**

सरकारचे ध्येय आधुनिक कल्याणाचे असते त्यासाठी पूर्ण रोजगार वाढीबरोबर वाढीच्या दरात स्थैर्य निर्माण करणे हे असते. ते ध्येय लवचिक विनिमय दरामुळे साध्य होते. येथे स्थिर विनिमय दराचे उद्दिष्ट सुद्धा पूर्ण होते.

**६. आंतरराष्ट्रीय देयतेची समस्या बदलते :**

लवचिक विनिमय दरामुळे परकीय विनिमयाची अपूर्णतेची समस्या निर्माण होते. त्यामुळे परकीय विनिमय पुरवठ्यात सट्टेबाजी निर्माण होते. खाजगी देयतेची गरज समाधानकारक होते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय देयते समस्या बदलते किंवा कमी होते.

**७. अल्पकाळात निधीचे कर्ज आणि उसनवार कमी :**

परकीय विनिमय दर मुक्तपणे बदलल्यामुळे अल्पकाळासाठी व्यवहारतोलाच्या असमतोलाच्या समस्येसाकर्त आणि उसणवारीची गरज भासन नाही.

**८. आर्थिक दृष्ट्या स्थिर विनिमय दर :**

बदलत्या विनिमय दरामुळे परकीय चलनाचा साठा ठेवण्यासाठी गरज नाही. त्यामुळे आर्थिक दृष्टीने स्थिर विनिमय दराची तुलना करता येते.

**९. वित्तीय धोरणाचे परिणाम :**

बदलत्या विनिमय दर पद्धतीमुळे वित्तीय धोरणाची परिणामकारकता वाढते. त्यामुळे देशाची निर्यात वाढण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे व्याजदरात घट होते. निर्यात वस्तूंच्या उत्पादनांना आणि भांडवलाच्या बाह्य प्रवाहाला उत्तेजन मिळते. त्यामुळे देशांतर्गत किंमती वाढतात. उत्पन्न आणि रोजगार वाढतो. जेव्हा देशात चलनवृद्धीची समस्या निर्माण होते, तेव्हा व्याजाचा दर वाढतो. वित्तिय धोरणाला ही पद्धत परिणामकारक ठरते.

**१०. आंतरराष्ट्रीय व्यापाराची उभारणी :**
बदलत्या विनिमय दर पद्धतीनुसार नैसर्गिक पातळी आपोआप तडजोड होऊन दुरूस्त होते किंवा राखली जाते. ते देशाच्या चलनाच्या अधिक मूल्याच्या किंवा मूल्याखाली धोकादायक नसते.

**११. तुलनात्मक फायदे :**
विनिमय दरात नेहमीच समतोल असतो. त्याचे फायदे कराच्या आकारणीसाठी, किंमत ठरविण्यासाठी ठराविक वस्तूंच्या बाबतीत देशाला तुलनात्मक फायदे मिळतात.

थोडक्यात बदलत्या विनिमय दरामुळे आंतरराष्ट्रीय व्यवहारतोल सरकारच्या कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय समतोल प्राप्त होतो, दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळातील अनुभव पाहता केवळ स्थिर विनिमय दरामुळेच आंतरराष्ट्रीय व्यवहारात वाढ होते असे नाही तर उलट बदलत्या विनिमय दरामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारातील बदलांची प्रवृत्ती सहज कळून येऊ शकते.

दीर्घकालीन आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीसाठी केवळ स्थिर विनिमय दर एवढीच गोष्ट पुरेशी नसते तर इतरही अनेक घटकांवर दीर्घकालीन गुंतवणूक अवलंबून राहते. उदा. कच्च्या मालाची उपलब्धता, गुंतवणूक करण्याची संधी, गुंतवणुकीपासून होणारा लाभ, राजकीय स्थैर्य, राजकीय व आर्थिक उद्दिष्ट्ये इत्यादी विनिमय दराची स्थिरता हेच ‘स्टर्लिंग क्षेत्र’, ‘डॉलर क्षेत्र’, ‘युरोक्षेत्र’ या सारख्या क्षेत्रामधील देशांच्या परस्पर व्यापार वाढीचे आवश्यक व एकमेव कारण असू शकत नाही. त्याशिवाय इतरही अनेक कारणे व्यापारवाढीस असू शकतात. स्थिर विनिमय दरांच्या परिस्थितीतही आंतरराष्ट्रीय व्यापारात सट्टेबाजीचे व्यवहार होणार नाहीत अशी खात्री देता येत नाही.

**बदलत्या विनिमय दराच्या विरोधाबाबत :**
बदलत्या विनिमय दर धोरणांच्या विरोधी पुढील युक्तिवाद करण्यात येतात.

**१. साधनांची चूकीची वाढणी :**
बदलत्या विनिमय दरामुळे परकीय विनिमय बाजाराला संबंधितांना समतोल विनिमय दराविषयी योग्य मार्गदर्शन मिळत नाही. त्यामुळे देशातील साधनांबरोबर वाटणीचा निर्णय चुकीचा ठरतो.

**२. सरकारची मध्यस्थी :**
बदलत्या विनिमय दर व्यवहारामुळे परकीय विनिमय बाजारात सरकार प्रत्यक्ष हस्तक्षेप करीत नाही. विनिमय दर वाढल्यास सरकार चलनविषयक आणि राजकोषीय धोरण राबविते. उदा. जेव्हा देशांतर्गत बचत जास्त असते. तेव्हा परकीय देशात निव्वळ गुंतवणूक अमलात आणली जाते. विनिमय दरामुळे भांडवलाचा बाह्य प्रवाह कमी होतो. म्हणून सरकारचे अप्रत्यक्ष परिणाम उपयोगी ठरणार नाहीत. दुसरे परिणाम सरकार विनिमय दर समजावून घेत नाही. म्हणजे विनिमय दर तयार केला जातो किंवा कावेबाजपणा केला जातो. परिणामी प्रत्येक देशांचे अनुकूल विनिमय दर दुसऱ्या देशाबरोबर, निर्माण करण्याचे प्रयत्न केले गेले नाहीत तर अराजकत माजेल. त्याचा परिणाम घाऊकपणावर (Retaliation) आणि विनिमय दराचे युद्धात होईल.

**३. विनिमयाची जबाबदारी आणि अनिश्चितता :**
बदलत्या विनिमय दरामुळे विकसित देशात धोके आणि अनिश्चितता वाढीस लागून आंतरराष्ट्रीय व्यापार आणि भांडवलाच्या हालचालीवर प्रतिकूल परिणाम होतो तसेच आर्थिक धोरणावरही प्रतिकूल परिणाम होतो.

४. बदलत्या विनिमयदरामुळे दीर्घकालीन विदेशी गुंतवणूकीवर आणि भांडवलाच्या हालचालीवर परिणाम होतो. बदलत्या विनिमयदरामुळे आयात व निर्यात व्यापारी दीर्घकालीन करार करण्यास तयार होत नाहीत.

५. बदलत्या विनिमय दरामुळे व्यापारामध्ये अस्थिरता वाढीस लागते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारावर प्रतिकूल परिणाम होऊन देशाच्या आर्थिक विकासात अडथळे निर्माण झाले आहेत.

६. बदलत्या विनिमय दरामुळे भाववाढीची परिस्थिती निर्माण होते.

**सारांश :**
स्थिर व बदलत्या विनिमयदराचे काही फायदे व तोटे आहेत. बदलत्या विनिमय पद्धतीची गरज आहे का? त्याला आंतरराष्ट्रीय नाणे विधी स्थिरता उपलब्ध करून देइल का?

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१ स्थीर विनिमय दर म्हणजे काय?

प्र.२ बदलत्या विनिमय दरपद्धतीची व्याख्या सांगा.

## १२.५ प्रश्नमालिका

प्र.१ सूर्वणपरिमाण पद्धत म्हणजे काय?
प्र.२ टांकसाल समतादर सिध्दांत स्पष्ट करा.
प्र.३ विनिमय दर पद्धतीचा उदय या संदर्भातील मध्यवर्ती बँकेची भूमिका व मौद्रिक धोरण याविषयी चर्चा करा.
प्र.४ स्थीर विनिमय विरूद्ध बदलत्या विनिमय दर याविषयी चर्चा करा.
प्र.५ बदलत्या विनिमयदराचे फायदे - तोटे स्पष्ट करा.

❖❖❖

# १३

# आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि आंतरराष्ट्रीय रोखता

**पाठ्यक्रम**

१३.० उद्दिष्ट्ये
१३.१ प्रस्तावना
१३.२ (अ) आंतरराष्ट्रीय रोखता
(ब) आंतरराष्ट्रीय नाणे निधी
१३.३ स्थिर विनिमय दर विरुध्द बदलते विनिमय दर
१३.४ केंद्रिय/मध्यवर्ती बँकेची भूमिका
१३.५ चलन/वित्तीय आरिष्ट - अर्थ आणि परिणाम
१३.६ चलन आरिष्ट्यापासून विकसनशील देशांनी घेतलेला धडा
१३.७ प्रश्नमालिका

## १३.० उद्दिष्ट्ये :

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची स्थापना हा आंतरराष्ट्रीय जागतिक आर्थिक सहकार्याच्या वाटचालीतील एक महत्त्वाचा ऐतिहासिक टप्पा मानला जातो. या पाठात आपण आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची भूमिका तसेच वित्तीय आरिष्ट इ. घटकांचा अभ्यास करणार आहोत.

या पाठाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची भूमिका/महत्त्व अभ्यासणे.
२) आंतरराष्ट्रीय रोखता ही संकल्पना समजावून घेणे.
३) वित्तीय आरिष्ट्य ह्या संकल्पना विकसनशील देशांच्या संदर्भात अभ्यास करणे.

## १३.१ प्रस्तावना :

विनिमयदरात स्थैर्य प्रस्थापित करणे हे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे प्रमुख उद्दिष्ट्य आहे. सभासददेशात चलनप्रणाली विकसित करुन देशाच्या व्यापारात वाढ घडवून आणणे हा नाणेनिधीच्या स्थापणेचा मुख्य उद्देश आहे. आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या सोडवण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी प्रयत्न करते. आंतरराष्ट्रीय व्यापारात सर्वच राष्ट्रांना चलनआरिष्ट्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होत आहे. साहजीकच चलन आरिष्ट्याची समस्या, सोडवण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची भूमिका महत्त्वाची ठरते.

## १३.२ (अ) आंतरराष्ट्रीय रोखता (International Liquidity)

आंतरराष्ट्रीय राखीव व आंतरराष्ट्रीय रोखता ह्या संज्ञा समानार्थी नसून 'आंतरराष्ट्रीय रोखता हे आंतरराष्ट्रीय राखीवांचे वैशिष्ट्ये आहे.'

आंतरराष्ट्रीय राखीव म्हणजे विभिन्न राष्ट्रातील प्रमुख चलनाचा साठा होय. विदेशी चलनालाच विदेशी विनिमय असेही म्हणतात.

**व्याख्या :**

१. किथ हार्स फिल्डच्या मते, ''आंतरराष्ट्रीय रोखतेचा अर्थ सुवर्ण, डॉलर, स्टर्लिंग, पौंड ई. विदेशी चलनाच्या देणी फेडण्यासाठी योग्य उपयोग कसा केला जाऊ शकतो.''

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) :-

२. IMF:- ''शोधनशेषातील तूट भरून काढण्याकरिता देशांच्या मौद्रिक सत्तेपाशी उपलब्ध असलेल्या साधन संपत्तीचा आंतरराष्ट्रीय रोखतेत समावेश होतो.''

आंतरराष्ट्रीय रोखतेत पुढील साधनांचा समावेश हातो.

१. देशातील मौद्रिक सत्ते जवळ असलेला सुवर्ण निधी.

२. प्रत्येक देशाला स्वीकारणीय असलेला विदेशी विनिमयाचा साठा म्हणजे विदेशी देणी फेडण्याकरिता ज्यांचा सर्वत्र स्वीकार होतो.

३. विभिन्न देशांकडून कर्ज घेण्याची क्षमता

**आंतरराष्ट्रीय रोखतेची आवश्यकता :**

**१. विदेशी व्यापाराचा विस्तारवृद्धी**

गेल्या काही वर्षापासून आंतरराष्ट्रीय विकसनशील देशांचा व्यापार वाढला आहे. परन्तु आंतरराष्ट्रीय रोखतेत त्या प्रमाणात वाढ झाली नाही. म्हणून रोखतेच्या पुरवठ्यात वाढ करणे आवश्यक आहे.

**२. अमेरिकन डॉलर्सचे महत्त्व कमी झाले**

डॉलर संकटात सापडल्यामुळे डॉलर्सची सहाय्यता व महत्त्व बरेच कमी झाले. त्यामुळे रोखतेच्या इतर साधनांचे महत्त्व वाढले.

**३. आर्थिक विकासाच्या नवीन योजना:**

गेल्या काही वर्षांत आशिया, आफ्रिका, दक्षिण अमेरिका इत्यादी विकसनशील देशांना आपल्या आर्थिक विकासाकरिता विकसित व संपन्न देशाच्या चलनांची जास्त प्रमाणात आवश्यकता भासू लागली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय रोखतेची मागणी वाढली.

**आंतरराष्ट्रीय रोखतेत समस्या निर्माण होण्याची कारणे :**

१. आंतरराष्ट्रीय रोखतेची अपर्याप्तता

२. जगातील सुवर्ण उत्पादन व जागतिक मुद्राकोष ह्यात होणारी अत्यल्प वृद्धी.

३. विकसनशील देशांच्या सतत वाढत जाणाऱ्या गरजा,
४. डॉलर व पौंड स्टर्लिंग संकट
५. तेलसंकट (क्रूड ऑईल)
६. सुवर्णांचा अधिकांश हिस्सा
७. विकसित राष्ट्रांचा कठोर निर्णय

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१ आंतरराष्ट्रीय रोखता म्हणजे काय? आंतरराष्ट्रीय रोखतेतील साधनांची माहिती लिहा.

## १३.२ (ब) आंतरराष्ट्रीय नाणे निधी : भूमिका : (Role of IMF)

आंतरराष्ट्रीय नाणे निधी ही आंतरराष्ट्रीय चलन विषयक संस्था असून यास निधी असेही म्हटले जाते. ब्रेटन-वुड्स कराराखाली ४४ देशांनी १९४४ मध्ये IMF ची स्थापना केली. जागतिक व्यापाराचा विस्तार आणि संतुलित वृद्धी घडवून आणण्याच्या दृष्टीने सभासद राष्ट्रात आर्थिक व वित्तीय सहकार्य वाढीस लागण्यासाठी या संस्थेची स्थापना करण्यात आली. १ मार्च १९४७ पासून आंतरराष्ट्रीय नाणे निधीने कार्य करण्यास सुरूवात केली जून १९९६ मध्ये १८१ सभासद होते.

**कार्य/भूमिका :**

१. आंतरराष्ट्रीय चलनविषयक सहकार्य :
विविध देशांमध्ये चलन विषयक सहकार्य प्रस्थापित करणे हे महत्त्वाचे कार्य आहे. जगातील देशात चलनविषयक सहकार्याचा असलेल्या अभाव हे दुसऱ्या महायुद्धाचे प्रमुख कारण होते. भविष्यात युद्ध टाळण्यासाठी आंतरराष्ट्रीय चलनविषयक सहकार्य वाढवणे गरजेचे आहे.

२. परकीय विनिमय दरात स्थैर्य राखणे :
दुसऱ्या महायुद्धापूर्वी परकीय विनिमय दरात मोठ्या प्रमाणात अस्थैर्य असल्याचे दिसते. विनिमय दरातील अस्थैर्याचा आंतरराष्ट्रीय व्यापारावर प्रतिकूल परिणाम घडून आला. अस्थैर्य दूर करण्यासाठी IMF ची स्थापना करण्यात आली.

३. बहुपक्षीय व्यापार व्यवस्था देणे, स्थापन करणे :
पूर्वीच्या जुन्या द्विपक्षीय काराराच्या जागी बहुपक्षीय व्यापार व्यवस्था स्थापन करणे ही महत्त्वाची भूमिका आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या मुक्त प्रवाहास द्विपक्षीय करारामुळे अडथळा येत असल्यामुळे ही नवीन व्यवस्था निर्माण करण्यात आली.

४. विनिमय नियंत्रणे दूर करणे :
दुसऱ्या महायुद्धापूर्वी जवळजवळ प्रत्येक देशाने आपला विनिमय दर विशिष्ट पातळीला राखण्यासाठी विनिमय नियंत्रणाचा अवलंब केला होता. त्याचा आंतरराष्ट्रीय व्यापारावर प्रतिकूल परिणाम झालेला होता. त्यामुळे अशी विनिमय नियंत्रणे दूर करावी लागतात.

५. आंतरराष्ट्रीय व्यापारात प्रोत्साहन देणे :
आंतरराष्ट्रीय व्यापारास ज्यामुळे मर्यादा पडतात असे अडथळे दूर करून आंतरराष्ट्रीय व्यापारास प्रोत्साहन दिले जाते.

६. अल्पकालीन वित्तीय मदत :
सभासद राष्ट्रांना व्यापारातील तुट कमी करण्यासाठी आवश्यक असणारी अल्पकालीन वित्तीय मदत देते. चलनाची अदलाबदल केली जाते.

७. विविध पत सुविधा :
विविध पत सुविधा दिल्यामुळे त्याचा फायदा अडचणीत आलेल्या सभासद राष्ट्रांना मोठ्या प्रमाणात झाला आहे.

८. सभासद देशांची मध्यवर्ती बँक :
व्यापारी बँकांचे नियंत्रण करण्यासाठी देशांतर्गत पातळीवर जसे मध्यवर्ती बँक असते, तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर नाणे निधी कार्य करते. देशां-देशांमधील देणी मिटवण्याचे कार्य नाणे निधी मार्फत केले जाते. अर्थात नाणे निधीचे सल्ले सभासद देशांसाठी मार्गदर्शक असतात.

९. खुल्या अर्थव्यवस्थेतस चालना :
व्यापार बंधने मुक्त रहावेत यासाठी IMF प्रारंभापासून प्रत्यक्षशील आहे. विनिमय दरातील बंधने दूर करणे, व्यापारावरील बंधने दूर करून खुली अर्थव्यवस्था झाल्यास जागतिक व्यापार वाढून त्याचा फायदा सर्व राष्ट्रांना होईल.

१०. सभासद राष्ट्रात आत्मविश्वास निर्माण करणे :
सभासद राष्ट्रांना साधन सामुग्री उपलब्ध करून देऊन सभासद राष्ट्रांत आत्मविश्वास निर्माण करणे. आंतरराष्ट्रीय नाणे निधी व्यवहार तोल दुरूस्त करण्यासाठी संधी उपलब्ध करू देते.

## १३.३ स्थिर विनिमय दर विरूद्ध बदलते विनिमय दर :

परकिय विनिमय दर स्थिर किंवा बदलते असतात. दोन्हींचेही फायदे आणि तोटे असतात. त्यांची चर्चा खालीलप्रमाणे :

**अ. स्थिर विनिमय दर :**
स्थिर विनिमय दरात सर्व परकीय विनिमय व्यवहार देशाच्या वित्तीय अधिकारात विनिमय दराच्या ठिकाणी ठरवून घेतले जातात. विनिमय दर स्थिर ठेवण्यासाठी कायद्याने परकीय चलन बाजारात मध्यस्थ म्हणून वित्तीय अधिकारात मागणी आणि पुरवठ्याची पोकळी भरून काढण्यासाठी मध्यवर्ती बँकेत चलन राखीव ठेवले जाते. 'जेव्हा परकीय चलनाची देवाण-घेवाण सरकारने कायद्यानुसार ठरविलेल्या विनिमय दरानुसार केली जाते. तेव्हा त्या दरास स्थिर विनिमय दर म्हणतात.'

१. स्थिर विनिमय दराबाबतीत : स्थिर किंवा स्थिर विनिमय दराच्या बाजूचे युक्तिवाद :
१. कॉमन चलनाचा आधारः
वेगवेगळ्या देशातील स्थिर विनिमय दराचा आधार कॉमन चलनाचा असतो. कारण कॉमन चलनाचे मूल्य निश्चित असते. त्यामुळे व्यापारात वाढ आणि उत्पादन आणि आर्थिक वाढीचा जलद दर साध्य होतो. परिणामी परकीय व्यापार आकर्षित होऊन वस्तूच्या किंमती व्यापाराबरोबर

सांगितल्या किंवा भाकीत केल्या जातात. जॉन्सन यांच्या मते विनिमय दरामुळे आंतरराष्ट्रीय एकात्मता साध्य करण्यास मदत होते.

२. शिस्तीला उत्तेजन :
स्थिर विनिमय दरामुळे वित्तीय बाबतीत शिस्त लावण्यास मदत होते. प्रवाह योग्य दिशेने वळविण्यासाठी वित्तीय आणि राजकोषीय धोरण काळजीपूर्वक राबविले जाते. विशेषतः अर्थव्यवस्थेतील चलनवाढीच्या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी उपयोगी ठरते.

३. चलनात चढ उतार होत नाही :
स्थिर विनिमय दराच्या पध्दतीनुसार चलनाच्या घटीची किंवा वाढीची शक्यता नसते. त्यामुळे देशांतर्गत चलनाची मजबूत वाढ होते आणि देशात आर्थिक स्थैर्य निर्माण होते.

४. भांडवल आणि अंतःप्रवाह आकर्षण :
स्थिर विनिमय दरामुळे दीर्घकाळ भांडवलाचा प्रवाह चालू राहतो. तो अर्थव्यवस्थेला सहाय्यक ठरतो. स्थिर विनिमय दरात जबाबदारी आणि अनिश्चितता नसते.

५. सट्टेबाजी उपक्रमावर नियंत्रण :
स्थिर विनिमय दर असेल तर सट्टेबाजीला प्रेरणा मिळत नाही. देशाची वित्तीय प्रणाली सट्टेबाजीला अयशस्वी ठरविते. त्यामुळे सट्टेबाजीला कोणताही वाव राहात नाही.

६. लहान देशांना उपयुक्त :
जॉन्सन यांच्या मते, स्थिर विनिमय धोरण लहान देशांना अतिशय उपयुक्त ठरते. कारण देशांच्या बाबतीत बदलत्या विनिमय दरामुळे चलनवाढ आणि मूल्यऱ्हास होऊन विनिमय दर पडतात.

७. दायित्व किंवा भार :
स्थिर विनिमय दरामुळे वस्तूच्या आयात आणि निर्यातीत परकीय दायित्व निर्माण होते. खर्चामुळे उत्पन्न निर्माण होते.

८. नाणे आणि भांडवल बाजाराचा विकास :
स्थिर विनिमय दरामुळे नाणे आणि भांडवल बाजाराचा विकास होतो. देशामध्ये भांडवलाचा प्रवाह

९. बहुविद्या व्यापाराची उभारणी :
स्थिर विनिमय दरामुळे अनिश्चितेचे वातावरण नसते. त्यामुळे देशाचा बहुविद्य विकास होतो.

१०. आंतरराष्ट्रीय वित्तीय सहकार्य :
स्थिर विनिमय दर पध्दतीमुळे आंतरराष्ट्रीय वित्तीय सहकार्याची उभारणी होते. कामात सुरळीतपणा निर्माण होतो. परिणामी जसे, IMF, IBRD युरबाजार इत्यादींचा परिणामकारक विकास होतो.

११. विकसनशील देशाला स्थैर्य :
विकसनशील देश स्थिर विनिमय दराला प्राधान्य देतात. स्थिर विनिमयासाठी आर्थिक विकासाचे नियोजन केले जाते. परकीय भांडवलाचा देशांतर्गत प्रवाह सुरळीतपणे राहण्यासाठी स्थिर विनिमय दर महत्त्वाचा ठरतो.

१२. देशांतर्गत संबंध वाढीचे महत्त्व :
स्थिर विनिमय दरामुळे देशात संधी आणि प्रेरणा निर्माण होते. त्यामुळे देशांतर्गत संबंध आपोआप सुधारतात.

थोडक्यात स्थिर विनिमय दरामुळे दोन देशांमधील आंतरराष्ट्रीय व्यापारास स्थैर्य प्राप्त होते व त्यामुळे देशांतर्गत आर्थिक स्थैर्य राखण्यासाठी मदत होते. स्थिर विनिमय दरामुळे निश्चिततेचे आणि विश्वासाचे वातावरण निर्माण होऊन आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ होते. विशेषतः इंग्लंड, जपान, यांसारखे देश परराष्ट्रीय व्यापारावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असतात. त्यांच्या दृष्टीने असे वातावरण असणे आवश्यक आहे. विनिमय दर अस्थिर असल्यास अशा देशांच्या परराष्ट्रीय व्यापारावर प्रतिकूल परिणाम होऊन आर्थिक प्रगतीच्या मार्गात अडथळे येण्याची शक्यता असते. अमेरिका, प. जर्मनी, जपान, फ्रान्स, इंग्लंड या देशांनी आपापसातील व्यापारात चलनाचे विनिमय दर स्थिर ठेवण्यासाठी लूव्र करार या दृष्टिकोनातूनच केला आहे. स्थिर विनिमय दरामुळे व्यापाऱ्यांना आयातीकरीता किती किंमत द्यावी लागेल व निर्यातीपासून किती उत्पन्न मिळेल याची निश्चित कल्पना येऊ शकते. दीर्घकालीन गुंतवणुकीच्या दृष्टीनेही स्थिर विनिमय दर आंतरराष्ट्रीय क्षेत्रात पोषक वातावण निर्माण करतो. आंतरराष्ट्रीय व्यापाराची त्यामुळे निरोगी वाढ होते. स्थिर विनिमय दरामुळे सट्टेबाजीच्या व्यवहारांना आळा बसतो. त्यामुळे भांडवलाच्या भयप्रद उड्डाणाला पायबंद घातला जातो. स्टर्लिंगक्षेत्र, डॉलरक्षेत्र, युरोक्षेत्र यासारख्या चलन क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने स्थिर विनिमय दर योग्य ठरतात. विकसनशील देश आर्थिक विकासासाठी आंतरराष्ट्रीय व्यापारावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असतात. त्यांना स्वतःच निर्यात व्यापार वाढविण्याची गरज असते. अशावेळी स्थिर विनिमय दरामुळे निर्माण होणारे स्थैर्याचे व निश्चिततेचे वातावरण त्यांच्या दृष्टीने पोषक ठरते.

ब) स्थिर विनिमय धोरणाच्या विरोधातील युक्तीवाद :
विनिमय धोरणाच्या विरोधातील पुढील युक्तीवाद मांडले जातात.

१. उद्दिष्टांचा त्याग :
स्थिर विनिमय दराच्या परिणामी अर्थव्यवस्थेत साधारण किंमत पातळीचे स्थैर्य आणि पूर्ण रोजगाराच्या महत्त्वाच्या उद्दिष्टांचा त्याग केला जातो. उदा. व्यवहार तोलाचे उद्दिष्ट्य राहण्यासाठी देशांतर्गत किंमत वाढीचे धोरण अवलंबिले जाते. त्यामुळे देशात सामाजिक खर्च मोठ्या प्रमाणात वाढतो आणि वित्तीय स्वातंत्र्यावर गदा येते.

२. अनपेक्षित व्यत्यय :
स्थिर विनिमय दराच्या पध्दतीमुळे देशांतर्गत अर्थव्यवस्थेत अनपेक्षित व्यत्याच्या परिणामी व्यवहारतोल समतोल बदलला जातो.

३. परकीय चलनाचे राखीव ठेवीत मोठे ओझे :
स्थिर विनिमय दर पध्दतीमुळे देशाचे परकीय विनिमय मोठ्या प्रमाणात राखीव ठेवले जाते. त्यामुळे परकीय विनिमयाच्या अपूर्णतेमुळे आपोआपच देशाला त्या समस्येला तोंड द्यावे लागते. त्यामुळे परकीय विनिमयाच्या राखीव ठेवीचे मोठे ओझे सहन करावे लागते.

४. वास्तव किंमत परिणाम संबंधाला अपयश :
स्थिर विनिमय दर पध्दतीमुळे वेगवेगळ्या देशांचे चलनामध्ये खर्च किंमतीचे वास्तव चित्र दिसत नाही. दोन्ही देशाचा प्रवाह वेगवेगळ्या आर्थिक धोरणानुसार चालतो.

५. अस्थैर्य आणि अनिश्चितता :
स्थिर विनिमय दरामुळे अनिश्चितता आणि अस्थैर्याचे कारण यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आकार कमी होतो. आणि गुंतवणुक कमीतकमी पातळीवर होते.

६. गुंतागुंतीची पध्दत :
स्थिर विनिमय दरामुळे अधिक गुंतागुंत होते. कारण उच्च कोशल्याच्या व्यक्तीच्या गुणांचा उपयोग करुन घेतला जातो. त्या वेळी त्याचा उपयोग होता. परंतु त्यामुळे त्या परिणामी अनिश्चितता निर्माण होते. या पध्दतीची ही एक चूक आहे आणि ती अमलात आणली जाते.

७. नेहमीच शक्य नसणे :
दीर्घकाळात स्थिर विनिमय दर टिकविणे शक्य नाही. कारण दीर्घकाळात व्यवहारतोलाच्या समस्या आणि आंतरराष्ट्रीय विनिमय दरात बदल करावा लागतो.

८. व्यवहारतोलातील असमतोल :
स्थिर विनिमय दर पध्दत व्यवहार तोलातील असमतोलाची समस्या सोडविण्याला मदत करीत नाही. हा तात्पूरता उपाय आहे. कायमस्वरुपी उपाय नाही.

९. आंतरराष्ट्रीय समस्यांवर वाढते अवलंबित्व :
स्थिर विनिमय दर पध्दतीमुळे देश मोठ्या प्रमाणावर आंतरराष्ट्रीय संस्थांवर मदतीसाठी आणि कर्जासाठी जास्त अवलंबून राहतो.

१०. आंतरराष्ट्रीय देयतेची समस्या :
स्थिर विनिमय दराचा हेतू व्यवहार तोलातील समतोलच ठेवण्यासाठी परकीय विनिमयाचा राखीव साठा मोठ्या प्रमाणात ठेवावा लागतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय चलनाची देयता मागणीमुळे वाढते. आधिक मागणीमुळे देणे वाढते. ह्या समस्या निर्माण होतात. म्हणून असा युक्तिवाद केला जातो की, देशाने लवचिक विनिमय दर ठेवावा.

## ब) बदलते किंवा लवचिक विनिमय दर :

बदलते लवचिक किंवा तरते विनिमय दर हे बाजारातील परदेशी चलनाची मागणी आणि पुरवठा यांच्या समतोलातून निश्चित केले जातात. सरकारचा विनिमय दर निश्चितीत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हस्तक्षेप नसतो. जर विनिमय दर बाजारातील मागणी आणि पुरवठ्यावरुन असतील तर देशाच्या व्यवहारतोलात आपोआप समतोल प्रस्थापित होतो. त्यामुळे असे म्हणता येते की, जेव्हा परदेशी चलनाचा विनिमय दर सरकारी हस्तक्षेपापासून न ठरता बाजारातील परदेशी चलनाची

मागणी आणि परदेशी चलनाचा पुरवठा यांच्या समतोलातून ठरतो, तेव्हा त्यास बदलते विनिमय दर म्हणतात.

### अ) बदलत्या विनिमय दराचे फायदे :

१. साधी कृती :
बदलत्या विनिमय दर पध्दतीत कृती करण्याची यंत्रणा अतिशय साधी आहे. विनिमय दर मुक्तपणे आणि आपोआप परकीय विनिमय बाजारात मागणी आणि पुरवठ्यामुळे होतो. त्यामुळे देशाची दुर्मिळता किंवा अधिक्य कमी होते.

२. सुरळीत तडजोड :
व्यवहारतोलात सुरळीतपणे आणि परिणामकारकरित्या जुळवून घेतले जाते. व्यवहार तोलावर ताण येत नाही. तसेच व्यवहार तोलाच्या कठीण स्थितीत ताण स्वीकारला जातो.

३. आपोआप असमतोल दुरुस्त :
बदलत्या विनिमय दर पध्दतीमुळे व्यवहार तोलातील असमतोल आपोआप आणि परिणामकारकरीत्या दुरुस्त होतो. त्यामुळे सोन्याच्या प्रवाहाची गरज भासत नाही. किंवा देशाचे भांडवल आत किंवा बाहेर जाते.

४. परकीय विनिमयाच्या राखीवतेची गरज नाही :
बदलता विनिमय दर आपोआप समतोल पातळीवर येतो. त्यासाठी परकीय विनिमय सेवेची गरज नाही. देशाच्या व्यवहार तोलातील तूट भरुन काढण्यासाठी परकीय चलन संबंधात स्वीकारले जाते. आणि व्यवहारतोलाचा समतोल आपोआप समतोल पातळीवर येतो.

५. देशांतर्गत आर्थिक धोरणे स्वयंपूर्ण :
सरकारचे ध्येय आधुनिक कल्याणाचे असते त्यासाठी पूर्ण रोजगार वाढीबरोबर वाढीच्या दरात स्थैर्य निर्माण करणे हे असते. ते ध्येय लवचिक विनिमय दरामुळे साध्य होते. येथे स्थिर विनिमय दराचे उद्दिष्ट सुध्दा पूर्ण होते.

६. आंतरराष्ट्रीय देयतेची समस्या बदलते :
लवचिक विनिमय दरामुळे परकीय विनिमयाची अपूर्णतेची समस्या निर्माण होते. त्यामुळे परकीय विनिमय पुरवठ्यात सट्टेबाजी निर्माण होते. खाजगी देयतेची गरज समाधानकारक होते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय देयतेची समस्या बदलते किंवा कमी होते.

७. अल्पकाळात निधीचे कर्ज आणि उसनवार कमी :
परकीय विनिमय दर मुक्तपणे बदलल्यामुळे अल्पकाळासाठी व्यवहारतोलाच्या असमतोलाच्या समस्येसाठी कर्ज आणि उसणवारीची गरज भासत नाही.

८. आर्थिक दृष्ट्या स्थिर विनिमय दर :
बदलत्या विनिमय दरामुळे परकीय चलनाचा साठा ठेवण्याची गरज नाही. त्यामुळे आर्थिक दृष्टीने स्थिर विनिमय दराची तुलना करता येते.

९. वित्तीय धोरणाचे परिणाम :
बदलत्या विनिमय दर पध्दतीमुळे वित्तीय धोरणाची परिणामकारकता वाढते. त्यामुळे देशाती निर्यात वाढण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे व्याजदरात घट होते. निर्यात वस्तूंच्या उत्पादनांना आणि भांडवलाच्या बाह्य प्रवाहाला उत्तेजन मिळते. त्यामुळे देशांतर्गत किंमती वाढतात. उत्पन्न आणि रोजगार वाढतो. जेव्हा देशात चलनवृध्दीची समस्या निर्माण होते, तेव्हा व्याजाचा दर वाढतो. वित्तीय धोरणाला ही पध्दत परिणामकारक ठरते.

१०. आंतरराष्ट्रीय व्यापाराची उभारणी :
बजलत्या विनिमय दर पध्तीनुसार नैसर्गिक पातळी आपोआप तडजोड होऊन दुरुस्त होते किंवा राखली जाते. ते देशाच्या चलनाच्या अधिक मूल्याच्या किंवा मूल्याखाली धोकादायक नसते.

११. तुलनात्मक फायदे :
विनिमय दरात नेहमीच समतोल असतो. त्याचे फायदे कराच्या आकारणीसाठी, किंमत ठरविण्यासाठी ठराविक वस्तूंच्या बाबतीत देशाला तुलनात्मक फायदे मिळतात.

थोडक्यात बदलत्या विनिमय दरामुळे आंतरराष्ट्रीय व्यवहारतोल सरकारच्या कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय समतोल प्राप्त होतो, दुसऱ्या महायुध्दानंतरच्या काळातील अनुभव पाहता केवळ स्थिर विनिमय दरामुळेच आंतरराष्ट्रीय व्यवहारात वाढ होते आहे नाही तर उलट बदलत्या विनिमय दरामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारातील बदलांची प्रवृत्ती सहज कळून येऊ शकते. दीर्घकालीन आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीसाठी केवळ स्थिर विनिमय दर एवढीच गोष्ट पुरेशी नसते तर इतरही अनेक घटकांवर दीर्घकालीन गुंतवणूक अवलंबून राहते. उदा. कच्चा मालाची उपलब्धता, गुंतवणुक करण्याची संधी, गुंतवणुकीपासून होणारा लाभ, राजकीय स्थैर्य, राजकीय व आर्थिक उद्दिष्ट्चे इत्यादी. विनिमय दराची स्थिरता हेच स्टर्लिंग क्षेत्र, डॉलर क्षेत्र, युरो क्षेत्र यासारख्या क्षेत्रामधील देशांच्या परस्पर व्यापार वाढीचे आवश्यक व एकमेव कारण असू शकत नाही. त्याशिवाय इतरही अनेक कारणे व्यापारवाढीस असू शकतात. स्थिर विनिमय दरांच्या परिस्थितीतही आंतरराष्ट्रीय व्यापारात सट्टेबाजीचे व्यवहार होणार माहीत अशी खात्री देता येत नाही.

## ब) बदलत्या विनिमय दराच्या विरोधाबाबत :

बदलत्या विनिमय दर धोरणांच्या विरोधी पुढील युक्तिवाद करण्यात येतात.
१. साधनांची चूकीची वाढणी :
बदलत्या विनिमय दरामुळे परकीय विनिमय बाजारात संबंधितांना समतोल विनिमय दराविषयी योग्य मार्गदर्शन मिळत नाही. त्यामुळे देशातील साधनांबरोबर वाटणीचा निर्णय चुकीचा ठरतो.

२. सरकारची मध्यस्थी :
बदलत्या विनिमय दर व्यवहारामुळे परकीय विनिमय बाजारात सरकार प्रत्यक्ष हस्तक्षेप करीत नाही. विनिमय दर वाढल्यास सरकार चलनविषयक आणि राजकोषीय धोरण राबविते. उदा. जेव्हा देशांतर्गत बचत जास्त असते, तेव्हा परकीय देशात निव्वळ गुंतवणूक अमलात आणली जाते. विनिमय दरामुळे भांडवलाचा बाह्य प्रवाह कमी होतो म्हणून सरकारचे अप्रत्यक्ष परिणाम उपयोगी ठरणार नाहीत. दपसरे परिणाम सरकार विनिमय दर समजावून घेत नाही म्हणजे विनिमय दर तयार केला जातो किंवा कावेलाजपणा केला जातो. परिणामी प्रत्येक देशांचे अनुकूल

विनिमय दर दुसऱ्या देशाबरोबर निर्माण करण्याचे प्रयत्न केले गेले नाहीत तर अराजकता माजेल. त्याचा परिणाम घाऊकपणावर आणि विनिमय दराचे युध्दात होईल.

३. विनिमयाची जबाबदारी आणि अनिश्चितता :
बदलत्या विनिमय दरामुळे विकसित देशात धोके आणि अनिश्चितता वाढीस लागून आंतरराष्ट्रीय व्यापार आणि भांडवलाच्या हालचालीवर प्रतिकूल परिणाम होतो. तसेच आर्थिक धोरणावरही प्रतिकूल परिणाम होतो.

४. बदलत्या विनिमय दरामुळे दिर्घकालीन विदेशी गुंतवणुकीवर आणि भांडवलाच्या हालचालीवर परिणाम होतो. बदलत्या विनिमयदरामुळे आयात व निर्यात व्यापारी दीर्घकालीन करार करण्यास तयार होत नाहीत.

५. बदलत्या विनिमय दरामुळे व्यापारामध्ये आस्थिरता वाढीस लागते त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारावर प्रतिकूल परिणाम होऊन देशाच्या आर्थिक विकासात अडथळे निर्माण झाले आहेत.

६. बदलत्या विनिमय दरामुळे भाववाढीची परिस्थिती निर्माण होते.

**सारांश :-**

स्थिर व बदलत्या विनिमयदराचे काही फायदे व तोटे आहेत. बदलत्या विनिमय पध्दतीची गरज आहे का ? त्याला आंतरराष्ट्रीय नाणेनिधी स्थिरता उपलब्ध करुन देइल का ?

**आपली प्रगती तपासा :**

१. स्थिर विनिमय दर म्हणजे काय ?

२. बदलत्या विनिमय दर पध्दतीची व्याख्या सांगा.

**आपली प्रगती तपासा :**

१. विनिमय दराच्या संदर्भातील आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची भूमिका थोडक्यात विशद करू

## १३.४ क) केंद्रीय अधिकोषाचे कार्य / भूमिका Role of Central Banks

**केंद्रिय अधिकोसाची व्याख्या**

१) हॉट्रे : केंद्रीय अधिकोष अधिकोषांचा अधिकोष असून इतर अधिकोषांसाठी अंतिम ऋणदाता म्हणून कार्य करतो.

२) क्राऊथर : ज्या प्रमाणे इतर अधिकोषांचा जनतेशी संबंध असतो, त्याचप्रमाणे केंद्रीय अधिकोषांचा इतर अधिकोषांशी संबंध असतो.

**केंद्रिय अधिकाराची कार्ये/भूमिका :**

१. चलनवाढ नियंत्रण : विनिमय दर स्थिर रहावा, विनिमय दरा संबंधी योग्य ती भूमिका कोणत्याही देशाच्या मध्यवर्ती बँकेला द्यावी लागते त्यासाठी देशांतर्गत चलनवाढ नियंत्रण आवश्यक असते त्यासाठी मध्यवर्ती बँक पतनियंत्रणाच्या साधनांचा वापर करणे.

२. पतपुरवठ्याचे नियमन करणे :
अर्थव्यवस्थेतील पतपुरवठ्यास नियमन करणे आवश्यक असते कारण त्यातूनच चलनवाढ अथवा चलनघट निर्माण होऊ शकते. त्यानुसार विनिमय दरावर परिणाम होऊ नये म्हणून मध्यवर्ती बँक पत पुरवठ्याचे नियमन करते.

३. विकासासाठी वित्त पुरवठा : सर्वसामान्य वित्तीय स्थैर्य राखणे व चलनवाढीच्या दाबाला आळा घालण्यासाठी करण्यात आलेल्या उपाय योजना बरोबरच रिझर्व बँकेने शेती व उद्योग क्षेत्राला वित्तीय सुविधा पुरवण्यासाठी विशेष वित्तीय संस्था स्थापन करण्यास मदत केली आहे. सरकारी बँका व पतसंस्था द्वारे रिझर्व बँकेने शेतीसाठी अल्प, मध्यम व दीर्घकालीन वित्तपुरवठा केला आहे.

४. पत्रमुद्रा निर्गमनाचा एकाधिकार :
केंद्रीय अधिकोषाने निर्गमित केलेल्या पत्रचलनाला कायदेशीर मान्यता आहे. अनेक देशात पत्र चलन निर्गमनाच्या वेग वेगळ्या पद्धती आहेत. भारतात किमान निधी पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

५. सरकारचा अधिकोष :
प्रत्येक देशातील केंद्रीय अधिकोष आपल्या सरकारची एजंट आणि सल्लागार म्हणून कार्य पार पाडतो. व्यापारी अधिकोष जनतेसाठी कार्य पार पाडतो. सरकारची रोख सांभाळणे, सार्वजनिक कर्जाची व्यवस्था करणे, सरकारला सल्ला देणे, खर्चाचे शोधन करणे.

६. अधिकोषाचा अधिकोष :
अधिकोषाचा अधिकोष म्हणून केंद्रीय अधिकोष कार्य पार पाडतो. केंद्रीय अधिकोषाला अधिकोषाची जननी म्हटले जाते.`केंद्रीय अभिकोष इतर अधिकोषांचा स्पर्धक नसून मदतनीस आहे.

७. आंतरराष्ट्रीय संघटनांशी सहकार्य : दिवसें दिवस आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढत आहे. प्रत्येक राष्ट्राला इतर राष्ट्रांची मदत घ्यावी लागते. केंद्रीय अधिकोष आंतरराष्ट्रीय संघटनांशी संबंध प्रस्थापित करतो.

८. आकडेवारी गोळा करणेः
केंद्रिय अधिकोष मुद्रा, अधिकोषण, आंतरराष्ट्रीय व्यापार, सार्वजनिक आयव्यय, शेती, उद्योग, व्यापार व नियोजन इत्यादी संबंधी माहिती गोळा करतो व प्रकाशित करतो. त्यामुळे केंद्रीय अधिकोषाला सूचना अधिकोष म्हटले जाते.

९. प्रत्यय नियंत्रण : शॉ यांच्या मते, प्रत्यय नियंत्रण अधिकोषाचे सर्वात महत्त्वाचे कार्य आहे, जर व्यापारी अधिकोषांनी जास्त प्रमाणात प्रत्यय निर्मिती केली तर त्याचे अनिष्ट परिणाम अर्थव्यवस्थेवर होतात. आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने अधिकोष व्यापारी अधिकोषांच्या प्रत्यय निर्मितीवर नियंत्रण ठेवतो. प्रत्यय नियंत्रणासाठी केंद्रीय अधिकोष संख्यात्मक आणि गुणात्मक दोन्ही साधनांचा अवलंब करते.

**आपली प्रगती तपसा :**

१. केंद्रीय अधिकोषाची भूमिका / कार्ये विशद करा.

## १३.५ चलन / वित्तीय आरिष्ट

### Currency crises - Meaning & Effects :

आंतरराष्ट्रीय बाजारात सर्वच राष्ट्रांना वित्तीय / चलन आरिष्टांना सामोरे जावे लागते.
''चलन आरिष्ट म्हणजे चलनाचे मूल्य जागतिक बाजारपेठेत कमी होणे होय.''
आतापर्यन्त विविध देशांना सहा प्रकारच्या चलनी आरिष्टांना सामोरे जावे लागले आहे.

१. १९९०-१९९४ मॅक्सिको
२. १९९७-१९९९ दक्षिण आशिया
३. १९९१-२००१ सर्जेटिना

पूर्व आशियाई देशांमध्ये १९७३-१९८० साली या देशांमध्ये क्रूड तेलाच्या किंमती भडकल्यामुळे वित्तीय संकट ओढवले. त्याचे अतिशय प्रतिकूल परिणाम त्या राष्ट्राच्या विनिमय दरावर झाले. अर्थव्यवस्था विस्कळीत झाल्या. यातून मार्ग काढण्यासाठी सर विल्समसन यांनी १९८० मध्ये एक लक्ष्य ठेवले. या स्थितीत देशाचा विनिमय दर कसा असावा या संबंधी त्यांनी आपले मत मांडले चलनी आरिष्ट्याच्या काळात ज्या देशावर वित्तीय आरिष्ट ओढवले आहे त्या देशाचा विनिमय दर इतर देशाच्या विनिमय दरापेक्षा स्थूलपणे १०% जास्त राहिल याकडे लक्ष ठेवावे. मात्र हे उद्दिष्ट्य डोळ्यासमोर ठेवताना बाजारातील मागणी आणि पुरवठ्याचा प्रतिसाद, तसेच बाजारातील चलनाचा प्रतिसाद कसा आहे? हे ही लक्षात घ्यावे लागते. कारण विनिमय दर या दोन घटकावर अवलंबून असतो. यासाठी औद्योगिक दृष्ट्या प्रगत राष्ट्रे व अप्रगत राष्ट्रे यांचा एक समुदाय (Zone) तयार करावा लागेल. त्यानुसार वित्तीय / चलनी आरिष्टावर मात करण्यासाठी व्यूहरचना तयार करावी.

१९८० साली विनिमय दर डॉलरच्या बरोबरीने येन मध्ये आणि डॉलर व जर्मन बँक असा करार करण्यात आला. त्यामुळे समुदायात (Zone) मध्ये असणाऱ्या राष्ट्रांनी आपला विनिमय दर स्थिर असावा असे मान्य केला. त्यामुळे परकीय राष्ट्रांच्या यादी मध्ये येणाऱ्या ज्या तेल निर्माण करणाऱ्या राष्ट्रांना विनिमय दर मान्य झाला नाही त्यामुळे तेलाच्या बॅलरची किंमती वाढल्या.

तेलाच्या किंमती भडकल्यामुळे व स्थिर विनिमय दर तेल निर्माण करणाऱ्या देशांनी अमान्य केल्यामुळे आंतरराष्ट्रीय नाणे निधीने अशा देशांसमोर प्रस्ताव ठेवला की, जे अल्पविकसित आहेत त्यांची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन, त्यांचे सुक्ष्म अभ्यास करून, त्यांना मार्गदर्शन करून, त्यांना तेलाच्या किंमती भडकल्यामुळे त्यांच्या अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या प्रतिकूल परिणामातून बाहेर पडण्यास मदत करणे गरजेचे आहे. त्यासाठी स्थूल राष्ट्रीय उत्पादनात GDP मध्ये वाढ करणे, रोजगारात वाढ करणे, चलन नियंत्रण, विनिमय दर, व्याज दर इतर बाबतीत स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणे.

**चलनी आरिष्ट्याचे परिणाम :** Effects of Currency Crises

औद्योगिक दृष्ट्या प्रगत देश व अप्रगत देश यांच्या अर्थव्यवस्थेवर चलनी आरिष्ट्याचे वेगवेगळे परिणाम झाले. ते पुढील प्रमाणे :

१. औद्योगिक दृष्ट्या प्रगत देशात आंतरराष्ट्रीय व्यापाराला संरक्षण मिळाले, मात्र विकासरोध कुंठित वाढ घडून आली म्हणजेच उच्च बेरोजगारी सह आर्थिक वाढ घडून आली.
२. युरोपियन राष्ट्रांत (विशेषतः जपान) संयुक्त राष्ट्रात मजूरीच्या व रोजगारीच्या दरात वाढ झाली. मात्र दोन्ही देशांच्या विनिमय दरात भिन्नता दिसून आली.
३. चलनाचे अवमूल्यन झाले.
४. अल्पविकसित देशात दारिद्र्याची मूळे खोलवर रूजण्यास मदत झाली.
५. पूर्वीचे युरोपमध्ये रचनात्मक सुधारणेमध्ये अडथळे निर्माण झाले.
६. मुक्त व्यापार धोरणावर मर्यादा आल्या.
७. जागतिक व्यापारात असमतोल निर्माण झाला.
चलनी आरिष्ट्याचे विविध अर्थव्यवस्थांवर झालेले परिणाम उत्पन्न, रोजगार, वितरण, विनिमय दर इ. वर मोठ्या प्रमाणात झाले.

**आपली प्रगती तपासा :**

१. चलनी आरिष्ट्याचे परिणाम लिहा.

## १३.६ चलनी आरिष्टापासून विकसनशील देशांनी घेतलेल धडा.

## (Lessons of Developing country crises)

विकसनशील देशांनी चलनी आरिष्ट्यांपासून आपल्या अर्थव्यवस्था सुरक्षित ठेवण्यासाठी पुढील मार्गांनी प्रयत्न केले.

१. विनिमय दर निश्चित करण्यात आले.
२. पतनियंत्रणावर मर्यादा ठेवण्यात आल्या.
३. जागतिक चलनी आरिष्ट्य निर्माण होऊ नये म्हणून जागतिक बँकेच्या मदतीने प्रयत्न केले जाऊ लागले.
४. उपलब्ध साधन संपत्तीचा पर्याप्त वापर करण्यावर भर दिला.
५. जागतिक बाजारपेठ ही एक कुंटुंब आहे ही संकल्पना मान्य करण्यात आली.
६. विविध राष्ट्रांनी आर्थिक गट / समुदाय (Economic Zone) निर्माण करण्यावर भर दिला.

१९७३-८० या काळातील कच्च्या तेलाच्या किंमतीचा विनिमय दरावर झालेला परिणाम, त्यातून अर्थव्यवस्था विस्कळीत झाल्या, तो अनुभव लक्षात घेऊन विकसनशील देशांनी वरील उपायांचा अवलंब केला.

**आपली प्रगती तपासा**

प्र. चलनी आरिष्ट्यांपासून विकसनशील देशांनी घेतलेला धडा : टिपा लिहा.

## १३.७ प्रश्नमालिका :

प्र.१ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची उद्दिष्टये आणि कार्ये स्पष्ट करा.

प्र.२ आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या दूर करण्यासंदर्भात आंतरराष्ट्रीय नणेनिधिची भूमिका स्पष्ट करा.

प्र.३ चलनआरिष्ट्य म्हणजे काय ? सांगून त्याचे परिणाम अभ्यासा.

प्र.४ १९७३ ते १९८० दरम्यान कच्च्या तेलाच्या किंमती भरल्यामुळे विनिमय दरात झालेला बदल अभ्यासा.

प्र.५ विकसनशील देशांनी चलन आरिष्ट्यांपासून घेतलेला धडा - टिप लिहा.

❖❖❖

# १४

# आर्थिक एकात्मीकरण

## ECONOMIC INTEGRATION

**पाठ्यक्रम**

१४.० उद्दिष्ट्ये
१४.१ प्रस्तावना
१४.२ आर्थिक एकात्मीकरणाचा अर्थ आणि फायदे
१४.३ आर्थिक एकात्मकीरण प्रकार
१४.४ सीमाशुल्क संघाचा सिद्धांत
१४.५ प्रश्नमालिका

## १४.० उद्दिष्ट्ये :

आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य आणि वित्तिय पद्धत यामध्ये आंतरसंबंध आहे. विकसित देशाकडून विकसनशील देशात मदतीचा प्रवाह वाढावा. विकसनशील देशातील उत्पादननिर्मिती वर अनुकूल परिणाम व्हावा यादृष्टीने आर्थिक एकात्मीकरण गरज भासू लागली त्याच अनुषंगाने जागतिक व्यापारपेठेत विविध व्यापारखाती निर्माण झाली. या प्रकरणात आपण आर्थिक एकात्मीकरण व व्यापारखाती याविषयी अभ्यास करणार आहोत.

या पाठाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१. आर्थिक एकात्मीकरणाची संकल्पना अभ्यासणे

२. आर्थिक एकात्मीकरणाची विविध प्रकारांचा अभ्यास करणे.

३. जागतिक व्यापार पेठेतील विविध व्यापारी गटांचा अभ्यास व मूल्यमापण करणे. (सार्क, साफ्ता आणि नाफ्ता इ.)

## १४.१ प्रस्तावना :

जागतिक अर्थव्यवस्थेतील सर्व देश आज विभेदी व्यापारी धोरण अवलंबतात. विविध प्रकारच्या आर्थिक एकात्मीकरणामुळे देशातील व्यापारी बंधने विशेषत: जकात बंधने कमी होतात म्हणून व्यापार वृद्धीसाठी आर्थिक एकात्मीकरणाची आवश्यकता आहे.

## १४.२ आर्थिक एकात्मीकरणाचा अर्थ आणि फायदे :

**अर्थ :** ''प्रादेशिक आर्थिक एकात्मीकरण म्हणजे विकसनशील देशातील व्यापार वाढीची एक अनोखी /अभिनव कल्पना होय.'' युरोपियन आर्थिक संघटनेद्वारे या देशांना यशस्वी होण्यासाठी

आकर्षित केले जाते, याचा अर्थ या क्षेत्रातील व्यापारवाढ होण्यास मदत होते. सहभागी देशात नविन तंत्रज्ञान, तांत्रिक नवनिर्मितीची अमलबजावणी व आधुनिक औद्योगिकरण तसेच उत्पादनातील मितव्ययता मिळवण्यासाठी आर्थिक एकात्मीकरण गरजेचे असते.

**फायदे :**

आर्थिक एकात्मीकरणामुळे काही सकारात्मक फायदे सहभागी देशांना होतात ते पुढीलप्रमाणे -

१. आर्थिक एकात्मीकरणामुळे बाजारपेठेचा विस्तार होऊन सहभागी देशातील अंतर्गत व बर्हिगत अशी उत्पादनातील मितव्ययत्ता वाढली जाते.

२. विस्तृत बाजारपेठेमुळे उत्पादनामध्ये विशेषीकरण करता येते परिणामी आधुनिक औद्योगिक विकास घडून येतो. अजूनही आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये तुलनात्मक लाभ मिळवण्यासाठी गुंतवणूकीचा प्रवाह उद्योगाकडे वळविण्यासाठी सहभागी देशांना प्रोत्साहन मिळते.

३. आर्थिक एकात्मीकरणामुळे परकिय व्यापाराच्या दिशेने व रचतेत तसेच वस्तूचा खर्च आणि किंमत रचना यामध्ये सकारात्मक (अनुकूल) परिणाम घडून येतो.

४. आर्थिक एकात्मीकरणामुळे नैसर्गिक साधनसामुग्रीचा पर्याप्त वापर. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, व जागतिक स्पर्धेला तोंड देणे शक्य होते.

५. उत्पादन आणि उपयोग यामुळे सहभागी देशात सामान्य कल्याण साधता येते.

**आपली प्रगती तपासा**

प्र.१ आर्थिक एकात्मीकरण म्हणजे काय ?

## १४.३ एकात्कीकरणाचे प्रकार :-

दुसऱ्या महायुद्धानंतर, जगातील देशांनी प्रादेशिक पातळीवर सहकार्य करण्याचे आणि अर्थव्यवस्थांचे परस्परांशी एकात्मीकरण (Integration) करण्याचे अनेक प्रयत्न केले आहेत. त्याचे खालील प्रकार सांगता येतात.

१. आर्थिक संघ (Economic Union)
२. सीमाशुल्क संघ (Customs Union)
३. खुला व्यापार क्षेत्र (Free Trade Area)
४. क्षेत्रीय किंवा आंशिक एकात्मीकरण (Sectoral Partial Integration)
५. अधिमान्य व्यापार (Preferential Trading)
६. दीर्घकालीन व्यापारी करार (Long- term Trade Agreement)

१. पहिल्या प्रकारात आर्थिक एकात्मीकरण पूर्णपणे झालेले असते. नंतरच्या प्रकारात एकात्मीकरणाचे आणि सहकार्याचे प्रमाण क्रमशः कमी होत जातो. शेवटच्या दोन प्रकारात केवळ शिथिल स्वरूपात सहकार्य केले जाते.

**आर्थिक संघ** ही परिपूर्ण एकात्मीकरणाची बाब म्हणता येईल. बॅनीलक्स संघ (Benelux Union) आणि युरोपीय सामाईक बाजारपेठ (European Common Market) ही आर्थिक संघाची दोन उत्तम उदाहरणे होत. माणसांच्या, भांडवलाच्या आणि सेवांच्या मुक्त

हालचालीवर निर्बंध घालणारे कायदे समाप्त करणे, सामाईक वाहतूक व्यवस्था करणे, कृषिविषयक समान धोरणे आखणे, आर्थिक धोरणांत समन्वय स्थापित करणे. आणि एका विकास बँकेची निर्मिती करणे. या पायाभूत तत्वांवर आर्थिक संघांची उभारणी केली जाते. या प्रकारात सभासद देशांना आपल्या स्वदेशांतर्गत आर्थिक धोरणांना पूर्ण मुरड घालावी लागते, कारण संपूर्ण क्षेत्रात शेवटी एकच धोरण लागू होते.

२. **सीमाशुल्क संघ** या दुसऱ्या प्रकारात दोन किंवा अधिक देश आपल्या भिन्न क्षेत्राच्या जागी एकच सीमाशुल्क क्षेत्र (Customs Territory) स्थापन करतात. यामुळे एक तर सभासद देशांना परस्पर व्यापारावरील प्रशुल्क आणि इतर निर्बंध अत्यंत कमी किंवा समाप्त करावे लागतात आणि दुसरे, संघाबाहेरच्या देशांशी होणाऱ्या व्यापारावर समान प्रशुल्क किंवा सारखे निर्बंध लावावे लागतात.

३. **खुला व्यापार क्षेत्र** या तिसऱ्या प्रकारात एकात्मीकरणाचे स्वरूप अधिक सैल असते. सभासद देश आपसात होणाऱ्या व्यापारावरील बहुतांश आणि इतर निर्बंध कमी करतात किंवा समाप्त करतात. मात्र प्रत्येक देशाला क्षेत्राबाहेरील अन्य देशाशी होणाऱ्या व्यापारावर इच्छेने प्रशुल्क किंवा निर्बंध लावण्याचे स्वातंत्र्य असते. सीमाशुल्क संघ आणि खुला व्यापारक्षेत्र यात अंतर म्हणजे पहिल्या प्रकारात सभासद देश बाह्य जगाशी होणाऱ्या व्यापाराबाबत सामाईक धोरण स्वीकारतात. तर दुसऱ्या प्रकारात आपसातील व्यापार खुला ठेवतात. आणि बाह्य जगाशी होणाऱ्या व्यापारावर वेगवेगळे आणि स्वतंत्र प्रशुल्क दर अमलात आणतात. युरोपीय स्वतंत्र व्यापार संघ (Europen free Trade Association or EFTA) आणि लॅटिन अमेरिकन स्वतंत्र व्यापार (Latin American Free Trade or LAFTA) ही खुला व्यापार क्षेत्राची उदाहरणे होत.

४. **क्षेत्रीय किंवा आंशिक एकात्मीकरण** या चवथ्या प्रकारात एखाद्या किंवा काही विविध वस्तूंची सामाईक बाजारपेठ स्थापन केली जाते. युरोपीय कोळसा आणि पोलाद समुदाय. (European Coal and steel Community) आणि युरोपीय अणुशक्ती समुदाय ही आंशिक एकात्मीकरणाची उदाहरणे होत.

५. **अधिमान्य व्यापार** या प्रकारात सभासद देश प्रशुल्क आणि इतर परिमाणात्मक निर्बंध याबाबतीत परस्पर अधिक उदार धोरण स्वीकारतात. पूर्वीचे साम्राज्य अधिमान (Imperial Preference) आणि सद्याचे राष्ट्रकूल अधिमान (Commonwealth Preference) हे या प्रकारचे आर्थिक सहकार्याचे उत्तम उदाहरण होय. युरोपीन आर्थिक सहकार्य संघटना (Organisation European Economic Cooperation - OEEC) आणि युरोपीय सहकार्य आणि विकास संघटना (Organisation for European Co-operation and Development - OECD) ही अलीकडील उदाहरणे होत. अधिमान्यतेमुळे व्यापाराच्या धरणीवर निश्चित परिणाम होतो आणि म्हणून त्याचे महत्त्व टिकून आहे.

**दीर्घकालीन व्यापारी करार** या शेवटच्या प्रकारात दोन देश काही विक्रेय वस्तूंच्या व्यापाराबाबत द्विपक्षीय करार करतात. करारांची मुदत १ ते ५ वर्षांपर्यंत किंवा आणखी जास्त

असू शकते. यामुळे जागतिक बाजारातील घटना आणि चढउतार यांच्या दुष्परिणामापासून दोन्ही देशांना संरक्षण मिळते. उत्पादनाच्या योजना आखता येतात. आणि बिनधोक पूर्ण करता येतात. आर्थिक सहकार्याचा हा अत्यंत शिथिल प्रकार म्हणता येईल.

वर वर्णन केलेल्या आर्थिक सहकार्याच्या प्रकारात कोणत्या तरी स्वरूपात भेदभाव अभिप्रेत असल्याचे स्पष्टपणे दिसते. राष्ट्रकुल अधिमानात भेदभाव आहे. सीमाशुल्क संघ आणि खुला व्यापार क्षेत्र यात तर १०० प्रतिशत अधिमान किंवा पसंती आहे. मुख्य म्हणजे प्रशुल्क आणि व्यापारविषयक सामान्य करार (GATT) या जागतिक संघटनेला कोणत्याही प्रकारचे अधिमान किंवा भेदभाव मान्य नाही. आणि अशा व्यवस्थांमध्ये भाग घेणारे बहुतेक देश मात्र प्र. व्या. सा. क. चे सभासद आहेत. म्हणूनच प्र.व्या.सा.क.ने अशा भेदभावपूर्ण व्यवस्यांवर नेहमी टीका केली आहे. खरे म्हणजे, अधिमान दाखविणारी कोणतीही नवीन व्यवस्था (Arrangement) निर्माण करू नये अशी ताकीद प्र.व्या.सा.क.ने दिली होती. परंतु नंतर अनेक प्रमुख राष्ट्रांकडून दडपणे आल्यामुळे प्र.व्या.सा. करारात काही सुधारणा करण्यात आल्या. त्यानुसार अल्पविकसित देशांना सुधारणा करण्यात आल्या. त्यानुसार अल्पविकसित देशांना अधिमान दाखविणाऱ्या व्यवस्थांना आणि विकसनशील देशांनी आपसात स्थापन केलेल्या अधिमान व्यवस्थांना मान्यता देण्यात आली. तसेच प्र. व्या. सा. क. चा भेदभावाला स्पष्ट विरोध असला तरी सीमाशुल्क संघ किंवा खुला व्यापार क्षेत्र स्थापन करण्याची परवानगी दोन अटींवर देण्यात आली. एक म्हणजे, त्या व्यवस्थेच्या अंतर्गतच सभासद देशांचा बहुतांश व्यापार होत असला पाहिजे आणि दुसरे, प्रशुल्क पूर्णपणे काढून टाकण्यासाठी ठराविक अवधींचा एक कार्यक्रम आखला गेला पाहिजे. युरोपीय कोळसा आणि पोलाद समुदाय (ECSC) या युरोपीय व्यवस्थेत मर्यादित वस्तूंचा समावेश असल्याने आणि युरोपीय खुल्या व्यापार संघ (E.F.T.A.) या संघटनेने शेतमालाला करारानुसार कळले असल्याने प्र.व्या.सा.क.ने आरंभी या दोन्ही व्यवस्थांना मान्यता दिली नव्हती. परंतु बऱ्याच वाटाघाटी झाल्या आणि त्यानंतर प्र. व्य. सा. क. ने आरंभी या दोन्ही व्यवस्थांना मान्यता दिली नव्हती. (प्रशुल्क व्यापारी सामुदायिक करार प्र.व्या.सा.क)

आदर्श व्यवस्थेच्या, जागतिक पातळीवरील आर्थिक सहकार्य हाच संपूर्ण महत्तम आर्थिक कल्याण साधणारा ‘पहिला उत्तम’ उपाय म्हणता येतो. परंतु अशी अवस्था उभारणे सध्या तरी शक्य नसल्याचे उघड आहे. म्हणून बहुतांश राष्ट्रे आता प्रादेक्षिक पातळीवर जमेल तेवढ्या प्रमाणात आर्थिक सहकार्य करण्याचा द्वितीय उत्तम उपाया स्वीकारीत आहे. आणि प्र. व्या. सा. क. ही संघटना नाखुशीने का असेना, पण संमती देत आहे. प्रादेशिक पातळीवरील आर्थिक सहकार्य आता केवळ व्यापारापर्यंत सीमित राहिले नसून अधिदानाच्या क्षेत्रातही सुरू झाले आहे. अशा आर्थिक सहकार्याचे आणि त्यात अभिप्रेत असलेल्या एकात्मीकरणाचे फायदे काय आणि त्याचे अर्थशास्त्र काय यांचा विचार झाला पाहिजे.

**आपली प्रगती अभ्यासा.**

१. आर्थिक एकात्मीकरणाचे विविध प्रकार कोणते ?

## १४.४ सीमाशुल्क संघांचा सिद्धांत (Theory of Customs Unions)

सीमा शुल्क संघांच्या सिद्धांताचा अभ्यास प्रशुल्क सिद्धांताची एक शाखा म्हणून केला जातो. ''द्वितीय उत्तमाचे'' एक प्रमुख उदाहरण म्हणून या संघांचा निर्देश केला जातो. त्यामुळे बरेचदा त्याविषयीची चर्चा कल्याण कल्पनेच्या संदर्भात होऊ लागते. अर्थात सीमाशुल्क संघाविषयीची चर्चा मागील दोन दशकांपासून जास्त होऊ लागली आहे. त्यावरील साहित्याला आणि संशोधन लिखाणाल जनू पेव फुटले आहे. कारणही तेसच घडले आहे. फ्रान्स, जर्मनी, इटली, बेल्जियम, लक्झेबर्ग आणि नेदरलॅन्ड्स या सहा देशांनी १९५८ साली रोम संधी (Tredty of Rome) करून युरोपी आर्थिक समुदायाची (European Economic Community) निर्मिती करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली. आणि तेव्हापासून आर्थिक एकात्मकीकरणाच्या जळवळीचे लोण जगभर पसरले आहे. अनेक अल्पविकसित देशांनी अनुकरण करण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणूने अशाच संधी केल्या आहेत. युरोपीय आर्थिक समुदायाच्या यशस्वितेची ग्वाही वाढत्या प्रमाणातील अनुकरणांद्वारे मिळते, याबद्दल शंका नाही.

सीमाशुल्क संघांच्या समस्यांचा अभ्यास सामान्यतः कल्याण पैलू आणि यंत्रणा पैलू या दोन शीर्षकांच्या अंतर्गत केला जातो. पहिल्यात संघाच्या स्थापनेमुळे सहभागी देशांच्या आणि एकंदर जगाच्या कल्याणात होणारी वाढ अथवा घट यांचा अंदाज लावला जातो. दुसऱ्यात सभासद देशांना आपल्या प्रशुल्क संरचनांमध्ये आणि वित्तीय धोरणांमध्ये कराव्या लागणाऱ्या बदलांचा विचार केला जातो. संघ सभासदाच्या कल्याणात भर पडते की घट होते, या प्रश्नाचे उत्तर देण्याचा सुविख्यात प्रयत्न जॅकॉब व्हायनर याने 'व्यापार निर्मिती' (Trade Creation) आणि (Trade diversion) या संदर्भात केला.

**व्यापार निर्मिती आणि अपवाहन**

जॅकॉब व्हायनर यांचे सर्वप्रथम १९५० साली 'सीमाशुल्क संघाचा प्रश्न' (The Coustoms union Issued) या नावाचा अभ्यास प्रकाशित करून या विषयावरील चर्चेला चालना दिली. खुल्या व्यापाऱ्यामुळे आंतरराष्ट्रीय श्रमविभागणी आणि विशेषीकरण अधिक योग्य प्रकारे होईल जागतिक कल्याणात भर पडते ही कल्पना सर्वसामान्य होती आणि सीमाशुल्क संघांच्या स्थापनेमुळे संबंधित सभासद राष्ट्रांत का असेना पण काही प्रमाणात व्यापारातील अडथळे दूर होण्यास निश्चित मदत होते आणि म्हणून सर्व देशानी प्रशुल्क भिंती उभारण्यापेक्षा काही देशांनी आपसातील प्रशुल्क भिंती मोडणे केव्हाही जागतिक कल्याणावर भर टाकणारे असते. असा समज सर्वत्र प्रचलित होता. काही खुल्या व्यापारापेक्षा केव्हाही अधिक श्रेष्ठ ही कल्पना अर्थशास्त्रज्ञांना देखील मान्य होती.

व्हायनरने या कल्पनेला धक्का दिला सीमाशुल्क संघामुळे जागतिक कल्याणात वाढ किंवा घट काहीही होऊ शकते, असे त्याने सांगितले आणि विशिष्ट संघाच्या स्थापनेमुळे कल्याणात वाढ होणार की घट याचे मोजमाप करण्यासाठी कसोट्या अथवा अभिलक्षणे सांगितली सीमाशुल्क संघाच्या स्थापनेच्या व्यापाराच्या स्वरूपावर (Pattern) काय परिणाम होतो याचे विश्लेषण करण्यासाठी त्याने व्यापार-निर्मिती आणि व्यापार - अपवाहन या दोन संज्ञा सांगितल्या. संघाच्या सभासदांनी परस्परातील प्रशुल्काची आडकाठी दूर केल्यानंतरच्या स्थितीत उत्पादन परिव्यय असलेल्या सभासद देशांमधून कमी परिव्यय असलेल्या सभासद देशांकडे हस्तांतरित

झाल्यास व्यापार - निर्मिती झाली आणि कल्याणावर घनात्मक परिणाम झाला असे म्हणता येते. याउलट प्रशुल्क आडकाठी दूर केल्यानंतर उत्पादन कमी परिव्यय असलेल्या संघाबाहेरच्या देशांऐवजी जास्त परिव्यय नसलेल्या संघातील देशांत होऊ लागल्यास व्यापार अपवाहन झाले असे म्हणता येते.

या दोन परिव्ययातील अंतर आपल्यालाा उदाहरण आणि आकृतीच्या साहाय्याने समजून घेता येते. उदाहरणात केवळ उत्पादनावर लक्ष केंद्रित केले असून एका विशिष्ट क्ष वस्तूंच्या (कापड) मागणी पूर्णपणे अलवचिक असल्याचे आणि पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या तिन्ही देशांत स्थिर परिव्ययाचा नियम लागू असल्याचे गृहीत धरले आहे. प्रशुल्काचा दर प्रत्येक वेळी १०० प्रतिशत मानला आहे. तिन्ही देशांतील परिव्यय पहिल्या देशातील चलनात बदलून सांगितला आहे. आकृती मध्ये प१, प२, आणि प३ हे अनुक्रम पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या देशाचे पुरवठा वक्र दाखविले आहेत. तिन्ही देशांतील परिव्यय अनुक्रमे १० रूपये, ८ रूपये आणि ६ रूपये प्रति मीटर आहे. पहिल्या देशाने आपल्या कापड उद्योगाला संरक्षण देण्यासाठी आयातींवर १०० प्रतिशत शुल्क (प्र) लावल्यास दुसऱ्या देशातील कापडाची प्रति मीटर किंमत ८ रू. पासून १६ रू. पर्यंत आणि तिसऱ्या देशातील ६ रू. पासून १८ रू. पर्यंत वाढते. त्यामुळे अ देशात आयात मुळीचं होत नाही आणि स्वदेशात १० रू. दराने संपूर्ण उत्पादन होते. समजा आता पहिला आणि दुसरा देश सीमाशुल्क संघ स्थापन करतात. परिणामतः त्यांच्यामधील आयात प्रशुल्क समाप्त होते. तिसऱ्या देशातील मालावर मात्र आयात प्रशुल्क चालू राहते. दुसऱ्या देशातील कापड (८ रू. प्रतिमीटर) आता पहिल्या देशातील कापडापेक्षा (१० रू. प्रति मीटर) स्वस्त असल्यामुळे पहिल्या देशातील जास्त खर्चिक उत्पादन बंद होऊन ते दुसऱ्या देशात सुरू होते. कमी परिव्यय असलेल्या देशाकडे उत्पादन हस्तांतरित झाल्यामुळे याला व्यापार-निर्मिती म्हणतात. तिसऱ्या देशातून पूर्वी देखील पहिल्या देशात निर्यात होत नसल्यामुळे सीमाशुल्क संघाच्या स्थापनेचा त्याच्या व्यापावर परिणाम होत नाही. पहिल्या देशाने स्वदेशात मालाची निर्मिती करण्याऐवजी दुसऱ्या देशातून तो आयात केला म्हणून संपत्ती साधनांचं अम X 2 किंवा रेखांकित भागाऐवढी बचत होते. ही बचत म्हणजेच कल्याणात पडलेली भर. व्यापार - निर्मिती होत असेल तर संघात अवश्य प्रवेश करावा आणि व्यापार-अपवाहन होत असेल तर संघाबाहेर राहावे. अर्थात यासंबंधी कोणतेही सरसकट विधान करणे कठीण आहे. प्रत्येक प्रस्तावित सीमाशुल्क संघाचा विचार स्वतंत्रपणे केला पाहिजे.

आपण केवळ उत्पादनावर होणाऱ्या परिणामांचा विचार केला. परंतु संघ स्थापनेचे परिणाम उपभोगावरही होतात. आंशिक समतोलाचा प्रतिमानाचा आपली मागणी पूर्णपणे अलवचिक असते असे गृहीत धरून विवेचन केले. वस्तुस्थिती मात्र तशी नसते. प्रशुल्क काढल्यामुळे सभासद देशात त्या वस्तूंच्या किंमती घटतात आणि त्यांचे मागणीवर उत्पन्न परिणाम आणि प्रतिस्थापन परिणाम होतात. प्रो. मीड यांनी यासंबंधी उल्लेखनीय विवेचन केले आहे. त्यांच्या मते केवळ एका वस्तूवर होणाऱ्या परिणामांचा विचार करून भागत नाही. सर्व वस्तूंविषयी त्यांचे आंतरसंबंध लक्षात घेऊन विचार करावा लागतो. त्या वस्तू पर्यायी असू शकतात किंवा संपूरक असू शकतात. काही वस्तूंपासून मिळणारे उपभोक्त्याचे संतोषाधिक्य जास्त तर इतरांपासून कमी असू शकते. शिवाय प्रत्येक वस्तूवर होणाऱ्या परिणामांची साधी बेरीज-वजाबाकी करता येत नाही, स्थिती त्यापेक्षा पुष्कळ गुंतागुंतीची असते.

संघ - स्थापनेचा व्यापार अटींवर देखील परिणाम होतो. देशांचा गट लहान असल्यास व्यापार अटींवर विशेष परिणाम होत नाही. परंतु युरोपीय आर्थिक समुदायासारखा मोठा गट

असल्यास प्रशुल्क काढता क्षणीच व्यापार-संबंधामध्ये महत्त्वाचे बदलांचा परिणाम कल्याणावर होतो. आपण उदाहरणे आणि आकृत्या यांच्या साहाय्याने आरंभी ज्या तीन देशांचा विचार केला आहे. त्यापैकी संघात प्रवेश करणाऱ्या पहिल्या दोन देशांच्या सामाईक व्यापार अटी अनुकूल होतात आणि संघाबाहेर राहणाऱ्या तिसऱ्या देशाच्या म्हणजेच बाह्य जगाच्या व्यापार अटी प्रतिकूल होतात हे उघड आहे. अर्थात संघात असणाऱ्या दोन देशांच्या परस्पर व्यापार - अटी सुधारतीलच असे नाही. त्या एकाला अनुकूल आणि दुसऱ्याला प्रतिकूल राहू शकतात.

उत्पादन उपभोग आणि व्यापार अटी यांवर संघ स्थापनेचा काय परिणाम होतो याचे विवेचन केले म्हणजे सीमाशुल्क संघांच्या सिद्धान्ताचा बराचसा भाग पूर्ण झाला असे समजायला हरकत नाही. परंतु उपेक्षा करता येणार नाही असेही काही परिणाम आहेत. एक म्हणजे संघ स्थापनेचा परिणाम बचतीवर (Scale economics) होणाऱ्या परिणामांचा विचार व्हावयास हवा. बाजारपेठ लहान असल्यास उत्पादन मोठ्या आणि कार्यक्षम प्रमाणात करता येत नाही. सामाईक बाजारपेठ उपलब्ध झाल्याने मोठ्या व कार्यक्षम उत्पादनाचे सर्व फायदे मिळू लागतात. अर्थात ही सामाईक बाजारपेठ फार लहान असू नये. अल्पविकसित देशांच्या दृष्टीने या मुद्याला महत्त्व आहे. कमी क्रयशक्ती असलेल्या लहान गटांनी सामाईक बाजारपेठा स्थापन करण्यात विशेष हशील नाही. मोठे गट एकत्र असल्यास लाभ होऊ शकतो हा त्याचा अर्थ.

दुसरे, सामाईक बाजारपेठेचा कार्यक्षमतेवरही परिणाम होतो. आधी संरक्षित असलेल्या अर्थव्यवस्था संघातील देशासाठी खुल्या झाल्यामुळे उत्पादकांना वाढत्या स्पर्धेला तोंड द्यावे लागते. इंग्लंडने युरोपीय आर्थिक समुदायात प्रवेश मिळविला पाहिजे. या प्रतिपादनामागे हीच भूमिका होती. बाजारपेठ लहान व संरक्षित असली तर उत्पादक आपली शक्ती अल्पाधिकार स्थापन करण्यासाठी खर्च करतात. नवीन तंत्रांचा वापर करण्याकडे किंवा नवीन वस्तू बाजारात आणण्याकडे त्यांचा विशेष कल नसतो. सामाईक बाजारपेठेत प्रवेश केल्यास आपोआप स्पर्धेला सामोरे जावे लागते. सभासद देशांनाही स्पर्धात्मक स्थिती टिकून राहावी व वृध्दींगत व्हावी या दृष्टीने प्रयत्न करावा लागतो. विश्वस्त (Trusts) किंवा कारखानदार नियंत्रक संघ (Cartels) यांची स्थापना होऊ नये म्हणून कायदे करावे लागतात. रोम संधीत अशा प्रकारचे कलम घालण्यात आले आहे.

तिसरे, सीमाशुल्क संघ किंवा सामाईक बाजारपेठ स्थापन केल्याने सभासद देशांच्या आर्थिक अभिवृद्धीला चालना मिळते. लॅटिन अमेरिकन सामाईक बाजारपेठ याच हेतूने स्थापन करण्यात आली. बाहेरच्या देशांतील अस्थिर बाजारांवर अवलंबून राहावे लागत नाही. हा त्याचा सर्वात मोठा फायदा. उत्पादकांना परिमाण बचती मिळविता येतात आणि स्पर्धेमुळे कार्यक्षमता वाढण्यास मदत होते. प्रशुल्क भिंतीच्या आड संरक्षणाचा लाभ मिळेल या आशेने भांडवलाचा अंतप्रवाह देखील सुरू होण्याची शक्यता असते. अनेक लेखक युरोपच्या वेगवान अभिवृद्धिदराचे श्रेय तेथील सामाईक बाजारपेठेला देतात. मात्र कोणत्याही अशा घटनेकडे जागतिक दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. सभासद देशांचा अभिवृद्धिवर एकीकडे वाढत असताना दुसरीकडे व्यापार - अपवाहन होऊन बिगर सभासद देशांचा अभिवृद्धिवर घटत असेल, आणि त्यांचा विकास धिमा होत असेल तर ही घटना समर्थनीय ठरत नाही. उत्पन्नाच्या केवळ हस्तातरणातून घडून आलेली अभिवृद्धी विषमता वाढविण्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे जागतिक कल्याणात वाढ होण्याऐवजी घटच होते. सामाईक बाजारपेठांच्या यशाकरीता एक आणखी गोष्ट आवश्यक असल्याचे प्रो. हॅरी जॉन्सन यांनी म्हटले आहे व ती म्हणजे प्रशुल्क घटविल्याचे फायदे वाढीव परिवहन खर्च किंवा सांस्कृतिक अडथळे यासारख्या गोष्टींनी निष्प्रभावी व्हावयास नकोत.

उदाहरणार्थ, भारत, थायलँड, फिलिपाईन्स, कोरिया आणि न्यूझीलँड या देशाच्या सामाईक बाजारपेठेची यशस्वीता शंकास्पद असू शकते. सीमाशुल्क संघाच्या स्थापनेचा उत्पादन, उपभोग, व्यापारअटी परिणाम बचती, उत्पादनातील कार्यक्षमता आणि आर्थिक अभिवृद्धिदर यावर काय परिणाम होऊ शकतो यासंबंधी आपण विवेचन केले. हे विवेचन केवळ आर्थिक पैलू दृष्टी समोर ठेवून करण्यात आले. सीमाशूल्य संघाची स्थापना ही घटना मात्र राजकीय असते व तिचे दूरगामी राजकीय परिणाम होतात. उदाहरणार्थ युरोपीय आर्थिक समुदायातील देशांची मागील वीस वर्षांतील प्रगती ग्रेट, ब्रिटनचा त्यात १९७३ साली झालेल प्रवेश आणि जून १९७५ मध्ये ब्रिटिश जनतेने सर्वमताच्या माध्यमाने त्यावर केलेले शिक्कामोर्तब या सर्व घटना तशा राजकीयच आहेत. त्याचे पर्यवसान संयुक्त राष्ट्र युरोपची (United States of Europe) स्थापना होण्यात झाले तर नवल नाही. मग नव्या युरोपला अमेरिका आणि सोव्हिएट संघ या दोन देशांशी समान पातळीवर व्यवहार करता येईल.

**आपली प्रगती तपासा**

१. सीमाशुल्क संघ म्हणजे काय ?

२. सीमशुल्काचे स्थितीथील परिणाम कोणते ?

## १४.५ प्रश्नमालिका

प्र.१ आर्थिक एकात्मीकरण म्हणजे कार्य सांगून त्याचे विविध फायदे स्पष्ट करा.

प्र.२ आर्थिक एकात्मीकरणाचे विविध प्रकार स्पष्ट करा.

प्र.३ सीमाशुल्क सिध्दांत स्पष्ट करा.

प्र.४ जकातसंघाच्या स्थितीशील परिणामांविषयी चर्चा करा.

❖❖❖

# १५

# व्यापारीगटांचे अनुभव व मुल्यमापन

**पाठ्यक्रम**

१५.० उद्दिष्ट्ये
१५.१ प्रस्तावना
१५.२ व्यापारी गट
१५.२.१ उत्तर अमेरिकन मुक्त व्यापार क्षेत्र (NAFTA)
१५.२.२ दक्षिण अमेरिकन मुक्त व्यापार क्षेत्र (SAFTA)
१५.२.३ प्रादेशिक सहकार्यासाठी दक्षिण आशियाई संघटना (SAARC)
१५.३ प्रश्नमालिका

## १५.० उद्दिष्ट्ये :

आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये आर्थिक एकात्मीकरणाबरोबरच व्यापारी गटांचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. विकसनशील देशातील निर्मितीवर अनुकूल परिणाम व्हावा यादृष्टीने आर्थिक एकात्मीकरणाची गरज भासू लागली त्याच अनुसंगाने जागतिक व्यापारपेठेत विविध आंतरराष्ट्रीय व्यापारीगट निर्माण झाले. या पाठात आपण महत्त्वाच्या अशा विविध व्यापारीगटांची चर्चा करणार आहोत.

या पाठाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) जागतिक व्यापारी पेठेतील विविध व्यापारीगटांचा अभ्यास करणे.

२) उत्तर अमेरिकन मुक्त व्यापारीक्षेत्र (NAFTA) या व्यापारी गटाचा अभ्यास करणे.

३) जागतिक व्यापारी पेठेतील व्यापारीगट म्हणून सार्क (SAARC) ची भूमिका अभ्यासणे.

## १५.१ प्रस्तावना :

आर्थिक विकास साध्य करण्यासाठी प्रादेशीक आर्थिक सहकार्य करण्याच्या हेतूने ज्या संस्थाची स्थापना करण्यात आली त्यामध्ये प्रामुख्याने नाफ्ता, साफ्ता व सार्क या व्यापारी गटांचा उल्लेख केला जातो. युरोपियन युनियन आणि नाफ्ता उत्तर अमेरिकन मुक्त व्यापारी क्षेत्र, हे व्यापारी गट मुख्यत्वेकरुन, विकसित देशाच्या आर्थिक विकासाच्या हेतूने स्थापन होतात तर सार्क प्रादेशिक सहकार्यासाठी दक्षिण आशियाई संघटना अशा प्रकारचे व्यापारी गट विकसनशील देशांच्या आर्थिक विकासाच्या हेतूने स्थापन किंवा निर्माण होतात. थोडक्यात जागतिक व्यापारी पेठेत आर्थिक सहकार्याच्या हेतूने व्यापारी गटांचे योगदान महत्वपूर्ण आहे.

## १५.२ व्यापारी गट

### १५.२.१उत्तर अमेरिकन मुक्त व्यापारी क्षेत्र (NAFTA)

अमेरिका भूतपूर्व राष्ट्रपती बिल क्लिंटन ह्यांच्या पुढाकाराने ''नाफ्टा''ची निर्मिती झाली. हा समझोता किंवा करार अमेरिका, कॅनडा व मेक्सिको ह्या तीन देशांच्या एका नव्या सामर्थ्यवान क्षेत्रीय संघटनेचा निर्माता आहे. एका नव्या सामर्थ्यवान क्षेत्री संघटनेचा निर्माता आहे. ह्या करारामुळे कडव्या अशा अंतर्विरोध असलेल्या संयुक्त राज्य अमेरिका (USA) नवजीवन प्राप्त झाले आहे. नाफ्ट लागू झाल्यानंतर अमेरिकेचा ६५ टक्के माल कोणत्याही प्रकारचे आयात शुल्क न लागता मेक्सिकोच्या बाजारपेठेत विकला जाईल. ह्याशिवाय भांडवल गुंतवणूकीवरील सर्व नियंत्रणे क्रमशः हटविण्यात येतील.
नाफ्टा अंतर्गत अमेरिका, कॅनडा व मेक्सिको हे देश व्यापारावर असलेली सर्व नियंत्रणे हटवून मुक्त व्यापार क्षेत्र बनतील. सांप्रत नाफ्टा म्हणजे सर्वात मोठे मुक्त व्यापार क्षेत्र मानले जाते. प्रादेशिक आर्थिक सहकार्य वाढवण्याचा प्रयत्नाचा एक भाग म्हणून या संघटनेकडे पाहता येईल.

उत्तर अमेरिकी देश एकमेकांकडून ज्या वस्तू विकत घेतात त्या यंत्रसामूग्री, वाहतूक सामूग्री अशा स्वरूपाच्या भांडवली वस्तू असतात. या वस्तू निर्यात करणाऱ्या देशावर संघटनेमुळे परिणाम होत असतो. भारताच्या बाबतीत अशी शक्यता नाही. अमेरिकेची संयुक्त संस्थाने सोडल्यास इतर देशांशी भारताचा मोठा व्यापार नाही. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानाचा विचार केल्यास भारत अमेरिकेकडे ज्या वस्तूंची निर्यात करतो अशा वस्तू संघटनेतील इतर देश अमेरिकेच्या संयुक्त संस्थाना पुरवीत नाहीत. त्यामुळे या संघटनेचा भारताच्या निर्यातीवर प्रतिकूल परिणाम होत नाही. संघटनेतील देशांनी आपसात व्यापार खूला केल्यामुळे भारताचे नुकसान होण्याची शक्यता नाही तर फायदा होण्याची शक्यता आहे.

**आपली प्रगती तपासा :**

प्रश्न १. ''नाफ्टा'' (NAFTA) वर टिपा लिहा.

### १५.२.२ दक्षिण अमेरिकन मुक्त व्यापारी क्षेत्र (SAFTA)

सार्क अधिमान्य (अधिक पसंती) व्यापार करार (साफ्टा)

(Preferential Trading Agreement - SAFTA)

सार्क देशांच्या अंतर्गत व्यापार सहकार्य वाढावे म्हणून ७ डिसेंबर १९९५ पासून करार लागू करण्यात आला. आंतरक्षेत्रीय व्यापाराचा प्रसार करणारी साफ्टा ही गठीत संस्था आहे. ह्या संस्थेचा उद्देश हा सार्कमधील देशांच्या व्यापारात येणारे अडथळे व्यवस्थितपणे निवारणे.

**अ) सार्क अधिमान्य व्यापार कराराची उद्दिष्ट्चे (SAPTA) पुढीलप्रमाणे -**

१. सार्कच्या सदस्य देशांचा हळूहळू व्यापार विस्तार करणे.
२. ''सार्क'' देशातील अडथळे काढून टाकणे.
३. सदस्य देशात आर्थिक सहकार्य अंतर्गत व्यापाराची स्थैर्याधिष्टित उभारणी करणे.

**ब) SAFTA च्या प्रशासनाची तत्त्वे :**

साफ्टा (SAFTA) च्या प्रशासनाची तत्त्वे पुढीलप्रमाणे :
१. परस्पर समझोत्याच्या आधारे एकत्रित समानतेने सभासद देशांना फायदे मिळवून देणे.

२. कराराप्रमाणे टप्प्याटप्प्याने सुधारणा परस्पर सहकार्यातून तडजोडी करणे. कच्चा माल आणि अर्धसिद्ध उत्पादित वस्तूंना अंतर्गत सवलत दिली जाते.

**क) जकाती :**

जकातीत सवलत दिली जाते. जकाती तसेच जकातीशिवाय वेगळ्या मार्गाचा अवलंब केला जातो. जकातीवर उपाया योजनाचे मार्ग म्हणजे

१. निर्यातक्षेत्रात व्यापाराच्या सुविधा उपलब्ध करून देणे.

२. निर्यात पुरवठा, विमा आणि बाजाराची माहिती उपलब्ध करून देणे.

३. तांत्रिक मदत उपलब्ध करून देणे. उद्योगाची स्थापना, निर्यातीसाठी कृषी प्रकल्प उभारणे इत्यादी.

४. दीर्घकाळाचा करार करणे.

५. जकातीचे अडथळे दूर करणे. त्यासाठी प्रशुल्क मुक्त करणे, निर्यात वस्तूंना जकातीपासून सूट देणे इ.

**ड) व्यवहारतोल :**

व्यवहारतोलाचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्यास निर्यात वाढविण्यासाठी सवलत देणे.

सहभागी समिती करार आणि विभागणीच्या अंमलबजावणीचा आढावा घेईल. तसेच फायदे सर्व देशांना समान दिले जातील. दिलेल्या सवलती काढून घेणे किंवा त्यात बदल करण्यासाठी अंतर्गत सल्ला मसलत करणे हे प्रत्येक तीन वर्षांनी केले जाईल.

सार्कवर टीका (Criticismson SAARC) :

व्यापाराच्या उदारीकरणामध्ये सार्क देशांशी सुरवात चांगली झाली. परंतु त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले.

१. काही वस्तुंबरोबर देशांतर्गत व्यापारात मोठ्या जकातीची सवलत पूर्ण करता आली नाही किंवा पोहोचली नाही.
२. ह्या प्रादेशिक संघाचा परकीय जागतिक व्यापारात अगदी लहान हिस्सा आहे. त्यामुळे संघटनेतील देशांचे इतर देशांबरोबर आयात-निर्यातीचे अधिक संबंध आहेत.
३. संघटनेतील सदस्य देशात दारिद्र्य, बेकारी, अतिरिक्त लोकसंख्या या समस्या आहेत. त्यामुळे परस्पर वित्तीय सहाय्य करणे कठीण आहे.
४. भारत आणि पाकिस्तान या दोन देशात राजकीय वैमनस्य असल्याने परस्परात विधायक सहकार्य निर्माण होणे कठीण आहे.
५. भारत हा आकाराने, आर्थिकदृष्ट्या लोकसंख्येने इतर सदस्य देशांमध्ये मोठा आहे. इतर सदस्य देशांपेक्षा मोठा आहे. इतर सदस्य देशांना भारताच्या वर्चस्वाचे भय वाटते.
६. तांत्रिक समितीद्वारे वाहतूक, जमीन आणि जलवाहतूक सुविधा सदस्य देशात उपलब्ध झाली नाही. म्हणून सदस्य देशातील सदस्य देशात उपलब्ध झाली नाही. म्हणून सदस्य देशातील व्यापार विकसित झाला नाही.
७. सदस्य देशांची पतपुरवठ्याची साधने वेगवेगळी आहेत तो एक महत्त्वाचा अडथळा देशांच्या व्यापाराच्या विकासाला निर्माण होतो.
८. वस्तूचा व्यापार बेकायदा आणि अव्यवहार्य असल्यास सदस्य देशात व्यापारात अडथळे येतात.

सद्या ''सार्क'' त्याचे उद्दिष्ट साद्य करण्यात महत्त्वपूर्णरित्या प्रगती करण्यात अपयशी ठरला आहे. सदस्य देशांमधील संबंधाचे चांगले वातावरण राहिले नाही. सार्कचे भवितव्य अंधारमय वाटते.

पेट्रोलियम निर्यातक देशांचे संघटन (ओपेक)

(Organization of the Petroleum exporting Countries = OPEC)

तेल निर्यातक देशांच्या संघटनेची (OPEC) स्थापना निर्यात करणाऱ्या देशांमध्ये तेल उत्पादन करण्याचे कार्य प्रामुख्याने बहुउद्देशीय कंपन्या मार्फतच करण्यात येते. ओपेकच्या स्थापनेपूर्वी पासूनच तेल कंपन्या तेलाच्या निर्यातीद्वारे स्वतःच्या देशांना संपन्न बनवित आहेत.

ओपेकच्या नियमानुसार कोणत्याही राष्ट्राला संघटनेचा सदस्य बनविण्याकरिता तेलाचे शुद्ध निर्यातक राष्ट्र असावयास हवे; तसेच राष्ट्राचे तेल.

**आपली प्रगती तपासा**

प्र.१ दक्षिण अमेरिकन मुक्त बाजार क्षेत्र (SAFTA) म्हणजे काय ?

## १५.२.३ प्रादेशिक सहकार्यासाठी दक्षिण आशियाई संघटना (सार्क)

**(South Asian Association for Regional Co-operation - SAARC)**

डिसेंबर १९८५ मध्ये दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटनेची स्थापना झाली. या संघटेनेत सात देश कायमस्वरूपी सदस्य आहेत. भारत, बांगला देश, पाकिस्तान, नेपाळ, श्रीलंका, भूतान आणि मालदिव या देशांचा समावेश होतो. या संघटनेचे मुख्य कार्यालय नेपाळची राजधानी काठमांडू येथे आहे ''सार्क''चे सर्व सभासद देश प्रामुख्याने कृषीप्रधान देशम्हणून ओळखले जातात.

प्रादेशिक सहकार्यासाठी दक्षिण आशियाई संघटना (सार्क) यांनी अंतर्गत स्पर्धा नाकारली असून व्यापाराच्या शर्तीत सुधारणा केली आहे. जर धोरणाचा स्वतःची ओळख विकसित करणे व व्यवहार करणे, तर प्रादेशिक व्यवहारात द्विपक्षीय शर्तीत विस्तार करणे, ही महत्त्वाची तत्वे आहेत.

सार्कचे संघटन स्वरूप (Organisation of SAARC)

सार्कच्या कार्यकारी मंडळाने ''उच्च धोरण'' ठरविले आहे. त्यानुसार सभासद देशांच्या सरकारचा प्रमुख घटनेनुसार कार्यकारी मंडळावर असतो. कार्यकारी मंडळाची बैठक दोन वर्षातून एकदा होते विदेश व्यापार संचिवांची स्थायी समिती असते.

ही समिती मागील कार्याचा आढावा घेऊन नवीन योजना मंजूर करून त्याची कार्यवाही करते. सार्कच्या कामकाजाच्या दृष्टीने एकूण ११ समित्या कार्यरत आहेत.

**तांत्रिक समिती :**

या समितीमध्ये सदस्य देशांच्या प्रतिनिधीचा समावेश असतो. या समितीवर सार्कच्या धोरणाची अंमलबजावणी, समन्वय आणि देखरेख ही जबाबदारी असते. सभासद देशांच्यासाठी घटनेनुसार पुढील कार्य केली जातात.

प्रादेशिक सहकार्यासाठी दक्षिण आशियाई संघटना (सार्क) मुख्य ध्येय मानवी आणि भौतिक साधनसंपत्तीचा अधिकाधिक उपयोग करून सामाजिक आणि आर्थिक विकास साध्य करणे.

सार्कची उद्दिष्ट : (Objectives of SAARC)
सार्क संघटनेच्या चार्टर कलम I मध्ये पुढील उद्दिष्ट दिली आहेत.

१. दक्षिण आशियातील लोकांच्या सामाजिक आर्थिक कल्याणात सुधारणा करणे आणि त्यांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारणे.
२. आर्थिक वाढीचा वेग वाढविणे, प्रदेशातील सामाजिक प्रगती आणि सांस्कृतिक विकास साधणे, सर्व व्यक्तींना आत्मसन्मानाने जगण्याची संधी देणे आणि त्यांच्या क्षमतेचा पूर्ण उपयोग करून घेणृ
३. दक्षिण आशियातील देशामध्ये सामुदायिरीत्या आत्मनिर्भरता वाढवून ती बळकट करणे.
४. एकमेकांच्या समस्या समजावून घेऊन एकमेकांवरील विश्वास वाढविणे.
५. सभासद देशांच्या विकासाचा वेग वाढविण्यासाठी एकमेकांतील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक आणि विज्ञान क्षेत्रातील सहकार्य वाढविणे.
६. समान हितसंबंधी प्रश्नांवर आंतरराष्ट्रीय मंचावर आपापसातील सहकार्य वाढविणे.
७. समान उद्दिष्ट आणि हेतू असलेल्या आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक संघटनेबरोबर सहकार्य करणे.

## तत्वे (Principales)

चार्टर (Charter) च्या नियम ११ मध्ये खालील तत्त्वांचा समावेश केला आहे.
व्यवहारतोल

१. संघटनेच्या आराखड्यामध्ये सहकार्य करण्यासंदर्भात म्हणजेच सार्वभौम समता, प्रादेशिक अबाधितता, राजकीय स्वातंत्र्य, इतर देशांच्या देशांतर्गत व्यवहारात अलिप्तता बाळगणे आणि एकमेकांचे फायदे पाहणे.
२. असे सहकार्य द्विपक्षीय किंवा अनेक पक्षीय बंधनाच्या विरोधी नसेल.
३. अशासहकार्यात असंगततेबरोबर द्विपक्षीय आणि बहुपक्षीय बंधने नसतील.
सार्क देशांचे आर्थिक संबंध आणि व्यापारवाढीस मोठा वाव आहे. हे देश जागतिक व्यापारात इतर देशांबरोबर स्पर्धा करू शकतील. सार्कच्या सदस्य देशात.
१. प्रतिनिधीच्या क्षेत्रात कार्यक्रम आणि प्रकल्पांची उभारणी करणे.
२. मुख्य प्रकल्पांची अंमलबजावणी करणे.
३. प्रकल्प कमिटीचा अहवाल स्थायी समितीला सादर करणे.

### सार्कच्या तांत्रिक समितीचा संबंध :

१. कृषी २. पर्यावरण ३. विज्ञान आणि तंत्रज्ञान ४. दळणवळण ५ आरोग्य आणि लोकसंख्या ६. ग्रामीण विकास ७. पर्यटन इत्यादींशी असतो.
सार्कने २००१ ते २०१० हे दशक बालकल्याणासाठी राबविण्याचे ठरविले आहे.

सार्कच्या सभासद देशांच्या प्रमुखाची वर्षातून एकदा बैठक आयोजित केली जाते. सार्कची पहिली बैठक १९८५ मध्ये बांगला देशाची राजधानी ढाका येथे भरली होती दुसरी बैठक १९८६ मध्ये

बेंगलोर, येथे तिसरी बैठक नेपाळची राजधानी काठमांडू येथे १९८७ मध्ये, चौथी बैठक इस्लामाबाद येथे १९८८ मध्ये भरली होती. नंतरच्या काळात मात्र प्रतिवर्षी बैठक आयोजित करण्याऐवजी दोन वर्षातून एकदा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. पाचवी बैठक माले येथे १९९० मध्ये, सहावी कोलंबो येथे १९९१ मध्ये भरली होती. तेरावी बैठक २००५ मध्ये ढाका येथे पार पाडली.

जानेवारी २००४ मध्ये इस्लामाबाद येथे भरलेली सार्क शिखर बैठक ऐतिहासिक समजण्यात येते. ह्या संमेलनात भारत व पाकिस्तान हे दोन देश परस्परांजवळ आले. सात देशांच्या ह्या संमेलनात घोषणापत्र जाहीर करण्यात आले. ह्या दोन्ही देशांनी एकत्रितपणे आंतकवादाचा बंदोबस्त करण्याची घोषणा केली तसेच ''खुल्या व्यापाराबाबत'' ही सहमती दर्शविण्यात आली. ह्या घोषणा पत्रातील प्रमुख मुद्दे पुढील प्रमाणे -

१. दक्षिण आशिया एक शांतीपूर्ण व स्थिर क्षेत्र बनविणे
२. विवाद; मतभिन्नता व संघर्ष ह्यावर शांततेच्या उपाय योजना करणे.
३. सार्वभौमिकता, समानता, क्षेत्रीय अखंडता व राष्ट्रांचे स्वातंत्र्य ह्यांच्या आधारावर समंजस शेजारी म्हणून राहणे व विकास साधणे.
४. शस्त्रस्त्रांचा वापर न करणे, इतरांच्या कारभारात हस्तक्षेप न करणे. तसेच दुसऱ्या देशाच्या भानगडीत न पडणे ह्यावर जोर देण्यात आला.
५. सार्कच्या छोट्या छोट्या देशांच्या विशेष समस्यां बद्दल जागरूक राहणे.

सार्कच्या सर्वसाधारण तरतूदी (SAARC)
१. सार्कमधील देश कोणताही निर्णय एकमताने घेतात.
२. संघटनेत विवाद्य मुद्दे टाळले जातात.

**भारताचा सार्क देशांशी व्यापार**

(India's Trade with SAARC)

भारताने नेपाळ, बांगलादेश, भूतान व श्रीलंकेबरोबर द्विपक्षीय करार केले आहेत. 'सार्क'च्या सभासद देशांत भारत भौगोलिक व आर्थिक दृष्ट्या प्रगत असल्याने सार्कच्या व्यापारामध्ये भारताचा वाटा सर्वाधिक आहे. भारताचा सार्क देशांशी असणारा व्यापारतोल हा सतत अनुकूल आहे. १९८० मध्ये भारतातून सार्कच्या इतर देशात झालेल्या निर्यातीचे मूल्य ३०७ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स तर आयातीचे मूल्य १४१ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स होते १९८७-१९८८ मध्ये भारतातून सार्कच्या इतर देशात झालेल्या निर्मितीचे मूल्य ४०६ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स तर आयातीचे मूल्य ९८ दशलक्ष डॉलर्स होते व भारताच्या व्यापारात ४०८ दशलक्ष डॉलर्सची शिल्लक होती. १९९८-९९ मध्ये भारताचे सार्क देशात आसलेल्या निर्यातीचे मूल्य ७१८७ दशलक्ष डॉलर्स होते आणि भारताच्या सार्क देशांशी असणारा व्यापार ५२४० दशलक्ष डॉलर्स एवढा शिलकी होता. म्हणजे व्यापारतोल अनुकूल होता.

भारताच्या निर्यातीपैकी सर्वाधिक निर्यात बांगलादेशात व त्यानंतर श्रीलंकेत झाली आहे.

भारताच्या सार्क सदस्य देशाशी असणाऱ्या व्यापाराबाबत असे दिसून येते किंवा निष्कर्ष येतात की
१. भारताचा व्यापारतोल सतत अनुकूल आहे.

२. भारताचा सार्क देशांशी असणारा निर्यात व्यापार १९८० मध्ये ३०७ दशलक्ष डॉलर्स वरून १९९८-९९ मध्ये ७१८७ दशलक्ष डॉलर्स पर्यंत वाढला.
३. भारताच्या एकूण निर्यातीत सर्वाधिक निर्यात बांगला देशात होते.
४. भूतान व मालदीव देशात झालेल्या निर्यातीचे मूल्य अतिशय कमी दिसून येते.
५. निर्यातीप्रमाणे आयातीचा सुद्धा मालदीवचा वाटा अतिशय कमी होता.
६. श्रीलंकाच्या असणाऱ्या व्यापाराचा विचार केल्यास भारतातून होणाऱ्या निर्यातीचे मूल्य आयात मूल्यांपेक्षा नेहमीच अधिक राहिले आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. सार्कची उद्दिष्ट्ये कोणती ?

२. सार्कवर थोडक्यात टिप लिहा.

## १५.३ प्रश्नमालिका

प्र.१ आर्थिक विकासातील विविध व्यापारी गटांची भूमिका थोडक्यात स्पष्ट करा.
प्र.२ नाफ्ता (NAFTA) वर टिप लिहा.
प्र.३ साफ्ता (SAFTA) वर टिप लिहा.
प्र.४ सार्क (SAARC) वर टिप लिहा.

❖❖❖